THE BOOK WAS DRENCHED

TEXT PROBLEM WITHIN THE BOOK ONLY

UNIVERSAL
LIBRARY
OU_192796
UNIVERSAL
LIBRARY

अध्यात्मग्रंथमाला

" तेसें अध्यात्मशास्त्रीं इये । अंतरंगचि अधिकारिये ।
परि लोकु वाक्चातुर्यें । होईल सुखिया ॥ "

ज्ञानेश्वरी १८.१७५०

ग्रंथांक ४

रामदासवचनामृत

रा. द. रानडे, एम्. ए.

किंमत १॥ रुपया.

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें

१ Academy of Philosophy and Religion, Post Deccan Gymkhana, Poona.

२ अध्यात्मविद्यापीठ, पोष्ट निंबाळ, जिल्हा विजापूर.

३ आर्यभूषण प्रेस, पुणें.

४ गणेश प्रिंटिंग वर्क्स, शनिवार पेठ, पुणें.

५ सर्व बुकसेलर्स, पुणे, मुंबई, नागपूर वगैरे.

Checked 1951

Checked 1965

Checked 1969

हें पुस्तक रा. **अनंत विनायक पटवर्धन** यांनीं
आर्यभूषण छापखाना, पुणें, येथें छापिलें.
व तें प्रो. **रामचंद्र दत्तात्रेय रानडे** यांनीं
पुणें येथें प्रसिद्ध केलें.

अध्यात्मग्रंथमाला

१. या ग्रंथमालेचें मुख्य प्रयोजन म्हणजे लोकांस परमार्थाचें उज्ज्वल स्वरूप महाराष्ट्रवाङ्मयांतून उघड करून सांगणें हें होय. ज्ञानेश्वरांपासून रामदासांपर्यंत जे साधु महाराष्ट्रांत निर्माण झाले त्यांनीं अशा प्रकारची उज्ज्वल ग्रंथरचना मराठींत करून ठेविली आहे कीं तिचें वाङ्मयदृष्ट्या व परमार्थदृष्ट्या फारच मोठें महत्त्व आहे. परमार्थाबद्दलच्या निरनिराळ्या भ्रामक कल्पनांचें निरसन करून शुद्ध परमार्थाचें स्वरूप समजावून देणें हें महाराष्ट्रवाङ्मयाचें पवित्र कर्तव्य आहे. हें कार्य महाराष्ट्रवाङ्मयांतून जितक्या उत्कृष्ट रीतीनें सिद्धीस गेलें आहे तितकें हिंदुस्थानच्या इतर प्रांतिक भाषांतून, अगर पाली अगर प्राकृत भाषांतून, अगर खुद्द संस्कृतभाषेंतूनही सिद्धीस गेलें आहे किंवा नाहीं याची शंकाच आहे. नुसतें परमार्थाचें खरें स्वरूप समजून देण्याचें सामर्थ्य महाराष्ट्रवाङ्मयांत आहे इतकेंच नव्हे, तर सर्व धर्मांचें एकीकरण करण्याचें सामर्थ्यही महाराष्ट्रवाङ्मयांत आहे. धर्माधर्मांतील लढे केवळ अज्ञानामुळें उत्पन्न होतात; पण परमार्थाचें शुद्ध स्वरूप कळल्यास ते लढे नाहींसे करण्याचें सामर्थ्य त्यांत आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. यामुळें आमच्या महाराष्ट्राच्या धार्मिक वाङ्मयाचा सशास्त्र अभ्यास होणें किती जरूरीचें आहे हें सांगण्याचें कारण नाहीं.

२. आज या अध्यात्मग्रंथमालेंतील पहिलीं चारच पुस्तकें प्रसिद्ध होत आहेत. हीं चार पुस्तकें म्हटलीं म्हणजे महाराष्ट्राच्या धार्मिक वाङ्मयाचा संपूर्ण निष्कर्ष होय. पहिल्या पुस्तकांत ज्ञानेश्वरींतील उताऱ्यांची विषयवार रचना करून ज्ञानेश्वरांची सर्वांगीण पारमार्थिक शिकवण कशी होती हें संपूर्ण रीतीनें त्यांच्याच शब्दांत सांगण्याचा प्रयत्न केला आहे. दुसऱ्या पुस्तकांत तीन भाग आहेत.

पहिल्या भागांत निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, व चांगदेव यांनीं जी अभंगरचना केली आहे तिचा संपूर्ण गोषवारा त्यांच्याच शब्दांत दिला आहे. दुसऱ्या भागांत नामदेव व तत्कालीन संतकवि यांच्या निवडक अभंगांची विषयवार रचना करून परमार्थाचें रहस्य त्यांच्या तोंडून सांगितलें आहे. या संतकवींमध्यें ज्यांचे ज्यांचे अभंग उपलब्ध आहेत अशा सर्व संतांचा उल्लेख करण्याचा प्रयत्न केला आहे. गोरा कुंभार, विसोबा खेचर, सांवता माळी, नरहरि सोनार, चोखामेळा, जनाबाई, सेनान्हावी, कान्होपात्रा, या सर्व जातींच्या व व्यवसायांच्या संतांचा उल्लेख येथें केला आहे. तिसऱ्या भागांत भानुदास, जनार्दनस्वामी, व एकनाथ यांच्या अभंगांची विषयवार निवड करून त्यांच्या तोंडून परमार्थाचें रहस्य सांगितलें आहे. अध्यात्मग्रंथमालेच्या तिसऱ्या पुस्तकांत संतशिरोमणि तुकारामांचें अध्यात्मचरित्र व अध्यात्मोपदेश त्यांच्याच वचनांच्या आधारें सांगितला आहे. शेवटच्या म्हणजे चवथ्या पुस्तकांत रामदासांच्या दासबोधं व इतर संकीर्ण ग्रंथांच्या आधारें रामदासांची पारमार्थिक व व्यावहारिक शिकवण कशी होती हें सांगितलें आहे. यावरून ही गोष्ट उघड होईल कीं, हीं चार पुस्तकें म्हणजे महाराष्ट्रधर्माचा मूळरूपानें संपूर्ण इतिहासच होय. या चारी पुस्तकांस विस्तृत विवेचनात्मक प्रस्तावना जोडल्या असून त्यामध्यें त्या त्या साधूंचें पारमार्थिक वर्म शक्य तितकें उघड करून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळें या चारी पुस्तकांचा अभ्यास केल्यास महाराष्ट्रवाङ्मयामध्यें परमार्थाचें रहस्य निरनिराळ्या संतांनीं कसें सांगितलें आहे हें पूर्णपणें निदर्शनास येईल. ज्ञान, भक्ति, व कर्म यांचा त्रिवेणीसंगम जर कोठें झाला असेल तर तो आमच्या महाराष्ट्रवाङ्मयांतच होय. ज्ञानेश्वरांप्रमाणें ज्ञानी, नामदेवतुकारामांप्रमाणें भक्तिमान्, व रामदासांप्रमाणें कर्मयोगी लोक आमच्या महाराष्ट्रांतच निर्माण झाले. आजचा आपला प्रसंग

ज्ञान, भक्ति, व कर्म यांचा समुच्चय करण्याचा आहे. यामुळेंही या ग्रंथमालेच्या अभ्यासाचें किती महत्त्व आहे हें सांगावयास नको.

३. आजकाल आपल्या विश्वविद्यालयांतून महाराष्ट्रभाषेचें अध्ययन जारीनें सुरू होत आहे ही फार आनंदाची गोष्ट आहे. जें स्थान इंग्रजी भाषेमध्यें चॉसर्, शेक्सपियर्, मिल्टन्, वर्ड्सवर्थ् इत्यादिकांनीं पटकावलें आहे, तेंच स्थान वाङ्मयदृष्टीनें ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, व रामदास यांनीं महाराष्ट्रभाषेंत पटकावलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. बायबलचा ज्याप्रमाणें वाङ्मयाच्या दृष्टीनें अभ्यास होतो, त्याप्रमाणेच आमच्या साधूंच्या ग्रंथांचा वाङ्मयाच्या दृष्टीनेंही अभ्यास व्हावयास पाहिजे. रवींद्रनाथ टागोर यांचा गीतांजलि हा ग्रंथ उत्कृष्ट आहे यांत शंका नाहीं; परंतु तुकारामज्ञानेश्वरांचें अध्ययन केलें असतां त्यांचे ग्रंथ तितकेच किंवा त्याहूनही सरस आहेत हें वाचकांच्या ध्यानांत येईल. किंबहुना, तुकारामज्ञानेश्वरादिकांच्या अगर तत्सदृश साधूंच्या वचनांचा फैलाव जो हिंदुस्थानांत झाला त्याचें गीतांजलि हें एक आधुनिक निदर्शन आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. या कारणास्तव महाराष्ट्रवाङ्मयाच्या व महाराष्ट्रधर्माच्या आधारभूत असलेल्या या ग्रंथांचा अभ्यास आमच्या विश्वविद्यालयांतून अवश्य व्हावयास पाहिजे. चमत्कारांच्या दृष्टीनें या साधूंच्या चरित्रांकडे न पाहतां त्यांच्या ग्रंथोक्तींच्या दृष्टीनें त्यांजकडे पहावयास आपण शिकलें पाहिजे; व अशा रीतीनें त्यांजकडे पाहिलें असतां बुद्धिवादास पटेल अशाच प्रकारचा अनुभव (Rational Mysticism) त्यांच्या ग्रंथांत सांगितला आहे असें दिसून येईल.

४. "अध्यात्मविद्यापीठ"(Academy of Philosophy and Religion) या संस्थेतर्फे हिंदी तत्त्वज्ञानाचा इतिहास जो सोळा भागांत लिहिण्यांत यावयाचा आहे, त्यांतील पंधराव्या भागांत हीं

आजचीं चारही पुस्तकें अंतर्भूत होतात. या चार मूळ पुस्तकांवर विवरणात्मक " Mysticism in Maharashtra " या नांवाचा ग्रंथ हा त्या हिंदीतत्त्वज्ञानाच्या इतिहासांतील दहावा भाग होय; व तो लौकरच छापून बाहेरही निघेल. या ग्रंथाचें अध्ययन व वाचन विशेषतः युरोपांत अधिक होणार. त्यांत जीं प्रमेयें केलीं आहेत त्यांस आधारभूत अगर उपकरणभूत म्हणून हे आजचे चार ग्रंथ प्रकाशित होत आहेत, ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे. या कारणामुळेंच या चार पुस्तकांतील कांहीं पुस्तकांच्या शेवटीं इंग्रजी हेडिंगें घातलीं आहेत, त्यांचा मुख्य उद्देश म्हटला म्हणजे पाश्चात्य लोकांनीं आमच्या महाराष्ट्रभाषेचा अभ्यास करून त्यांतील चिद्रत्नें ओळखण्यास शिकलें पाहिजे हा होय.

५ या अध्यात्मग्रंथमालेंतील पुढील पुस्तकें जसजशीं तयार होतील तसतशीं तीं प्रसिद्ध करण्यांत येतील. आज त्यांचा नामनिर्देश करण्याचें कारण नाहीं. तूर्त आजचे चारच ग्रंथ प्रकाशित होत आहेत. पुढें मार्गे जुळून आल्यास, पाश्चात्य व पौर्वात्य तत्त्वज्ञांचे व सत्पुरुषांचे विचार व अनुभव जमेस धरून, शास्त्रीय दृष्टीचा निकष लावून, स्वानुभवास पडताळून, चिकित्सक बुद्धीनें आधुनिक लोकांस परमार्थाच्या दृष्टीनें उपयोगी पडेल अशा प्रकारचा एक ग्रंथ लिहिण्याची जरूरी आहे; त्यास हे आजचे चारही ग्रंथ उपयोगी पडतील असा भरवसा आहे.

रा. द. रानडे.

प्रस्तावना.

१. श्रीसमर्थ रामदास याच्या चरित्रासंबंधानें खात्रीलायक पुरावा पाहिजे असल्यास तो "वाकेनिशीप्रकरण" या नावाच्या प्रकरणांत सांपडेल. रामदासाचा काल माघ वद्य ९ शके १६०३ या रोजीं झाला. यानंतर चारच दिवसांनी म्हणजे माघ वद्य त्रयोदशीस रामदासाचे पट्टशिष्य दिवाकर गोसावी यांनी सांगितल्यावरून रा. अंताजी गोपाळ वाकनीस यांनीं रामदासाच्या चरित्राचें टिपण करून ठेविलें आहे. इतिहाससंशोधक रा. राजवाडे हे कांहीं वर्षांपूर्वी चाफळास गेले असतां त्यास हें " वाकेनिशीप्रकरण " तेथील एका दप्तरांत उपलब्ध झालें. रामदासाचा मुख्य मठ चाफळास असल्यानें तेथें उपलब्ध झालेल्या या वाकेनिशी प्रकरणाचें महत्त्व किती आहे हे सांगणे नकोच. हनुमंतस्वामींनीं जी रामदासाची बखर लिहिली ती प्रथम शके १७१५ त लिहून नंतर शके १७३९ मध्यें त्यांनी वाढवून ती पुनः लिहिली. रामदासस्वामींच्या निधनानंतर सरासरी शंभर वर्षांनी लिहिलेल्या या बखरीपेक्षां रा. अंताजी गोपाळ वाकनीस यांनीं जें रामदासस्वामींच्या निधनानंतर चारच दिवसांनीं " वाकेनिशीप्रकरण " लिहिलें आहे त्याची किंमत फारच आहे हे सांगणें नको. या प्रकरणांत ज्या कांहीं अद्भुत चमत्काराच्या गोष्टी सांगितल्या आहेत त्या सोडून दिल्या, तरी त्याच्या मुळाशीं बरेंच ऐतिहासिक सत्य आहे हे वरवर पहाणाऱ्यासमुद्धां दिसून येईल; व हें सत्य काय आहे याचा आपण आतां विचार करूं.

२. शके १५३० चैत्र शुद्ध ९ रामनवमीचे दिवशीं रामदासाचा जन्म झाला.

शके १५३७ रामदासांच्या वडिलांचे निधन

शके १५४२ रामदास जांबगांवाहून टाकळीस पळून गेले. याबद्दल दोन गोष्टी उपलब्ध आहेत. एक, रामदासाच्या आईनें अत्याग्रह केल्यावरून आपल्या भाचीशीं लग्न करण्याचें कबूल करून रामदास ' सुमुहूर्ते सावधान ' म्हटल्याबरोबर मंडपांतून पळून गेले. दुसरी गोष्ट अशी आहे कीं, रामदासाचे ज्येष्ठ बंधु गंगाधरपंत यांजजवळ रामदासांनी मंत्र मागितला असतां त्यांनी तो देण्याचें नाकारलें, म्हणून ईश्वराच्या शोधार्थ रामदास नाशिकजवळ टांकळी येथें गेले.

शके १५४२–५४ रामदासाचें टांकळी येथें नदीवर मध्यान्हापर्यंत गायत्री पुरश्चरण, व मध्यान्हानंतर रामजपयज्ञ. रामदासांस श्रीरामचंद्राचा साक्षात्कार.

शके १५५४–६६ पुरश्चरण सपल्यावर रामदासांनी केलेल्या तीर्थयात्रा. रामदासांनी या अवधीत ज्या तीर्थयात्रा केल्या व जे देश पाहिले त्यांचें वर्णन त्यांनींच थोडेंबहुत "तीर्थावळी" या प्रकरणांत करून ठेविलें आहे (विविध विषय, खंड २, पहा.)

शके १५६६ ईश्वरी संकेतानुसार रामदास कृष्णातटाकीं येऊन हाच देश आपला सांप्रदाय वाढविण्यास योग्य आहे असें समजून तेथें राहिले.

शके १५६९ या साली अगापुरच्या डोहांतून रामाची मूर्ति रामदासांस मिळाली.

शके १५७० या मूर्तीची स्थापना त्यांनी चाफळ येथें कृष्णातटाकीं आल्या-वर चार वर्षांनी केली. ती मूर्ति अद्यापिही पहावयास सांपडते.

शके १५७१ वाकेनिशी प्रकरणाप्रमाणे या साली रामदासांनी शिवाजीस चाफळनजीक शिंगणवाडी येथील बागेंत वैशाख शुद्ध ९ गुरुवार या रोजी अनु-ग्रह दिला. याबद्दल भिन्न मतही आहे, त्याचा पुढें निर्देश करण्यांत येईल.

शके १५७१ आषाढमासी रामदास पंढरपुरास विठोबाच्या दर्शनार्थ गेले. त्यावेळेसच त्यांनी विठ्ठल व राम याबद्दलचें आपलें सुंदर पद केलें असेल (क्रमांक १३१). तुकाराम व रामदासांची तुकारामांच्या निधनापूर्वी भेट झाली होती अशी जी दंतकथा आहे तिचा प्रसंग कदाचित् रामदासांची ही पंढरपुरची यात्राच असेल. तुकाराम शके १५७२ फाल्गुनांत समाधिस्थ झाले. तेव्हां त्यांची व रामदासाची भेट होणें अशक्य दिसत नाही.

शके १५७२ वाकेनिशी प्रकरणाप्रमाणे या साली रामदास परळीस रहावयास गेले. इतर मताप्रमाणें शिवाजीस राज्याभिषेक झाल्यावर रामदास सज्जनगडावर रहावयास गेले.

शके १५७७ या साली शिवाजीनें आपलें राज्य समर्थांच्या झोळींत टाकिलें.

शके १५७७ समर्थ जांबेस आपल्या मातोश्रींचें निधनप्रसंगीं अचानक गेले, व त्यांस मातोश्रींचें शेवटचें दर्शन झालें.

शके १५९६ मध्यें शिवाजीस राज्याभिषेक झाला. राज्याभिषेक झाल्यावर शिवाजी दीड महिनापर्यंत सज्जनगडास येऊन राहिला, व त्यानें तेथें बरीच रक्कम अन्नसंतर्पण, परमार्थकार्य, वगैरेंत खर्च केली.

शके १५९६ याच साली हिंवाळ्यांत समर्थ कोंकाणांमध्यें हेळवाकच्या घळींत होते. तेथें त्यांस कफाचा व तापाचा बराच विकार झाला. हेळवाकास रघुनाथभट यांनीं समर्थांस बराच उपचार केला. रामदास चाफळाच्या उष्ण हवेंत आल्यावर त्यांनीं रघुनाथभट यांस स्वदस्तुरचें लिहिलेलें पत्र उपलब्ध आहे (क. १०९). त्याचा उल्लेख पुढें येईलच.

शके १५९९ मध्यें रामीरामदासांचा देहांत झाला.

शके १६०० त रामदासांनी राम, लक्ष्मण, व सीता यांच्या मूर्ती तंजावर मध्यें करावयास घातल्या.

शके १६०० आश्विन शुद्ध १० स म्हणजे दसऱ्याच्या दिवशी शिवाजीने रामदासांस करून दिलेली सनद अद्याप चालू आहे. ती पुढें दिलेलीच आहे. (क. ११५).

शके १६०० रामदासांनी कल्याणांस डोमगावीं मठ करून राहण्यास सांगितलें.

शके १६०१ पोष महिन्यांत शिवाजी महाराज रामदासांच्या भेटीस आले. ही भेट शेवटचीच होय असें रामदासानी शिवाजीस सुचविलें. यानंतर शिवाजी महाराज फार दिवस राहिले नाहीत.

शके १६०२ चैत्रमासी शिवाजीचा अंत झाला, व संभाजी आपला अमात्य रामचंद्रपत यांस घेऊन ज्येष्ठमासी रामदासांच्या दर्शनास आला, व तेथें आठ दिवस राहिला.

शके १६०३ माघ शुद्ध १ स तंजावरहून मूर्ति आल्या. माघ वद्य ५ समर्थांनी त्यांची स्थापना सज्जनगड येथें केली. हल्ली रामदासांच्या समाधिवर सज्जनगड येथें ज्या मूर्ति दिसतात त्या याच होत.

शके १६०३ माघ वद्य नवमी रोजीं समर्थांनीं देह ठेविला.

३. वरील शकावलींत एका महत्त्वाच्या मुद्यासंबधानें विद्वान् लोकांमध्यें वाद माजून राहिला आहे; तो मुद्दा म्हटला म्हणजे रामदासांनीं शिवाजीस अनुग्रह केव्हां दिला यासंबंधीं होय. आजपर्यंत प्रचलित असलेल्या मतांप्रमाणें वाकेनिशी-

प्रकरणांत दिल्याप्रमाणें रामदासांनी शिवाजीस शके १५७१ या साली अनुग्रह दिला. हें मत वाकेनिशीप्रकरण व हनुमंत स्वामीची बखर याच्या बरहुकूम असून रा. देव व राजवाडे यांस तें अभिप्रेत आहे. याच्या विरुद्ध मताचें प्रतिपादन प्रो. भाटे व चांदोरकर यांनी केलें आहे. या मताप्रमाणें शिवाजीस रामदासांनी शके १५९४ मध्ये अनुग्रह दिला. या दोन मतांमध्ये दक्षिण व उत्तर ध्रुव यांइतकें अंतर आहे हें उघडच दिसत आहे. रा. देव व राजवाडे यांचे मत खरें असल्यास शिवाजीच्या कारकीर्दीच्या अव्वलपासूनच रामदासांचें शिवाजीवर पारमार्थिक वर्चस्व असल्यानें शिवाजीचा राज्यविस्तार बहुशः रामदासाच्या नेतृत्वाखाली झाला असला पाहिजे. याच्या उलट रा. भाटे व चांदोरकर यांचें मत खरें असल्यास रामदासांचें शिवाजीवर वर्चस्व शिवाजीच्या कारकीर्दीच्या अखेरीसच प्रस्थापित झालें असल्यानें शिवाजीस रामदासांपासून राज्यस्थापनेची स्फूर्ति मिळाली हें म्हणणें फोल होतें. ही मतें इतकी परस्परविरोधी आहेत की त्यातून मार्ग काढणें कठीण आहे. शिवाय दोहीकडे कागदपत्रांचा पुरावा असल्यानें दोन्ही मतें जणूं काय अभेद्यच आहेत अशी वाटतात. तथापि तारतम्यबुद्धीनें यांतील कोणतें ग्राह्य आहे याचा आपण थोडक्यांत येथे विचार करूं.

४. भाटे व चांदोरकर यांच्या मताप्रमाणें (१) केशव गोसावी यांनी दिवाकर गोसावी यांस शके १५९४ मध्यें जें पत्र लिहिलें आहे त्यात 'राजे यांची पहिलीच भेट आहे. वाडीचे लोकास खटपेटस अणावे...झाडी बहुत आहे' असा उल्लेख आहे. तसेंच (२) शके १५८० मध्यें भास्कर गोसावी यांनी दिवाकर गोसावी यांस जें पत्र लिहिलें आहे त्यांत त्यांनी 'शिवाजी राजे यांच्याकडे भिक्षेस गेलो...आम्हीं बोललो की आम्ही रामदासी. श्रीसमर्थांचे शिष्य चाफळास हों. मग ते बोलले की ते कोठे राहतात व मुळ गांव कोण ?' असा उल्लेख आहे. (३) याशिवाय ज्यांवर तारीख नाही अशी दिवाकर गोसावी यांची दोन पत्रें उपलब्ध आहेत. त्यांच्या ताजाकलमांत शिवाजीस शिंगणवाडी येथें परिधावी संवत्सरी परमार्थ झाला असा अनंत गोसावी व चिमा अक्का यांचा अनुक्रमें उल्लेख आहे. या मताप्रमाणें पाहिलें असतां रामदासांची व शिवाजीची भेट शके १५९४ मध्यें झाली, शके १५८० पर्यंत रामदास कोण होते हें शिवाजीस माहीतही नव्हतें, व परिधावी संवत्सर शके १५९४ मध्यें पडत अस-

त्यानें आजपर्यंत शके १५७१ मध्यें रामदासांनी शिवाजीस अनुग्रह दिला असें जें मत प्रचलित आहे तें खोटें ठरतें.

५. याच्या विरुद्ध रा. देव व राजवाडे याचे म्हणणें असें आहे की ज्या पत्रांवर रा. भाटे व चांदोरकर यांची भिस्त आहे ती पत्रें अस्सल नसून नक्कल आहेत. व शिवाय त्यांत जे शक लिहिले आहेत ते स्पष्ट नाहीत, अगर त्यांत हस्तदोष आहे. शिवाय ती पत्रें अस्सल आहेत असें जरी धरून चाललें तरी त्या पत्राचा अर्थ दुसऱ्या रीतीनें लावता येण्यासारखा आहे. (१) पहिल्या पत्रात शिवाजी राजे याची पहिलीच भेट आहे असा जो उल्लेख आहे तो रामदासांच्या भेटीविषयी नसून शिवाजीने चाफळ येथील मठास शके १५९४ मध्यें जी भेट दिली तीस अनुलक्षून आहे. रा. दत्तोपंत आपटे यानी ही सूचना पुढें माडली आहे. या सूचनेस दुजोरा म्हणून वरील पत्र लिहिल्यावर चारच महिन्यांनी शिवाजी राजे यांनी दत्ताजीपंत वाकेनिवीस यांस जें पत्र लिहिलें आहे त्यांत ' चाफल येथें रामदास गोसावी आहेत. श्रीचें देवालय केले आहे...तथ कटकीचे सिपाही लोक व बाजे लोक राहतातो...चोरा चिरटियाही उपद्रव होउ न दणें ' असा जो उल्लेख आहे तो शिवाजी राजे यानी चाफळमठास शके १५९४ सालीं भेट दिली त्यानंतरचा आहे. (२) रा. भाटे व चांदोरकर यांच्या दुसऱ्या मुद्यांत भास्कर गोसावी यांशी बोलतांना शिवाजी राजे यांनी हे रामदासाचेच खरे शिष्य आहेत किंवा नाहीत याची परीक्षा पाहण्याकरितांच त्यांस प्रश्न केला असावा असें रा. देव व राजवाडे यांचें म्हणणें आहे. (३) रा. भाटे व चांदोरकर यांच्या तिसऱ्या मुद्यांत दिवाकर गोसावी यांची जीं दोन पत्रें उद्धृत केली आहेत त्यांत परिधावी संवत्सरी परमार्थाचा उल्लेख मुळामध्यें केला गेला नसून त्यांच्या ताजाकलमांत केला आहे, म्हणून तो मुळाइतका विश्वसनीय नाहीं. शिवाय, जरी शके १५७१ मध्यें प्रथम रामदासाचा शिवाजीस अनुग्रह झाला असला, तथापि त्याची पुनरावृत्ति शके १५९४ मध्यें झाली असण्याचा संभव आहे.

६. याशिवाय प्रो. भाटे व चांदोरकर यांच्या मताविरुद्ध दोन तीन कारणें आहेत त्यांचाही येथें उल्लेख केला पाहिजे. (४) रामदास शिवाजीचे केवळ ' मोक्षगुरु किंवा धर्मगुरु ' होते व त्यांचें मूळपासून राजकारणाकडे लक्ष नव्हतें

असें म्हणून चालावयाचें नाहीं. आम्ही उद्धृत केलेल्या दासबोधांतील ज्यांत तुळजाभवानीचा उल्लेख आहे अशा पहिल्या उताऱ्यावरून, शिवाय रामदासांनीं तुळजादेवीस " तुझा तूं वाढवी राजा । सीघ्र आम्हांचि देखतां " (क्र. ११२ , या उताऱ्यावरून, व शिवाय आनंदवनभुवन (क्र. ११६) या सर्व उताऱ्यांवरून रामदासांचें राजकारणाकडे मूळपासून लक्ष नव्हते असें म्हणणें चुकीचें होईल. शिवाय शके १५८३ मध्यें प्रतापगडावर तुळजाभवानीची स्थापना रामदास यांच्याकडूनच झाली असल्याबद्दलचा पुरावाही आहे ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे. (५) संभाजी यानें रामदासांचे शिष्य वासुदेवगोसावी यांस शके १६०२ मध्यें जी सनद दिली आहे त्यांत चंद्र पचवीस, जिल्हेज, सन इहिदे सबइन अलफ म्हणजे शके १५९३ मध्यें शिवाजीनें वासुदेव गोसावी यांस दिलेल्या सनदेचा उल्लेख केला आहे. हा शक शके १५९४ च्या पूर्वीचा असल्यानें रामदासांस मात्र शिवाजी शके १५९४ पर्यंत ओळखीत नाहीत व त्यांचे शिष्य वासुदेवगोसावी यांस शके १५९३ मध्यें सनद देण्याइतकें ओळखितात ही मोठ्या चमत्काराची गोष्ट आहे असें रा. देव यांनी म्हटलें आहे. (६) परंतु आमच्या मतें आतांपर्यंत उपलब्ध असलेल्या पुराव्यांत शके १६०० आश्विन शुद्ध १० या रोजी शिवाजीनें रामदासांस जी सनद करून दिली आहे (क्र. ११५) ती सनदच सर्वांत श्रेष्ठ आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. या सनदेंत रामदासांनी चाफळास श्रीची स्थापना केल्यापासून म्हणजे शके १५७० पासूनच आपल्या व रामदासांच्या संबंधाचा जो साद्यंत वृत्तांत शिवाजीनें लिहिला आहे त्यावरून रामदासांची व शिवाजीची भेट शके १५९४ मध्यें झाली या मतास गौणत्व येतें. (१) चाफळची स्थापना, (२) राजकारण व धर्मस्थापनेचा उपदेश, (३) संपादिलेल्या राज्याचें रामदासचरणीं समर्पण, (४) राजकारणाचा पुनः उपदेश, (५) साम्राज्यप्राप्तीनंतर चाफळास इनाम, या सर्व गोष्टींचा उलगडा रामदासांचा शिवाजीशीं शके १५९४ च्या अगोदर बरींच वर्षे संबंध आला असला पाहिजे असें मानल्यावांचून सुसंगत रीतीनें होत नाहीं. तथापि आणखी कांहीं ऐतिहासिक पुरावा बाहेर आल्यावर याबद्दल यापेक्षां अधिक निश्चित रीतीनें लिहितां येईल.

७. रामदासांच्या ग्रंथांपैकीं दासबोध हा भक्तिग्रंथराज आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. रामदासांच्या वेळेसच या ग्रंथाच्या तीन वाढविलेल्या आवृत्त्या

निघाल्या असाव्या असें वाटतें. दासबोध ग्रंथाची मूळ कल्पना ' एकवीस समासी ' अगर ' जुना दासबोध ' या नावानें जो ग्रंथ प्रसिद्ध आहे त्यांत आहे. या जुन्या दासबोधांत व हल्लींच्या आपल्या दासबोधांत पुष्कळ प्रकरणें सारखीच आहेत. त्यांचा जिज्ञासूंनीं अवश्य अभ्यास करावा. यानंतर सत्तर समासांमध्यें दासबोध वाढविण्याची कल्पना रामदासांस सुचली असावी, व त्याबरहुकूम हल्लीच्या दासबोधाचे पहिले सात दशक लिहिले गेले असावे. दासबोधांतील दशक ७ समास १० यांतील ४२ वी ओंवी "सरली शब्दाची खटपट । आला ग्रथाचा शेवट । येथें सांगितलें पष्ट सद्गुरुभजन ॥" या व पुढील ओंव्यांवरून प्रथम दासबोधाची समाप्ति येथेंच करण्याचा रामदासांचा विचार असावा असें दिसतें. नंतर प्रसंगानुरूप वाढत वाढत जाऊन इतर समासांची त्यांत भर पडून हल्लीचा दासबोध ग्रंथ झाला आहे. दासबोध ग्रंथ लिहिण्यास दहा वर्षें लागतील असा संकल्प करून रामदास शके १५७६ मध्यें शिवथरच्या घळींत जाऊन बसले असें दिवाकर गोसावी यांनी चाफळहून बहिरामभट यांस लिहिलेलें पत्र उपलब्ध आहे त्यावरून दिसतें. यावेळीं दासबोध ग्रंथ लिहिण्यास सुरुवात झाली असावी. दासबोधांतील दशक ६ समास ४ हा शके १५८१ मध्ये लिहिला आहे असें त्यांतील सातव्या ओवीच्या " च्यारि सहस्र सातशे साठी । इतुकी कलयुगाची राहाटी " या अंतःपुराव्यावरून सिद्ध होतें. शिवाय अठराव्या दशकांतील ६ वा समास की ज्यांत रामदासांनी शिवाजीस अफझुलखानाचे भेटीचे वेळीं उपदेश केला आहे असें दिसतें तोही शके १५८१ मध्यें लिहिला गेला असावा. एकंदरीत शके १५८१ हें साल दासबोधग्रंथाच्या रचनेंत महत्त्वाचें आहे असें म्हणण्यास हरकत नाही. दासबोधाच्या दोन मूळ प्रतीं आपल्यास उपलब्ध आहेत. डोमगांव मठांतील कल्याणांनी लिहिलेली व रा. देवांनी प्रसिद्ध केलेली एक प्रत, व शिरगाव मठातील कल्याणांचे बंधु दत्तात्रय यांनीं लिहिलेली व ग्वाल्हेरीस रा. पांगारकर यांस उपलब्ध झालेली शके १६०६ मधील दुसरी प्रत. या दोन्ही प्रती शोधून काढण्याबद्दल व रामदासांचा मूळ दासबोध आपल्यास दिल्याबद्दल रा. देव व पांगारकर यांचे जितके आभार मानावे तितके थोडेच आहेत. रा. देवांनी आपल्यास समर्थसेवेस वाहूनच घेतलें आहे. मूळप्रतीबरहुकूमच त्यांनीं समर्थांचे जे ग्रंथ

आजपर्यंत छापले आहेत त्यांतूनच होतां होईल तों पुढील वेंचे घेण्यांत आले आहेत. परंतु जे समर्थांचे ग्रंथ अद्याप अप्रकाशित आहेत त्यांबद्दल दुसरीकडून वेंचे घेण्याची योजना केली आहे. रामदासांच्या मूळ ग्रंथांपैकीं पण अद्याप अप्रकाशित अशा " दासबोधाच्या सोलीव अर्था " तील एका उताऱ्याबद्दल रा. रा. गणेश गोविंद कारखानिस यांचे विशेष आभार मानले पाहिजेत. दासबोधाचा सोलीव अर्थ काय आहे हे या उताऱ्यावरून सहज कळेल. रामदासाच्या संकीर्णग्रंथांपैकी करुणाष्टकें, मनाचे श्लोक, जनस्वभावगोसावी, इत्यादि प्रकरणे या पुस्तकाच्या दुसऱ्या भागांत उध्दृत केलीं आहेत ती वाचकांच्या नजरेस येतीलच.

८. रामदासांच्या समकालीन मंडळीमध्यें त्यांचे वडिल बंधु रामीरामदास यांचा येथें प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे. रामीरामदास हे रामदासांच्या अगोदर तीन वर्षे जन्मून रामदासांच्या अगोदर तीन वर्षे समाधिस्थ झाले. हे प्रत्यक्ष जरी रामदासीसांप्रदायामध्यें नव्हते, तथापि रामदासाचा व त्यांचा पुष्कळ संबंध आला असला पाहिजे हें उघड आहे. यांचे " भक्तिरहस्य " व " सुगमोपाय " हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. रामदासांच्या शिष्यांपैकी कल्याण हे प्रमुख होत. रामदासांच्या आज्ञेवरून रामदासांनी देह ठेवण्यापूर्वी तीन वर्षे हे डोमगांव येथें मठांत जाऊन राहिले; आणि रामदासांच्या देहावसानानंतर तेहतीस वर्षांनीं म्हणजे शके १६३६ त त्यांनी देह ठेविला. त्यांनी रामदासांच्या इतर कांहीं शिष्याप्रमाणें चाफळ व सज्जनगड येथील व्यवस्थेसंबंधीं तंट्यांत भाग घेतला नाहीं. रामदासांच्या शरीराचें शके १६०३ मध्यें सज्जनगडावर दहन केल्यावर त्यांच्या अस्थि चाफळ येथें आणून तेथील वृंदावनाखाली ठेवण्यांत आल्या. बरींच वर्षे त्या अस्थि गंगेस पोहोंचविण्यासंबंधीं विचार चालला होता. शेवटीं एकदां ज्या दिवशी त्या अस्थि गंगेस पोहोंचविण्याकरितां वृंदावनांतून बाहेर काढण्यांत आल्या, त्याच दिवशी कर्मधर्मसंयोगानें कल्याणांनी डोमगांव येथें आपला देह ठेविला. व गुरूच्या व शिष्याच्या अस्थि एकदमच चाफळाहून डोमगांवावरून काशीस नेण्यांत आल्या. रामदासांचे आणखी दोघे प्रमुख शिष्य म्हटले म्हणजे दिवाकर गोसावी व उद्धव गोसावी हे होत. या उभयतांमध्यें रामदासांच्या निधनानंतर बरींच वर्षे मठाच्या व्यवस्थेसंबंधीं तंटा चालला होता. रामदास जिवंत असतांनाच त्यांनीं दिवाकर गोसावी यांस मठाची व्यवस्था

करण्यासबंधी सांगितले होतें; आणि देहावसानाचे वेळी त्यांनी उद्धव गोसावी यांस मठाची व्यवस्था करण्यास सांगितलें. यामुळें उभयतांचा तंटा वाढत जाऊन शेवटी तें प्रकरण संभाजीपर्यंत गेलें. सभाजीनें दिवाकर गोसावी याच्या बाजूनें निकाल दिला. या निकालानें खिन्न होऊन उद्धव गोसावी जे एकदा शके १६०७ मध्यें टांकळीस जाऊन राहिले ते पुनः या प्रांताकडे आले नाहीत. शके १६२१ मध्यें त्यांचे देहावसान होईपर्यंत ते केवळ दुग्ध प्राशन करून होते. वासुदेव गोसावी याचा उल्लेख शिवाजी व संभाजी यांच्या सनदांसंबधी पूर्वी केलाच आहे. यांनी मंत्राची जोपासना बरोबर केली नाही म्हणून रामदासानी यास एकदां भरसभेंत ठोकून काढिलें. त्यावेळी ते जे एकदां रामदासासमोर जमिनीवर पडले ते रामदासांनी क्षमा म्हणेपर्यंत उठलेच नाहीत. आणखी रामदासांच्या शिष्यांपैकी " स्वानुभवदिनकर " या ग्रंथाचे कर्ते दिनकर गोसावी यांचा उल्लेख केला पाहिजे. नगर जिल्ह्यांतील तिसगांव मठाचे हे अधिपति असून स्वानुभवदिनकरांतील यांनी केलेलें योगाचें विवरण ज्ञानेश्वरीबरहुकूम असून फार वाचनीय आहे. रामदासांच्या शिष्यिणींपैकीं वेणुबाई व अक्का या प्रमुख होत. वेणुबाईचा " सीतास्वयंवर " या नावाचा ग्रथ प्रसिद्ध आहे. त्याचा मठ अद्यापि मिरजेस आहे. रामदासांच्या समोरच त्यानीं सज्जनगड येथें समाधि घेतली, ती आजतागायतही तेथें दृष्टीस पडते. अक्का या रामदासांनंतर चाळीस वर्षे राहिल्या. सज्जनगड येथें रामाच्या मूर्तीवर जें देऊळ बाधलें गेलें ते यांच्याच नेतृत्वाखाली होय. यांचीही समाधि सज्जनगड येथेंच आहे. गिरिधर हे वेणुबाई व बाईयाबाई यांचे शिष्य असून त्यांनी रामदासांस पाहिलें होतें. रामदासांनी समाधि घेतली त्यावेळी हे पंचवीस वर्षांचे असल्याने रामदासांचे चरित्र त्यांस पूर्ण अवगत असलें पाहिजे. हे बीड मठाचे अधिपति असून रामदासाच्या समोर त्यांनी एकदां कीर्तनही केलें होतें; यांचा ग्रंथ " समर्थप्रताप " हें एक समर्थांचें चरित्रच असल्यानें व तेंही प्रत्यक्ष समर्थांस पाहिलेल्या गृहस्थानें लिहिलेलें असल्यानें त्याची किंमत विशेष आहे. रामदासांनी समाधि घेतल्यावर अर्धशतकानें हा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथामध्यें १८·३६ यांत अफझुलखानाचा वध, चाफळ मठाचा जीर्णोद्धार, व प्रतापगड येथें शके १५८३ साली समर्थांकडून तुळजादेवीची स्थापना, या सर्वांचा उल्लेख आहे. आत्माराम यांनी " दासविश्रामधाम " या नांवाचा जो प्रचंड ग्रंथ लिहिला आहे त्यांतील सर्व कथा गिरिधरांच्या समर्थ-

मतापाइतक्या विश्वसनीय नसल्या, तथापि रामदासांची मुख्य शिकवण कोणती, रामदासांस अनुभव कसा प्राप्त झाला, वगैरे गोष्टींबद्दल त्यांतील मजकूर फार विचारणीय आहे.

दासबोधविवरण.

९. आतां आपण आपल्या प्रस्तुतच्या पुस्तकांत रामदासांच्या ग्रंथांतून जे उतारे घेतले आहेत त्यांच्या अल्पमात्र चर्चेकडे वळूं. सर्व विषयाचें संपूर्ण विवेचन करण्यास स्वतंत्र ग्रंथच लिहिला पाहिजे. तथापि या लहानशा प्रस्तावनेंत रामदासवचनामृताचे अल्पमात्र स्वारस्य तरी लोकांस देणें जरूरीचें आहे. क्रमांक १ यांमध्ये रामदासांनी अफझुलखानाचे भेटीचे वेळी शिवाजीस केलेला उपदेश ग्रथित केला आहे असें त्यांतील "म्लेंच दुर्जन उदंड। बहुतां देसांचें माजलें बंड" हे वाक्य, व शिवाजीस देवब्राह्मणांची चिंता वाहण्याविषयीं उपदेश, यांवरून सिद्ध होत आहे. क्रमांक २ मध्यें रामदासांनी आपल्या वेळेस ब्राह्मणांस अन्नसुद्धां मिळत नव्हतें, व म्लेंच्छांनीं व अन्य याति यांनीं (अर्थभेद्-रणांगणावर) राज्य पादाक्रांत केलें होतें असें लिहिले आहे. क्रमांक ३ मध्यें रामदासांनी आपल्या विश्वपाळित्या उपासनेचें वर्णन केलें असून नारायणाचें ध्यान केलें असतां लक्ष्मी भक्तांपासून जाणार नाही असें सुचविलें आहे. क्रमांक ४ मध्यें दुर्जनांचा संहार करणाऱ्या व भक्तांस आधारभूत अशा देवाचें स्मरण केलें असतां मनी इच्छिलेलें कार्य सिद्ध होतें; फक्त कर्तृत्वाचा अहंकार आपल्याकडे लावून घेऊं नये असें रामदासांनी सांगितले आहे.

१०. क्रमांक ५ पासून ज्ञानचर्चा सुरू झाली आहे. प्रथम क्रमांक ५ मध्यें भूगर्भशास्त्र, प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र, तर्कमीमांसा, भूतभविष्यज्ञान, दुसऱ्यांच्या जीवींचें ज्ञान, इत्यादि नानाप्रकारची जी ज्ञानें त्यांस ज्ञान हें नांव योग्य नसून आपलें स्वरूपदर्शन यासच ज्ञान म्हणावें, तोच मुख्य देव जाणावा, महावाक्याचा जप न करितां केवळ विचार करावा, सर्व संतांचें गुह्यज्ञान तें हेंच होय, स्वामी कृपेसहित अंतःकरणांत वसल्यास त्यासच ज्ञान म्हणावें, असें क्रमांक ६ मध्यें लिहिलें आहे. क्रमांक ७ यांत अशा ज्ञानाच्या योगानें सर्व पातकांचें भस्म होऊन पुण्य अमूप झाल्यानें आपली सीग सांडून जातें असें रामदासांनीं लिहिलें आहे. नंतर मुख्य देव कोणता याचा विचार सुरू होऊन

नानाप्रकारच्या मूर्ति वगैरे " देव " या नांवास योग्य नसून फक्त अंतरात्माच देव आहे असें सिद्ध केलें आहे. मूर्तीस लोक चोरून नेतील अगर फोडून टाकतील. अशा प्रकारचे देव नर्मदागंडकातीरीं लक्षावधि पडले आहेत, पण खऱ्या देवाचें सत्त्व कधीही जाणार नाहीं असें रामदासांनी लिहिलें आहे (क्र. ८). जगामध्यें चार प्रकारचे देव प्रसिद्ध आहेत. एक प्रतिमादेव, दुसरा अवतारदेव, तिसरा अंतरात्मादेव, व चौथा निर्विकारी देव. यांमध्यें निर्विकारीदेवासच देव म्हणावें असें रामदासांनी लिहिलें आहे (क्र. ९). शाईचा व्यापार करून कोठें राज्यसंपदा प्राप्त झाली आहे काय ? म्हणून सुरता करून पाहणें यास देवदर्शन म्हणूं नये (क्र. १०). खरा देव केवळ सद्गुरूच्या योगानेंच प्राप्त होतो व त्यामुळे नानाप्रकारच्या देवांची भीड पडत नाही (क्र. ११). अंतर्देवास चुकून धांवा घेऊन तीर्थास गेलें असतां जेथें तेथें केवळ धोंडापाणी दिसेल (क्र. १२). नाना देवांच्या अंतर्भूत असलेल्या आत्मदेवाच्या अनुसंधानानें सर्व किल्मिष जळून जाईल (क्र. १३) असें रामदास म्हणतात.

११. रामदासांचा भुताखेतांवर व चमत्कारांवर अगदीच विश्वास नव्हता असें दिसत नाही. शापामुळें देहधारण, परकायाप्रवेश, वायुरूपानें देवताभूतांचा अंगीं संचार, वायुस्वरूप झोटिंगाच्या लीला, या गोष्टीस अभावानें नेऊं नका (क्र. १४–१५), फक्त ज्यांस संकल्पच नाही अशा ज्ञात्यांस यांच्यानें बाधवत नाही (क्र. १६), असें रामदासांचें मत आहे. याच्या उलट, विष्णु म्हणजे केवळ विश्वांतील जाणीव, रुद्र म्हणजे केवळ नेणीव, व ब्रह्मा म्हणजे जाणीवनेणीवेचें संमिश्रण (क्र.१७), अगर ब्रह्म्यास जगाची उत्पत्ति, विष्णूस प्रतिपालन, रुद्रास संहार, अशीं जी कामें सोंपवून दिली आहेत तीं काल्पनिक असून सगळ्या जगाचा उत्पत्तिस्थितिलयकर्ता केवळ एक अंतर्देव आहे (क्र. १८) असें रामदासांचें मत आहे. ब्रह्मा, विष्णु, महेश, हा ऐलीकडील विचार, चंद्रसूर्यतारांगणें हा ऐलीकडील विचार, नाना देवांचे अवतार हा ऐलीकडील विचार; हीं दृश्यें केवळ देवाचें महाद्वार होत; यांस ओलांडून गेल्यावांचून देवाचें दर्शन व्हावयाचें नाही (क्र. २०). ज्याच्यामुळें सूर्यबिंब धांवतें, धुकटामध्यें अगाध पाणी सांचून राहतें, काळाचा दूत म्हणून वारा ज्याच्यामुळें धांव घेतो, विजांच्या तडाख्यांतही जो अंतर्भूत आहे, त्या देवाचीच उपासना ही माझी उपासना आहे असें रामदास म्हणतात (क्र. २१). ज्याचें नांव सर्वकर्ता, ज्याच्यामुळें

मेघमाळा, चंद्रबिंब, रविमंडळ हीं अ'पापल्या ठिकाणीं स्थित आहेत, त्यासच देव म्हणावें; देव्हारींच्या देवास उठून ब्रह्मकटाव रचतां येणार नाहीं; जो अंतर्बाह्य व्यापून असणारा अंतरात्मा आहे, त्यासच देव म्हणावें; देव आला, देव गेला ही भाषा दुरिताची आहे (क्र. २२); देह, आत्मा, व ब्रह्म यांचा संबंध जड चंचळ निश्चळाप्रमाणें आहे (क्र २३); ज्याप्रमाणें घटाकाश, मठाकाश, महदाकाश, चिदाकाश मिळून सर्व एकच आकाश होतें, त्याप्रमाणें जीवात्मा, शिवात्मा, परमात्मा व निर्मळात्मा मिळून सर्व एकच आत्मा होय (क्र. २४); केवळ भिडेस पडू नका; ज्यानें राजा ओळखिला तो भलत्यास राव म्हणणार नाहीं (क्र. २५) असें सांगून मुख्य देवास शोधून काढणें हेच तत्त्वज्ञानाचे लक्षण होय असे रामदासानी सांगितलें आहे.

१२. या देवाचा साक्षात्कार कसा करून घ्यावा हा एक मोठा प्रश्नच आहे. जगातील नाशिवंत वस्तूंचा भरंवसा नसल्यानें ज्यास सुख पाहिजे असेल त्याने केवळ रघुनाथभजन केलें पाहिजे (क्र. २६); या संसाराच्या यात्रेंत देवाचा फायदा करून घेतला नाहीं तर आपले कष्ट सफळ होणार नाहीत (क्र. २७); या देहाचें हें एक बरें आहे की जी जी परमार्थवांछा या देहामध्ये करावी ती ती तृप्त होते, या नरदेहास येऊन हजारों लोक उद्धरागतीस गेले आहेत (क्र. २८); शिवाय मृत्यूच्या वेदना सोसवत नाहींत हें सगळ्यांच्या अनुभवाचेंच आहे (क्र. २९). या मृत्यूपुढे महापराक्रमी राजे, महान् व्युत्पन्न पंडित, मोठमोठे योगाभ्यासी, महान् महान् संत, कोणीच टिकले नाहीत. फक्त एकच टिकले की ज्यांनीं स्वरूपसाक्षात्कार करून घेतला (क्र. ३०). यामुळे सर्व गोष्टी सोडून देवास धुंडणें हेंच आपले संसारांतील मुख्य कर्तव्य आहे (क्र. ३१). याच जन्मी ईश्वरसाक्षात्कार झाला तर त्याचा उपयोग; पुढील जन्मावर कोणी भिस्त ठेवावी ! उधार आणि रोकडें धन यामध्यें जो फरक आहे तोच विदेहमुक्ति व जीवन्मुक्ति यांच्यामध्यें आहे (क्र. ३२); परंतु मनुष्याची दृष्टि अंध झाली असल्यानें द्रव्यद्वारा नेत्रानें पाहणें, द्रव्यद्वारा कानानें ऐकणें, यांखेरीज दुसरा व्यापारच त्यास सुचत नाहीं (क्र. ३३). या बद्धस्थितीतून विनिर्मुक्त होण्यास गुरूची आवश्यकता आहे. मागें महान् महान् संतसाधु, रामकृष्णादिक अवतार, यांनीं गुरूचाच आश्रय केलेला आहे (क्र. ३४) सद्गुरुकृपा झाल्याखेरीज अनुभवचिद्रत्नांच्या भांडारगृहाची किल्ली हातास येत नाहीं (क्र. ३५).

असा जो गुरु तो एकापरी देवापेक्षांही श्रेष्ठ समजला पाहिजे (क. ३६); अशा सद्गुरूस सागर, मेरु, गगन, पृथ्वी, गभस्ति, फणिवर, कल्पतरु, इत्यादिकांपैकी कोणतीही उपमा लागूं पडत नाही. सद्गुरूचे वर्णन करता येणें अशक्य आहे, हेंच त्याचें वर्णन होय (क. ३७). अशा सद्गुरूची चिन्हें कोणती म्हणाल तर तीं शुद्ध आत्मज्ञान, स्वरूपस्थितीचें समाधान, प्रबळ वैराग्य, निर्मळ आचार, अखंड अध्यात्मश्रवण, तत्त्वज्ञानविचार ही होत (क. ३८). ज्याच्या पोटांत अमृत गेलें त्याचें शरीर तेजस्वी व्हावयासच पाहिजे. जो स्वरूपस्थितीनें वर्ततो तोच साधु. राज्यावर बसल्यावर अंगी राजकळा सहजच बाणते, त्याप्रमाणें स्वरूपारूढ झाल्यावर कामक्रोध, मदमत्सर, लोभशोक, मोहभय, इत्यादि विकार सहजच नाहीसे होतात. स्वधर्माची व्याख्या म्हणजे केवळ स्वरूपस्थितीत राहणें हीच होय (क. ३९). आजपर्यंत कोणत्या चक्रवर्ती राजानें सायुज्यमुक्ति दिली आहे ? जें त्रैलोक्यांत नाही त्याचें दान संतसज्जन करितात. जें चंद्रसूर्यानें प्रकाशित होत नाही तें या साधूंच्यामुळे प्रकट होते (क. ४०); असे साधु जेथें भजन करितात तेथें प्रत्यक्ष जगदीश उभा असतो (क. ४१). या साधूंच्या मागें जे चमत्कार होतात ते केवळ हे पुण्यमार्गानें चालले म्हणूनच होतात. अशा साधूंस वासना धरून पुनः जन्म घेण्यास लावूं नका (क. ४२); पूर्वी मोठमोठे भक्त होऊन गेले व त्यांचें सामर्थ्यही अद्भुत होतें असें समजून हल्लींच्या साधूंस तुच्छ करूं नका; शरीराचा ध्यास केवळ सामर्थ्यसिद्धीकडे असल्यानें मनुष्य सहज ईश्वराचा मार्ग चुकून जातो; तर असें न करतां ईश्वरप्राप्तीच्या कामनेखेरीज दुसरी कोणतीही कामना मनांत बाळगूं नये (क. ४३).

१३. ज्याच्यामध्यें ही ईश्वरकामना उत्पन्न झाली, जो अत्यंत साक्षपी, धैर्यवान् व प्रज्ञावंत आहे, जो त्रिविधतापानें पोळून जाऊन गुरुवचनावर दृढभाव ठेवितो, व आकाश कोसळून पडलें असतांही ज्याच्या शुद्ध भावार्थांत पालट होत नाहीं, तोच सच्छिष्य होय (क. ४४). अशा शिष्यास मोक्षप्राप्तीस मुळींच वेळ लागत नाहीं. लोहपरिससंयोग, गंगासरितासंयोग, अगर सिंधुसागरसंयोगाप्रमाणें अशा शिष्यास तत्क्षणींच मोक्ष मिळतो (क. ४५). ज्यांत सत्त्वगुणाचें वर्चस्व असेल असाच सच्छिष्य शिष्यराज या नांवास शोभतो. सत्त्वगुणाचीं लक्षणें म्हटलीं म्हणजे संसारदुःख विसरून भक्तिमार्गाकडे तांतडीनें ओढ घेणें,

नीच दास्यत्वाची गोडी पतकरणें, यथानुशक्ति सामग्री घेऊन ईश्वरयज्ञास प्रवृत्त होणें, मुखीं नाम हातीं टाळी वाहून ईश्वराचें गुणसंकीर्तन करणें, आघातांत धारिष्ट धरणें, पदार्थमात्रावर चित्त न लागता मनांत भगवंताचा ध्यास लागणें, भगवताकरितां सर्व सुख सोडून देणें, शरीर सत्कार्यीं लावण्याचा निश्चय करणें, समुद्राऐशी चित्तांत सांठवण बाळगणें ही होत (क्र. ४६). ईश्वरसाक्षात्कारास मुख्य साधन म्हटलें म्हणजे नामस्मरण हे होय. प्रातःकाळीं, माध्यान्हकाळीं, सायंकाळीं नेमानें साधन करून नेहमीं नामस्मरण करीत जावें. सुखदुःख, संपत्तिविपत्ति, संकट आनंद वगैरे कोणत्याही स्थितींत नामस्मरण सोडूं नये. नामानें संकटे नासतात, व विघ्नें निवारतात; महापापी तेच पवित्र होतात. कांहीं न करित नामजप केला असतां चक्रपाणी संतुष्ट होऊन भक्तांस सांभाळतो. लहानथोर, उच्चनीच, ब्राह्मणअंत्यज, हा भेद नामस्मरणामध्यें नाहीं (क्र. ४७). नामस्मरणरूप उपासनेचा पाठिंबा जेथें नाहीं तेथें जय प्राप्त होणार नाहीं (क्र. ४८). प्रत्येक चळवळीच्या मुळाशीं भगवंताचें अधिष्ठान असलें पाहिजे. पायरीनें पायरी चढून मुळापर्यंत शोधिलें असतां याचा उलगडा होणार आहे (क्र. ४९). ईश्वराबद्दल नामस्मरणरूप भक्ति करणें ती निष्काम करावी. कामनेनें मिळालेलें फळ व निष्काम भजनानें मिळालेला भगवंत यांमध्यें महदंतर आहे. निष्कामभजन करणाऱ्या भक्ताच्या मनांत जो हेतु उत्पन्न होतो तो देव आपणच पुरवितो (क्र. ५०). निष्कामभजनाच्या जोडीला श्रवणाचें बळ पाहिजे. श्रवणानें भक्ति व विरक्ति उद्भवतात, चित्तशुद्धि होते, निश्चय घडतो, आशंका फिटतात, मन ताब्यांत येते व त्यास भगवंताची भूक लागते (क्र. ५१). श्रवणाप्रमाणेंच कीर्तनाचीही फार जरूरी आहे. कीर्तनांत स्त्रियादिकांचें कौतुक वर्णिलें असतां श्रोत्यावक्त्यांचे मन कामाकार होऊन ईश्वराचे ध्यान नाहींसें होतें. निःशंक निर्लज्ज कीर्तन केलें असतां गुप्त परमात्मा प्रकट होतो (क्र.५२). अशा रीतीनें ज्याच्या जवळ ईश्वर अखंड राहतो तो जे सहज बोलतो ते ईश्वराचेच शब्द होत (क्र. ५३).

१४. साधकांस ध्यानक्रिया सांगितली असतां मनामध्यें कल्पनेचें काहूर उठून ध्यानयोग सिद्ध होत नाहीं हा साधकांचा अनुभव सर्वांस माहीत आहेच याकरितां मन निर्विकल्प करण्याबद्दल रामदासांनीं एक उपाय सुचविला आहे जसा काम कामानें मरतो तशी कल्पना कल्पनेनें मरते (क्र. ५४). निर्वि

कल्पाच ध्यान केलें असतां कल्पना सहजच नाहींशा होतात (क. ५५). खरें ध्यान व खोटें ध्यान यांमध्यें इतकाच फरक आहे की, खऱ्या ध्यानांत आत्म्याचें चिंतन होतें, व खोट्या ध्यानांत अनात्म्याचें चिंतन होतें. ध्येय व ध्याता यांमध्यें अनन्यलक्षण उत्पन्न झाल्यासच ध्यानाची परिसमाप्ति झाली असें म्हणतां येईल. बाजारी लोकास प्रमाण आणि अप्रमाण या गोष्टी कळत नसल्यानें खोट्याच गोष्टी उठवून ते वाउग्याच बोंबा मारतात. साधकांनीं मानसपूजा व प्रत्यक्ष दर्शन यांमध्यें महदंतर आहे असें समजून खऱ्या ध्यानाचा मार्ग शोधून काढावा (क. ५६). ज्यास आत्मज्ञानाची किल्ली मिळाली, संदेहनिवृत्तीकरितां जो परिश्रम करतो, जीर्ण जर्जर झालेल्या आत्मज्ञानाचा जो जीर्णोद्धार करण्यास प्रवृत्त होतो, असत्क्रिया सोडून स्वरूपाकडे जो अखंड निजध्यास लावितो, जें लक्षूं जातांही लक्षवत नाही त्यास जो लक्षितो, जेथें मनबुद्धीचा प्रवेशही नाही त्यांचें जो अनुभवानें आकलन करितो, व उन्मनीच्या शेवटीं आपली आपणांस ज्यास अखंड भेट अनुभवितां येते, त्यासच साधक म्हणतां येईल (क. ५७). अशा साधकामध्यें व देवामध्यें सख्यभक्ति उत्पन्न होते. आपली संसारव्यथा सोडून आपण देवाचें चिंतन केलें असतां देव आपली चिंता करतो. देवाच्या सख्यत्वासाठीं आपलें सौख्य, जिवलग, प्रपंच, व प्राण वेंचण्यासही साधकानें तयार व्हावें. आपण ज्याप्रमाणें वचनें बोलावीत त्या-प्रमाणें प्रत्युत्तरें येतात. म्हणून आपण ज्या भावना ईश्वराविषयी ठेवाव्यात त्या भावना ईश्वर आपल्याविषयी ठेवितो (क. ५८). महापूजेच्या अंतीं ज्या-प्रमाणें देवास मस्तक वाहतात त्याप्रमाणें आत्मनिवेदनभक्ति आहे. देव व भक्त हे दोघे एकच आहेत अशी ज्याची खात्री पटली तोच साधु या जगांत मोक्ष-दायक जाणावा (क ५९). आपण आत्मरूप आहों अशी खात्री पटल्यावर देह प्रारब्धाच्या ओघांत खुशाल सोडून देण्यास काय हरकत आहे (क. ६०)? सलोकता, समीपता, सरूपता या तीन्ही मुक्तापेक्षां ईश्वराशीं जीत तादात्म्य होतें अशी सायुज्यमुक्ति श्रेष्ठ आहे (क. ६१). ज्यानें आपण आपणांस ओळखिलें तो जीत असतांच मुक्त होऊन गेला. देह पुण्यनदीच्या तीरावर पडावा, दक्षिणायनापेक्षां उत्तरायणच देह सोडण्यास योग्य, " अग्निर्ज्योतिरहः शुक्लः " हा अर्चिमार्ग धूम्रमार्गापेक्षां श्रेष्ठ होय, अशा प्रकारच्या खोट्या कल्पना साधूच्या मनास शिवत नाहीत. जो जीवन्मुक्त झाला त्याचा देह रानांत पडो, अगर स्मशानांत पडो, तो धन्यच होय (क. ६२).

१५. सिद्धावस्था प्राप्त झाल्यानंतर साधनाची जरूरी राहते किंवा नाही याबद्दल रामदासांनी दोन निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळी मतें प्रतिपादली आहेत. एकदां त्यांनी असें म्हटलें आहे की साधन हा देहाचा धर्म असल्यानें देह असेपर्यंत साधन हे केलेच पाहिजे. सिद्ध झाल्यावर हा अद्यापिही साधन करतो असें लोक म्हणतील या लज्जेने साधन टाकून देणें हे शहाणपणाचें काम नव्हे (क. ६३) याच्या उलट दुसरे एके ठिकाणी त्यानी असे म्हटले आहे की, साधनानें साध्य प्राप्त झाल्यावर साधनाची खटपट करणें म्हणजे कुंभार राजा झाल्यावर पुनः त्यानें आपली मडकी घडणे,अगर रंक राजा झाल्यावर रंकपणाचा गलबला त्याने पुनः चालविणे, तीर्थाने तीर्थास जाणे, अगर उन्मन्यवस्थेनें मनास आवरणे, याप्रमाणेच चमत्कारिक आहे (क. ६४). मुख्य साक्षात्काराचे लक्षण म्हटलें म्हणजे पापाची खंडणा झाली व जन्मयातना चुकली असा अनुभव आला पाहिजे, देवभक्तांतील विभकता निघून गेली पाहिजे, ब्रह्मांडाच्या कर्त्यास ओळखून मुख्य कर्तृत्वाचे स्वरूप कळलें पाहिजे; येथें अनुमान राहिल्यास केलेला परमार्थ वायां गेला असें रामदासांनी म्हटलें आहे (क. ६५). योग्याच्या अनुभवदृष्टीपुढे जें उदंड धन आहे त्याची किंमत लोकांस कशी कळावी ? जो काष्ठस्वार्थ करतो, अगर शुभा एकवटतो, त्यास श्रेष्ठरत्नांची किंमत कशी कळणार ? हे गुप्तधन सांपडण्याकरितां सद्गुरूच्या उपदेशाचें अंजन लेइलें पाहिजे (क. ६६). ज्यास भेटूं जाता तुटी पडते, व ज्याची न भेटतां भेट होते, जें पाहूं जातां दिसत नाही, व न पाहतांही जें सर्वत्र दिसतें, तेंच स्वरूप असें समजावें (क. ६७). ज्यास तस्कराचें भय नाही, ज्यास राजभय, अग्निभय अगर श्वापद्भय मुळीच नाहीत, जें अधिक व न्यून होत नाही, जे मिळविण्याकरिता योगियांच्या अनुज्ञेप्रमाणे आकाशमार्गीच्या गुप्तपंथानें चालावें लागते, ज्याची प्राप्ति झाली असतां राजाचे सामर्थ्य अंगीं बाणतें, व ज्याच्यावांचून राजेही भिकारीसे दिसतात, तोच केवळ परमार्थ होय (क. ६९). ज्यास शस्त्रानें तोडिलें असतां तुटत नाही, जें अग्नीवर असून जळत नाहीं, जें सर्वत्र सूक्ष्म रीतीनें भरलेलें आहे (क ७०), जें अनंत ब्रह्मांडाखालतें व अनंत ब्रह्मांडावरतें आहे, जळानें जसें जळचरांस व्यापावें तसें जें सर्व सृष्टीस व्यापून आहे, जें वज्रास भेदिलें असून ज्याचा मृदुपणा गेला नाही, जें कधींही विन्मुख न होतां अखंड सन्मुख असतें, ज्या-

मध्येंच पाहणे ऐकणें, वगैरे क्रिया घडतात, जे अत्यंत निकट पदार्थांच्याही अलीकडचे आहे, जें वाचूं लागले असता अक्षरांमध्येच दिसतें, जें कोणतीही वस्तु घेण्याच्या अगोदर हातांत येते, जें चर्मदृष्टीचें देखणें नसून ज्ञानदृष्टीचे देखणें आहे, तेच परब्रह्म होय (क. ७१) जें धरूं जातां धरवत नाही, जें टाकू जाता टाकवत नाही, जे सर्वांचे मस्तकी सूर्याप्रमाणे प्रकाशते, ज्यास पहावयास तीर्थक्षेत्रांस जावे लागत नाही, जे बैसलेठायींच सबाह्यांतरी व्यापून दिसते, जे वामसव्य, अधऊर्ध्व, सन्मुखविन्मुख सर्वत्र एकदम असते, ज्याच्या असंभाव्य विस्ताराची कल्पनाही कोणास होणार नाही, अशा त्या विमळ ब्रह्माची सरी कोणास द्यावी (क. ७२)? अशा रीतीनें रामदासांनी ब्रह्माच्या सर्वगत अस्तित्वाचे मोठ्या बहारीने वर्णन केलें आहे.

१६. रामदासांसारखे कर्मयोगी रामदासच होत. परमार्थाचा अनुभव घेऊन जगात योग्य रीतीनें वर्तणूक करण्याचे भाग्य थोड्या साधूंसच लाभते. अशा साधूंत रामदासांची प्रामुख्यानें गणना होते असे म्हणण्यास हरकत नाही. विशेषेंकरून त्यांच्या दासबोधग्रंथात पारमार्थिक कर्मयोग्याची वर्तणूक कशी असावी याबद्दल त्यांनी जे विचार प्रकट केले आहेत ते आपल्या स्वतःच्याच अनुभवावरून केले आहेत, तथापि त्यांपासून इतरानीही पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे. साधूने कीर्तिरूपानें उदंड विख्यात असावे, परंतु पाहू गेलें असतां त्यानें एकाएकी सापडू नये, असे रामदासानी लिहिले आहे. ज्या स्थळास जावयाचें ते सांगूं नये, व जे ठिकाण सांगावें त्या ठिकाणी जाऊं नये; अशा प्रकार आपली स्थितिगति लोकांच्या निदर्शनास आणू नये, असें रामदासानी म्हटलं आहे. लोकांस जें पहावेंसें वाटतें तें यानें पाहूं नये. यानें उदंड समुदाय करावे; पण गुप्तरूपानें करावे. लोकाचे निरनिराळे अधिकार शोधून त्यास जवळ अगर दूर ठेवावे; पण आपला मगज काहीतरी बाळगून रहावे. महतानें महंत करून त्यांस नाना देशीं विखरावें (क. ७३). आपण मनापासून भक्ति केल्यास अशा महापुरुषाचें दर्शन घ्यावें म्हणून लोक त्यांस धुंडीत येतील. शिष्यास कोणतीही गोष्ट न मागण्याची त्याने प्रतिज्ञा करावी. फक्त आपणांमागें जगदीशास भजत जावें इतकेंच मागावें (क. ७४). ज्याप्रमाणें आत्मा ठायींच्या ठायीं गुप्त होतो त्याप्रमाणें साधूनें तेथल्या तेथेंच नाहींसें होऊन सर्व लोकांस गुप्तरीतीनें वर्तवीत असावे (क. ७५). मुख्य लोकांचें मनोगत राखणें

हेंच मोठ्या चातुर्याचें लक्षण होय (क्र. ७७). आपण करून करवावें; आपण विवरून विवरवावें; आपण भजनमार्गास धरून लोकांकडूनही धरवावें. जो करून बोलेल त्याचेच शब्द जगात प्रमाण मानितात (क्र. ७८); नष्ट लोकांशी गांठ पडली असतां नष्टांकडूनच त्यांचा पराभव करवावा; हुब्यास हुंबा लावून द्यावा; खटनटाची फजिती खटनटाकडूनच करवावी. ज्याला समुदाय मोठा व्हावा अशी इच्छा असेल त्याच्या तनावा बळकट असाव्या लागतात. जो दुसऱ्यांवर विसंबून राहतो त्याचा कार्यभाग बुडतो· जो आपणच कष्टत जातो त्यासच स्वीकृत कार्यांत यश येतें (क्र. ७९). "कांही गल्बला कांही निवळ" अशा संमिश्रणानें आपला काल घालवीत जावा (क्र. ८०). लोक आपली मार्गप्रतीक्षा करीत असतां वेळेस तत्काळ अशा साधूनें पुढें उभें रहावें. वडिलाचे मन जसें सर्व मुलांवर असतें त्याप्रमाणें अशा महापुरुषानें सर्वत्रांची चिंता करीत जावी (क्र. ८१). आपण जेथें तेथे नित्य नवा असून लोकांस हा असावा असें नेहमी वाटत असावें. कांही तरी एक उत्कट कार्य केल्याखेरिज कीर्ति होत नाही हे मनांत बाळगावें. जेथें अखंड तजविजा चाळणा होतात तेथें कार्य करण्याचे निरनिराळे मार्ग सुचतात. यामुळें एकांतांत जाऊन विवेक करावा, व आत्मारामाचें दर्शन घ्यावें (क्र. ८२). जो एक क्षणही वायां जाऊं· देणार नाहीं त्यासच तीक्ष्णबुद्धीचा म्हणावें. ज्याच्या तोंडांतून अखंड वाक्प्रवाह सुरू असतो त्यासच लोकांची अंतःकरणें आपल्या ताब्यात घेता येतात. जेथें तेथें लोकांस भजनास लावून आपण तेथून निसटावें. उदासवृत्तीच्या बळानें आल्यागेल्याची क्षिती नाही असें झाले पाहिजे. आपण जेथे कोणीच पाहणार नाहीं अशा खनाळामध्यें जाऊन ईश्वराचे ध्यान करून सर्वत्राची चिंता वाहिली असता त्याची मनें सहजच आपल्याकडे आकृष्ट होतील. अशा मनुष्यानेंच जन्मास येऊन सार्थक केले असें रामदासांनी लिहिलें आहे (क्र. ८३).

संकीर्णग्रंथविवरण.

१७. रामदासांचा "जुना दासबोध" या नांवाचा जो ग्रंथ आहे तो आपल्या दासबोधाचें मूळ होय असें आपण वर पाहिलेंच आहे. त्यांतील व यातील शिकवण यात फारच साम्य आहे हे त्यांचा अभ्यास करणाऱ्यांस सहज दिसून येईल. येथें आपणांस जुन्या दासबोधापैकीं दोनचारच नवे मुद्दे उद्धृत

करावयाचे आहेत. क्रमांक ५ यांत " देह पडो कां देव जोडो" अशा भावनेने देवाच्या पाठीशी लागल्यावांचून देवाचें दर्शन व्हावयाचें नाही असें रामदासानी लिहिलें आहे (क्र. ८५). क्रमांक ८६ यांत ज्यास परमार्थ करावयाचा आहे त्यानें प्रपंचाची मिठी सोडविली पाहिजे असें स्पष्ट सांगितलें आहे. दासबोधांत याच्या उलट " प्रपंचपरमार्थ चालवाल । तरी तुम्ही विवेकी " असें जें रामदासांनी सांगितलें आहे तें ध्यानांत ठेविलें पाहिजे. क्रमांक ८७ मध्यें कोणास कळं न देतां अंतरीच रामाचा अखंड जप चालल्यावर जो साक्षात्कार होतो तो आपल्यास लोकांनी मोठे म्हणावें या बुद्धीनें लोकांस सांगितला असतां तो पुनः होणार नाही असा रामदास आपल्या जीवींचा अनुभव सांगतात. क्रमाक ८८ मध्यें रामास मागणें असेल तर आपण राम व्हावें, व रामाने आपलें दास्य करावें, इतकेंच त्यास मागावें असें सांगितलें आहे.

१८. मनाचे श्लोक सर्व उद्धृत करण्यास येथें जागा नाहीं. तथापि त्यांतील कांहीं निवडक श्लोक या पुस्तकात घेतल्यावांचून गत्यंतरच नव्हतें. भक्तिपंथ हाच सगळ्यांत सोपा पथ; प्रभाती रामाचें चिंतन करावें; ज्यामुळें आपली कीर्ति मागें उरेल अशा प्रकारची क्रिया येथे करावी; समर्थाच्या सेवकास वक्र पाहण्यास काळही समर्थ होणार नाही; देव अल्पमात्र आपले धारिष्ट पहात असतो; संकटात स्वामी एकदम उडी घालतो; देवकार्यांत देह झिजविण्याची वासना आपण बळकट ठेवावी; राम हा कल्पतरु असल्यानें त्याच्या खालीं मागितलेली फळे येतात; जातां, येतां, जेवितां, सुखी होतां, नामस्मरण करावें; देव हा श्वेतही नाही व पीतही नाही; हाती घेऊं गेलें असता तो सापडत नाही; विधीस निर्माण करणारा, विष्णूचे प्रतिपालन करणारा, व शंकरास शेवटी जाळणारा तोच मुख्य देव होय; असा जो मोठा देव तो या जगांत चोरला असल्यानें गुरूवांचून तो दिसत नाही; व या देवाचे स्वरूप नभासारखें विस्तीर्ण, व्यापक, अलिप्त, व निर्विकार आहे, अशा प्रकारच्या कल्पना ज्या मनाच्या श्लोकांत रामदासानी सांगितल्या आहेत त्या सर्वांच्या माहितीच्याच आहेत.

१९. प्रस्तुत पुस्तकांत समर्थांच्या "पंचसमासी" पैकी दोनच उतारे घेतले आहेत. पहिल्यांत मन पांगळून बुद्धि ज्यावेळी स्वरूपांत लीन होते, अनुभव अनुभवामध्यें मुरून जातो, व निष्कलंक निर्मळ आत्मा प्रकाशमान होतो त्या स्थितीसच स्वरूपानुसंधान म्हणावें असें रामदासांनी म्हटलें आहे (क्र. ९०). दुसऱ्यांत सर्वत्र रामदर्शन कसें होतें हें रामदासांनी सांगितलें आहे. वृत्ति

मुळाकडे पाहूं लागल्यास तिला रामच दिसतो; मन मुरडले असता त्यास रामच भेटतो; वदन चुकवूं गेलें असतां सन्मुख रामच दिसतो; एकदां सन्मुख झाल्यावर केव्हाही राम विन्मुख होत नाही; विसरून पाहिलें असतां सुद्धां रामाचेंच दर्शन होतें; अशी खूण सर्वत्रांस सांगून रामदास या जगांतून पार झाले असें म्हटलें आहे (क्र. ९१). "मानपंचक" या प्रकरणांतूनही दोनच उतारे घेतले आहेत. पहिल्यांत रामराज्याचे वर्णन आहे. रामराज्य त्यासच म्हणावें की, ज्यांत बहुवृष्टि अनावृष्टि नाहीत; चिंता व व्याधि याचा लेशही नाही; युद्ध व दारिद्र्य नाहीच नाहीत; सर्वत्र सत्याचे साम्राज्य आहे; भूमि अद्भुत पिकतात, व वृक्ष सदा फळ देतात; श्वापद, पक्षी वगैरे जीव नेहमी आनंदरूप विचरतात; व कीर्तन व नामघोष यांच्या गर्जनेने सर्व पृथ्वी दुमदुमून जाते (क्र. ९२). दुसऱ्या उताऱ्यांत रामाचें ध्यान करणे, अगर शिवाचे ध्यान करणे, अगर शक्तीचें ध्यान करणे, अगर इतर कोणत्याही देवतेचें ध्यान करणें, हें सर्व सारखेंच होय असें रामदासानी सांगितलें आहे. मानवांचे सेवक नानापरीनें कष्टतात; मी देवांचा देव सेविल्याने धन्य झालो असे रामदासानी येथें उद्गार काढले आहेत (क्र. ९३). "निर्गुण ध्यान" या प्रकरणातून एकच उतारा घेतला आहे. मुमुक्षु, साधक, सिद्ध, योगी, वीतरागी, जोगी, जंगम, फकीर, ऋषि, मुनि, अवतार, सर्व याच मार्गाने स्वरूपस्थितिप्रत गेले आहेत असें रामदासांनी म्हटलें आहे (क्र. ९४).

२०. रामदासांच्या समग्रग्रथांत "जनस्वभावगोसावी" या नांवाचें एक प्रकरण आहे. त्याकडे लोकांचें जितकें लक्ष जावे तितकें गेलेलें नाही असें दिसतें. या केवळ सत्तर ओव्याच्या प्रकरणात त्यांनी भोंदू गुरूंचे वर्णन अशा बहारीनें केलें आहे की ते जर या गुरूंनी मनांत बाळगले तर त्यांस भोंदूपणा करण्याच्या नवीन कल्पनाच सुचावयाच्या नाहीत. मुख्य, अनुभवावांचून बोलणारे हे सर्व भोंदू गुरूच होत असें रामदासांचें मत आहे. कांहीं गुरु विष्ठेचा अंगिकार करून अगर ओंगळपणाच्या सबबीनें गुरु बनतात; कांही भूतांस व वेताळांस चेतवूं शकतात; नानाप्रकारचीं चेटकें करून, स्मशानांत राहून, जिकडे तिकडे सर्पच सर्प करून, नपुंसकास वानिता भोगण्याचें सामर्थ्य देऊन, सर्व धातूंचें सोनेंरुपें बनवून कांही गरूपणाप्रत पावतात; कांही गुरु आज गुप्त होऊन उद्यां उमटतात; कांही व्याघ्रावर बसून हातांत सर्पाचा चाबूक घेऊन धांवतात (३४); आणि कांहीं तर अचेतनेंच चालवितात (३३), अगर रेड्याकडून वेद बोलवितात

(४३). यांत रामदासांनी चागदेव व ज्ञानदेव याच्याबद्दलचे जे चमत्कार जगांत प्रचलित आहेत त्यांचा उल्लेख केला असावा असे दिसते. कांही दुसऱ्यांच्या जीवींचें जाणतात, व कांही वांझेचें वांझपण फेडतात; व काही तर वाळलेल्या काष्ठास पल्लवित करितात (४६). यांत रामदासांनी प्रत्यक्ष दा. १६·१ यात वाल्मिक ऋषिसंबंधी, " शुष्ककाष्ठी अकुर फुटले । तपोबळें जयाच्या " अशा प्रकारचे जे उद्गार काढिले आहेत त्याचाच उल्लेख आहे. काही गुरु गर्भिणीस कन्या अगर पुत्र होईल हे सागतात; काही पूर्वेचे पश्चिमेस अकस्मात् जातात, जळावर आसन घालून काही परतीरास बसून जातात; काही गोसावी तर वाघच बनतात; एका गोसाव्यास वाळवंटात पुरले असताही तो जिवंत राहतो, व काही गोसावी तर मद्यमासाची फुले बनवितात (६१). या ओंवीत मोरया गोसावी यांनी जो चमत्कार केला अशी दंतकथा आहे तिचा उल्लेख असावा असें दिसते. असो. असे नानाप्रकारचे चमत्कार करणारे गुरु आहेत. पण तोच गुरु खरा की ज्यास अध्यात्मविद्या कळली (६८), व जो आत्मज्ञानपारंगत झाला (६९).

२१. रामदास इतके बुद्धिवादी होते तथापि त्याच्या अतःकरणांत करुणेचा पाझर होता. त्यांचे अतःकरण वज्रापेक्षां कठीण, पण कुसुमापेक्षाही मृदु होतें, हे त्यांच्या असंख्य करुणाष्टकांवरून सिद्ध होत आहे. येथे सर्व करुणाष्टके घेण्यास जागा नाही, म्हणून काही महत्त्वाचीच करुणाष्टकें तेवढी उध्दृत केली आहेत. सदासर्वदा देवाचा योग घडावा व त्याचे कारणी आपला देह पडावा (क्र. ९७) असें रामदासांनी म्हटलें आहे. साधुजनाच्या संगतीनें समाधान वाटते; पण त्यांचा वियोग झाला असता दुःख होऊन काळ कंठेनासा होतो (क्र. ९८); लोकामध्यें रामाचा दास या नावानें मला पाचारितात, पण अंतरांत त्याच्या भक्तीचा लेशही नाहीं (क्र. ९९) ! संसाराकडे व प्रपंचाकडे माझें मन अद्याप ओढ घेतें (क्र. १००); पळपळ आयुष्य जात असता व काळ लळलळ विष ओकीत असतां रामावांचून या जगात-सौख्यच नाही (क्र. १०१); मनासारिखी सुंदर भार्या, कन्या, जांवई, मुलें, धनधान्य, अलंकार, वसने, आरोग्य, शांततायुक्त ग्राम, साधूंची संगति, व देवाची प्राप्ति होणें, हा फार सुकृताचा योग आहे असें रामदासानीं म्हटलें आहे (क्र. १०२). माझ्या अंतरीचा निश्चय घडिघडि बिघडत असल्यानें मजवर करुणेचा तूं पूर लोट (क्र. १०३); माझ्या हातून कोणतेंही कार्य झालें नसून मी फक्त भूमिभार झालो आहे (क्र.

१०४); सर्व सोडून एकदम निघून जावें असें मनास वाटतें, व उपाधीस देखून कंटाळा येतो (क्र. १०५); विषयकर्दमांत लोळत असतां मला चिळस उपजत नाही (क्र. १०६); मी टोणपा झालों असल्यानें मनांत फार उद्वेग वाटतो; तुला उदंड भक्त असल्याने तूं आम्हांस कशास विचारशील (क्र. १०७); तुझ्या साधूचे कृपणपण लोकांत न दिसावें म्हणून तुझ्या सामर्थ्याचा अल्प वांटा मी मागत आहे (क्र. १०८); अशा प्रकारचे रामदासाचे करुणाष्टकांतील उद्गार फार हृदयस्पर्शी आहेत. या करुणावचनावरून ज्ञान व भक्ति यांची रामदासांत किती उत्तम सांगड होती हे दिसून येईल.

२२. ज्ञान व भक्ति याबरोबरच समर्थांचा जो राजकारणांतील कर्मयोग होता तोही फार अवर्णनीय होता. रामदास हे राजकारणी नसून ते केवळ "मोक्ष-गुरु" अगर "धर्मगुरु" होते हे मत आमच्या ऐतिहासिक प्रकरणांतील उतारे जे वाचतील त्यांस सहजच सदोष वाटणार आहे. क्रमांक १०९ मध्यें रामदास हेळवाकच्या घळींतून चाफळास कसे आले, तेथें त्यांची व्याधीही कशी बरी झाली, रघुनाथभटजीवर त्यांचे प्रेम किती होतें, आपल्या शिष्यांविषयीं निकट भाव त्याचे ठायीं किती वसत होता, हे त्यांच्या स्वहस्तलिखित पत्रा-वरून सहज दृग्गोचर होणार आहे (क्र. १०९). क्रमांक ११० वरून रामदासांनी देशोदेशी विखुरलेल्या आपल्या निरनिराळ्या महंतांस सांप्रदाय वाढविण्याविषयीं कशी आज्ञा केली होती तें व्यक्त होत आहे. "समुदाय" करणे हा त्यांच्या शिकवणीचा मुख्य धडा होता. जवळच्या सोयऱ्याधायऱ्यां-च्या मुलांस एकांतात बोलावून ईश्वराचे भजन करावें असें त्यांस सांगून जप देऊन नंतर आम्हाकडे पाठवावें म्हणजे आम्ही त्यांचा गोवा उगवून घेऊं, असें रामदासांनी आपल्या भक्तांस सांगितलें आहे. क्रमांक १११ मध्ये सुंदरमठ अगर शिवथर येथील घळीचें रामदासांनी सुंदर वर्णन केलें आहे तें पहावें. तोच समर्थ देव की ज्यानें आपल्या शिष्यास सुद्धां समर्थ म्हणविलें. अशा देवाने सुंदरमठांत वास करून आपला दास संनिध ठेवला व सगळा प्रांतच पावन केला. या सुंदरमठाचे सौंदर्य बावी, पोखरणी, झरे इत्यादिकांनीं विशेषच वाढत आहे. ज्या कड्याकपाटांत जातांना भय वाटावें अशा स्थळीं रघुनाथाचें वैभव दृष्टीस पडतें. संनिध तर प्रतापगडची रामवरदायिनी माता आहे, असें रामदासांनीं म्हटले आहे. क्रमांक ११२ मध्यें अफझुलखानामुळें मानेना म्हणून पश्चिमेकडे जगन्माता कशी गेली, रामास वरदायिनी रामदासासही कशी वरदायिनी झाली, सदानंदामध्यें तिचा "उदो उदो" कसा झाला, अशा रीतीनें प्रतापगडच्या भवानीचें वर्णन करून आपला राजा तूंच वाढीव अशी

तीस रामदासांनी प्रार्थना केली आहे. क्रमांक ११३ मध्ये शिवाजीचें देवब्राह्मणाच्या संरक्षणाबद्दल अभिनंदन करून शेवटीं उद्दंड राजकारण तटल्यामुळें तुमच्या देशांत वास्तव्य केलें असतांही तुम्ही आमचें वर्तमान घेतलें नाही याबद्दल खेद प्रदर्शित करून शिवाजीचें मन जास्तच आपल्याकडे रामदासानी ओढून घेतलें आहे. क्रमाक ११४ मध्ये क्षत्रियाचे काम म्हटलें म्हणजे मारतां मारतां मरणें हे होय; अशा शूर क्षत्रियानी तकवा न सोडितां तलवार चालविली असतां जय अवश्यमेव प्राप्त होतो; मराठा तितका मेळवून आपला महाराष्ट्रधर्म वाढविला पाहिजे; देवधर्माचें उच्छेदन झाल्यास त्यापेक्षा मृत्यु बरा असा क्षात्रधर्म सांगितला आहे. क्रमाक ११५मधील सनदेत चाफळच्या स्थापनेपासून शिवाजीचा व रामदासाचा जो संबंध घडून आला त्याबद्दलचा साद्यंत इतिहास शिवाजीने लिहिला आहे हें वर सांगितलेच आहे. क्रमांक ११६मध्यें "आनंदवनभुवन" या नावाच्या प्रकरणात रामदासांनी पुढे होणार ते पाहून बायबलमधलि सेंट् जॉनप्रमाणे आपले विचार प्रकट केले आहेत. मुख्य देवच उठल्यावर इतराची किमत काय ! अभक्ताचा क्षय होऊन हिंदुस्थान बळावले आहे, औरंगजेबाचें राज्य नष्ट होऊन पूर्वीप्रमाणे सुराज्य स्थापन झालें आहे, रामवरदायिनी माता हातात गर्द घेऊन रायासमागमें चालली आहे, व पूर्वीप्रमाणेच पुढेही भक्ताचे रक्षण करीत आहे, असें रामदासानी पाहिलेलें दिव्यदर्शन या आनंदवनभुवनात त्यांनी प्रथित केले आहे. अशाप्रकारचे उद्गार वाचल्यावर रामदास राजकारणी नव्हते असें कोण म्हणेल !

२३. रामदासाचे गुरु कोण असा एक प्रश्न नेहमी विचारण्यांत येतो. त्याचें उत्तर रामदासानी क्रमाक ११७ मध्ये दिले आहे. त्यावरून रामचंद्राचा दृष्टात होऊन रामदासास मत्र मिळाला असावा असे दिसते. मारुतीची उपासना रामचद्रानी दृष्टांतांत सांगितल्याप्रमाणें रामदासानी केली असें त्यात लिहिलें आहे. क्रमाक ११८ मध्यें रामदासानी आपल्या पित्यास म्हणजे सूर्याजीपंतास गांवाबाहेर भीमदेवालयामध्ये रामलक्ष्मणापासून उपदेश कसा झाला, तुझे पुत्र रामदास्याचा ध्वज उभारतील असा वर त्यास कसा मिळाला, शेवटी वडिलाच्या निधनानतर ज्येष्ठ बंधूंनीं मंत्र न सांगितल्यामुळे रामदासासही त्याच देवालयांत रामाचा दृष्टांत कसा झाला, हें बालपणीचें आपलें चरित्रकथन रामदासांनी केलें आहे. क्रमाक ११९ मध्यें हनुमंतवेलीवरून राममंडपावर चढून आत्मज्ञानाचे फळ आपल्यास कसे प्राप्त झाले हे रामदासांनीं सुंदर रीतीने सांगितलें आहे. क्रमांक १२० मध्ये मनास मागे टाकणाऱ्या प्राणदात्या मारुतीची उपासना त्यांनीं सांगितली आहे. शेवटीं तेरा अक्षरी मंत्राचा तेरा कोटि जप केल्यास देवाचें दर्शन होईल असें रामदासानी अभिवचन दिलें आहे (क्र. १२२).

२४. रामदासांचीं पदें, अभंग, वगैरे तुकारामज्ञानेश्वरांच्या इतकी जरी संख्येनें नसलीं तरी त्यांतलि शिकवण ज्ञानेश्वरतुकारामांच्या प्रमाणेंच ईश्वरप्राप्ती-

ची आहे. कोणत्याही स्थितीत 'आपण राघवाची कांस सोडू नये (क. १२३). आपण हजारो अन्याय केले तरी अनुताप झाल्यास गुरु क्षमा करतील (क. १२४); शिंक, जांभई, खोकला इतका काळही आपण व्यर्थ जाऊ देतां कामा नये (क. १२६); अशानें एकदम थोर लाभ होतो (क. १२७); साधनाची खटपट व्यर्थ ठरते (क. १२८); गृहात अगर वनात सारखेंच रामदर्शन होते (क. १२९); एकदां रामाचें दर्शन झाल्यावर पुनः राम विन्मुख होत नाही (क. १३०), राम व विठ्ठल हे सारखेच आहेत; जसा भाव तसा देव (क १३१); अशी शिकवण रामदासांनी आपल्या अभंगात व पदांत केली आहे.

२५. स्फुट प्रकरणांत शक्ति व युक्ति या दोन्हीखेरीज काम चालत नाही असें सांगून सर्व प्राणिमात्रांच्या शरीरांत खेळणारी विश्वव्यापिनी शक्ति, अगर भवानी माता, इला आपण हुडकून काढली असें रामदासांनी सांगितलें आहे (क.१३२). देव व देउळें यामधील भेद लोक मानीत नाहीत; देवळासाठीच लोक भाडतात, त्यास देव चुकवून राहतो, देव मोठा ठक असल्यानें जीर्ण देवालये तो सोडून जातो; ब्रह्मा, विष्णु महेश्वर, हे देव नसून ती देवालयेंच होत; अशा त्या निश्चल देवाचें ध्यान सर्वांनी करावें असे रामदासांनी पुनः सांगितले आहे (क. १३३). क्रमांक १३४ हा उतारा आजपर्यंत अप्रसिद्ध होता. तो रा. शंकर श्रीकृष्ण देव व रा. गणेश गोविंद कारखानीस यांच्यामुळें आम्हांस प्रकाशित करण्यास सांपडला आहे, याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहोंत. या उताऱ्यात गुरुशिष्यसंवादरूपानें दासबोधाचा सोंलीव अर्थ दिला आहे. ईश्वरसाक्षात्काराच्या वाटेत जे नानाप्रकारचे अनुभव येतात ते यांत कल्याण व रामदास याच्या संवादांत ग्रथित केले असल्यानें या उताऱ्याचें फारच महत्त्व आहे हे सांगावयास नको. क्रमांक १३५ मध्यें ज्ञानदेवांनी " धर्म जागो निवृत्तीचा " असें जें सुंदर पद केलें आहे त्याबरहुकूम रामदासांनी " राघवाचा धर्म जागो " अशा रीतीचे पद करून देवास " मागणे निरसे जेणें। ऐसें देगा रामराया " अशा प्रकारचें एकच मागणे मागितले आहे. हें सर्व पद बहारीचें असल्यानें रामदासांच्या निष्कामभक्तीचा येथें कळसच झाला आहे असें म्हणण्यास हरकत नाही.

२६. या ग्रंथाचे कामी रा. सा. वासुदेवराव दामले, रा. गणेश गोविंद कारखानीस, रा. शंकर केशव धर्माधिकारी, व रा. जगन्नाथ रघुनाथ लेले या सर्वांची जी मदत झाली आहे, त्याबद्दल मी त्या सर्वांचा फार आभारी आहे. आर्यभूषण छापखान्याच्या चालकांनीं फार मेहनत घेऊन व झीज सोसून हें पुस्तक छापून दिलें त्याबद्दल मी त्यांचाही फार आभारी आहें.

अनुक्रमणिका.

रामदासवचनामृत

भाग पहिला.

१. प्रासंगिक.

क्रमांक		पृष्ठ
१.	रामदासांचा शिवाजीस उपदेश.	१
२.	ब्राह्मणांच्या दुःस्थितीबद्दल रामदासांचे उद्गार. ...	२
३.	रामदासांचें स्वतःच्या उपासनेचें वर्णन.	३
४.	रामदासांची रामभक्ति.	४

२. तात्त्विक.

५.	ज्ञानाचें व्यतिरेकात्मक वर्णन.	६
६.	ज्ञान म्हणजे काय?	९
७.	आत्मज्ञानाच्या योगानें सर्व पातकांचा व दुःखांचा नाश होतो.	१४
८.	मूर्ति म्हणजे देव नव्हे.	१५
९.	नाना देव आणि एक देव.	१७
१०.	खरा देव म्हणजे मूर्ति नव्हे.	१८
११.	देवांचा जो देव तो गुरूच्या योगानें कळतो. ...	१९
१२.	अंतरात्मा सर्व देवांहून श्रेष्ठ आहे.	२०
१३.	आत्मा हा सर्व देवांहून श्रेष्ठ आहे.	२१
१४.	देवता व भुतें यांचें अस्तित्व.	२२
१५.	देवता वायुरूपानें राहतात.	२३

क्रमांक		पृष्ठ
१६.	भुतें संतांस बाधा करूं शकत नाहींत.	२४
१७.	देवांचें जाणीवरूपानें अस्तित्व.	२४
१८.	ब्रह्मा, विष्णु, महेश, यांचें केवळ प्रवृत्तिरूपानें अस्तित्व.	२५
१९.	अनृताचें प्राबल्य.	२६
२०.	ब्रह्मांडापैलीकडील गोष्टी.	२६
२१.	सृष्टिकर्त्यास ओळखणें हीच उपासना.	२७
२२.	देव कोणास म्हणावें?	२८
२३.	देह, आत्मा, आणि ब्रह्म यांचा संबंध.	३२
२४.	चारही आत्मे मिळून एकच होत.	३३
२५.	ब्रह्माचें स्वरूप.	३४

३. साक्षात्कार.

२६.	देवाचें भजन कां करावें?	३६
२७.	या संसारयात्रेमध्यें देवाचा नफा पहावा.	३८
२८.	अध्यात्मप्राप्तीविषयीं देहाचा उपयोग.	३९
२९.	अंतकालची दुःस्थिति.	४२
३०.	मृत्यूचें सामर्थ्य.	४३
३१.	" सर्व सांडून शोधा मजला. "	४८
३२.	याच जन्मीं परमेश्वराचा साक्षात्कार होणें शक्य आहे.	४९
३३.	बद्ध मनुष्याचें वर्णन.	५०
३४.	गुरूची आवश्यकता.	५०
३५.	" सद्गुरुकृपा तेचि किली. "	५३
३६.	देवापेक्षां गुरु श्रेष्ठ आहे.	५४
३७.	" म्हणौनी सद्गुरु वर्णवेना। हे गे हेचि माझी वर्णना. "	५४
३८.	सद्गुरूचें लक्षण.	५७
३९.	साधुलक्षण.	५८
४०.	" जें त्रैलोकीं नाहीं दान। तें करिती संतसज्जन. "	६३

क्रमांक	पृष्ठ
४१. संतसभावर्णन.	६६
४२. संत चमत्कार करीत नाहींत, देव संतांबद्दल चमत्कार करितो.	६८
४३. ज्ञान आणि सामर्थ्य.	६९
४४. शिष्यलक्षण.	७०
४५. मोक्ष कसा मिळतो?	७३
४६. सत्त्वगुणलक्षण.	७४
४७. नाममहिमा.	८०
४८. " उपासनेचा मोठा आश्रयो. "	८२
४९. " परंतु तेथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे. " ...	८३
५०. ईश्वराबद्दल अहेतुक प्रेम.	८४
५१. श्रवणनिरूपण.	८५
५२. " निःशंक निर्लज्ज कीर्तन । करितां रंग माजे. " ...	८९
५३. भक्तियुक्त काव्य हेंच प्रासादिक काव्य होय. ...	९१
५४. कल्पना कशी मोडावी?	९२
५५. " निर्विकल्पास कल्पावें । कल्पना मोडे स्वभावें. " ...	९४
५६. खोटें ध्यान व खरें ध्यान.	९४
५७. साधकलक्षण.	९७
५८. सख्यभक्तिनिरूपण.	१००
५९. आत्मनिवेदनभक्ति.	१०३
६०. आत्मनिवेदन म्हणजेच आत्मज्ञान.	१०५
६१. मुक्तिचतुष्टयनिरूपण.	१०६
६२. जीवन्मुक्तलक्षण.	१०६
६३. " साधन सोडितां होये । मुक्तपणें बद्ध. " ...	१०९
६४. " कुल्लाळ पावला राज्यपदवी । आतां रासभें कासया राखावीं. "	११०
६५. साक्षात्कार झाला हें कशावरून ओळखावें? ...	११२

क्रमांक		पृष्ठ
६६.	योग्यांच्या गुप्तधनाचें वर्णन.	११३
६७.	अनुभवाचे उलट सुलट प्रकार.	११५
६८.	“ जैसा भाव जयापासीं, तैसा देव तयासीं. ” ...	११६
६९.	परमार्थवर्णन.	११६
७०.	प्रचीतिनिरूपण.	११९
७१.	विमळब्रह्मनिरूपण.	१२०
७२.	ब्रह्माचें सर्वगत अस्तित्व.	१२५

४. कर्मयोग.

७३.	निःस्पृह वर्तणूक.	१२७
७४.	उत्तमपुरुषनिरूपण.	१२९
७५.	महंतलक्षणें.	१३२
७६.	“ जंव उत्तम गुण न कळे । तों या जनास काये कळे. ”	१३३
७७.	शिकवणनिरूपण.	१३४
७८.	विवेकनिरूपण.	१३५
७९.	राजकारणनिरूपण.	१३७
८०.	“ कांहीं गल्बला कांहीं निवळ । ऐसा कंठित जावा काळ. ”	१४०
८१.	समर्थलक्षण.	१४१
८२.	“ भगवत्कीर्तीनें भरावें । भूमंडळ. ”	१४३
८३.	रामदासांचें आत्मचरित्र.	१४५

५. उपसंहार.

८४.	“ समर्थकृपेचीं वचनें । तो हा दासबोध. ” ...	१४८

रामदासवचनामृत

भाग दुसरा.

६. जुना दासबोध.

क्रमांक पृष्ठ

८५. देह पडे कां देव जोडे ! ... ...
जु. दा. ७·१३–२१ १५३

८६. प्रपंचपरमार्थ. ... ...
जु. दा. ११·५४–६० १५४

८७. अनुभव सांगूं नये. ... ...
जु. दा. १५·३७–४६ १५४

८८. रामास मागणें. ... ...
जु. दा. १६·१–१७ १५५

७. मनाचे श्लोक.

८०. मनास प्रार्थना. ... ...
म. श्लो. (२१) १५७

८. पंचसमासी.

९०. स्वरूपानुसंधान. ... ...
पं. स. ४·१८–३० १६१

९१. सर्वत्र रामदर्शन. ... ...
पं. स. ५·५–३३ १६२

९. मानपंचक.

९२. रामराज्य. ... ...
मा. पं. १·७–२५ १६३

क्रमांक पृष्ठ

९३. सर्व देव मिळून एकच. ... ...
मा. पं. ४·१२५ १६५

१०. निर्गुणध्यान.

९४. परममार्गाचें वर्णन. ... ...
नि. ध्या. ५२–७४ १६७

११. जनस्वभावगोसावी.

९५. भोंदू गुरूंचें वर्णन. ... ...
ज. गो. १–७० १६८

१२. राममंत्राचे श्लोक.

९६. हरे राम हा मंत्र सोपा जपा रे. ... ...
रा. मं. श्लो. (८) १७५

१३. करुणाष्टकें.

९७. रघुनायेका, मागणें हेंचि आतां. ... ... १७७.
९८. उदासीन हा काळ कोठें न कंठे. १७७
९९. नसे भक्ति ना ज्ञान. १७८
१००. सर्वोत्तमा कैं मज भेटि देसी. १७९
१०१. रघुविरभजनाची. १७९
१०२. जनीं जाणिजे योग हा सुकृताचा. १८०
१०३. अनुदिनिं अनुतापें. १८१
१०४. तुझा दास मी व्यर्थ जन्मासि आलों. १८४
१०५. रघूनायका, काय कैसें करावें ? १८५
१०६. रामाचा धांवा. १८६
१०७. बुद्धि दे रघुनायका. १८७
१०८. रामदासांस कफव्यथा झाली असतां त्यांनीं केलेलें मारुतीचें करुणाष्टक. १८८

१४. ऐतिहासिक.

क्रमांक		पृष्ठ
१०९. समर्थांचें स्वहस्तलिखित पत्र....	सांप्रदायाचीं कागदपत्रें.	१९०
११०. रामदासांचें महंतांस पत्र.	विविध विषय १. १४१–१४२	१९२
१११. सुंदरमठ.	विविध विषय २. १३७--१३८	१९३
११२. प्रतापगडच्या भवानीचें स्तोत्र.	रामदासांची कविता ३९३. १--२०	१९४
११३. शिवाजीचें वर्णन.		१९६
११४. क्षात्रधर्म.		१९७
११५. शिवाजीची सनद.		१९९
११६. आनंदवनभुवन.	रामदासांची कविता ४२१. १–५३	२०१

१५. सांप्रदायिक.

११७. रामदासांचे गुरु कोण ?	२०३
११८. रामदासांचें स्वचरित्रकथन.	२०४
११९. हनुमंत आमुची कुळवल्ली.	२०६
१२०. "भीमरूपी" स्तोत्र.	२०७
१२१. छत्रसिंहासनीं.	२०८
१२२. रामाचें दर्शन केव्हां होईल ?...	२०८

१६. अभंग, पदें, वगैरे.

१२३. "राघवाची कास न सोडी सत्य !"	२०९
१२४. आतां तरी जाय जाय.	२१०
१२५. देव जवळ असून भेट नाहीं.	२१०

क्रमांक		पृष्ठ
१२६. एकही क्षण वायां न दवडितां देवाचें चिंतन.	...	२१०
१२७. देवाचा वियोग नाहीं तो योग.	... ...	२११
१२८. देव एकाएकीं प्रसन्न होतो.	... ...	२११
१२९. देवाचें सर्वत्र दर्शन.	... ...	२११
१३०. राघवाच्या भेटीनें अमृतत्व.	... ...	२११
१३१. विठ्ठल व राम.	... ...	२१२

१७. स्फुट प्रकरणें.

१३२. शक्ति व युक्ति	... ...	२१३
	रामदासांची कविता ४३६. २२–५७	
१३३. देव व देउळें.	... ...	
	रामदासांची कविता ४३९. १–२२	२१४
१३४. गुरुशिष्यसंवादात्मक दासबोधाचा सोलींव अर्थ.	...	
	सोलींव अर्थ १५–३०	२१५
१३५. श्रीसमर्थकृत पांगूळ.	... ...	
	विविधविषय २. ८९	२१७

रामदासवचनामृत

भाग पहिला

दासबोध

रामदासवचनामृत

(दासबोध)

१. प्रासंगिक

१. रामदासांचा शिवाजीस उपदेश.

वरें ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजा भवानी ।
परंतु विचार पाहोनि । कार्य करणें ॥ ९ ॥
अखंडचि सावधाना । बहुत काये करावी सूचना ।
परंतु कांहीं येक अनुमाना । आणिलें पाहिजे ॥ १० ॥
समर्थापासीं बहुत जन । राहिला पाहिजे साभिमान ।
निश्चय करूनियां मन । लोक असती ॥ ११ ॥
म्लेंच्छ दुर्जन उदंड । बहुतां दिसांचें माजलें बंड ।
या कारणें अखंड । सावधान असावें ॥ १२ ॥
सकळकर्ता तो ईश्वरु । तेणें केला अंगिकारु ।
तया पुरुषाचा विचारु । विरुळा जाणे ॥ १३ ॥
न्यायनीति विवेक विचार । नाना प्रसंग प्रकार ।
परीक्षणें परांतर । देणें ईश्वराचें ॥ १४ ॥
महायेत्न सावधपणें । समई धारिष्ट धरणें ।
अद्भुतचि कार्य करणें । देणें ईश्वराचें ॥ १५ ॥

येश कीर्ती प्रताप महिमा । उत्तम गुणासी नाहीं सीमा ।
नाहीं दुसरी उपमा । देणें ईश्वराचें ॥ १६ ॥

देव ब्राह्मण आचार विचार । कितेक जनासी आधार ।
सदा घडे परोपकार । देणें ईश्वराचें ॥ १७ ॥

येहलोक परलोक पाहाणें । अखंड सावधपणें राहाणें ।
बहुत जनाचें साहाणें । देणें ईश्वराचें ॥ १८ ॥

देवाचा कैपक्ष[१] घेणें । ब्राह्मणां चिंता वाहाणें ।
बहुत जनासी पाळणें । देणें ईश्वराचें ॥ १९ ॥

धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ।
जाले आहेत पुढें होणार । देणें ईश्वराचें ॥ २० ॥

दा. १८. ६. ९–२०.

२. ब्राह्मणांच्या दुःस्थितीबद्दल रामदासांचे उद्गार.

नीच प्राणी गुरुत्व पावला । तेथें आचारचि बुडाला ।
वेदशास्त्रब्राह्मणाला । कोण पुसे ॥ २९ ॥

ब्रह्मज्ञानाचा विचारु । त्याचा ब्राह्मणासीच अधिकारु ।
वर्णानां ब्राह्मणो गुरुः । ऐसें वचन ॥ ३० ॥

ब्राह्मण बुद्धीपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले ।
गुरुत्व सांडून जाले । शिष्य शिष्यांचे ॥ ३१ ॥

कित्येक दावलमलकांस[२] जाती । कित्येक पीरास भजती ।
कित्येक तुरुक होती । आपले इच्छेनें ॥ ३२ ॥

ऐसा कलियुगींचा आचार । कोठें राहिला विचार ।
पुढें पुढें वर्णसंकर । होणार आहे ॥ ३३ ॥

---

१ कैवार. २ मुसलमानांचा एक अवलिया.

गुरुत्व आलें नीच याती । कांहींएक वाढली महंती ।
शूद्र आचार बुडविती । ब्राह्मणांचा ॥ ३४ ॥
हें ब्राह्मणास कळेना । त्यांची वृत्तिच वळेना ।
मिथ्या अभिमान गळेना । मूर्खपणाचा ॥ ३५ ॥
राज्य नेलें म्लेंछि क्षेत्रीं[1] । गुरुत्व नेलें कुपात्रीं ।
आपण अरत्रीं ना परत्रीं[2] । कांहींच नाहीं ॥ ३६ ॥
ब्राह्मणास ग्रामणीनें[3] बुडाविलें । विष्णूनें श्रीवत्स मिरविलें[4] ।
त्याच विष्णूनें श्रापिलें । फरशरामें ॥ ३७ ॥
आम्हींही तेचि ब्राह्मण । दुःखें बोलिलें हें वचन ।
वडिल गेले ग्रामणी करून । आम्हांभोंवते ॥ ३८ ॥
आतांचे ब्राह्मणीं काय केलें । अन्न मिळेना ऐसें जालें ।
तुम्हां बहुतांचे प्रचितीस आलें । किंवा नाहीं ॥ ३९ ॥
बरें वडिलांस काय म्हणावें । ब्राह्मणांचें अदृष्ट जाणावें ।
प्रसंगें बोलिलें स्वभावें । क्षमा केलें पाहिजे ॥ ४० ॥

दा. १४. ७. २९–४०.

३. रामदासांचें स्वतःच्या उपासनेचें वर्णन.

सकळांवडिल अंतरात्मा । त्यासि नेणे तो दुरात्मा ।
दुरात्मा म्हणजे दुरी आत्मा । अंतरला तया ॥ १८ ॥
जवळी असोन चुकलें । प्रत्ययास नाहीं सोकलें ।
उगेंचि आलें आणि गेलें । देवाचकारितां ॥ १९ ॥
म्हणौन सकळां वडिल देव । त्यासी होतां अनन्यभाव ।
मग हे प्रकृतीचा स्वभाव । पालटों लागे ॥ २० ॥

---

१ क्षत्रियांनी. २ येथें ना तथें. ३ ग्रामण्यानें. ४ मिळविलें.

करी आपुला व्यासंग । कदापि नोहे ध्यानभंग ।
बोलणें चालणें वेंग[1] । पडोंच नेदी ॥ २१ ॥

जें वडिलीं निर्माण केलें । तें पाहिजे पाहिलें ।
काये काये वडिलीं केलें । किती पाहावें ॥ २२ ॥

तो वडिल जेथें चेतला[2] । तोचि भाग्यपुरुष जाला ।
अल्प चेतनें तयाला । अल्पभाग्य ॥ २३ ॥

तया नारायेणाला मनीं । अखंड आठवावें ध्यानीं ।
मग ते लक्ष्मी तयापासुनी । जाईल कोठें ॥ २४ ॥

नारायेण असे विश्वीं । त्याची पूजा करीत जावी ।
याकारणें तोषवावी । कोणी तरी काया ॥ २५ ॥

उपासना शोधून पाहिली । तों ते विश्वपाळिती[3] जाली ।
न कळे लीळा परीक्षिली । न वचे कोणा ॥ २६ ॥

देवाची लीळा देवेंविण । आणीक दुसरा पाहे कोण ।
पाहाणें तितुकें आपण । देवाचि असे ॥ २७ ॥

उपासना सकळां ठाईं । आत्माराम कोठें नाहीं ।
याकारणें ठाइं ठाइं । रामें आटोपिलें[4] ॥ २८ ॥

ऐसी माझी उपासना । आणितां नये अनुमाना ।
नेऊनि घाली निरंजना- । पैलीकडे ॥ २९ ॥

दा. १९. ९. १८–२९.

४. रामदासांची रामभक्ति.

आमुचे कुळीं रघुनाथ । रघुनाथें आमुचा परमार्थ ।
जो समर्थाचाहि समर्थ । देवां सोडविता ॥ २१ ॥

---

१ व्यंग. २ प्रकाशित जाला. ३ विश्वाचें पाळण करणारी. ४ व्यापिलें.

त्याचे आम्हीं सेवकजनें। सेवेकरितां जालें ज्ञान।
तथें अभावें[1] धरितां पतन। पाविजेल कीं॥ २२॥

गुरु सांगती सारासार। त्यास कैसें म्हणावें असार।
तुज काय सांगणें विचार। शाहाणे जाणती॥ २३॥

समर्थाचे मनींचें तुटे। तेंचि जाणावें अदृष्ट खोटें।
राज्यपदापासून करंटें। च्यवलें जैसें॥ २४॥

मी थोर वाटे मनीं। तो नव्हे ब्रह्मज्ञानी।
विचार पाहतां देहाभिमानी। प्रत्यक्ष दिसे॥ २५॥

वस्तुभजन करीना। ना न करी ऐसेंही म्हणेना।
तरी हे जाणावी कल्पना। दडोन राहिली॥ २६॥

ना तें ज्ञान ना तें भजन। उगाचि आला देहाभिमान।
येथें नाहीं किं अनुमान। प्रत्यय तुझा॥ २७॥

तरी आतां ऐसें न करावें। रघुनाथभजनीं लागावें।
तेणेंचि ज्ञान बोलावें। चळेना ऐसें॥ २८॥

करी दुर्जनाचा संहार। भक्तजनासी आधार।
ऐसा हा तों चमत्कार। रोकडा[3] चाले॥ २९॥

मनीं धरावें तें होतें। विघ्न अवघेंचि नासोन जातें।
कृपा केलियां रघुनाथें। प्रचित येते॥ ३०॥

रघुनाथभजनें ज्ञान झालें। रघुनाथभजनें महत्त्व वाढलें।
म्हणोनियां तुवां केलें। पाहिजे आधीं॥ ३१॥

हें तों आहे सप्रचित। आणि तुज वाटेना प्रचित।
साक्षात्कारें नेमस्त। प्रत्ययो करावा॥ ३२॥

---

१ अविश्वास. २ च्युत झालें. ३ प्रत्यक्ष, रोखठोक.

रघुनाथ स्मरोनि कार्य करावें । तें तात्काळचि सिद्धी पावे।
कर्ता राम हें असावें । अभ्यांतरीं ॥ ३३ ॥

कर्ता राम मी नव्हे आपण । ऐसें सगुणनिवेदन ।
निर्गुणीं तें अनन्य । निर्गुणचि होइजे ॥ ३४ ॥

मी कर्ता ऐसें म्हणतां । कांहींच घडेना सर्वथा ।
प्रचित पाहासी तरी आतां । सीघ्रचि पाहे ॥ ३५ ॥

मी कर्ता ऐसें म्हणसी । तेणें तूं कष्टी होसी ।
राम कर्ता म्हणतां पावसी । येश कीर्ती प्रताप ॥ ३६ ॥

दा. ६. ७. ३१–३६.

२. तात्त्विक

१. ज्ञानाचें व्यतिरेकात्मक वर्णन.

भूत भविष्य वर्तमान । ठाउकें आहे परिच्छिन्न[१] ।
यासीहि म्हणिजे तें ज्ञान । परी तें ज्ञान नव्हे ॥ ३ ॥

बहुत केलें विद्यापठण । संगीत शास्त्र रागज्ञान ।
वैदिक शास्त्र वेदाधेन[२] । हेंही ज्ञान नव्हे ॥ ४ ॥

नाना वनितांची परीक्षा । नाना मनुष्यांची परीक्षा ।
नाना नरांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ ६ ॥

नाना अश्वांची परीक्षा । नाना गजांची परीक्षा ।
नाना श्वापदांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ ७ ॥

---

१ संपूर्ण. २ अधेन = अध्ययन.

नाना पशूंची परीक्षा । नाना पक्षांची परीक्षा ।
नाना भूतांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ ८ ॥

नाना यानांची परीक्षा । नाना वस्त्रांची परीक्षा ।
नाना शस्त्रांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ ९ ॥

नाना धातूंची परीक्षा । नाना नाण्यांची परीक्षा ।
नाना रत्नांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १० ॥

नाना पाषाण परीक्षा । नाना काष्ठांची परीक्षा ।
नाना वाद्यांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ ११ ॥

नाना पुष्पांची परीक्षा । नाना फळांची परीक्षा ।
नाना वल्लींची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १४ ॥

नाना दुःखांची परीक्षा । नाना रोगांची परीक्षा ।
नाना चिन्हांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १५ ॥

नाना मंत्रांची परीक्षा । नाना यंत्रांची परीक्षा ।
नाना मूर्तींची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १६ ॥

नाना क्षेत्रांची परीक्षा । नाना गृहांची परीक्षा ।
नाना पात्रांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १७ ॥

नाना होणार परीक्षा । नाना समयांची परीक्षा ।
नाना तर्कांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १८ ॥

नाना शब्दांची परीक्षा । नाना अर्थांची परीक्षा ।
नाना भाषांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ २१ ॥

नाना मतांची परीक्षा । नाना ज्ञानांची परीक्षा ।
नाना वृत्तींची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ २३ ॥

नाना रूपांची परीक्षा । नाना रसनेची परीक्षा ।
नाना सुगंध परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ २४ ॥

नेमकचि बोलणें । तत्काळचि प्रतिवचन देणें ॥
सीघ्रचि कवित्व करणें । हें ज्ञान नव्हे ॥ २६ ॥

नेत्रपालवी नादकळा । करपालवी भेदकळा ।
स्वरपालवी संकेतकळा । हें ज्ञान नव्हे ॥ २७ ॥

काव्यकुशळ संगीतकळा । गीतप्रबंध नृत्यकळा ।
सभाचातुर्य शब्दकळा । हें ज्ञान नव्हे ॥ २८ ॥

नाना लाघवें चित्रकळा । नाना वाद्यें संगीत कळा ।
नाना प्रकारें विचित्र कळा । हें ज्ञान नव्हे ॥ ३० ॥

आदिकरूनि चौसष्टि कळा । याहि वेगळ्या नाना कळा ।
चौदा विद्या सिद्धि कळा । हें ज्ञान नव्हे ॥ ३१ ॥

असो सकळ कळाप्रवीण । विद्यामात्रपरिपूर्ण ।
तरी ते कौशल्यता परी ज्ञान । ह्मणोंचि नये ॥ ३२ ॥

हें ज्ञान होयसें भासे । परंतु मुख्य ज्ञान तें अनारिसें[1] ।
जेथें प्रकृतीचें पिसें[2] । समूळ वावें[3] ॥ ३३ ॥

जाणावें दुसऱ्याचें जीवींचें । हें ज्ञान वाटे साचें ।
परंतु हें आत्मज्ञानाचें । लक्षण नव्हे ॥ ३४ ॥

माहानुभाव महाभला । मानसपूजा करितां चुकला ।
कोणी येकें पाचारिला । ऐसें नव्हे म्हणोनि ॥ ३५ ॥

ऐसी जाणे अंतरस्थिती । तयासी परमज्ञाता म्हणती ।
परंतु जेणें मोक्षप्राप्ती । तें हें ज्ञान नव्हे ॥ ३६ ॥

बहुत प्रकारीचीं ज्ञानें । सांगों जातां असाधारणें ।
सायोज्यप्राप्ती होये जेणें । तें ज्ञान वेगळें ॥ ३७ ॥

दा. ५. ५. ३–३७.

---

१ वेगळें. २ वेड. ३ व्यर्थ.

६. ज्ञान म्हणजे काय ?

ऐक ज्ञानाचें लक्षण। ज्ञान म्हणिज आत्मज्ञान।
पाहावें आपणासि आपण। या नाव ज्ञान ॥ १ ॥
मुख्य देवास जाणावें। सत्यस्वरूप वोळखावें।
नित्यानित्य विचारावें। या नाव ज्ञान ॥ २ ॥
जेथें दृश्यप्रकृति सरे। पंचभूतक वोसरे।
समूळ द्वैत निवारे। या नाव ज्ञान ॥ ३ ॥
मनबुद्धिअगोचर। न चले तर्काचा विचार।
उलेख[1] परेहूनि पर। या नाव ज्ञान ॥ ४ ॥
जेथें नाहीं दृश्यभान। जेथें जाणीव हें अज्ञान।
विमळ शुद्ध स्वरूपज्ञान। यासि बोलिजे ॥ ५ ॥
सर्वसाक्षी अवस्ता तुर्या[2]। ज्ञान ऐसें म्हणती तया।
परी तें जाणिजें वायां। पदार्थज्ञान ॥ ६ ॥
दृश्य पदार्थ जाणिजे। त्यास पदार्थज्ञान बोलिजे।
शुद्धस्वरूप जाणिजे। या नाव स्वरूपज्ञान ॥ ७ ॥
जेथें सर्वचि नाहीं ठाईचें[3]। तेथें सर्वसाक्षित्व कैंचें।
म्हणौनि शुद्ध ज्ञान तुर्येचें। मानूंचि नये ॥ ८ ॥
ज्ञान म्हणजे अद्वैत। तुर्या प्रत्यक्ष द्वैत।
म्हणौनि शुद्ध ज्ञान तें संतत[4]। वेगळेंचि असे ॥ ९ ॥
ऐक शुद्ध ज्ञानाचें लक्षण। शुद्ध स्वरूपचि आपण।
या नाव शुद्ध स्वरूपज्ञान। जाणिजे श्रोतीं ॥ १० ॥
माहावाक्य उपदेश भला। परी त्याचा जप नाहीं बोलिला।
तेथींचा तो विचारचि केला। पाहिजे साधकें ॥ ११ ॥

---

१ उल्लेख, निर्देश. २ चतुर्थावस्था. ३ सत्य. ४ स्वतत्र, अगर नेहमी.

माहावाक्य उपदेशसार । परी घेतला पाहिजे विचार ।
त्याच्या जपें अंधकार । न फिटे भ्रांतीचा ॥ १२ ॥

माहावाक्याचा अर्थ घेतां । आपण वस्तुचि तत्त्वतां ।
त्याचा जप करितां वृथा । सीणचि होये ॥ १३ ॥

माहावाक्याचें विवरण । हें मुख्य ज्ञानाचें लक्षण ।
शुद्ध लक्ष्यांशें आपण । वस्तुच आहे ॥ १४ ॥

आपला आपणासि लाभ । हें ज्ञान परम दुल्लभ[1] ।
जें आदिअंतीं स्वयंभ । स्वरूपचि स्वयें ॥ १५ ॥

जेथून हें सर्वही प्रगटे । आणी सकळही जेथें आटे ।
तें ज्ञान जालियां फिटे । भ्रांति बंधनाची ॥ १६ ॥

मतें आणि मतांतरें । जेथें होती निर्विकारें ।
अति सूक्ष्म विचारें । पाहातां ऐक्य ॥ १७ ॥

जें या चराचराचें मूळ । शुद्ध स्वरूप निर्मळ ।
या नाव ज्ञान केवळ । वेदांतमतें ॥ १८ ॥

शोधितां आपलें मूळस्थान । सहजचि उडे अज्ञान ।
या नाव म्हणिजे ब्रह्मज्ञान । मोक्षदायेक ॥ १९ ॥

आपणासि वोळखों जातां । आंगीं बाणे सर्वज्ञता ।
तेणें एकदेसी वार्ता । निशेष उडे ॥ २० ॥

मी कोण ऐसा हेत । धरून पाहातां देहातीत ।
अवलोकितां नेमस्त । स्वरूपचि होये ॥ २१ ॥

असो पूर्वी थोर थोर । जेणें ज्ञानें पैलपार ।
पावले ते साचार । ऐक आतां ॥ २२ ॥

---

१ दुर्लभ.

व्यास वसिष्ठ महामुनी । शुकनारद समाधानी ।
जनकादिक महाज्ञानी । येणेंचि ज्ञानें ॥ २३ ॥

वामदेवादिक योगेश्वर । वाल्मीक अत्रि ऋषेश्वर ।
शौनिकादि अध्यात्मसार । वेदांतमतें ॥ २४ ॥

सनकादिक मुख्य करूनी । आदिनाथ मीन गोरक्षमुनी ।
आणीक बोलतां वचनीं । अगाध[1] असती ॥ २५ ॥

सिद्ध मुनी माहानुभाव । सकळांचा जो अंतर्भाव ।
जेणें सुखें माहादेव । डुल्लत सदा ॥ २६ ॥

जें वेदशास्त्रांचें सार । सिद्धांत धादांत विचार ।
ज्याची प्राप्ती भाग्यानुसार । भाविकांस होये ॥ २७ ॥

साधुसंत आणी सज्जन । भूत भविष्य वर्तमान ।
सर्वत्रांचें गुह्यज्ञान । तें सांगिजेल आतां ॥ २८ ॥

तीर्थें व्रतें तपें दानें । जें न जोडे धूम्रपानें ।
पंचाग्नी गोरांजनें[3] । जें प्राप्त नव्हे ॥ २९ ॥

सकळ साधनांचें फळ । ज्ञानाची सिर्गची केवळ ।
जेणें संशयाचें मूळ । निशेष तुटे ॥ ३० ॥

छपन्न भाषा तितुके ग्रंथ । आदिकरून वेदांत ।
या इतुकियांचा गहनार्थ । येकचि आहे ॥ ३१ ॥

जे नेणवे पुराणीं । जेथें सिणल्या वेदवाणी ।
तेंचि आतां येचि क्षणीं । बोधीन गुरुकृपें ॥ ३२ ॥

पाहिलें नस्तां संस्कृतीं । रीग नाहीं मऱ्हाष्ट ग्रंथीं ।
हृदई वसल्या कृपामूर्ती । सद्गुरु स्वामी ॥ ३३ ॥

---

१ कित्येक. २ आत्मसाक्षात्कार. ३ एक प्रकारचें अग्निसाधन. ४ शेवट. ५ प्रवेश.

आतां नलगे संस्कृत । अथवा ग्रंथ प्राकृत ।
माझा स्वामी कृपेसहित । हृदईं वसे ॥ ३४ ॥

न करितां वेदाभ्यास । अथवा श्रवण सायास ।
प्रेत्नेविण सौरसं[1] । सद्गुरुकृपा ॥ ३५ ॥

ग्रंथ मात्र मऱ्हाष्ट्र । त्याहून संस्कृत श्रेष्ठ ।
त्या संस्कृतामधें पष्ट[2] । थोर तो वेदांत ॥ ३६ ॥

त्या वेदांतापरतें कांहीं । सर्वथा श्रेष्ठ नाहीं ।
जेथें वेदगर्भ सर्वही । प्रगट जाला ॥ ३७ ॥

असो ऐसा जो वेदांत । त्या वेदांताचाही मथितार्थ ।
अतिगहन जो परमार्थ । तो तूं ऐक आतां ॥ ३८ ॥

अरे गहनाचेंहि गहन । तें तूं जाण सद्गुरुवचन ।
सद्गुरुवचनें समाधान । नेमस्त आहे ॥ ३९ ॥

सद्गुरुवचन तोचि वेदांत । सद्गुरुवचन तोचि सिद्धांत ।
सद्गुरुवचन तोचि धादांत । सप्रचीत आतां ॥ ४० ॥

जें अत्यंत गहन । माझ्या स्वामीचें वचन ।
जेणें माझें समाधान । अत्यंत जालें ॥ ४१ ॥

तें हें माझें जिवीचें गुज । मी सांगेन म्हणतों तुज ।
जरी अवधान देसी मज । तरी आतां येच क्षणीं ॥ ४२ ॥

शिष्य म्लान वदनें बोले । धरिले सदृढ पाउले ।
मग बोलों आरंभिलें । गुरुदेवं ॥ ४३ ॥

अहं ब्रह्मास्मि माहाद्वाक्य । येथीचा अर्थ अतर्क्य ।
तोही सांगतों ऐक्य । गुरुशिष्य जेथं ॥ ४४ ॥

---

१ सुलभ. २ स्पष्ट.

ऐक शिष्या येथीचें वर्म । स्वयें तूंचि आहेसी ब्रह्म ।
येविषईं संदेह भ्रम । धरूंचि नको ॥ ४५ ॥
नवविधा प्रकारें भजन । त्यांत मुख्य तें आत्मनिवेदन ।
तें समग्रप्रकारें कथन । कीजेल आतां ॥ ४६ ॥
निर्माण पंचभूतें यीयें[1] । कल्पांतीं नासतीं येथान्वयें ।
प्रकृति पुरुष जियें । तेही ब्रह्म होतीं ॥ ४७ ॥
दृश्य पदार्थ आटतां । आपणाहि नुरे तत्वतां ।
ऐक्यरूपें ऐक्यता । मुळींच आहे ॥ ४८ ॥
सृष्टीची नाहीं वार्ता । तेथें मुळींच ऐक्यता ।
पिंडब्रह्मांड पाहों जातां । दिसेल कोठें ॥ ४९ ॥
ज्ञानवन्ही प्रगटे । तेणें दृश्य केरें आटे ।
तदाकारें मूळ तुटे । भिन्नत्वाचें ॥ ५० ॥
मिथ्यत्वें वृत्ति फिरे । तों दृश्य असतांच ओसरे ।
सहजचि येणेंप्रकारें । जालें आत्मनिवेदन ॥ ५१ ॥
असो गुरूचे ठाईं अनन्यता । तरी तुजसी कायेसी रे[3] चिंता।
वेगळेपणें अभक्ता । उरोंचि नको ॥ ५२ ॥
आतां हेंचि दृढीकर्ण । व्हावया करीं सद्गुरुभजन ।
सद्गुरुभजनें समाधान । नेमस्त आहे ॥ ५३ ॥
या नाव शिष्या आत्मज्ञान । येणें पाविजे समाधान ।
भवभयाचें बंधन । समूळ मिथ्या ॥ ५४ ॥
देह मी वाटे ज्या नरा । तो जाणावा आत्महत्यारा ।
देहाभिमानें येरझारा । भोगिल्याच भोगी ॥ ५५ ॥
असो चहूं देहावेगळा । जन्मकर्मासी निराळा ।
सकळ आवाळगोवळां[2] । सबाह्य[4] तूं ॥ ५६ ॥

---

१ ह्यें, हीं. २ कस्पटासमान, तुच्छ. ३ गभाळा. ४ बाहेर.

कोणासीच नाहीं बंधन । भ्रांतिस्तव भुलले जन ।
दृढ घेतला देहाभिमान । म्हणौनियां ॥ ५७ ॥
शिष्या येकांतीं बैसावें । स्वरूपीं विश्रांतीस जावें ।
तेणें गुणें दृढावे । परमार्थ हा ॥ ५८ ॥
अखंड घडे श्रवण मनन । तरीच पाविजे समाधान ।
पूर्ण जालिया ब्रह्मज्ञान । वैराग्य भरे आंगीं ॥ ५९ ॥
शिष्या मुक्तपणें अनर्गळें[1] । करिसी इंद्रियें बाष्कळ ।
तेणें तुझी तळमळ । जाणार नाहीं ॥ ६० ॥
विषईं वैराग्य उपजलें । तयासीच पूर्ण ज्ञान जालें ।
मणी टाकितांची लाधलें । राज्य जेवीं ॥ ६१ ॥
मणी होतां सीगटाचा[2] । लोभ धरूनियां तयाचा ।
मूर्खपणें राज्याचा । अव्हेर केला ॥ ६२ ॥
ऐक शिष्या सावधान । आतां भविष्य मी सांगेन ।
जया पुरुषास जें ध्यान । तयास तेंचि प्राप्त ॥ ६३ ॥
म्हणोनि जे अविद्या । सांडून धरावी सुविद्या ।
तेणें गुणें जगद्वंद्या । पाविजे सीघ्र ॥ ६४ ॥

दा. ५. ६. १–६४.

७. आत्मज्ञानाच्या योगानें सर्व पातकांचा व दुःखांचा नाश होतो.

पापाचें वळलें[3] शरीर । पापाचि घडे तदनंतर ।
अंतरीं रोग वरिवरी उपचार । काय करी ॥ ५९ ॥
नाना क्षेत्रीं हें मुंडिलें । नाना तीर्थीं हें दंडिलें ।
नाना निग्रहीं खंडिलें । ठाईं ठाईं ॥ ६० ॥

१ अनिर्बद्ध. २ शिंगाचा. ३ घडलें.

नाना मृत्तिकेनें घांसिलें । अथवा तप्तमुद्रेनें लांसिलें ।
जरी हें वरिवरी तासिलें । तरी शुद्ध नव्हे ॥ ६१ ॥
सेणाचे गोळे गिळिले । गोमुत्राचे मोघे घेतले ।
माळा रुद्राक्ष घातले । काष्ठमणी ॥ ६२ ॥
वेश वरीवरी केला । परी अंतरीं दोष भरला ॥
त्या दोषाच्या दहनाला । आत्मज्ञान पाहिजे ॥ ६३ ॥
नाना व्रतें नाना दानें । नाना योग तीर्थाटणें ।
सर्वांहून कोटिगुणें । महिमा आत्मज्ञानाचा ॥ ६४ ॥
आत्मज्ञान पाहे सदा । त्याच्या पुण्यासी नाहीं मर्यादा ।
दुष्ट पातकाची बाधा । निरसोन गेली ॥ ६५ ॥
वेदशास्त्रीं सत्यस्वरूप । तेंचि ज्ञानियाचें रूप ।
पुण्य जालें अमूप[2] । सुकृतें सीमा सांडिली ॥ ६६ ॥
या प्रचितीच्या गोष्टी । प्रचित पहावी आत्मदृष्टी ।
प्रचिती वेगळें कष्टी । होऊंच नये ॥ ६७ ॥
आगा ये प्रचितीचे लोक हो। प्रचित नस्तां अवघा शोक हो।
रघुनाथकृपेनें राहो । प्रत्यय निश्चयाचा ॥ ६८ ॥

दा. १०. १०. ६९–६८.

८. मूर्ति म्हणजे देव नव्हे.

पाषाणाचा देव केला । एके दिवशीं भंगोन गेला ।
तेणें भक्त दुःखवला । रडे पडे आक्रंदे ॥ ३३ ॥
देव हारपला घरीं । येक देव नेला चोरीं ।
येक देव दुराचारीं । फोडिला बळें ॥ ३४ ॥

---

१ भाजलें, डागलें. २ अमर्याद.

येक देव जापाणिला[1] । येक देव उदकीं टाकिला ।
येक देव नेऊन घातला । पायातळीं ॥ ३५ ॥

काय सांगों तीर्थमहिमा । मोडूनि गेला दुरात्मा ।
थोर सत्व होतें तें मा[2] । काय जालें कळेना ॥ ३६ ॥

देव घडिला सोनारीं । देव वोतिला वोतारीं ।
येक देव घडिला पाथरीं । पाषाणाचा ॥ ३७ ॥

नर्बदागंडिकातीरीं । देव पडिले लक्षवरी ।
त्यांची संख्या कोण करी । असंख्यात गोटे ॥ ३८ ॥

चक्रतीर्थीं चक्रांकित । देव असती असंख्यात ।
नाहीं मनीं निश्चितार्थ । येक देव ॥ ३९ ॥

बाण तांदळे तांब्रनाणें । स्फटिक देव्हारां पूजणें ।
ऐसे देव कोण जाणें । खरे किं खोटे ॥ ४० ॥

देव रेसिमाचा केला । तोही तुटोनियां गेला ।
आतां नवा नेम धरिला । मृत्तिकेचा ॥ ४१ ॥

आमचा देव बहु सत्य । आम्हां आकांतीं पावत ।
पूर्ण करी मनोरथ । सर्वकाळ ॥ ४२ ॥

आतां याचें सत्व गेलें । प्राप्त होतें तें जालें ।
प्राप्त न वचे पालटिलें । ईश्वराचेनि ॥ ४३ ॥

धातु पाषाण मृत्तिका । चित्रलेप काष्ठ देखा ।
तेथें देव कैंचा मूर्खा । भ्रांति पडिली ॥ ४४ ॥

हे आपुली कल्पना । प्राप्तऐसीं फळें जाणा ।
परी त्या देवाचिया खुणा । वेगळ्याची ॥ ४५ ॥

दा. १. ६. ३३–४५.

---

१ भ्रष्टविला. २ मग.

९. नाना देव आणि एक देव.

लोक कोण्या पंथें जाती । आणि कोण्या देवास भजती ।
ऐसी हे रोकडी प्रचीती । सावध ऐका ॥ २८ ॥

मृत्तिका धातु पाषाणादिक । ऐसीया प्रतिमा अनेक ।
बहुतेक लोकांचा दंडक[1] । प्रतिमादेवीं ॥ २९ ॥

नाना देवांचे अवतार । चरित्रें ऐकती येक नर ।
जपध्यान निरंतर । करिती पूजा ॥ ३० ॥

येक सकळांचा अंतरात्मा । विश्वीं वर्ते जो विश्वात्मा ।
द्रष्टा साक्षी ज्ञानात्मा । मानिती येक ॥ ३१ ॥

येक ते निर्मळ निश्चळ । कदापी नव्हेती चंचळ ।
अनन्यभावें केवळ । वस्तुच ते ॥ ३२ ॥

येक नाना प्रतिमा । दुसरा अवतारमहिमा ।
तिसरा तो अंतरात्मा । चौथा तो निर्विकारी ॥ ३३ ॥

ऐसे हे चत्वार देव । सृष्टीमधील स्वभाव ।
या वेगळा अंतर्भाव । कोठेंचि नाहीं ॥ ३४ ॥

अवघे येकचि मानिती । ते साक्ष देव जाणती ।
परंतु अष्टधा प्रकृति । वोळखिली पाहिजे ॥ ३५ ॥

प्रकृतीमधील देव । तो प्रकृतीचा स्वभाव ।
भावातीत माहानभाव । विवेकें जाणावा ॥ ३६ ॥

जो निर्मळास ध्याईल । तो निर्मळचि होईल ।
जो जयास भजेल । तो तद्रूप जाणावा ॥ ३७ ॥

क्षीर नीर निवडिती । ते राजहंस बोलिजेती ।
सारासार जाणती । ते माहानभाव ॥ ३८ ॥

---

१ प्रचार.

अरे जो चंचळासि ध्याईल । तो सहजाचि चळेल ।
जो निश्चळास भजेल । तो निश्चळचि ॥ ३९ ॥

दा. ११. २. २८–३९.

१०. खरा देव म्हणजे मूर्ति नव्हे.

मृत्तिकापूजन करावें । आणि सवेंचि विसर्जावें ।
हें मानेना स्वभावें । अंतःकर्णासी ॥ १ ॥

देव पूजावा आणी टाकावा । हें प्रशस्त न वटे[2] जीवा ।
याचा विचार पाहावा । अंतर्यामीं ॥ २ ॥

देव करिजे ऐसा नाहीं । देव टाकिजे ऐसा नाहीं ।
म्हणोनि याचा कांहीं । विचार पाहावा ॥ ३ ॥

देव नाना शरीरें धरितो । धरुनी मागुती सोडितो ।
तरी तो देव कैसा आहे तो । विवेकें वोळखावा ॥ ४ ॥

सगट[3] लोकांचे अंतरींचा भाव । मज प्रत्यक्ष भेटवावा देव[4] ।
परंतु विवेकाचा उपाव । वेगळाचि आहे ॥ ७ ॥

विचार पाहातां तगेना । त्यांस देव ऐसें म्हणवेना ।
परंतु जन राहेना । काय करावें ॥ ८ ॥

थोर लोक मरोनि जाती । त्यांच्या सुरता करूनि पाहाती ।
तैसीच आहे हेही गती । उपासनेची ॥ ९ ॥

थोर व्यापार ठाकेना[5] जनीं । म्हणोनि केली रखवानी[6] ।
राजसंपदा तयाचेनी । प्राप्त कैची ॥ १० ॥

म्हणोनि जितुका भोळा भाव । तितुका अज्ञानाचा स्वभाव ।
अज्ञानें तरी देवाधिदेव । पाविजेल कैचा ॥ ११ ॥

---

१ लगेच. २ वाटे. ३ सर्व. ४ प्रतिमा. ५ मिळेना. ६ शाईचा व्यापार.

माया उल्लंघाया कारणें । देवासी नाना उपाय करणें ।
अध्यात्मश्रवणपंथेंचि जाणें । प्रत्ययानें ॥ १४ ॥

खोटें तें खोटेंचि खोटें । खऱ्यासी तगेनात बाळटें[1] ।
मन अधोमुख उफराटें । केलें पाहिजे ॥ १७ ॥

अध्यात्मश्रवण करीत जावें । म्हणिजे सकळ कांहीं फावे ।
नाना प्रकारींचे गोवे । तुटोनि जाती ॥ १८ ॥

पिंड पडतां अवघेंचि जातें । परंतु परब्रह्म राहातें ।
शाश्वत समजोन मग तें । दृढ धरावें ॥ ३० ॥

दा. २०. ९. १–३०.

११. देवांचा जो देव तो गुरूच्या योगानें कळतो.

मातीचे देव धोंड्याचे देव । सोन्याचे देव रुप्याचे देव ।
काशाचे देव पितळेचे देव । तांब्याचे देव चित्रलेपें[2] ॥ १ ॥

रुविच्या लांकडाचे देव पोंवळ्यांचे देव । बाण तांदळे नर्मदे देव ।
शालिग्राम काश्मिरी देव । सूर्यकांत सोमकांत ॥ २ ॥

तांब्रनाणीं हेमनाणीं । कोणी पूजिती देवार्चनीं ।
चक्रांकित चक्रतीर्थीहुनी । घेऊन येती ॥ ३ ॥

मुळीं द्रष्टा देव तो येक । त्याचे जाहाले अनेक ।
समजोन पाहातां विवेक । उमजों लागे ॥ ६ ॥

लोकांची पाहातां रीती । लोक देवार्चनें करिती ।
अथवा क्षेत्रदेवें[3] पाहाती । ठाईं ठाईं ॥ १८ ॥

अथवा नाना अवतार । ऐकोन धरिती निर्धार ।
परी ते अवघे सविस्तर । होऊन गेले ॥ १९ ॥

---

१ आरोप. २ भिंतीवरचीं चित्रें. ३ क्षेत्रांतील देव.

येक ब्रह्मविष्णुमहेश । ऐकोन ह्मणती हे विशेष ।
गुणातीत जो जगदीश । तो पाहिला पाहिजे ॥ २० ॥

देवासि नाहीं थानमान[1] । कोठें करावें भजन ।
हा विचार पाहातां अनुमान । होत जातो ॥ २१ ॥

भूमंडळीं देव नाना । त्यांची भीड उलंघेना ।
मुख्य देव तो कळेना । कांहीं केल्या ॥ २३ ॥

हें ज्ञानदृष्टीनें पाहावें । पाहोन तेथेंचि राहावें ।
निजध्यासें तद्रूप व्हावें । संगत्यागें ॥ २८ ॥

ऐसी सूक्ष्म स्थितिगती । कळतां चुके अधोगती ।
सद्गुरुचेनि सद्गती । तात्काळ होते ॥ ३० ॥

दा. १९. ५. १–३०.

१२. अंतरात्मा सर्व देवांहून श्रेष्ठ आहे.

ब्रह्म निराकार निश्चळ । आत्म्यास विकार चंचळ ।
तयास म्हणती सकळ । देव ऐसें ॥ १ ॥

देवाचा ठावाचि लागेना । येक देव नेमस्त कळेना ।
बहुत देवीं अनुमानेना । येक देव ॥ २ ॥

म्हणोनि विचार असावा । विचारें देव शोधावा ।
बहुत देवांचा गोवा[2] । पडोंचि नये ॥ ३ ॥

देव क्षेत्रीं पाहिला । त्यासारिखा धातूचा केला ।
पृथ्वीमधें दंडक चालिला । येणें रीती ॥ ४ ॥

नाना प्रतिमादेवांचें मूळ । तो हा क्षत्रदेवचि केवळ ।
नाना क्षत्रें भूमंडळ । शोधून पाहावें ॥ ५ ॥

---

१ स्थान अथवा प्रमाण. २ गुंता.

क्षत्रदेव[1] पाषाणाचा । विचार पाहातां तयाचा ।
तंत[2] लागला मुळाचा । अवताराकडे ॥ ६ ॥
अवतारी देव संपले । देहे धरून वर्तों लागले ।
त्याहून थोर अनुमानले । ब्रह्मा विष्णु महेश ॥ ७ ॥
त्यां तिही देवांस ज्याची सत्ता । तो अंतरात्माचि पाहातां ।
कर्ता भोक्ता तत्त्वतां । प्रत्यक्ष आहे ॥ ८ ॥
युगानयुगें तिन्ही लोक । येकचि चालवी अनेक ।
हा निश्चयाचा विवेक । वेदशास्त्रीं पाहावा ॥ ९ ॥
आत्मा वर्तवितो शरीर । तोचि देव उत्तरोत्तर ।
जाणीवरूपें कळिवर । विवेकें वर्तवी ॥ १० ॥
तो अंतर्देव चुकती । धांवा घेऊन तीर्था जाती ।
प्राणी बापुडे कष्टती । देवास नेणतां ॥ ११ ॥
मग विचारिती अंतःकरणीं । जेथें तेथें धोंडा पाणी ।
उगेंचि वणवण हिंडोनि । कायें होतें ॥ १२ ॥
ऐसा ज्यासी विचार कळला । तेणें सत्संग धरिला ।
सत्संगें देव सांपडला । बहुत जनासी ॥ १३ ॥

दा. १८. ८. १–१३.

१३. आत्मा हा सर्व देवांहून श्रेष्ठ आहे.

सकळ देवांचें मूळ । तो हा अंतरात्माचि केवळ ।
भूमंडळीं भोग सकळ । त्यासीच घडे ॥ १६ ॥
नाना देव होऊन बैसला । नाना शक्तिरूपें जाला ।
भोक्ता सकळ वैभवाला । तोचि येक ॥ १७ ॥

---

१ क्षत्रांतील देव. २ तंतु.

याचा पाहातां विचार। उदंड लांबला जोजार[१]।
होती जाती देव नर। किती म्हणोनि ॥ १८ ॥

कीर्ति आणि अपकीर्ति। उदंड निंदा उदंड स्तुती।
सर्वत्रांची भोगप्राती। अंतरात्म्यासीच घडे ॥ १९ ॥

कोण देहीं काये करितो। कोण देहीं काये भोगितो।
भोगी त्यागी वीतरागी तो। येकचि आत्मा ॥ २० ॥

प्राणी साभिमानें भुलले। देहाकडे पाहात गेले।
मुख्य अंतरात्म्यास चुकले। अंतरीं असोनि ॥ २१ ॥

आरे या आत्मयांची चळवळ पाहे। ऐसा भूमंडळीं कोण आहे।
अगाध पुण्यें अनुसंधान राहे। कांहीं येक ॥ २२ ॥

त्या अनुसंधानासारिसें। जळोनि जाइजे किल्मिषें।
अंतरनिष्ठ ज्ञानी ऐसें। विवरोन पाहाती ॥ २३ ॥

अंतरनिष्ठ तितुके तरले। अंतरभ्रष्ट तितुके बुडाले।
बाह्यात्कारें भरंगळले[२]। लोकाचारें ॥ २४ ॥

दा. १८. १. १६–२४.

१४ देवता व भुतें यांचें अस्तित्व.

कित्येक प्राणी निःशेष मरती। पुन्हां मागुतें जीव येती।
ढकलून दिल्हें तेणें दुःखवती। हस्तपादादिक ॥ ६ ॥

सर्पदृष्टि जालियावरि। ती दिवसां उठवी धन्वंतरी।
तेव्हां ते माघारी। वासना येते कीं ॥ ७ ॥

कित्येक सवें[३] होऊन पडती। कित्येक तयास उठविती
येमलोकींहून आणविती। माघारे प्राणी ॥ ८ ॥

---

१ विस्तार २ भरकटले, फसले. ३ शवें.

कित्येक पूर्वी श्रापिले । ते शापें देह पावले ।
उश्रापकाळीं पुन्हां आले । पूर्वदेहीं ॥ ९ ॥
कित्येकीं बहुजन्म घेतले । कित्येक परकाया प्रवेशले ।
ऐसे आले आणि गेले । बहुत लोक ॥ १० ॥

दा. ९. ८. ९–१०.

वायोरूपें देवतें भुतें । अंगीं भरतीं अकस्मातें ।
वीधं[1] कोलियां प्रेतें । सावध होती ॥ २० ॥
राहाणें ब्राह्मण समंध जाती । राहाणें ठवणीं सांपडती ।
नाना गुंतले[2] उगवती । प्रत्यक्ष राहाणें ॥ २१ ॥

दा. ९. ८. २०–२१.

वायोकरितां रागोद्धार । कळे वोळखीचा निर्धार ।
दीप लागे मेघ पडे हा चमत्कार । रागोद्धारीं ॥ ३१ ॥

दा. ९. ८. ३१.

१५. देवता वायुरूपानें राहातात.

देव देवता देवतें भुतें । पृथ्वीमधें असंख्यातें ।
परंतु या समस्तातें । वायोस्वरूप बोलिजे ॥ ९ ॥
वायोस्वरूप सदा असणें । प्रसंगें नाना देह धरणें ।
गुप्त प्रगट होणें जाणें । समस्तांसी ॥ १० ॥

दा. १०. ३. ९–१०

आतां रोकडी प्रचीती । मनुष्यें गुप्त प्रगटती ।
मा[3] त्या देवांच्याच मूर्ति । सामर्थ्यवंत ॥ २३ ॥

---

१ विधि. २ गुंते. ३ मग

देव देवता भुतें देवतें । च्ढतें सामर्थ्य आहे तेथें ।
येणेंचि न्यायें राक्षसांतें । सामर्थ्यकळा ॥ २४ ॥

झोटिंग वायोस्वरूप असती । सवेंच खुळखुळां चालती ।
खोबरीं खारिका टाकून देती । अकस्मात ॥ २५ ॥

अवघेंचि न्याल अभावें । तरी हें बहुतेकांस ठावें ।
आपुल्याला अनुभवें । विश्वलोक जाणती ॥ २६ ॥

मनुष्यें धरिती शरीरवेष । नाना परकायाप्रवेश ।
मा तो परमात्मा जगदीश । कैसा न धरी ॥ २७ ॥

म्हणोनि वायोस्वरूपें देह धरिले । ब्रह्मा विष्णु महेश जाले ।
पुढें तेचि विस्तारले । पुत्रपौत्रीं ॥ २८ ॥

दा. १०. ४. २३–२८.

१६. भुतें संतांस बाधा करूं शकत नाहींत

तैसें देव देवता देवतें भुतें । मिथ्या म्हणों नये त्यांतें ।
आपलाल्या सामर्थ्यें ते । सृष्टीमधें फिरती ॥ २० ॥

सदा विचरती वायोस्वरूपें । स्वइच्छा पालटिती रूपें ।
अज्ञान प्राणी भ्रमे संकल्पें । त्यास बाधिती ॥ २१ ॥

ज्ञात्यास संकल्पचि असेना । म्हणोन त्यांचेन बाधवेना ।
या कारणें आत्मज्ञाना । अभ्यासावें ॥ २२ ॥

दा. १०. ९. २०–२२.

१७. देवांचें जाणीवरूपानें अस्तित्व.

जाणीव म्हणिजे अंतःकर्ण । अंतःकर्ण विष्णूचा अंश जाण ।
विष्णु करितो पाळण । येणें प्रकारें ॥ २६ ॥

---

१ मग.

नेणता प्राणी संव्हारितो । नेणीव तमोगुण बोलिजे तो ।
तमोगुणें रुद्र संव्हारितो । येणेंप्रकारें ॥ २७ ॥
कांहीं जाणीव कांहीं नेणीव । हा रजोगुणाचा स्वभाव ।
जाणतां नेणतां जीव । जन्मास येती ॥ २८ ॥
जाणिवेनें होतें सुख । नेणिवेनें होतें दुःख ।
सुखदुःख आवश्यक । उत्पत्तिगुणें ॥ २९ ॥
जाणण्यानेणण्याची बुद्धी । तोचि देहीं जाणावा विधी ।
स्थूळ देहीं ब्रह्मा त्रिशुद्धि । उत्पत्तिकर्ता ॥ ३० ॥
ऐसा उत्पत्ति स्थिति संहार । प्रसंगें बोलिला विचार ।
परंतु याचा निर्धार । प्रत्यें[1] पाहावा ॥ ३१ ॥

दा. १०. १. २६–३१.

स्वामीनें विचार दाखविला । येथें विष्णूचा अभाव दिसोन आला ।

ब्रह्मा विष्णु महेशाला । उरी[2] नाहीं ॥ १ ॥
उत्पत्ति स्थिति संव्हार । ब्रह्मा विष्णु महेश्वर ।
याचा पाहातां विचार । प्रत्ययो नाहीं ॥ २ ॥

दा. १०. २. १–२.

१८. ब्रह्मा, विष्णु, महेश यांचें केवळ प्रवृत्तिरूपानें अस्तित्व.

ब्रह्मा जन्मास घालितो । विष्णु प्रतिपाळ कारितो ।
रुद्र अवघे संव्हारितो । ऐसें बोलती ॥ १० ॥
तरी हें प्रवृत्तीचें बोलणें । प्रत्ययास आणी उणें ।
प्रत्यय पाहातां श्लाघ्यवाणें । होणार नाहीं ॥ ११ ॥

१ प्रत्ययानें, प्रचीतीनें. २ ठाव, टिकाव.

ब्रह्मयास कोणें जन्मास घातलें । विष्णूस कोणें प्रतिपाळिलें ।
रुद्रास कवणें संव्हारिलें । महाप्रळयीं ॥ १२ ॥

दा. ९. ७. १०–१२.

१९. अनृताचें प्राबल्य.

मिथ्य तेंचि जालें सत्य । सत्य तेंचि जालें असत्य ।
मायाविभ्रमाचें कृत्य । ऐसें असे पाहातां ॥ १ ॥

सत्य कळावया कारणें । बोलिलीं नाना निरूपणें ।
तरी उठेना धरणें । असत्याचें ॥ २ ॥

असत्य अंतरीं बिंबलें । न सांगतां तें दृढ जालें ।
सत्य असोन हारपलें । जेथील तेथें ॥ ३ ॥

वेदशास्त्रें पुराणें सांगती । सत्याचा निश्चय करिती ।
तरी नये आत्मप्रचिती । सत्यस्वरूप ॥ ४ ॥

सत्य असोन आच्छादलें । मिथ्या नसोन सत्य जालें ।
ऐसें विपरीत वर्तलें । देखत देखतां ॥ ५ ॥

दा. ७. १०. १–५.

२०. ब्रह्मांडापैलीकडील गोष्टी.

या ब्रह्मांडापैलिकाडिल गोष्टी । जैं जाली नव्हती सृष्टि ।
मूळमाया सूक्ष्मदृष्टीं । वोळखावी ॥ ४७ ॥

सप्तकुंचक[१] प्रचंड । जालें नव्हतें ब्रह्मांड ।
मायें अविद्येचें बंड । ऐलिकडे ॥ ४८ ॥

ब्रह्मा विष्णु महेश्वर । हा ऐलिकडिल विचार ।
पृथ्वी मेरु सप्तसागर । ऐलिकडे ॥ ४९ ॥

---

१ सात आवरणाचें.

नाना लोक नाना स्थानें । चंद्र सूर्य तारांगणें ।
सप्त द्वीपें चौदा भुवनें । ऐलिकडे ॥ ५० ॥

शेष कूर्म सप्त पाताळ । येकविस स्वर्गें अष्टदिक्पाळ ।
तेतिस कोटी देव सकळ । ऐलिकडे ॥ ५१ ॥

बारा आदित्य अकरा रुद्र । नवनाग सप्त ऋषेश्वर ।
नाना देवांचे अवतार । ऐलिकडे ॥ ५२ ॥

मेघ मनु चक्रवती । नाना जीवांची उत्पत्ति ।
आतां असो सांगों किती । विस्तार हा ॥ ५३ ॥

सकळ विस्ताराचें मूळ । तें मूळमायाच केवळ ।
मागां निरोपिली सकळ । पंचभूतिक ॥ ५४ ॥

सूक्ष्म भूतें जे बोलिलीं । तेचि पुढें जडत्वा आलीं ।
ते सकळही बोलिलीं । पुढिले समासीं ॥ ५५ ॥

पंचभूतें पृथकाकारें । पुढें निरोपिलीं विस्तारें ।
वोळखीकारणें अत्यादरें । श्रोतीं श्रवण करावीं ॥ ५६ ॥

पंचभूतिक ब्रह्मगोळ । जेणें कळे हा प्रांजळ ।
दृश्य सांडून केवळ । वस्तुच पाविजे ॥ ५७ ॥

महाद्वार वोलांडावें । मग देवदर्शन घ्यावें ।
तैसें दृश्य हें सांडावें । जाणोनियां ॥ ५८ ॥

दा. ८. ४. ४७–५८.

२१. सृष्टिकर्त्यास ओळखणें हीच उपासना.

ईश्वरें केवढें सूत्र केलें । सूर्यबिंब धांवाया लाविलें ।
धुकटाकरवीं धरविलें । अगाध पाणी ॥ २३ ॥

पर्वताऐसे ढग उचलती । सूर्यबिंबासी आच्छादिती ।
तेथें सर्वेचि वायोची गती । प्रगट होये ॥ २४ ॥

झिडकाझिडकु[१] धांवे वारा । जैसा काळाचा म्हणियारा[२] ।
ढग मारुनी दिनकरा । मोकळे करी ॥ २५ ॥

बैसती विजांचे तडाखे । प्राणीमात्र अवचिता धाके[३] ।
गगन कडकडून तडके । स्थळांवरी ॥ २६ ॥

येहलोकांसी एक वर्म केलें । महद्भूतें महद्भूत आळिलें ।
सकळां समभागें चालिलें । सृष्टिरचनेसी ॥ २७ ॥

ऐसे अनंत भेद आत्मयाचे । सकळ जाणती ऐसें कैंचे ।
विवरतां विवरतां मनाचे । फडके[४] होती ॥ २८ ॥

ऐसी माझी उपासना । उपासकीं आणावी मना ।
अगाध महिमा चतुरानना । काये कळे ॥ २९ ॥

दा. १०. ८. २३–२९.

२२. देव कोणास म्हणावें ?

बहुत देव सृष्टीवरी । त्यांची गणना कोण करी ।
येक देव कोणेपरी । ठाईं पडेना ॥ ८ ॥

बहुविध उपासना । ज्याची जेथें पुरे कामना ।
तो तेथेंचि राहिला मना । सदृढ करूनी ॥ ९ ॥

बहु देव बहु भक्त । इच्छ्या झाले आसक्त ।
बहु ऋषि बहु मत । वेगळालें ॥ १० ॥

बहु निवडतां निवडेना । एक निश्चय घडेना ।
शास्त्रें भांडती पडेना । निश्चय ठाईं ॥ ११ ॥

---

१ सोसाट्यानें. २ शिपाई. ३ भितो. ४ तुकडे.

बहुत शास्त्रीं बहुत भेद । मतांमतांस विरोध ।
ऐसा करितां वेवाद । बहुत गेले ॥ १२ ॥

सहस्रामधें कोणी येक । पाहे देवाचा विवेक ।
परी त्या देवाचें कौतुक । ठाई न पडे ॥ १३ ॥

ठाई न पडे कैसें म्हणतां । तेथें लागली अहंता ।
देव राहिला परता । अहंतागुणें ॥ १४ ॥

आतां असो हें बोलणें । नाना योग ज्या कारणें ।
तो देव कोण्या गुणें । ठाई पडे ॥ १५ ॥

देव कोणासी म्हणावें । कैसें तयासी जाणावें ।
तेंचि बोलणें स्वभावें । बोलिजेल ॥ १६ ॥

जेणें केलें चराचर । केले सृष्ट्यादि व्यापार ।
सर्वकर्ता निरंतर । नाम ज्याचें ॥ १७ ॥

तेणें केल्या मेघमाळा । चंद्रबिंबीं अमृतकळा ।
तेज दिधलें रविमंडळा । जया देवें ॥ १८ ॥

जयाची मर्यादा सागरा । जेणें स्थापिलें फणिवरा ।
जयाचेनि गुणें तारा । अंतरिक्ष ॥ १९ ॥

च्यारी खाणी च्यारी वाणी । चौऱ्यांशी लक्ष जीवयोनी ।
जेणें निर्मिले लोक तिन्ही । तया नांव देव ॥ २० ॥

ब्रह्मा विष्णु आणि हर । हे जयाचे अवतार ।
तोचि हा देव निर्धार । निश्चयेसीं ॥ २१ ॥

देव्हारांचा उठोनि देव । करूं नेणे सर्व जीव ।
तयाचेनि ब्रह्मकटाव[1] । निर्मिला न वचे ॥ २२ ॥

---

१ ब्रह्मांडव्यूह.

ठाईं ठाईं देव असती । तेंहिं केली नाहीं क्षिती ।
चंद्रसूर्य तारा जीमूती[1] । तयांचेनि नव्हे ॥ २३ ॥

सर्वकर्ता तोचि देव । पाहों जातां निरावेव ।
ज्याची कळा लीळा लाघव । नेणती ब्रह्मादिक ॥ २४ ॥

येथें आशंका उठिली । ते पुढिलिये समासीं फिटली ।
आतां वृत्ति सावध केली । पाहिजे श्रोतीं ॥ २५ ॥

पैस अवकाश आकाश । कांहींच नाहीं जें भकास[2] ।
तये निर्मळीं वायोस । जन्म झाला ॥ २६ ॥

वायोपासून जाला वन्ही । वन्हीपासुनी जालें पाणी ।
ऐसी जयाची करणी । अघटित घडली ॥ २७ ॥

उदकापासून सृष्टि जाली । स्तंभेंविण उभारली ।
ऐसी विचित्र कळा केली । त्या नांव देव ॥ २८ ॥

देवें निर्मिली हे क्षिती । तिचे पोटीं पाषाण होती ।
तयासाचि देव म्हणती । विवेकहीन ॥ २९ ॥

जो सृष्टिनिर्माणकर्ता । तो ये सृष्टिपूर्वी होता ।
मग हे तयाची सत्ता । निर्माण झाली ॥ ३० ॥

कुल्लाळ[3] पात्रापूर्वीं आहे । पात्रें कांहीं कुल्लाळ नव्हे ।
तैसा देव पूर्वींच आहे । पाषाण नव्हे सर्वथा ॥ ३१ ॥

मृत्तिकेचें सैन्य केलें । कर्ते वेगळे राहिले ।
कार्यकारण येक केलें । तरी होणार नाहीं ॥ ३२ ॥

तथापी होईल पंचभूतिक । निर्गुण नव्हे कांहीं येक ।
कार्याकारणाचा विवेक । भुतांपरता नाहीं ॥ ३३ ॥

---

१ ढग. २ शून्य. ३ कुंभार.

अवघी सृष्टि जो कर्ता । तो ते सृष्टिहूनि पर्ता ।
तेथें संशयाची वार्ता । काहूंचि नये ॥ ३४ ॥
खांबसूत्रींची बाहुली । जेणें पुरुषें नाचविली ।
तोचि बाहुली हे बोली । घडे केवीं ॥ ३५ ॥
छायामंडपींची सेना । सृष्टिसारिखीच रचना ।
सूत्रें चाळी परी तो नाना । वेक्ति नव्हे ॥ ३६ ॥
तैसा सृष्टिकर्ता देव । परी तो नव्हे सृष्टिभाव ।
जेणें केले नाना जीव । तो जीव कैसेनी ॥ ३७ ॥
जें जें जया करणें पडे । तें तें तो हें कैसें घडे ।
म्हणोनि वायांचि बापुडे । संदेहीं पडती ॥ ३८ ॥
सृष्टि ऐसेंचि स्वभावें । गोपुर निर्मिलें बरवें ।
परी तो गोपुरकर्ता नव्हे । निश्चयेंसि ॥ ३९ ॥
तैसें जग निर्मिलें जेणें । तो वेगळा पूर्णपणें ॥
एक म्हणती मूर्खपणें । जग तोचि जगदीश ॥ ४० ॥
एवं जगदीश तो वेगळा । जग निर्माण त्याची कळा ।
तो सर्वांमध्यें परी निराळा । असोन सर्वां ॥ ४१ ॥
म्हणोनि भूतांचा कर्दमु । यासि अलिप्त आत्मारामु ।
अविद्यागुणें मायाभ्रमु । सत्यचि वाटे ॥ ४२ ॥
मायोपाधी जगडंबर । आहे सर्वही साचार ।
ऐसा हा विपरीत विचार । कोठेंचि नाहीं ॥ ४३ ॥
म्हणोनि जग मिथ्या साच आत्मा । सर्वांपर जो परमात्मा ।
अंतर्बाह्य अंतरात्मा । व्यापूनि असे ॥ ४४ ॥
तयास म्हणावें देव । येर हें अवघेंचि वाव ।
ऐसा आहे अंतर्भाव । वेदांतींचा ॥ ४५ ॥

पदार्थ वस्तु नासिवंत । हें तों अनुभवास येत ।
याकारणें भगवंत । पदार्थावेगळा ॥ ४६ ॥
देव विमळ आणी चंचळ । शास्त्रें बोलतीं सकळ ।
तया निश्चळास सकळ । म्हणों नये सर्वथा ॥ ४७ ॥
देव आला देव गेला । देव उपजला देव मेला ।
ऐसें बोलतां दुरिताला । काय उणें ॥ ४८ ॥
जन्ममरणाची वार्ता । देवास लागेना सर्वथा ।
देव अमर ज्याची सत्ता । त्यासी मृत्य कैसेनि ॥ ४९ ॥
उपजणें आणी मरणें । येणें जाणें दुःख भोगणें ।
हें त्या देवाचें करणें । तो कारण वेगळा ॥ ५० ॥

दा. ८. १. ८–५०

२३ देह, आत्मा आणि ब्रह्म यांचा संबंध.

जड देह भूतांचा । चंचळ गुण आत्मयांचा ।
निश्चळ ब्रह्मावेगळा ठाव कैंचा । जेथें तथें ॥ १२ ॥
निश्चळ चंचळ आणि जड । पिंडीं करावा निवाड ।
प्रत्ययावेगळें जाड । बोलणें नाहीं ॥ १३ ॥
पिंडामधून आत्मा जातो । तेव्हां निवाडा कळों येतो ।
देहे जड हा पडतो । देखतदेखतां ॥ १४ ॥
जड तितुकें पडिलें । चंचळ तितुकें निघोनि गेलें ।
जड चंचळाचें रूप आलें । प्रत्ययासी ॥ १५ ॥
निश्चळ आहे सकळां ठाई । हें तों पाहाणें नलगे कांहीं ।
गुणविकार तेथें नाहीं । निश्चळासी ॥ १६ ॥
जैसें पिंड तैसें ब्रह्मांड । विचार दिसतो उघड ।
जड चंचळ जातां जाड । परब्रह्मचि आहे ॥ १७ ॥

महाभूतांचा खंबीरि[1] केला। आत्मा घालून पुतळा जाला।
चालिला सृष्टीचा गल्बला। येणें रीती ॥ १८ ॥

आत्मा माया विकार करी। आळ घालिती ब्रह्मावरी।
प्रत्ययें सकळ कांहीं विवरी। तोचि भला ॥ १९ ॥

ब्रह्म व्यापक अखंड। वरकड व्यापकता खंड।
शोधून पाहातां जड। कांहींच नाहीं ॥ २० ॥

गगनासी खंडितां नये। गगनाचे नासेल काय।
जरी जाला माहांप्रळये। सृष्टीसंव्हार ॥ २ ॥

जें सव्हारामधें सांपडलें। तें सहजाचि नासिवंत जालें।
जाणते लोकीं उगविलें। पाहिजे कोडें ॥ २२ ॥

न कळतां वाटे कोडें। कळतां अवघें दिसे उघडें।
म्हणोनि येकांतीं निवाडे। विचार पाहावा ॥ २३ ॥

मिळतां प्रत्ययाचे संत। येकांतापरिस येकांत।
केली पाहिजे सावचित्त। नाना चर्चा ॥ २४ ॥

दा. २०. ७. १२-२४.

२४. चारही आत्मे मिळून एकच होत.

पाहों जातां आत्मे च्यारी। त्यांचें लक्षण अवधारीं।
हें जाणोनि अभ्यांतरीं। सदृढ धरावें ॥ ४४ ॥

येक जीवात्मा दुसरा शिवात्मा। तिसरा परमात्मा जो विश्वात्मा।
चौथा जाणिज निर्मळात्मा। ऐसे च्यारी आत्मे ॥ ४५ ॥

भेद उंच नीच भासती। परी च्यारी येकचि असती।
येविषीं दृष्टांत संमती। सावध ऐका ॥ ४६ ॥

१ सांगाडा.

घटाकाश मठाकाश । महदाकाश चिदाकाश ।
अवघे मिळोनी आकाश । येकचि असे ॥ ४७ ॥

तैसा जीवात्मा आणी शिवात्मा । परमात्मा आणी निर्मळात्मा ।
अवघा मिळोन आत्मा । येकचि असे ॥ ४८ ॥

घटीं व्यापक जें आकाश । तया नांव घटाकाश ।
पिंडीं व्यापक ब्रह्मांश । त्यास जीवात्मा बोलिजे ॥ ४९ ॥

मठीं व्यापक जें आकाश । तया नाव मठाकाश ।
तैसा ब्रह्मांडीं जो ब्रह्मांश । त्यास शिवात्मा बोलिजे ॥ ५० ॥

मठाबाहेरील आकाश । तया नांव महदाकाश ।
ब्रह्मांडाबाहेरील ब्रह्मांश । त्यास परमात्मा बोलिजे ॥ ५१ ॥

उपाधीवेगळें आकाश । तया नांव चिदाकाश ।
तैसा निर्मळात्मा परेश । तो उपाधीवेगळा ॥ ५२ ॥

उपाधीयोगें वाटे भिन्न । परी तें आकाश अभिन्न ।
तैसा आत्मा स्वानंदघन । येकचि असे ॥ ५३ ॥

दा. ८. ७. ४४–५३.

२९. ब्रह्माचें स्वरूप.

सर्व उपाधीचा सेवट । तेथें नाहीं दृश्य खटपट ।
निर्गुण ब्रह्म घनदाट । सकळा ठाईं ॥ ११ ॥

उदंड कल्पांत जाला । तरी नाश नाहीं तयाला ।
मायात्यागें शाश्वताला । वोळखावें ॥ १२ ॥

देव अंतरात्मा सगुण । सगुणें पाविजे निर्गुण ।
निर्गुणज्ञानें विज्ञान । होत असे ॥ १३ ॥

कल्पनेतीत जें निर्मळ । तेथें नाहीं मायामळ ।
मिथ्यत्वें दृश्य सकळ । होत जातें ॥ १४ ॥

जें होतें आणि सवेंचि जातें । तें तें प्रत्ययास येतें ।
जेथें होणें जाणें नाहीं तें । विवेकें ओळखावें ॥ १५ ॥

एक ज्ञान एक अज्ञान । यक जाणावें विपरीत ज्ञान ।
हे त्रिपुटी होये क्षीण । तेंचि विज्ञान ॥ १६ ॥

वेदांत सिद्धांत धादांत । याची पहावी प्रचित ।
निर्विकार सदोदित । जेथें तेथें ॥ १७ ॥

तें ज्ञानदृष्टीनें पाहावें । पाहोन अनन्य राहावें ।
मुख्य आत्मनिवेदन जाणावें । याचें नांव ॥ १८ ॥

दृश्यास दिसतें दृश्य । मनास भासतो भास ।
दृश्यभासातीत अविनाश । परब्रह्म तें ॥ १९ ॥

पाहों जातां दुरीच्या दुरी । परब्रह्म सबाहे अंतरीं ।
अंताचि नाहीं अनंत सरी । कोणास द्यावी ॥ २० ॥

चंचळ तें स्थिरावेना । निश्चळ तें कदापि चळेना ।
आभाळ येतें जातें गगना । चळण नाहीं ॥ २१ ॥

जें विकारें वाढे मोडे । तेथें शाश्वतता कैची घडे ।
कल्पांत होतांच विघडे । सकळ कांहीं ॥ २२ ॥

जें अंतरींच भ्रमलें । मायासंभ्रमें संभ्रमलें ।
तयास हें कैसें उकलें । आव्हांट चक्र ॥ २३ ॥

भिडेनें वेव्हार निवडेना । भिडेनें सिद्धांत कळेना ।
भिडेनें देव आकळेना । अंतर्यामीं ॥ २४ ॥

वैद्याची प्रचित येईना । आणि भीडही उल्लंघेना ।
तरी मग रोगी वांचेना । ऐसें जाणावें ॥ २५ ॥

---

१ स्वप्रत्यय. २ अफाट.

जेणें राजा वोळखिला। तो राव म्हणेना भलत्याला।
जेणें देव वोळखिला। तो देवरूपी ॥ २६ ॥

जयास माईकाची भीड। तें काय बोलेल द्वाड।
विचार पाहातां उघड। सकळ कांहीं ॥ २७ ॥

भीड माये ऐलीकडे। परब्रह्म तें पैलीकडे।
पैलीकडे ऐलीकडे। सदोदित ॥ २८ ॥

दा. १४. ९. ११–२८.

३. साक्षात्कार.

२९. देवाचें भजन कां करावें ?

कोण समयो येईल कैसा। याचा न कळे किं भर्वसा।
जैसे पक्षी दाही दिशा। उडोन जाती ॥ ३९ ॥

तैसें वैभव हें सकळ। कोण जाणे कैसी वेळ।
पुत्रकळत्रादि सकळ। विघडोन जाती ॥ ४० ॥

पाहिली घडी नव्हे आपुली। वयसा तरी निघोन गेली।
देह पडतांच ठेविली। आहे नीच योनी ॥ ४१ ॥

श्वानसूकरादिक नीच याती। भोगणें घडे विपत्ती।
तेथें कांहीं उत्तम गती। पाविजेत नाहीं ॥ ४२ ॥

मागां गर्भवासीं आटाटी। भोगितां जालासी रे हिंपुटी।
तेथुनियां थोरा कष्टीं[1]। सुटलासि देवें ॥ ४३ ॥

दुःख भोगिलें आपुल्या जीवें। तेथें कोणीच होती सर्वें।
तैसेंचि पुढें येकलें जावें। लागेल बापा ॥ ४४ ॥

---

१ यातना.

कैची माता कैचा पिता । कैची बहिण कैचा भ्राता ।
कैचीं सुहृदें कैची वनिता । पुत्रकळत्रादिक ॥ ४५ ॥
हे तूं जाण मावेची[१] । आघवीं सोइरीं सुखाची ।
हे तुझ्या सुखदुःखाची । सांगाती नव्हेती ॥ ४६ ॥
कैचा प्रपंच कैचें कुळ । कासया होतोसी व्याकुळ ।
धन कण लक्ष्मी सकळ । जाइजणें[२] ॥ ४७ ॥
कैचें घर कैचा संसार । कासया करिसी जोजार[३] ।
जन्मवरी वाहोन भार । सेवीं[४] सांडून जासी ॥ ४८ ॥
कैचें तारुण्य कैचें वैभव । कैचे सोहळे हावभाव ।
हे सकळही जाण माव । माईक माया ॥ ४९ ॥
येच क्षणीं मरोन जासी । तरी रघुनाथीं अंतरलासी ।
माझें माझें म्हणतोसी । म्हणोनियां ॥ ५० ॥
तुवां भोगिल्या पुनरावृत्ती । ऐसीं मायबापें किती ।
स्त्री कन्या पुत्र होती । लक्षानलक्ष ॥ ५१ ॥
कर्मयोगें सकळ मिळालीं । येकें स्थळीं जन्मास आलीं ।
ते तुवां आपुलीं मानिलीं । कैसी रे पढतमूर्खा ॥ ५२ ॥
तुझें तुज नव्हे शरीर । तेथें इतराचा कोण विचार ।
आतां येक भगवंत साचार । धरी भावार्थबळें ॥ ५३ ॥
येका दुर्भराकारणें । नाना नीचांची सेवा करणें ।
नाना स्तुती आणि स्तवनें । मर्यादा धरावी ॥ ५४ ॥
जो अन्न देतो उदरासी । शरीर विकावें लागे त्यासी ।
मा जेणें घातलें जन्मासी । त्यासी कैसें विसरावें ॥ ५५ ॥

---

१ मायेची. २ जाणारे, नश्वर. ३ खटपट, उठाठेव. ४ शेवटीं.

अहिर्निशीं ज्या भगवंता । सकल जीवांची लागली चिंता ।
मेघ वरुषे जयाची सत्ता । सिंधु मर्यादा धरी ॥ ५६ ॥
भूमि धरिली धराधरें[1] । प्रगट होईजे दिनकरें ॥
ऐसी सृष्टि सत्तामात्रें । चालवी जो कां ॥ ५७ ॥
ऐसा कृपाळु देवाधिदेव । नेणवे जयाचें लाघव ।
जो सांभाळी सकळ जीव । कृपाळुपणें ॥ ५८ ॥
ऐसा सर्वात्मा श्रीराम । सांडून धरिती विषयकाम ।
ते प्राणी दुरात्मे अधम । केलें पावती ॥ ५९ ॥
रामेविण जे जे आस । तितुकी जाणावी नैराश ।
माझें माझें सावकाश । सीणचि उरे ॥ ६० ॥
जयास वाटे सीण व्हावा । तेणें विषयो चिंतीत जावा ।
विषयो न मिळतां जीवा । तगबग सुटे ॥ ६१ ॥
सांडून राम आनंदघन । ज्याचें मनीं विषयचिंतन ।
त्यासी कैचें समाधान । लोलंगतासी[2] ॥ ६२ ॥
जयास वाटे सुखचि असावें । तेणें रघुनाथभजनीं लागावें ।
स्वजन सकळही त्यागावे । दुःखमूळ जे ॥ ६३ ॥

दा. ३. १०. ३९–६३.

२७. या संसारयात्रेमध्यें देवाचा नफा पहावा.

येथील येथें अवघेंचि राहातें । ऐसें प्रत्ययास येतें ।
कोण काय घेऊन जातें । सांगाना कां ॥ २८ ॥
पदार्थी असावें उदास । विवेक पाहावा सावकास ।
येणेंकरितां जगदीश । अलभ्य लाभे ॥ २९ ॥

---

१ शेष. २ लोलुप

जगदीशापरता लाभ नाहीं । कार्योकारण सर्व कांहीं ।
संसार करित असतांही । समाधान ॥ ३० ॥
मागां होते जनकादिक । राज्य करितांहि अनेक ।
तैसेचि आतां पुण्यश्लोक । कित्येक असती ॥ ३१ ॥
राजा असतां मृत्य आला । लक्ष कोटी कबुल जाला ।
तरी सोडिना तयाला । मृत्य कांहीं ॥ ३२ ॥
ऐसें हें पराधेन जिणें । यामधें दुखणें बाहाणें ।
नाना उद्वेग चिंता करणें । किती म्हणोनि ॥ ३३ ॥
हाट[1] भरला संसाराचा । नफा पाहावा देवाचा ।
तरीच या कष्टाचा । परियांये होतो ॥ ३४ ॥

दा. १२. ८. २८–३४.

२८. अध्यात्मप्राप्तीविषयीं देहाचा उपयोग.

धन्य धन्य हा नरदहो । येथील अपूर्वता पाहो ।
जो जो कीजे परमार्थलाहो[2] । तो तो पावे सिद्धीतें ॥ १ ॥
या नरदेहाचेनि लागवेगं[4] । येक लागले भक्तिसंगं ।
येकीं परम वीतरागें । गिरिकंदरें सेविलीं ॥ २ ॥
येक फिरती तीर्थाटणें । येक करिती पुरश्चरणें ।
येक अखंड नामस्मरणें । निष्ठावंत राहिले ॥ ३ ॥
येक तपें करूं लागले । येक योगाभ्यासी माहाभले ।
येक अभ्यासयोगें जाले । वेदशास्त्रीं वित्पन्न ॥ ४ ॥
येकीं हटनिग्रह केला । देह अत्यंत पीडिला ।
येकीं देव ठाईं पाडिला । भावार्थबळें ॥ ५ ॥

---

१ बाजार. २ मोबदला. ३ इच्छा. ४ लगबगीनें.

येक माहानुभाव विख्यात । येक भक्त जाले ख्यात ।
येक सिद्ध अकस्मात । गगन वोळगंती[1] ॥ ६ ॥

येक तेजीं तेजचि जाले । येक जळीं मिळोन गेले ।
येक ते दिसतचि अदृश्य जाले । वायोस्वरूपीं ॥ ७ ॥

येक येकाचि बहुधा होती । येक देखतचि निघोन जाती ।
येक बैसले असतांचि भ्रमती । नाना स्थानीं समुद्रीं ॥ ८ ॥

येक भयानकावरी बैसती । येक अचेतनें चालविती ।
येक प्रेतें उठविती । तपोबळें करूनी ॥ ९ ॥

येक तेजें मंद करिती । येक जळें आटविती ।
येक वायो निरोधिती । विश्वजनाच्या ॥ १० ॥

ऐसें हटनिग्रही कृतबुद्धी । जयांस वोळल्या[2] नाना सिद्धी ।
ऐसे सिद्ध लक्षावधी । होऊन गेले ॥ ११ ॥

येक मनोसिद्ध येक वाचासिद्ध । येक अल्पसिद्ध येक सर्वसिद्ध ।
ऐसे नाना प्रकारीचे सिद्ध । विख्यात जाले ॥ १२ ॥

येक नवविधाभक्तिराजपंथें । गेले तरले परलोकींच्या निजस्वार्थें ।
येक योगी गुप्तपंथें । ब्रह्मभुवना पावले ॥ १३ ॥

येक वैकुंठास गेले । येक सत्यलोकीं राहिले ।
येक कैलासीं बैसले । शिवरूप होउनी ॥ १४ ॥

येक इंद्रलोकीं इंद्र झाले । येक पितृलोकीं मिळाले ।
येक ते उडगणीं[3] बैसले । येक ते क्षीरसागरीं ॥ १५ ॥

१ आक्रमिती. २ प्राप्त झाल्या. ३ नक्षत्रलोक.

सलोकता समीपता । स्वरूपता सायोज्यता ।
या चत्वार मुक्ती तत्त्वता । इच्छा सेऊन राहिले ॥ १६ ॥
ऐसे सिद्ध साधु संत । स्वहितां प्रवर्तले अनंत ।
ऐसा हा नरदेह विख्यात । काय ह्मणौनि वर्णावा ॥ १७ ॥
या नरदेहाचेनि आधारें । नाना साधनांचेनि द्वारें ।
मुख्य सारासारविचारें । बहुत सुटले ॥ १८ ॥
या नरदेहाचेनि समंधें । बहुत पावले उत्तम पदें ।
अहंता सांडून स्वानंदें । सुखी जाले ॥ १९ ॥
नरदेहीं येऊन सकळ । उद्धरागती पावले केवळ ।
येथें संशयाचें मूळ । खंडोन गेलें ॥ २० ॥
पशुदेहीं नाहीं गती । ऐसें सर्वत्र बोलती ।
म्हणौन नरदेहींच प्राप्ती । परलोकाची ॥ २१ ॥
संत महंत ऋषी मुनी । सिद्ध साधु समाधानी ।
भक्त मुक्त ब्रह्मज्ञानी । विरक्त योगी तपस्वी ॥ २२ ॥
तत्त्वज्ञानी योगाभ्यासी । ब्रह्मचारी दिगंबर संन्यासी ।
षड्दर्शनी तापसी । नरदेहींच जाले ॥ २३ ॥
म्हणौनि नरदेह श्रेष्ठ । नाना देहांमध्यें वरिष्ठ ।
जयाचेनि चुके अरिष्ट । येमयातनेचें ॥ २४ ॥
नरदेह हा स्वाधेन । सहसा नव्हे पराधेन ।
परंतु हा परोपकारीं झिजवून । कीर्तिरूपें उरवावा ॥ २५ ॥
अश्व वृषभ गाई म्हैसी । नाना पशु स्त्रिया दासी ।
कृपाळूपणें सोडितां त्यांसी । कोणीं तरी धरील ॥ २६ ॥
तैसा नव्हे नरदेहो । इच्छा जाव अथवा राहो ।
परी यास कोणी पाहो । बंधन करूं सकेना ॥ २७ ॥

नरदेह पांगुळ असतां । तरी तो कार्यास न येतां ।
अथवा थोटा जरी असतां । तरी परोपकारास न ये ॥ २८ ॥
नरदेह अंध असिला । तरी तो निपटाचि वायां गेला ।
अथवा बाधिर जरी असिला । तरी निरूपण नाहीं ॥ २९ ॥
नरदेह असिला मुका । तरी घेतां नये आशंका ।
अशक्त रोगी नासका । तरी तो निष्कारण ॥ ३० ॥
नरदेह असिला मूर्ख । अथवा फेंपऱ्या समंधाचें दुःख ।
तरी तो जाणावा निरर्थक । निश्चयेंसी ॥ ३१ ॥
इतुकें हें नस्तां वेंगं । नरदेह आणी सकळ सांग ।
तेणें धरावा परमार्थमार्ग । लागवेगें ॥ ३२ ॥

दा. १. १०. १–३२.

२९. अंतकाळची दुःस्थिति.

परंतु अंतीं नाना दुःखें । तेथें होतें सगट सारिखें ।
पूर्वी भोगिलीं नाना सुखें । अंतीं दुःख सोसवेना ॥ २६ ॥
कठिण दुःख सोसवेना । प्राण शरीर सोडीना ।
मृत्य दुःख सगट जना । कासाविस करी ॥ २७ ॥
नाना आवेवहीन जालें । तसोंचि पाहिजे वर्तलें ।
प्राणी अंतकाळीं गेलें । कासावीस होउनी ॥ २८ ॥
रूप लावण्य अवघें जातें । शरीरसामर्थ्य अवघें राहतें ।
कोणी नस्तां मरतें । आपदआपदां ॥ २९ ॥
अंतकाळ दैन्य दीन । सकळिकांस तत्समान ।
ऐसें चंचळ अवलक्षण । दुःखकारी ॥ ३० ॥

---

१ सर्वस्वी. २ व्यंग. ३ सर्व. ४ दुःखांत

भोगून अभोक्ता म्हणती । हे तों आवघीच फजिती ।
लोक उगेच बोलती । पाहिल्याविण ॥ ३१ ॥
अंतकाळ आहे कठीण । शरीर सोडिना प्राण ।
बरांड्यासारिखें[1] लक्षण । अंतकाळीं ॥ ३२ ॥

दा. १७. ६. २६–३२.

३०. मृत्यूचें सामर्थ्य.

संसार म्हणिजे सवेंच स्वार । नाहीं मरणास उधार ।
मापीं लागलें शरीर । घडीनें घडी ॥ १ ॥
नित्य काळाची संगती । नकळे होणाराची गती ।
कर्मासारिखे प्राणी पडती । नाना देसीं विदेसीं ॥ २ ॥
सरतां संचिताचें शेष । नाहीं क्षणाचा अवकाश ।
भरतां न भरतां निमिष्य । जाणें लागे ॥ ३ ॥
अवचितें काळाचे म्हणियारे[2] । मारित सुटती येकसरें ।
नेऊन घालिती पुढारें । मृत्यपंथें ॥ ४ ॥
होतां मृत्याची आटाटी[3] । कोणी घालूं न सकती पाठीं ।
सर्वत्रांस कुटाकुटी । मागें पुढें होतसे ॥ ५ ॥
मृत्यकाळ काठी निकी[4] । बैसे बळियाचे मस्तकीं ।
महाराजे बळिये लोकीं । राहों न सकती ॥ ६ ॥
मृत्य न म्हणे किं हा क्रूर । मृत्य न म्हणे हा झुंजार ।
मृत्य न म्हणे संग्रामशूर । समरांगणीं ॥ ७ ॥
मृत्य न म्हणे किं हा कोपी । मृत्य न म्हणे हा प्रतापी ।
मृत्य न म्हणे उग्ररूपी । माहाखळ ॥ ८ ॥

१ वुक ळलेला. २ शिपाई. ३ यातना. ४ खरोखर.

मृत्य न म्हणे बलाढ्य । मृत्य न म्हणे धनाढ्य ।
मृत्य न म्हणे आढ्य[1] । सर्वगुणें ॥ ९ ॥
मृत्य न म्हणे हा विख्यात । मृत्य न म्हणे श्रीमंत ।
मृत्य न म्हणे हा अद्भुत । पराक्रमी ॥ १० ॥
मृत्य न म्हणे हा भूपती । मृत्य न म्हणे हा चक्रवर्ती ।
मृत्य न म्हणे हा करामती । कैवांड[2] जाणे ॥ ११ ॥
मृत्य न म्हणे हयपती । मृत्य न म्हणे गजपती ।
मृत्य न म्हणे नरपती । विख्यात राजा ॥ १२ ॥
मृत्य न म्हणे वरिष्ठ जनीं । मृत्य न म्हणे राजकारणी ।
मृत्य न म्हणे वेतनी । वेतनधर्ता ॥ १३ ॥
मृत्य न म्हणे देसाई । मृत्य न म्हणे वेवसाई ।
मृत्य न म्हणे ठाईं ठाईं । पुंडराजे ॥ १४ ॥
मृत्य न म्हणे वित्पन्न । मृत्य न म्हणे संपन्न ।
मृत्य न म्हणे विद्वज्जन । समुदाई[3] ॥ १७ ॥
मृत्य न म्हणे धूर्त । मृत्य न म्हणे बहुश्रुत ।
मृत्य न म्हणे हा पंडित । महाभला ॥ १८ ॥
मृत्य न म्हणे अग्निहोत्री । मृत्य न म्हणे हा श्रोत्री ।
मृत्य न म्हणे मंत्रयंत्री । पूर्णागमी ॥ २० ॥
मृत्य न म्हणे शास्त्रज्ञ । मृत्य न म्हणे वेदज्ञ ।
मृत्य न म्हणे सर्वज्ञ । सर्व जाणे ॥ २१ ॥
मृत्य न म्हणे रागज्ञानी । मृत्य न म्हणे ताळज्ञानी ।
मृत्य न म्हणे तत्त्वज्ञानी । तत्त्ववेत्ता ॥ २३ ॥

---

१ युक्त. २ युक्त्या. ३ समुदाय असलेला.

मृत्य न म्हणे योगाभ्यासी । मृत्य न म्हणे संन्यासी ।
मृत्य न म्हणे काळासी । वंचूं जाणे ॥ २४ ॥
मृत्य न म्हणे हा सावध । मृत्य न म्हणे हा सिद्ध ।
मृत्य न म्हणे वैद्य प्रसिद्ध । पंचाक्षरी ॥ २५ ॥
मृत्य न म्हणे हा गोसावी । मृत्य न म्हणे हा तपस्वी ।
मृत्य न म्हणे हा मनस्वी । उदासीन ॥ २६ ॥
मृत्य न म्हणे ऋषेश्वर । मृत्य न म्हणे कवेश्वर ।
मृत्य न म्हणे दिगंबर । समाधिस्थ ॥ २७ ॥
मृत्य न म्हणे हठयोगी । मृत्य न म्हणे राजयोगी ।
मृत्य न म्हणे वीतरागी । निरंतर ॥ २८ ॥
मृत्य न म्हणे ब्रह्मचारी । मृत्य न म्हणे जटाधारी ।
मृत्य न म्हणे निराहारी । योगेश्वर ॥ २९ ॥
मृत्य न म्हणे हा संत । मृत्य न म्हणे हा महंत ।
मृत्य न म्हणे हा गुप्त । होत असे ॥ ३० ॥
मृत्य न म्हणे स्वाधेन । मृत्य न म्हणे पराधेन ।
सकळ जीवांस प्राशन । मृत्यचि करी ॥ ३१ ॥
येक मृत्यमार्गी लागले । येकीं आर्ध पंथ क्रमिले ।
येक ते सेवटास गेले । वृद्धपणीं ॥ ३२ ॥
मृत्य न म्हणे बाळ तारुण्य । मृत्य न म्हणे सुलक्षण
मृत्य न म्हणे विचक्षण । बहु बोलिका ॥ ३३ ॥
मृत्य न म्हणे हा आधारु । मृत्य न म्हणे उदारु ।
मृत्य न म्हणे हा सुंदरु । चतुरांग जाणे ॥ ३४ ॥
मृत्य न म्हणे पुण्य पुरुष । मृत्य न म्हणे हरिदास
मृत्य न म्हणे विशेष । सुकृती नर ॥ ३५ ।

आतां असो हें बोलणें । मृत्यापासून सुटिजे कोणें ।
मागें पुढें विश्वास[1] जाणें । मृत्यपंथें ॥ ३६ ॥

च्यारी खाणी च्यारी वाणी । चौऱ्यांसी लक्ष जीवयोनी ।
जन्मा आले तितुके प्राणी । मृत्य पावती ॥ ३७ ॥

मृत्याभेणें पळों जातां । तरी मृत्य सोडिना सर्वथा ।
मृत्यास न ये चुकावितां । कांहीं केल्या ॥ ३८ ॥

मृत्य न म्हणे हा स्वदेसी । मृत्य न म्हणे हा विदेसी ।
मृत्य न म्हणे हा उपवासी । निरंतर ॥ ३९ ॥

मृत्य न म्हणे थोर थोर । मृत्य न म्हणे हारिहर ।
मृत्य न म्हणे अवतार । भगवंताचे ॥ ४० ॥

श्रोतीं कोप न करावा । हा मृत्यलोक सकळांस ठावा ।
उपजला प्राणी जाईल बरवा । मृत्यपंथें ॥ ४१ ॥

येथें न मनावा किंत[2] । हा मृत्यलोक विख्यात ।
प्रगट जाणती समस्त । लहानथोर ॥ ४२ ॥

ऐसें जाणोनियां जीवें । याचें सार्थकची करावें ।
जनीं मरोन उरवावें । कीर्तिरूपें ॥ ४४ ॥

येरवी प्राणी लहान थोर । मृत्य पावती हा निर्धार ।
बोलिलें हें अन्यथा उत्तर । मानूंचि नये ॥ ४५ ॥

गेले बहुत वैभवाचे । गेले बहुत आयुष्याचे ।
गेले अगाध महिमेचे । मृत्यपंथें ॥ ४६ ॥

गेले बहुत पराक्रमी । गेले बहुत कपटकर्मी ।
गेले बहुत संग्रामी । संग्रामसौरे[3] ॥ ४७ ॥

---

१ सर्व लोकांस. २ किंतु, संशय. ३ शूर.

गेले बहुतां बळांचे । गेले बहुतां काळांचे ।
गेले बहुतां कुळांचे । कुळवंत राजे ॥ ४८ ॥

गेले बहुतांचे पाळक । गेले बुद्धीचे चाळक ।
गेले युक्तींचे तार्किक । तर्कवादी ॥ ४९ ॥

गेले विद्येचे सागर । गेले बळाचे डोंगर ।
गेले धनाचे कुबेर । मृत्यपंथें ॥ ५० ॥

गेले बहुत पुरुषार्थाचे । गेले बहुत विक्रमाचे ।
गेले बहुत आटोपाचे[1] । कार्यकर्ते ॥ ५१ ॥

गेले बहुत शस्त्रधारी । गेले बहुत परोपकारी ।
गेले बहुत नानापरी । धर्मरक्षक ॥ ५२ ॥

गेले बहुत प्रतापाचे । गेले बहुत सत्कीर्तीचे ।
गेले बहुत नीतीचे । नीतिवंत राजे ॥ ५३ ॥

गेले बहुत मतवादी । गेले बहुत कार्यवादी ।
गेले बहुत वेवादी । बहुतां परीचे ॥ ५४ ॥

गेलीं पंडितांचीं थाटें[2] । गेलीं शब्दांचीं कचाटें[3] ।
गेलीं वादकें अचाटें । नाना मतें ॥ ५५ ॥

गेले तापस्यांचे भार । गेले संन्यासी अपार ।
गेले विचारकर्ते सार । मृत्यपंथें ॥ ५६ ॥

गेले बहुत संसारी । गेले बहुत वेषधारी ।
गेले बहुत नानापरी । नाना छंद करूनी ॥ ५७ ॥

गेले ब्राम्हणसमुदाये । गेले बहुत आचार्ये ।
गेले बहुत सांगों काये । किती ह्मणोनि ॥ ५८ ॥

---

१ व्याप. २ समुदाय. ३ बंड.

असो ऐसे सकळही गेले । परंतु येकचि राहिले ।
जे स्वरूपाकार जाले । आत्मज्ञानी ॥ ५९ ॥

दा. ३. ९. १–५९.

३१. " सर्व सांडून शोधा मजला."

याकारणें सर्व सांडावें । येक देवास धुंडावें ।
तरीच वर्म पडे ठावें । कांहींएक ॥ २१ ॥
नाना सुखें देवें केलीं । लोकें तयास चुकलीं ।
ऐसीं चुकतांच गेलीं । जन्मवरी ॥ २२ ॥
सर्व सांडून शोधा मजला । ऐसें देवचि बोलिला ।
लोकीं शब्द अमान्य केला । भगवंताचा ॥ २३ ॥
म्हणोन नाना दुःखें भोगिती । सर्वकाळ कष्टी होती ।
मनीं सुखचि इच्छिति । परी तें कैंचें ॥ २४ ॥
उदंड सुख जया लागलें । वेडें तयास चुकलें ।
सुख सुख म्हणतांच मेलें । दुःख भोगितां ॥ २५ ॥
शहाण्यानें ऐसें न करावें । सुख होये तेंचि करावें ।
देवास धुंडित जावें । ब्रह्मांडापरतें ॥ २६ ॥
मुख्य देवचि ठाईं पडिला । मग काये उणें तयाला ।
लोक वेडे विवेकाला । सांडूनि जाती ॥ २७ ॥
विवेकाचें फळ तें सुख । अविवेकाचें फळ तें दुःख ।
यांत मानेल तें आवश्यक । केलें पाहिजे ॥ २८ ॥
कर्तयासी वोळखावें । यास विवेक म्हणावें ।
विवेक सांडितां व्हावें । परम दुःखी ॥ २९ ॥

दा. १३. ७. २१–२९.

३२. याच जन्मीं परमेश्वराचा साक्षात्कार होणें शक्य आहे.

संसारत्याग न करितां । प्रपंचउपाधी न सांडितां ।
जनामध्यें सार्थकता । विचारेंचि होये ॥ २४ ॥

हें प्रचितीचें बोलणें । विवेकें प्रचित पाहणें ।
प्रचित पाहे तें शाहाणे । अन्यथा नव्हे ॥ २५ ॥

सप्रचित आणी अनुमान । उधार आणी रोकडें धन ।
मानसपूजा प्रत्यक्ष दर्शन । यास महदांतर ॥ २६ ॥

पुढें जन्मांतरीं होणार । हा तों अवघाच उधार ।
तैसा नव्हे सारासार । तत्काळ लाभे ॥ २७ ॥

तत्काळचि लाभ होतो । प्राणी संसारीं सुटतो ।
संशय अवघाचि तुटतो । जन्ममरणाचा ॥ २८ ॥

याचि जन्में येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ २९ ॥

ये गोष्टीस करी अनुमान । तो सिद्धचि पावेल पतन ।
मिथ्या वदे त्यास आण[1] । उपासनेची ॥ ३० ॥

हें येथार्थचि आहे बोलणें । विवेकें सीघ्रचि मुक्त होणें ।
असोनी कांहींच नसणें । जनामधें ॥ ३१ ॥

देवपद आहे निर्गुण । देवपदीं अनन्यपण ।
हाचि अर्थ पहातां पूर्ण । समाधान बाणे ॥ ३२ ॥

देहीच विदेह होणें । करून कांहींच न करणें ।
जीवन्मुक्तांचीं लक्षणें । जीवन्मुक्त जाणे ॥ ३३ ॥

दा. ६. ९. २४–३३.

---

१ शपथ.

३३. बद्ध मनुष्याचें वर्णन.

परमार्थाचा अनादर । प्रपंचाचा अत्यादर ।
संसारभार जोजारें[1] । या नांव बद्ध ॥ ३७ ॥
सत्संगाची नाहीं गोडी । संतनिंदेची आवडी ।
देहेबुद्धीची घातली बेडी । या नांव बद्ध ॥ ३८ ॥
हातीं द्रव्याची जपमाळ । कांताध्यान सर्वकाळ ।
सत्संगाचा दुष्काळ । या नांव बद्ध ॥ ३९ ॥
नेत्रीं द्रव्यदारा पाहावी । श्रवणीं द्रव्यदारा ऐकावी ।
चिंतनीं द्रव्यदारा चिंतावी । या नांव बद्ध ॥ ४० ॥
काया वाचा आणि मन । चित्त वित्त जीव प्राण ।
द्रव्यदारेचें करी भजन । या नांव बद्ध ॥ ४१ ॥
इंद्रियें करून निश्चळ । चंचळ होऊं नेदी पळ ।
द्रव्यदारेसि लावी सकळ । या नांव बद्ध ॥ ४२ ॥
द्रव्य दारा तेंचि तीर्थ । द्रव्यदारा तोचि परमार्थ ।
द्रव्यदारा सकळ स्वार्थ । म्हणे तो बद्ध ॥ ४३ ॥
वेर्थ जाऊं नेदी काळ । संसारचिंता सर्वकाळ ।
कथा वार्ता तेचि सकळ । या नांव बद्ध ॥ ४४ ॥

दा. ५. ७. ३७–४४.

३४. गुरूची आवश्यकता.

ब्राह्मणें पाविजे देवाधिदेवा । तरी किमर्थ सद्गुरु करावा ।
ऐसें म्हणाल तरी निजठेवा । सद्गुरुविण नाहीं ॥ १९ ॥

१ जोराचा, अत्यंत

स्वधर्मकर्मी पूज्य ब्राह्मण । परी ज्ञान नव्हे सद्गुरुविण ।
ब्रह्मज्ञान नसतां सीण । जन्ममृत्य चुकेना ॥ २० ॥

सद्गुरुविण ज्ञान कांहीं । सर्वथा होणार नाहीं ।
अज्ञान प्राणी प्रवाहीं । वाहातचि गेले ॥ २१ ॥

ज्ञानविरहित जें जें केलें । तें तें जन्मासि मूळ[1] जालें ।
म्हणोनि सद्गुरूचीं पाउलें । सदृढ धरावीं ॥ २२ ॥

जयास वाटे देव पहावा । तेणें सत्संग धरावा ।
सत्संगेंविण देवाधिदेवा । पाविजेत नाहीं ॥ २३ ॥

नाना साधनें बापुडीं । सद्गुरुविण करिती वेडीं ।
गुरुकृपे[2]विण कुडकुडीं । वेर्थचि होतीं ॥ २४ ॥

कार्तिकस्नानें माघस्नानें । व्रतें उद्यापनें दानें ।
गोरांजनें[3] धूम्रपानें । साधिती पंचाग्नी ॥ २५ ॥

हरिकथा पुराण श्रवण । आदरें करिती निरूपण ।
सर्व तीर्थे परम कठिण । फिरती प्राणी ॥ २६ ॥

झळफळित देवतार्चनें । स्नानें संध्या दर्भासनें ।
टिळे माळा गोपीचंदनें । ठसे श्रीमुद्रांचे ॥ २७ ॥

अर्घ्यपात्रें संपुष्ट गोकर्णें । मंत्र यंत्राचीं तांब्रपर्णें ।
नाना प्रकारचीं उपकरणें । साहित्यशोभा ॥ २८ ॥

घंटा घणघणा वाजती । स्तोत्रें स्तवनें आणी स्तुती ।
आसनें मुद्रा ध्यानें करिती । प्रदक्षिणा नमस्कार ॥ २९ ॥

पंचायेतन[4] पूजा केली । मृत्तिकेचीं लिंगें लाखोली ।
बेलें नारिकेळें भरिलीं । संपूर्ण सांग पूजा ॥ ३० ॥

---

१ ·रण. २ पोकळ. ३ एकप्रकारचें साधन. ४ पंचायतन.

उपोषणें निष्ठानेम । परम सायासीं केलें कर्म ।
फळचि पावती वर्म । चुकले प्राणी ॥ ३१ ॥

येज्ञादिकें कर्में केलीं । हृदई फळाशा कल्पिली ।
आपले इच्छेनें घेतली । सूति जन्माची ॥ ३२ ॥

करूनि नाना सायास । केला चौदा विद्यांचा अभ्यास ।
रिद्धि सिद्धि सावकाश । वोळल्या जरी ॥ ३३ ॥

तरी सद्गुरुकृपेंविरहित । सर्वथा न घडे स्वहित ।
येमपुरीचा अनर्थ । चुकेना येणें ॥ ३४ ॥

जंव नाहीं ज्ञानप्राप्ती । तंव चुकेना यातायाती ।
गुरुकृपेंविण अधोगति । गर्भवास चुकेना ॥ ३५ ॥

ध्यान धारणा मुद्रा आसन । भक्तिभाव आणी भजन ।
सकळही फोल ब्रह्मज्ञान । जंव तें प्राप्त नाहीं ॥ ३६ ॥

सद्गुरुकृपा न जोडे । आणी भलतीचकडे वावडे ।
जैसें आंधळें चाचरोन पडे । गारीं आणी गडधरीं ॥ ३७ ॥

जैसें नेत्रीं घालितां अंजन । पडे दृष्टीस निधान ।
तैसें सद्गुरुवचनें ज्ञान-। प्रकाश होये ॥ ३८ ॥

सद्गुरुविण जन्म निर्फळ । सद्गुरुविण दुःख सकळ ।
सद्गुरुविण तळमळ । जाणार नाहीं ॥ ३९ ॥

सद्गुरुचेनि अभयंकरें । प्रगट होईजे ईश्वरें ।
संसारदुःखें अपारें । नासोनि जाती ॥ ४० ॥

मागें जाले थोर थोर । संत महंत मुनेश्वर ।
तयांसही ज्ञानविज्ञानविचार । सद्गुरुचेनी ॥ ४१ ॥

---

१ प्राप्ति. २ हस्तगत झाल्या. ३ भटकतो. ४ चाचरहून. ५ खळग्यांत.

श्रीरामकृष्ण आदिकरूनी। अतितत्पर गुरुभजनीं।
सिद्ध साधु आणी संतजनीं। गुरुदास्य केलें ॥ ४२ ॥
सकळ सृष्टीचे चाळक। हरिहर ब्रह्मादिक।
तेही सद्गुरुपदीं रंक। महत्त्वा न चढती ॥ ४३ ॥
असो जयासि मोक्ष व्हावा। तेणें सद्गुरु करावा।
सद्गुरुविण मोक्ष पावावा। हें कल्पांतीं न घडे ॥ ४४ ॥

दा. ५. १. १९–४४.

३९. " सद्गुरुकृपा तेचि किली. "

आतां मनासि जें अप्राप्त। तें कैसें होईल प्राप्त।
ऐसें म्हणाल तरी कृत्य। सद्गुरुविण नाहीं ॥ १२ ॥
भांडारगृहें भरलीं। परी असती आडकलीं।
हातास न येतां किली। सर्वही अप्राप्त ॥ १३ ॥
तरी ते किली ते कवण। मज करावी निरूपण।
ऐसा श्रोता पुसे खूण। वक्तयासी ॥ १४ ॥
सद्गुरुकृपा तेचि किली। जेणें बुद्धि प्रकाशली।
द्वैतकपाटें उघडलीं। येकसरीं ॥ १५ ॥
तेथें सुख असे [1] वोड। नाहीं मनास [2] पवाड।
मनेंविण [3] कैवाडें। साधनाचा ॥ १६ ॥
त्याची मनेंविण प्राप्ती। किं वासनेविण तृप्ती।
तेथें न चले वित्पत्ती। कल्पनेची ॥ १७ ॥
तें परेहूनि पर। मनबुद्धिअगोचर।
संग सोडितां सत्वर। पाविजे तें ॥ १८ ॥

---

१ फार. २ प्रवेश. ३ प्रकार.

संग सोडावा आपुला । मग पहावें तयाला ।
अनुभवी तो या बोला । सुखावेल गा ॥ १९ ॥

दा. ७. २. १२–१९.

३६. देवापेक्षां गुरु श्रेष्ठ आहे.

सद्गुरुहून देव मोठा । जयास वाटे तो करंटा ।
सुटला वैभवाचा फांटा । सामर्थ्यपिसें ॥ ४० ॥
सद्गुरुस्वरूप तें संत । आणी देवास मांडेल कल्पांत ।
तेथें कैंचें उरेल सामर्थ्य । हरिहरांचें ॥ ४१ ॥
म्हणोन सद्गुरुसामर्थ्य अधिक । जेथें आटती ब्रह्मादिक ।
अल्पबुद्धी मानवी रंक । तयांसि हें कळेना ॥ ४२ ॥
गुरुदेवास बराबरी । करी तो शिष्य दुराचारी ।
भ्रांति बैसली अभ्यांतरीं । सिद्धांत नेणवे ॥ ४३ ॥
देव मानुषीं भाविला । मंत्रीं देवपणासि आला ।
सद्गुरु न वचे कल्पिला । ईश्वराचेनि ॥ ४४ ॥
म्हणोनि सद्गुरु पूर्णपणें । देवाहून अधिक कोटिगुणें ।
जयासि वर्णितां भांडणें । वेदशास्त्रीं लागलीं ॥ ४५ ॥
असो सद्गुरुपदापुढें । दुजें कांहींच न चढे ।
देवसामर्थ्य तें केवढें । मायाजनित ॥ ४६ ॥

दा. ५. ३. ४०–४६.

३७. "म्हणौनि सद्गुरु वर्णवेना । हे गे हेचि माझी वर्णना."

आतां सद्गुरु वर्णवेना । जेथें माया स्पर्शों सकेना ।
तें स्वरूप मज अज्ञाना । काय कळे ॥ १ ॥

नकळे नकळे नेति नेति । ऐसें बोलतसे श्रुति ।
तेथें मज मूर्खाची मति । पवाडेल[1] कोठें ॥ २ ॥

मज न कळे हा विचारु । इन्हूनि माझा नमस्कारु ।
गुरुदेवा पैलपारु । पाववी मज ॥ ३ ॥

होती स्तवनाची दुराशा । तुटला मायेचा भर्वसा[2]
आतां असाल तैसें असा । सद्गुरु स्वामी ॥ ४ ॥

मायेच्या बळें करीन स्तवन । ऐसें वांछित होतें मन ।
माया जाली लज्जायमान । काय करूं ॥ ५ ॥

नातुडे मुख्य परमात्मा । म्हणोनि करावी लागे प्रतिमा ।
तैसा मायायोगें महिमा । वर्णीन सद्गुरूचा ॥ ६ ॥

आपल्या भावासारिखा मनीं । देव आठवावा ध्यानीं ।
तैसा सद्गुरु हा स्तवनीं । स्तऊं आतां ॥ ७ ॥

जय जयाजि सद्गुरुराजा । विश्वंभरा विश्वबीजा ।
परमपुरुषा मोक्षध्वजा । दीनबंधू ॥ ८ ॥

तुझीयेन अभयंकरें । अनावर माया हे वोसरे ।
जैसें सूर्यप्रकाशें अंधारें । पळोन जाये ॥ ९ ॥

आदित्यें अंधकार निवारे । परंतु मागुतें ब्रह्मांड भरे ।
नीसी जालिया नंतरें । पुन्हां काळोखें ॥ १० ॥

तैसा नव्हे स्वामीरावो । करी जन्ममृत्य वाव ।
समूळ अज्ञानाचा ठाव । पुसून टाकी ॥ ११ ॥

सुवर्णाचें लोहो कांहीं । सर्वथा होणार नाहीं ।
तैसा गुरुदास संदेहीं । पडोंचि नेणे सर्वथा ॥ १२ ॥

---

१ शिरेल. २ निशा.

M. 1299

कां सरिता गंगेसी मिळाली । मिळणी होतां गंगा जाली ।
मग जरी वेगळी केली । तरी होणार नाहीं सर्वथा ॥ १३ ॥
परी ते सरिता मिळणीमागें । वाहाळ मानिजेत जगें ।
तैसा नव्हे शिष्य वेगें । स्वामीच होये ॥ १४ ॥
परिस आपणा ऐसें करीना । सुवर्णें लोहो पालटेना ।
उपदेश करी बहुत जना । अंकित सद्गुरूचा ॥ १५ ॥
शिष्यास गुरुत्व प्राप्त होये । सुवर्णें सुवर्ण करितां नये ।
म्हणौनि उपमा न साहे । सद्गुरूसी परिसाची ॥ १६ ॥
उपमे द्यावा सागर । तरी तो अत्यंतची क्षार ।
अथवा म्हणों क्षीरसागर । तरी तो नासेल कल्पांतीं ॥ १७ ॥
उपमे द्यावा जरि मेरू । तरी तो जड पाषाण कठोरू ।
तैसा नव्हे कीं सद्गुरु । कोमळ दीनाचा ॥ १८ ॥
उपमे म्हणों गगन । तरी गगनापरीस तें निर्गुण ।
याकारणें दृष्टांत हीन । सद्गुरूस गगनाचा ॥ १९ ॥
धीरपणें उपमूं जगती । तरी हेही खचेल कल्पांतीं ।
म्हणौन धीरत्वास दृष्टांतीं । हीन वसुंधरा ॥ २० ॥
आतां उपमावा गभस्ती । तरी गभस्तीचा प्रकाश किती ।
शास्त्रें मर्यादा बोलती । सद्गुरु अमर्याद ॥ २१ ॥
म्हणौनि उपमे उणा दिनकर । सद्गुरुज्ञानप्रकाश थोर ।
आतां उपमावा फणिवर । तरी तोही भारवाही ॥ २२ ॥
आतां उपमे द्यावें जळ । तरी तें काळांतरीं आटेल सकळ ॥
सद्गुरुरूप तें निश्चळ । जाणार नाहीं ॥ २३ ॥
सद्गुरुसी उपमावें अमृत । तरी अमर धरिती मृत्यपंथ ।
सद्गुरुकृपा यथार्थ । अमर करी ॥ २४ ॥

सद्गुरूसी म्हणावें कल्पतरू। तरी हा कल्पनातीत विचारू।
कल्पवृक्षाचा अंगिकारू। कोण करी ॥ २५ ॥

चिंतामात्र नाहीं मनीं। कोण पुसे चिंतामणी।
कामधेनूची दुभणी[१]। निःकामासी न लगती ॥ २६ ॥

सद्गुरु म्हणों लक्ष्मवंत। तरी ते लक्ष्मी नाशिवंत।
ज्याचे द्वारीं असे तिष्ठत। मोक्षलक्ष्मी ॥ २७ ॥

स्वर्गलोक इंद्रसंपती। हे काळांतरीं विटंबती।
सद्गुरुकृपेची प्राप्ती। काळांतरीं चळेना ॥ २८ ॥

हरीहर ब्रम्हादिक। नाश पावती[२] सकळिक।
सर्वदा अविनाश येक। सद्गुरुपद ॥ २९ ॥

तयासी उपमा काय द्यावी। नाशिवंत सृष्टी आघवी।
पंचभूतिक उठाठेवी। नचले तेथें ॥ ३० ॥

म्हणोनि सद्गुरु वर्णवेना। हे गे हेचि माझी वर्णना।
अंतरास्थितीचिया खुणा। अंतर्निष्ठ जाणती ॥ ३१ ॥

दा. १. ४. १–३१

३८. सद्गुरूचें लक्षण.

म्हणोनि निःकामताविचारु। दृढबुद्धीचा निर्धारु।
तोचि सद्गुरु पैलपारु। पाववी भावाचा ॥ ४४ ॥

मुख्य सद्गुरूचें लक्षण। आधीं पाहिजे विमळ ज्ञान।
निश्चयाचें समाधान। स्वरूपस्थिती ॥ ४५ ॥

याही वरि वैराग्य प्रबळ। वृत्ति उदास केवळ।
विशेष आचारें निर्मळ। स्वधर्मविषईं ॥ ४६ ॥

---

१ दुभतीं. २ नाश पावतात.

याहीवरी अध्यात्मश्रवण । हरिकथानिरूपण ।
जेथें परमार्थविवरण । निरंतर ॥ ४७ ॥

जेथें सारासार विचार । जेथें होये जगोद्धार ।
नवविधा भक्तीचा आधार । बहुत जनासी ॥ ४८ ॥

म्हणोनि नवविधा भजन । जेथें प्रतिष्ठिलें साधन ।
हें सद्गुरूचें लक्षण । श्रोतीं ओळखावें ॥ ४९ ॥

अंतरीं शुद्ध ब्रह्मज्ञान । बाह्य निष्ठेचें भजन ।
तेथें बहु भक्तजन । विश्रांति पावती ॥ ५० ॥

नाहीं उपासनेचा आधार । तो परमार्थ निराधार ।
कर्मेविण अनाचार । भ्रष्ट होती ॥ ५१ ॥

म्हणोनि ज्ञान वैराग्य आणि भजन । स्वधर्म कर्म आणि साधन ।
कथा निरूपण श्रवण मनन । नीति न्याये मर्यादा ॥ ५२ ॥

यामधें येक उणें असे । तेणें तें विलक्षण दिसे ।
म्हणोन सर्वहि विलसे । सद्गुरूपासीं ॥ ५३ ॥

दा. ५. २. ४४–५३.

३९. साधुलक्षण.

अंतरीं गेलियां अमृत । बाह्य काया लखलखित ।
अंतरस्थिति बाणतां संत । लक्षणें कैसीं ॥ १ ॥

जालें आत्मज्ञान बरवें । हें कैसेनि पां जाणावें ।
म्हणोनि बोलिलीं स्वभावें । साधुलक्षणें ॥ २ ॥

ऐक सिद्धाचें लक्षण । सिद्ध म्हणिजे स्वरूप जाण ।
तेथें पाहातां वेगळेपण । मुळींच नाहीं ॥ ३ ॥

स्वरूप होऊन राहिजे । तया नांव सिद्ध बोलिजे ।
सिद्धस्वरूपींच साजे । सिद्धपण ॥ ४ ॥

वेदशास्त्रीं जें प्रसिद्ध । सस्वरूप स्वतःसिद्ध ।
तयासिच बोलिजे सिद्ध । अन्यथा न घडे ॥ ५ ॥

तथापि बोलों कांहीं येक । साधकास कळाया विवेक ।
सिद्धलक्षणाचें कौतुक । तें हें ऐसें असे ॥ ६ ॥

अंतरस्थित स्वरूप जाली । पुढें काया कैसी वर्तली ।
जैसी स्वप्नींची नाथिली[1] । स्वप्नरचना ॥ ७ ॥

तथापि सिद्धाचें लक्षण । कांहीं करूं निरूपण ।
जेणें बाणे अंतर्खूण । परमार्थाची ॥ ८ ॥

सदा स्वरूपानुसंधान । हें मुख्य साधूचें लक्षण ।
जनीं असोन आपण । जनावेगळा ॥ ९ ॥

स्वरूपीं दृष्टी पडतां । तुटोन गेली संसारचिंता ।
पुढें लागली ममता । निरूपणाची ॥ १० ॥

हें साधकाचें लक्षण । परी सिद्धाआंगीं असे जाण ।
सिद्धलक्षण साधकेंविण । बोलोंच नये ॥ ११ ॥

बाह्य साधकाचे परी । आणी स्वरूपाकार अंतरीं ।
सिद्धलक्षण तें चतुरीं । जाणिजे ऐसें ॥ १२ ॥

संदेहरहित साधन । तोचि सिद्धाचें लक्षण ।
अंतर्बाह्य समाधान । चळेना ऐसें ॥ १३ ॥

अचळ जाली अंतरस्थिती । तेथें चाळणास कैंची गती ।
स्वरूपीं लागतां वृत्ती । स्वरूपचि जाली ॥ १४ ॥

---

१ नश्वर.

मग तो चळतांच अचळ । चंचळपणें निश्चळ ।
निश्चळ असोनि चंचळ । देह त्याचा ॥ १५ ॥

स्वरूपीं स्वरूपचि जाला । मग तो पडोनिच राहिला ।
अथवा उठोनि पळाला । तरी चळेना ॥ १६ ॥

येथें कारण अंतरस्थिती । अंतरींच पाहिजे निवृत्ती ।
अंतर लागलें भगवंतीं । तोचि साधु ॥ १७ ॥

बाह्य भलतेसें असावें । परी अंतर स्वरूपीं लागावें ।
लक्षणें दिसती स्वभावें । साधुअंगीं ॥ १८ ॥

रांजीं[1] बैसता अवलिळा[2] । आंगीं बाणे राजकळा ।
स्वरूपीं लागतां जिव्हाळा । लक्षणें बाणती ॥ १९ ॥

येरव्हीं अभ्यास करितां । हाता न चढती सर्वथा ।
स्वरूपीं राहावें तत्वता । स्वरूप होऊनि ॥ २० ॥

अभ्यासाचा मुगुटमणी । वृत्ती राहावी निर्गुणीं ।
संतसंगें निरूपणीं । स्थिती बाणे ॥ २१ ॥

ऐसीं लक्षणें बरवीं । स्वरूपाकारें अभ्यासावीं ।
स्वरूप सोडितां गोसावी । भांबावती ॥ २२ ॥

आतां असो हें बोलणें । एका साधूचीं लक्षणें ।
जेणें समाधान बाणे । साधकाअंगीं ॥ २३ ॥

स्वरूपीं भरतां कल्पना । तेथें कैंची उरेल कामना ।
म्हणौनियां साधुजना । कामचि नाहीं ॥ २४ ॥

कल्पिला विषयो हातींचा जावा । तेणें गुणें क्रोध यावा ।
साधुजनाचा अक्षै[3] ठेवा । जाणार नाहीं ॥ २५ ॥

---

१ राज्यी. २ सहज. ३ कायमचा.

म्हणोनि ते क्रोधरहित । जाणती स्वरूप संत ।
नासिवंत हे पदार्थ । सांडुनियां, ॥ २६ ॥

तेथें नाहीं दुसरी परी । क्रोध यावा कोणावरी ।
क्रोधरहित सचराचरीं । साधुजन वर्तती ॥ २७ ॥

आपुला आपण स्वानंद । कोणावरी करावा मद ।
याकारणें वादवेवाद । तुटोन गेला ॥ २८ ॥

साधुस्वरूप निर्विकार । तेथें कैंचा तिरस्कार ।
आपला आपण मत्सर । कोणावरी करावा ॥ २९ ॥

साधु वस्तु आनायासें । याकारणें मत्सर नसे ।
मदमत्सराचें पिसें । साधुसी नाहीं ॥ ३० ॥

साधु स्वरूप स्वयंभ । तेथें कैचा असेल दंभ ।
जेथें द्वैताचा आरंभ । जालाच नाहीं[1] ॥ ३१ ॥

जेणें दृश्य केलें विसंच । तयास कैंचा हो प्रपंच ।
याकारणें निःप्रपंच । साधु जाणावा ॥ ३२ ॥

अवघें ब्रह्मांड त्याचें घर । पंचभूतिक हा जोजार[2] ।
मिथ्या जाणोन सत्वर । त्याग केला ॥ ३३ ॥

याकारणें लोभ नसे । साधु सदा निर्लोभ असे ।
जयाची वासना समरसे । शुद्धस्वरूपीं ॥ ३४ ॥

आपुला आपण आघवा । स्वार्थ कोणाचा करावा ।
म्हणोनि साधु तो जाणावा ॥ शोकरहित ॥ ३५ ॥

दृश्य सांडून नासिवंत । स्वरूप सेविलें शाश्वत ।
याकारणें शोकरहित । साधु जाणावा ॥ ३६ ॥

---

१ नाहींस. २ पसारा.

शोकें दुःखवावी वृत्ती । तरी ते जाहाली निवृत्ति ।
म्हणोनि साधु आदिअंतीं । शोकरहित ॥ ३७ ॥

मोहें झळंबावें मन । तरी तें जाहालें उन्मन ।
याकारणें साधुजन । मोहातीत ॥ ३८ ॥

साधु वस्तु अद्वये । तेथं कैंचें वाटेल भय ।
परब्रह्म तें निर्भये । तोचि साधु ॥ ३९ ॥

याकारणें भयातीत । साधु निर्भय निवांत ।
सकळास मांडेल अंत । साधु अनंतरूपी ॥ ४० ॥

सत्यस्वरूपें अमर जाला । भयें कैंचें वाटेल त्याला
याकारणें साधुजनाला । भयेचि नाहीं ॥ ४१ ॥

जेथें नाहीं द्वंदभेद । आपला आपण अभेद ।
तेथं कैंचा उठेल खेद । देहबुद्धीचा ॥ ४२ ॥

बुद्धीनें नेमिलें निर्गुणा । त्यास कोणीच नेईना ।
याकारणें साधुजना । खेदचि नाहीं ॥ ४३ ॥

आपण येकला ठाईंचा । स्वार्थ करावा कोणाचा ।
दृश्य नस्तां स्वार्थाचा । ठावचि नाहीं ॥ ४४ ॥

साधु आपणचि येक । तेथें कैंचा दुःखशोक ।
दुजेविण अविवेक । येणार नाहीं ॥ ४५ ॥

आशा धरितां परमार्थाची । दुराशा तुटली स्वार्थाची ।
म्हणोन नेराशता साधूची । वोळखण ॥ ४६ ॥

मृदपणें जैसें गगन । तैसें साधूचें लक्षण ।
याकारणें साधुवचन । कठीण नाहीं ॥ ४७ ॥

---

१ पछाडावें. २ निश्चय केला

स्वरूपाचा संयोगीं । स्वरूपचि जाला योगी ।
याकारणें वीतरागी । निरंतर ॥ ४८ ॥

स्थिति बाणतां स्वरूपाची । चिंता सोडिली देहाचा ।
याकारणें होणाराची । चिंता नसे ॥ ४९ ॥

स्वरूपीं लागतां बुद्धी । तुटे अवघी उपाधी ।
याकारणें निरोपाधी । साधुजन ॥ ५० ॥

साधु स्वरूपींच राहे । तेथें संगचि न साहे ।
म्हणोनि साधु तो न पाहे । मानापमान ॥ ५१ ॥

अलक्षास लावी लक्ष । म्हणोनि साधु परमदक्ष ।
वोळ्हं जाणती केपक्षे[1] । परमार्थाचा ॥ ५२ ॥

स्वरूपीं न साहे मळ । म्हणोन साधु तो निर्मळ ।
साधु स्वरूपचि केवळ । म्हणोनियां ॥ ५३ ॥

सकळ धर्मांमधें धर्म । स्वरूपीं राहणें हा स्वधर्म ।
हेंचि जाणिजे मुख्य वर्म । साधुलक्षणाचें ॥ ५४ ॥

दा. ८. ९. १–५४.

४०. " जें त्रैलोकीं नाहीं दान । तें करिती संतसज्जन. "

आतां वंदीन संतसज्जन । जे परमार्थाचें अधिष्ठान ।
जयांचेनि गुह्यज्ञान । प्रगटे जनीं ॥ १ ॥

जे वस्तु परम दुर्लभ । जयेचा अलभ्य लाभ ।
तेचि होये सुलभ । संतसंगेंकरूनां ॥ २२ ॥

वस्तु प्रगटचि असे । पाहातां कोणासीच न दिसे ।
नाना साधनीं सायासें । न पडे ठाईं ॥ ३ ॥

---

१ केवार.

जेथें परीक्षवंत ठकले । गातरी डोळसचि अंध जाले ।
पाहात असतांचि चुकले । निजवस्तूसी ॥ ४ ॥

जें दीपाचेनि दिसेना । नाना प्रकाशें गवसेना ।
नेत्रांजनेंहि वसेना । दृष्टीपुढें ॥ ५ ॥

सोळाकळी पूर्ण शशी । दाखवूं सकेना वस्तूसी ।
तीव्र आदित्य कळाराशी । तोहि दाखवीना ॥ ६ ॥

ज्या सूर्याचेनि प्रकाशें । ऊर्णतंतु[१] तोहि दिसे ।
नाना सूक्ष्म पदार्थ भासे । अणुरेणादिक ॥ ७ ॥

चिरलें वाळाग्र[२] तेहि प्रकाशी । परी तो दाखविना वस्तूसी ।
तें जयाचेनि साधकांसी । प्राप्त होये ॥ ८ ॥

जेथें आक्षेप आटले । जेथें प्रेत्न प्रस्तावले ।
जेथें तर्क मंदावले । तार्कितां निजवस्तूसी ॥ ९ ॥

वेळे विवेकाची वेगडी । पडे शब्दाची बोबडी ।
जेथें मनाची तांतडी । कामा नये ॥ १० ॥

जो बोलकेपणें विशेष । सहस्र मुखांचा जो शेष ।
तोहि सिणला निःशेष । वस्तु न संगवे ॥ ११ ॥

वेदें प्रकाशिलें सर्वही । वेद विरहित कांहीं नाहीं ।
तो वेद कोणासही । दाखऊं सकेना ॥ १२ ॥

तोचि वस्तु संतसंगें । स्वानुभवें कळों लागे ।
त्यांचा महिमा वचनीं सांगें । ऐसा कवणु ॥ १३ ॥

विचित्र कळा ये मायेची । परी वोळखी न संगवे वस्तूची ।
मायातीता अनंताची । संत सोये सांगती ॥ १४ ॥

वस्तूसी वर्णिलें न वचे । तेंचि स्वरूप संतांचें ।
याकारणें वचनाचें । कार्य नाहीं ॥ १५ ॥

---

१ लोकरीचा तंत. २ वालाग्र.

संत आनंदाचें स्थळ। संत सुखचि केवळ।
नाना संतोषाचें मूळ। ते हे संत॥ १६ ॥
संत विश्रांतीची विश्रांती। संत तृप्तीची निजतृप्ती।
नातरी भक्तीची फळश्रुती। ते हे संत॥ १७ ॥
संत धर्माचें धर्मक्षेत्र। संत स्वरूपाचें सत्पात्र।
नातरी पुण्याची पवित्र। पुण्यभूमी॥ १८ ॥
संत समाधीचें मंदिर। संत विवेकाचें भांडार।
नातरी बोलिजे माहेर। सायोज्यमुक्तीचें॥ १९ ॥
संत सत्याचा निश्चयो। संत सार्थकाचा जयो।
संत प्राप्तीचा समयो। सिद्धरूप॥ २० ॥
मोक्षश्रिया आळंकृत। ऐसे हे संत श्रीमंत।
जीव दरिद्री असंख्यात। नृपती केले॥ २१ ॥
जे समर्थपणें उदार। जे कां अत्यंत दानशूर।
तयांचेनि हा ज्ञानविचार। दिधला नवचे॥ २२ ॥
महाराजे चक्रवंती[1]। जाले आहेत पुढें होती।
परंतु कोणी सायोज्यमुक्ती। देणार नाहीं॥ २३ ॥
जें त्रैलोकीं नाहीं दान। तें करिती संतसज्जन।
तयां संतांचें महिमान। काय म्हणोनि वर्णावें॥ २४ ॥
जें त्रैलोक्याहूनि वेगळें। जें वेदश्रुतीसी नाकळे।
तेंचि जयांचेनि वोळें[2]। परब्रह्म अंतरीं॥ २५ ॥
ऐसी संतांची महिमा। बोलिजे तितुकी उणी उपमा।
जयांचेनि मुख्य परमात्मा। प्रगट होये॥ २६ ॥

दा. १. ५.

---

१ चक्रवर्ती. २ सांपडते.

४१. संतसभावर्णन.

आतां वंदूं सकळ सभा । जये सभेसी मुक्ति सुल्लभा ।
जेथें स्वयें जगदीश उभा । तिष्ठतु भरें ॥ १ ॥
“नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ ।
मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ॥ १ ॥”
नाहीं वैकुंठींचा ठाईं । नाहीं योगियांचा हृदईं ।
माझे भक्त गाती ठाईं ठाईं । तेथें मी तिष्ठतु नारदा ॥ २ ॥
याकारणें सभा श्रेष्ठ । भक्त गाती तें वैकुंठ ।
नामघोषें घडघडाट । जयजयकारें गर्जती ॥ ३ ॥
प्रेमळ भक्तांचीं गायनें । भगवत्कथा हरिकीर्तनें ।
वेदव्याख्यान पुराणश्रवणें । जेथें निरंतर ॥ ४ ॥
परमेश्वराचे गुणानुवाद । नाना निरूपणाचे संवाद ।
अध्यात्मविद्या भेदाभेद । मथन जेथें ॥ ५ ॥
नाना समाधानें तृप्ति । नाना आशंकानिवृत्ति ।
चित्तीं बैसे ध्यानमूर्ति । वाग्विलासें ॥ ६ ॥
भक्त प्रेमळ भाविक । सभ्य सखोल[1] सात्विक ।
रम्य रसाळ गायक । निष्ठावंत ॥ ७ ॥
कर्मसीळ आचारसीळ । दानसीळ धर्मसीळ ।
सुचिष्मंत पुण्यसीळ । अंतरशुद्ध कृपाळु ॥ ८ ॥
योगी वीतरागी उदास । नेमक निग्रह तापस ।
विरक्त निस्पृह बहुवस । आरण्यवासी ॥ ९ ॥
दंडधारी जटाधारी । नाथपंथी मुद्राधारी ।
येक बाळब्रह्मचारी । योगेश्वर ॥ १० ॥

---

१ गंभीर.

पुरश्चरणी आणी तपस्वी । तीर्थवासी आणी मनस्वी[1] ।
माहायोगी आणी जनस्वी । जनसारिखे ॥ ११ ॥

सिद्ध साधु आणी साधक । मंत्रयंत्रशोधक ।
येकनिष्ठ उपासक । गुणग्राही ॥ १२ ॥

संतसज्जन विद्वज्जन । वेदज्ञ शास्त्रज्ञ महाजन ।
प्रबुद्ध सर्वज्ञ समाधान । विमळकर्ते ॥ १३ ॥

योगी वित्पन्न ऋषेश्वर । धूर्त तार्किक कवेश्वर ।
मनोजयाचे मुनेश्वर । आणी दिग्वल्की[2] ॥ १४ ॥

ब्रह्मज्ञानी आत्मज्ञानी । तत्त्वज्ञानी पिंडज्ञानी ।
योगाभ्यासी योगज्ञानी । उदासीन ॥ १५ ॥

पंडित आणी पुराणिक । विद्वांस आणी वैदिक ।
भट आणी पाठक । येजुर्वेदी ॥ १६ ॥

माहाभले महाश्रोत्री । याज्ञिक आणी आग्नहोत्री[3] ।
वैद्य आणी पंचाक्षरी । परोपकारकर्ते ॥ १७ ॥

भूत भविष्य वर्तमान । जयांस त्रिकाळाचें ज्ञान ।
बहुश्रुत निराभिमान । निरापेक्षी ॥ १८ ॥

शांति क्ष्मा[4] दयासीळ । पवित्र आणी सत्वशीळ ।
अंतरशुद्ध ज्ञानसीळ । ईश्वरी पुरुष ॥ १९ ॥

ऐसे जे कां सभानायेक । जेथें नित्यानित्यविवेक ।
त्यांचा महिमा अलोकिक । काय म्हणोनि वर्णावा ॥ २० ॥

जेथें श्रवणाचा उपाये । आणी परमार्थसमुदाये ।
तेथें जनासी तरणोपाये । सहजचि होये ॥ २१ ॥

---

१ ज्ञानी. २ दिगंबर. ३ अग्निहोत्री. ४ क्षमा.

उत्तम गुणाची मंडळी । सत्वधीर सत्वागळी[1] ।
नित्य सुखाची नव्हाळी[2] । जेथं वसे ॥ २२ ॥

विद्यापात्रं कळापात्रं । विशेष गुणाचीं सत्पात्रं ।
भगवंताचीं प्रीतिपात्रं । मिळालीं जेथं ॥ २३ ॥

प्रवृत्ती आणी निवृत्ती । प्रपंची आणी परमार्थी ।
गृहस्ताश्रमी वानप्रहस्ती । संन्यासादिक ॥ २४ ॥

वृद्ध तरुण आणी बाळ । पुरुष स्त्रियादिक सकळ ।
अखंड ध्याती तमाळनीळ । अंतर्यामीं ॥ २५ ॥

ऐसे परमेश्वराचे जन । त्यांसी माझें अभिवंदन ।
जयांचेनि समाधान । अकस्मात बाणे ॥ २६ ॥

ऐसिये सभेचा गजर[3] । तेथं माझा नमस्कार ।
जेथं नित्य निरंतर । कीर्तन भगवंताचं ॥ २७ ॥

दा. १.८.१–२७.

४२. संत चमत्कार करीत नाहींत, देव संतांबद्दल चमत्कार करितो.

अवतारादिक ज्ञानी संत । सारासारविचारें मुक्त ।
त्यांचें सामर्थ्य चालत । कोण्या प्रकारें ॥ १ ॥

हे श्रोतयांची आशंका । पाहातां प्रश्न केला निका ।
सावध होऊन ऐका । म्हणे वक्ता ॥ २ ॥

ज्ञानी मुक्त होऊन गेले । मागें त्यांचें सामर्थ्य चाले ।
परंतु ते नाहीं आले । वासना धरूनी ॥ ३ ॥

लोकांस होतो चमत्कार । लोक मानिती साचार ।
परंतु याचा विचार । पाहिला पाहिजे ॥ ४ ॥

---

१ सत्वानें श्रेष्ठ. २ नवेपणा. ३ रोखठोक.

जीत असतां नेणों किती । जनामधें चमत्कार होती ।
ऐसीयाची सद्यप्रचिती । रोकडी पाहावी ॥ ५ ॥

तो तरी आपण नाहीं गेला । लोकीं प्रत्यक्ष देखिला ।
ऐसा हा चमत्कार झाला । यास काये म्हणावें ॥ ६ ॥

तरी हा लोकांचा भावार्थ । भाविकां देव येथार्थ ।
अन्नेत्र कल्पना वेर्थ । कुतर्कांची ॥ ७ ॥

आवडे तें स्वप्नीं देखिलें । तरी काय तेथून आलें ।
म्हणाल तेणें आठविलें । तरी द्रव्य कां दिसे ॥ ८ ॥

एवं आपली कल्पना । स्वप्नीं येती पदार्थ नाना ।
तरी ते पदार्थ चालतीना । अथवा आठऊं नाहीं ॥ ९ ॥

येथें तुटली आशंका । ज्ञात्यास जन्म कल्पूं नका ।
उमजेना तरी विवेका । बरें पाहा ॥ १० ॥

ज्ञानी मुक्त होऊन गेले । त्यांचें सामर्थ्य उगेंच चाले ।
कां जे पुण्यमार्गे चालिले । म्हणोनियां ॥ ११ ॥

याकारणें पुण्यमार्गें चालावें । भजन देवाचें वाढवावें ।
न्याये सांडून न जावें । अन्यायमार्गें ॥ १२ ॥

दा. १०. ७. १–१२.

४३. ज्ञान आणि सामर्थ्य.

निरूपणीं सामर्थ्यसिद्धी । श्रवण होतां दुराशा बाधी ।
नाना चमत्कारें बुद्धी । डंडळूं[1] लागे ॥ ३३ ॥

पूर्वी ज्ञाते विरक्त भक्त । तयांसि सादृश्य भगवंत ।
आणी सामर्थ्यही अद्भुत । सिद्धीचेनि योगें ॥ ३४ ॥

---

१ डळमळू.

ऐसें तयांचें सामर्थ्य । आमुचें ज्ञानचि नुसदें वेर्थ ।
ऐसा सामर्थ्याचा स्वार्थ । अंतरीं वसे ॥ ३५ ॥

निःशेष दुराशा तुटे । तरीच भगवंत भेटे ।
दुराशा धरिती ते वोखटे । शब्दज्ञाते कामिक ॥ ३६ ॥

बहुत ज्ञातीं नागवलीं । कामनेनें वेडीं केलीं ।
कामना इच्छितांचि मेलीं । बापुडीं मूर्खें ॥ ३७ ॥

निःशेष कामनारहित । ऐसा तो विरुळा संत ।
अवघ्या वेगळें मत । अक्षै ज्याचें ॥ ३८ ॥

अक्षै ठेवा सकळांचा । परी पांगडा फिटेना शरीराचा ।
तेणें मार्ग ईश्वराचा । चुकोनि जाती ॥ ३९ ॥

सिद्धी आणी सामर्थ्य जालें । सामर्थ्यें देहास महत्व आलें ।
तेणें बेचाडें बळकावलें । देहबुद्धीचें ॥ ४० ॥

सांडून अक्षै सुख । सामर्थ्य इच्छिती ते मूर्ख ।
कामनेसारिखें दुःख । आणीक कांहींच नाहीं ॥ ४१ ॥

ईश्वरेंविण जे कामना । तेणेंचि गुणें नाना यातना ।
पावती होती पतना । वरपडे प्राणी ॥ ४२ ॥

होतां शरीरासी अंत । सामर्थ्यहि निघोन जात ।
सेखीं अंतरला भगवंत । कामनागुणें ॥ ४३ ॥

दा. ९. २. ३३–४३.

४४. शिष्यलक्षण.

मुख्य सच्छिष्याचें लक्षण । सद्गुरुवचनीं विश्वास पूर्ण ।
अनन्यभावें शरण । त्या नांव सच्छिष्य ॥ १९ ॥

---

१ खोटे. २ ममत्व. ३ प्रस्थ, बंड ४ योग्य ५ शेवटीं.

शिष्य पाहिजे निर्मळ । शिष्य पाहिजे आचारसीळ ।
शिष्य पाहिजे केवळ । विरक्त अनुतापी ॥ २० ॥

शिष्य पाहिजे निष्ठावंत । शिष्य पाहिजे सुचिष्मंत ।
शिष्य पाहिजे नेमस्त । सर्व प्रकारीं ॥ २१ ॥

शिष्य पाहिजे साक्षेपी[1] विशेष । शिष्य पाहिजे परम दक्ष ।
शिष्य पाहिजे अलक्ष । लक्षी ऐसा ॥ २२ ॥

शिष्य पाहिजे अति धीर । शिष्य पाहिजे अति उदार ।
शिष्य पाहिजे अति तत्पर । परमार्थविषईं ॥ २३ ॥

शिष्य पाहिजे परोपकारी । शिष्य पाहिजे निर्मत्सरी ।
शिष्य पाहिजे अर्थांतरीं । प्रवेशकर्ता ॥ २४ ॥

शिष्य पाहिजे परम शुद्ध । शिष्य पाहिजे परम सावध ।
शिष्य पाहिजे अगाध । उत्तम गुणाचा ॥ २५ ॥

शिष्य पाहिजे प्रज्ञावंत । शिष्य पाहिजे प्रेमळ भक्त ।
शिष्य पाहिजे नीतिवंत । मर्यादेचा ॥ २६ ॥

शिष्य पाहिजे युक्तिवंत । शिष्य पाहिजे बुद्धिवंत ।
शिष्य पाहिजे संतासंत । विचारघेता ॥ २७ ॥

शिष्य पाहिजे धारिष्टाचा । शिष्य पाहिजे दृढव्रताचा ।
शिष्य पाहिजे उत्तम कुळींचा । पुण्यसीळ ॥ २८ ॥

शिष्य असावा सात्त्विक । शिष्य असावा भजक ।
शिष्य असावा साधक । साधनकर्ता ॥ २९ ॥

शिष्य असावा विश्वासी । शिष्य असावा कायाक्लेशी ।
शिष्य असावा परमार्थासी । वाढऊं जाणे ॥ ३० ॥

---

१ प्रयत्न करणारा.

शिष्य असावा स्वतंत्र । शिष्य असावा जगमित्र ।
शिष्य असावा सत्पात्र । सर्वगुणें ॥ ३१ ॥

शिष्य असावा सद्विद्येचा । शिष्य असावा सद्भावाचा ।
शिष्य असावा अंतरींचा । परम शुद्ध ॥ ३२ ॥

शिष्य नसावा अविवेकी । शिष्य नसावा गर्भसुखी ।
शिष्य असावा संसारदुःखी । संतप्त देहीं ॥ ३३ ॥

जो संसारदुःखें दुःखवला । जो त्रिविधतापें पोळला ।
तोचि अधिकारी जाला । परमार्थविषीं ॥ ३४ ॥

बहु दुःख भोगिलें जेणें । तयासीच परमार्थ बाणे ।
संसारदुःखाचेनि गुणें । वैराग्य उपजे ॥ ३५ ॥

जया संसाराचा त्रास । तयासीच उपजे विस्वास ।
विस्वासबळें दृढ कास । धरिली सद्गुरूची ॥ ३६ ॥

दा. ५. ३. १९–३६.

अहो सद्गुरुकृपा जयासी । सामर्थ्य न चले तयापासी
ज्ञानबळें वैभवासी । तृणतुच्छ केलें ॥ ४७ ॥

सद्गुरुकृपेचेनि बळें । अपरोक्षज्ञानाचेनि उसाळें[१] ।
मायेसहित ब्रह्मांड सगळें । दृष्टीस न ये ॥ ४८ ॥

ऐसें सच्छिष्याचें वैभव । सद्गुरुवचनीं दृढ भाव ।
तेणें गुणें देवराव । स्वयेंचि होती ॥ ४९ ॥

अंतरीं अनुतापें तापले । तेणें अंतर शुद्ध जालें ।
पुढें सद्गुरुवचनें निवाले । सच्छिष्य ऐसे ॥ ५० ॥

---

१ उसाळपानें.

लागतां सद्गुरुवचनपंथें। जालें ब्रह्मांड पालथें।
तरी जयाच्या शुद्ध भावार्थें। पालट न धरिजे ॥ ५१ ॥

दा. ५.३. ४७–५१.

४९. मोक्ष कसा मिळतो ?

आतां असो हे उपपत्ती। आशंकेची कोण गती।
कितां दिवसां होते मुक्ती। सज्जनाचेनि संगें ॥ ४१ ॥

ऐका याचें प्रत्योत्तर। कथेसि व्हावें निरोत्तर।
संतसंगाचा विचार। ऐसा असे ॥ ४२ ॥

लोहो परिसेसीं लागला। थेंबुटा सागरीं मिळाला।
गंगे सरिते संगम जाला। तत्क्षणीं ॥ ४३ ॥

सावध साक्षपी[1] आणी दक्ष। तयास तत्काळचि मोक्ष।
इतरांस तें अलक्ष। लक्षिलें न वचे ॥ ४४ ॥

येथें शिष्यप्रज्ञाच केवळ। प्रज्ञावंतां न लगे वेळ।
अनन्यास तत्काळ। मोक्ष लाभे ॥ ४५ ॥

प्रज्ञावंत आणी अनन्य। तयास नलगे येक क्षण।
अनन्य भावार्थेंविण। प्रज्ञा खोटी ॥ ४६ ॥

प्रज्ञेविणें अर्थ न कळे। विश्वासेंविण वस्तु नाकळे।
प्रज्ञाविश्वासें गळे। देहाभिमान ॥ ४७ ॥

देहाभिमानाचे अंतीं। सहजचि वस्तुप्राप्ती।
सत्संगें सद्गती। विलंबचि नाहीं ॥ ४८ ॥

सावध साक्षपी विशेष। प्रज्ञावंत आणी विश्वास।
तयास साधनीं सायास। करणेंचि नलगे ॥ ४९ ॥

---

१. प्रयत्न करणारा.

इतर भाविक साबडे[1] । तयांसहि साधनें मोक्ष जोडे ।
साधुसंगें तत्काळ उडे[2] । विवेकदृष्टी ॥ ५० ॥

दा. ८.६. ४१–५०.

४६. सत्त्वगुणलक्षण.

ईश्वरीं प्रेमा अधिक । प्रपंच संपादणें लौकिक ।
सदा सन्निध विवेक । तो सत्त्वगुण ॥ ९ ॥
संसारदुःख विसरवी । भक्तिमार्ग विमळ दावी ।
भजनक्रिया उपजवी । तो सत्वगुण ॥ १० ॥
परमार्थाची आवडी । उठे भावार्थाची गोडी ।
परोपकारी तांतडी । तो सत्वगुण ॥ ११ ॥
स्नान संध्या पुण्यसीळ । अभ्यांतरींचा निर्मळ ।
शरीरवस्त्रें सोज्वळ । तो सत्वगुण ॥ १२ ॥
येजन आणी याजन । आधेन[3] आणी अध्यापन ।
स्वयें करी दान पुण्य । तो सत्वगुण ॥ १३ ॥
निरूपणाची आवडी । जया हरिकथेची गोडी ।
क्रिया पालटे रोकडी । तो सत्वगुण ॥ १४ ॥
अश्वदानें गजदानें । गोदानें भूमिदानें ।
नाना रत्नांचीं दानें । करी तो सत्वगुण ॥ १५ ॥
धनदान वस्त्रदान । अन्नदान उदकदान ।
करी ब्राह्मणसंतर्पण । तो सत्वगुण ॥ १६ ॥
कार्तिकस्नानें माघस्नानें । व्रतें उद्यापनें दानें ।
निष्काम तीर्थें उपोषणें । तो सत्वगुण ॥ १७ ॥

---

१ भोळे. २ उठे. ३ अध्ययन

सहस्त्रभोजनें लक्षभोजनें । विविध प्रकारींचीं दानें ।
निष्काम करी सत्वगुण । काममा रजोगुण ॥ १८ ॥

तीर्थी अर्पी जो अग्रारें[1] । बांधे वापी सरोवरें ।
बांधे देवालयें सिखरें । तो सत्वगुण ॥ १९ ॥

देवद्वारीं पडशाळा[2] । पाइरीया[3] दीपमाळा ।
वृंदावनें पार पिंपळा । बांधे तो सत्वगुण ॥ २० ॥

लावी वनें उपवनें । पुष्पवाटिका जीवनें ।
निववी तापस्यांचीं मनें । तो सत्वगुण ॥ २१ ॥

संध्यामठ आणी भुयेरीं[4] । पाईरीया नदीतीरीं ।
भांडारगृहें देवद्वारीं । बांधे तो सत्वगुण ॥ २२ ॥

नाना देवांचीं जे स्थानें । तेथें नंदादीप घालणें ।
वाहे आळंकार भूषणें । तो सत्वगुण ॥ २३ ॥

जेंगट[5] मृदांग टाळ । दमामे नगारे काहळ ।
नाना वाद्यांचे कल्लोळ । सुस्वरादिक ॥ २४ ॥

नाना सामग्री सुंदर । देवाळईं घाली नर ।
हरिभजनीं जो तत्पर । तो सत्वगुण ॥ २५ ॥

छेत्रें आणी सुखासनें । दिंड्या पताका निशाणें ।
वाहे चामरें सूर्यपानें । तो सत्वगुण ॥ २६ ॥

वृंदावनें तुळसीवनें । रंगमाळा संमार्जनें ।
ऐसी प्रीति घेतली मनें । तो सत्वगुण ॥ २७ ॥

सुंदरें नाना उपकरणें । मंडप चांदवे आसनें ।
देवाळईं समर्पणें । हा सत्वगुण ॥ २८ ॥

---

१ अग्रहार. २ धर्मशाळा. २ पायऱ्या. ४ भुयारे. ५ झागट.

देवाकारणें खाद्य । नाना प्रकारीं नैवेद्य ।
अपूर्व फळें अर्पी सद्य । तो सत्वगुण ॥ २९ ॥

ऐसी भक्तीची आवडी । नीच दास्यत्वाची गोडी ।
स्वयें देवद्वार झाडी । तो सत्वगुण ॥ ३० ॥

तिथी पर्व मोहोत्साव । तेथें ज्याचा अंतर्भाव ।
काया वाचा मनें सर्व । अर्पी तो सत्वगुण ॥ ३१ ॥

हरिकथेसी तत्पर । गंधें माळा आणी धुशर[1] ।
घेऊन उभी निरंतर । तो सत्वगुण ॥ ३२ ॥

नर अथवा नारी । येथानशक्ति सामग्री ।
घेऊन उभी देवद्वारीं । तो सत्वगुण ॥ ३३ ॥

महत्कृत्य सांडून मागें । देवास ये लागवेगें ।
भक्ति निकट आंतरंगें । तो सत्वगुण ॥ ३४ ॥

थोरपण सांडून दुरी । नीच कृत्य आंगिकारी ।
तिष्ठत उभी देवद्वारीं । तो सत्वगुण ॥ ३५ ॥

देवालागीं उपोषण । वर्जी तांबोल भोजन ।
नित्य नेम जपध्यान । करी तो सत्वगुण ॥ ३६ ॥

शब्द कठीण न बोले । अतिनेमेसीं चाले ।
योगी जेणें तोषविले । तो सत्वगुण ॥ ३७ ॥

सांडूनियां अभिमान । निष्काम करी कीर्तन ।
श्वेद[2] रोमांचस्फुरण । तो सत्वगुण ॥ ३८ ॥

अंतरीं देवाचें ध्यान । तेणें निडारेले[3] नयन ।
पडे देहाचें विस्मरण । तो सत्वगुण ॥ ३९ ॥

---

१ बुका. २ स्वेद. ३ भरून आले.

हरिकथेची अतिप्रीति । सर्वथा नये विकृति ।
आदिक[1] प्रेमा आदिअंतीं । तो सत्वगुण ॥ ४० ॥
मुखीं नाम हातीं टाळी । नाचत बोले ब्रीदावळी ।
घेऊन लावी पायधुळी । तो सत्वगुण ॥ ४१ ॥
देहाभिमान गळे । विषईं वैराग्य प्रबळे ।
मिथ्या माया ऐसें कळे । तो सत्वगुण ॥ ४२ ॥
कांहीं करावा उपाये । संसारीं गुंतोन काये ।
उकलवी ऐसें हृदये । तो सत्वगुण ॥ ४३ ॥
संसारासी त्रासे मन । कांहीं करावें भजन ।
ऐसें मनीं उठे ज्ञान । तो सत्वगुण ॥ ४४ ॥
असतां आपुले आश्रमीं । अत्यादरें नित्यनेमी ।
सदा प्रीती लागे रामीं । तो सत्वगुण ॥ ४५ ॥
सकळांचा आला वीट । परमार्थी जो निकट ।
आघातीं उपजे धारिष्ट । तो सत्वगुण ॥ ४६ ॥
सर्वकाळ उदासीन । नाना भोगीं विटे मन ।
आठवे भगवद्भजन । तो सत्वगुण ॥ ४७ ॥
पदार्थीं न बैसे चित्त । मनीं आठवे भगवंत ।
ऐसा दृढ भावार्थ । तो सत्वगुण ॥ ४८ ॥
लोक बोलती विकारी । तरी आदिकप्रेमा धरी ।
निश्चय बाणे अंतरीं । तो सत्वगुण ॥ ४९ ॥
अंतरीं स्फूर्ती स्फुरे । सस्वरूपीं[2] तर्क भरे ।
नष्ट संदेह निवारे । तो सत्वगुण ॥ ५० ॥

---

१ अधिक. २ स्वस्वरूप.

शरीर लावावें कारणीं। साक्षेप उठे अंतःकर्णी॥
सत्वगुणाची करणी। ऐसी असे॥ ५१॥

शांति क्षमा आणि दया। निश्चय उपजे जया।
सत्वगुण जाणावा तया। अंतरीं आला॥ ५२॥

आले आतीत अभ्यागत। जाऊं नेदी जो भुकिस्त।
येथानशक्ती दान देत। तो सत्वगुण॥ ५३॥

तडितांपडी दैन्यवाणे। आले आश्रमाचेनि गुणें।
तयालागीं स्थळ देणें। तो सत्वगुण॥ ५४॥

आश्रमीं अन्नाची आपदा। परी विमुख नव्हे कदा।
शक्तिनसार दे सर्वदा। तो सत्वगुण॥ ५५॥

जेणें जिंकिली रसना। तृप्त जयाची वासना।
जयास नाहीं कामना। तो सत्वगुण॥ ५६॥

होणार तैसें होत जात। प्रपंचीं जाला आघात।
डळमळिना ज्याचें चित्त। तो सत्वगुण॥ ५७॥

येका भगवंताकारणें। सर्व सुख सोडिलें जेणें।
केलें देहाचें सांडणें। तो सत्वगुण॥ ५८॥

विषईं धांवे वासना। परी तो कदा डळमळिना।
ज्याचें धारिष्ट चळेना। तो सत्वगुण॥ ५९॥

देह आपदेनें पीडिला। क्षुधें तृषेनें वोसावला[१]।
तरी निश्चयो राहिला। तो सत्वगुण॥ ६०॥

श्रवण आणी मनन। निजध्यासें समाधान।
शुद्ध जालें आत्मज्ञान। तो सत्वगुण॥ ६१॥

---

१ व्याकुळ झाला.

जयास अहंकार नसे । नैराशता विलसे ।
जयापासीं कृपा वसे । तो सत्वगुण ॥ ६२ ॥

सकळांसी नम्र बोले । मर्यादा धरून चाले ।
सर्वजण तोषविले । तो सत्वगुण ॥ ६३ ॥

सकळ जनासी आर्जव । नाहीं विरोधास ठाव ।
परोपकारीं वेची जीव । तो सत्वगुण ॥ ६४ ॥

[1]आपकार्याहून जीवीं । परकार्यसिद्धी करावी ।
मरोन कीर्ती उरवावी । तो सत्वगुण ॥ ६५ ॥

पराव्याचे [2]दोषगुण । दृष्टीस देखे आपण ।
समुद्रा ऐसी सांठवण । तो सत्वगुण ॥ ६६ ॥

नीच उत्तर साहाणें । प्रत्योत्तर न देणें ।
आला क्रोध सांवरणें । तो सत्वगुण ॥ ६७ ॥

अन्यायेंवीण गांजिती । नानापरी पीडा करिती ।
तितुकेंहि सांठवी चित्तीं । तो सत्वगुण ॥ ६८ ॥

शरीरें घीस साहाणें । दुर्जनासीं मिळोन जाणें ।
निंदकास उपकार करणें । हा सत्वगुण ॥ ६९ ॥

मन भलतीकडे धांवे । तें विवेकें आवरावें ।
इंद्रियें दमन करावें । तो सत्वगुण ॥ ७० ॥

सत्क्रिया आचरावी । असत्क्रिया त्यागावी ।
वाट भक्तीची धरावी । तो सत्वगुण ॥ ७१ ॥

जया आवडे प्रातःस्नान । आवडे पुराणश्रवण ।
नाना मंत्रीं देवतार्चन । करी तो सत्वगुण ॥ ७२ ॥

---

१ आपल्या. २ दोषगुणाप्रमाणे.

पर्वकाळीं अतिसादर । वसंतपूजेस तत्पर ।
जयंत्यांची प्रीति थोर । तो सत्वगुण ॥ ७३ ॥

विदेसिं[1] मेलें मरणें । तयास संस्कार देणें ।
अथवा सादर होणें । तो सत्वगुण ॥ ७४ ॥

कोणी येकास मारी । तयास जाऊन वारी ।
जीव बंधनमुक्त करी । तो सत्वगुण ॥ ७५ ॥

लिंगें लाखोली अभिशेष[2] । नामस्मरणीं विश्वास ।
देवदर्शनीं अवकाश । तो सत्वगुण ॥ ७६ ॥

संत देखोन धांवे । परमसुख हेलावे[3] ।
नमस्कारी सर्वभावें । तो सत्वगुण ॥ ७७ ॥

संतकृपा होय जयास । तेणें उद्धरिला वंश ।
तो ईश्वराचा अंश । सत्वगुणें ॥ ७८ ॥

सन्मार्ग दाखवी जना । जो लावी हरिभजना ।
ज्ञान सिकवी अज्ञाना । तो सत्वगुण ॥ ७९ ॥

दा. २. ७. ९–७९.

४७. नाममहिमा.

मागां निरोपिलें कीर्तन । जें सकळांस करी पावन ।
आतां ऐका विष्णोःस्मरण । तिसरी भक्ति ॥ १ ॥

स्मरण देवाचें करावें । अखंड नाम जपत जावें ।
नामस्मरणें पावावें । समाधान ॥ २ ॥

नित्यनेम प्रातःकाळीं । माध्यानकाळीं सायंकाळीं ।
नामस्मरण सर्वकाळीं । करीत जावें ॥ ३ ॥

---

१ परदेशांत. २ अभिषेक. ३ डोलतो

सुख दुःख उद्वेग चिंता । अथवा आनंदरूप असतां ।
नामस्मरणेंविण सर्वथा । राहोंच नये ॥ ४ ॥

हरुषकाळीं विषमकाळीं । पर्वकाळीं प्रस्तावकाळीं[1] ।
विश्रांतिकाळीं निद्राकाळीं । नामस्मरण करावें ॥ ५ ॥

कोडें सांकडें संकट । नाना संसार खटपट ।
अवस्ता लागतां चटपट । नामस्मरण करावें ॥ ६ ॥

चालतां बोलतां धंदा करितां । खातां जेवितां सुखी होतां ।
नाना उपभोग भोगितां । नाम विसरों नये ॥ ७ ॥

संपत्ती अथवा विपत्ती । जैसी पडेल काळगती ।
नामस्मरणाची स्थिती । सांडूंच नये ॥ ८ ॥

वैभव सामर्थ्य आणी सत्ता । नाना पदार्थ चालतां ।
उत्कट भाग्यश्री भोगितां । नामस्मरण सांडूं नये ॥ ९ ॥

आधीं आवदसा[2] मग दसा । अथवा दसेउपरी आवदसा ।
प्रसंग असो भलतेसा । परंतु नाम सोडूं नये ॥ १० ॥

नामें संकटें नासती । नामें विघ्नें निवारती ।
नामस्मरणें पाविजेती । उत्तमपदें ॥ ११ ॥

भूत पिशाच्य नाना छंद । ब्रह्मगिऱ्हो[3] ब्राह्मणसमंध ।
मंत्रचळ नाना खेद । नामनिष्ठें नासती ॥ १२ ॥

नामें विषबाधा हरती । नामें चेडें चेटकें नासती ।
नामें होये उत्तम गती । अंतकाळीं ॥ १३ ॥

बाळपणीं तारुण्यकाळीं । कठिण काळीं वृद्धाप्यकाळीं ।
सर्वकाळीं अंतकाळीं । नामस्मरण असावें ॥ १४ ॥

---

१ पश्चात्ताप. २ अवदशा ३ ग्रह.

नामाचा महिमा जाणे शंकर। जना उपदेशी विश्वेश्वर।
वाराणसी मुक्तिक्षेत्र। रामनामेंकरूनि॥ १५॥

उफराट्या नामासाठीं। वाल्मिक तरला उठाउठीं।
भविष्य वदला शतकोटी। चरित्र रघुनाथाचें॥ १६॥

हरिनामें प्रल्हाद तरला। नाना आघातापासून सुटला।
नारायेणनामें पावन जाला। अजामेळ॥ १७॥

नामें पाषाण तरले। असंख्यात भक्त उद्धरले।
महापापी तेचि जाले। परम पवित्र॥ १८॥

परमेश्वराचीं अनंत नामें। स्मरतां तरिजे नित्यनेमें।
नामस्मरण करितां येमें। बाधिजेना॥ १९॥

सहस्त्रां नामामधें कोणी येक। म्हणतां होतसे सार्थक।
नाम स्मरतां पुण्यश्लोक। होइजे स्वयें॥ २०॥

कांहींच न करूनि प्राणी। रामनाम जपे वाणी।
तेणें संतुष्ट चक्रपाणी। भक्तांलागीं सांभाळी॥ २१॥

नाम स्मरे निरंतर। तें जाणावें पुण्यशरीर।
माहांदोषांचे गिरिवर। रामनामें नासती॥ २२॥

अगाध महिमा न वचे वदला। नामें बहुतजन उद्धरला।
हळहळापासून सुटला। प्रत्यक्ष चंद्रमौळी॥ २३॥

चहूं वर्णा नामाधिकार। नामीं नाहीं लहानथोर।
जडमूढ पैलपार। पावती नामें॥ २४॥

म्हणौन नाम अखंड स्मरावें। रूप मनीं आठवावें।
तिसरी भक्ती स्वभावें। निरोपिली॥ २५॥

दा. ४. ३.

४८. "उपासनेचा मोठा आश्रयो."

अगाध गुण भगवंताचे । शेष वर्णूं न शके वाचे ।
वेदविधि तेहि कांचे[1] । देवेंविण ॥ २३ ॥
आत्माराम सकळां पाळी । अवघें त्रयलोक्य सांभाळी ।
तया येकेंविण धुळी । होये सर्वत्रांची ॥ २४ ॥
जेथें आत्माराम नाहीं । तेथें उरों न शके कांहीं ।
त्रयलोकींचे प्राणी सर्वही । प्रेतरूपी ॥ २५ ॥
आत्मा नस्तां येतीं मरणें । आत्म्याविण कैंचें जिणें ।
बरा विवेक समजणें । अंतर्यामीं ॥ २६ ॥
समजणें जें विवेकाचें । तेंहि आत्म्याविण कैंचें ।
कोणीयेकें जगदीशाचें । भजन करावें ॥ २७ ॥
उपासना प्रगट झाली । तरी[2] हे विचारणा कळली ।
याकारणें पाहिजे केली । विचारणा देवाची ॥ २८ ॥
उपासनेचा मोठा आश्रयो । उपासनाविण निराश्रयो ।
उदंड केलें तरी तो जयो । प्राप्त नाहीं ॥ २९ ॥
समर्थाची नाहीं पाठी । तयास भलताच कुटी ।
याकारणें उठाउठी[3] । भजन करावें ॥ ३० ॥
भजन साधन अभ्यास । येणें पाविजे परलोकास ।
दास म्हणे हा विश्वास । धरिला पाहिजे ॥ ३१ ॥

दा. १६. १०. २३–३१.

४९. " परंतु तेथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे. "

सामर्थ्य आहे चळवळेचें । जो जो करील तयाचें ।
परंतु येथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ॥ ०६ ॥

---

१ निरर्थक. २ तरच ३ जलद.

कर्ता जगदीश हें तों खरें। परी विभाग आला पृथकाकारें।
तेथें अहंतेचें कोविरें। बाधिजेना॥ २७॥

हरिदाता हरिभोक्ता। ऐसें चालतें तत्त्वतां।
ये गोष्टीचा आतां। विचार पहावा॥ २८॥

सकळकर्ता परमेश्वरू। आपला माइक विचारू।
जैसें कळेल तैसें करूं। जगदांतरें॥ २९॥

देवायेवढें चपळ नाहीं। ब्रह्मायेवढें निश्चळ नाहीं।
पाइरीनें पाइरी चढोन पाहीं। मूळपरियंत॥ ३०॥

दा. २०. ४. २६—३०.

५०. ईश्वराबद्दल अहेतुक प्रेम.

निःकाम बुद्धीचिया भजना। त्रैलोकीं नाहीं तुलना।
सामर्थ्येंविण घडेना। निःकाम भजन॥ १९॥

कामनेनें फळ घडे। निःकाम भजनें भगवंत जोडे।
फळभगवंता कोणीकडे। महदांतर॥ २०॥

नाना फळें देवापासीं। आणी फळ अंतरी भगवंतासी।
याकारणें परमेश्वरासी। निःकाम भजावें॥ २१॥

निःकाम भजनाचें फळ आगळें। सामर्थ्य चढे मर्यादेवेगळें।
तेथें बापुडीं फळें। कोणीकडे॥ २२॥

भक्तें जें मनीं धरावें। तें देवें आपणाचि करावें।
तेथें वेगळें भावावें। नलगे कदा॥ २३॥

दोन्हीं सामर्थ्यें येक होतां। काळास नाटोपे सर्वथा।
तेथें इतरांची कोण कथा। कीटकन्यायें॥ २४॥

१ वेड, भूतबाधा.

म्हणोन निःकाम भजन । वरी विशेष ब्रह्मज्ञान ।
तयास तुळितां त्रिभुवन । उणें वाटे ॥ २५ ॥
येथें बुद्धीचा प्रकाश । आणीक न चढे विशेष ।
प्रताप कीर्ती आणी येश । निरंतर ॥ २६ ॥

दा. १०. ७. १९–२६.

५१. श्रवणनिरूपण.

एका परमार्थाचें साधन । जेणें होय समाधान ।
तें तूं जाण गा श्रवण । निश्चयेंसीं ॥ १ ॥
श्रवणें आतुडे भक्ती । श्रवणें उद्भवे विरक्ती ।
श्रवणें तुटे आसक्ती । विषयांची ॥ २ ॥
श्रवणें घडे चित्तशुद्धी । श्रवणें होये दृढबुद्धी ।
श्रवणें तुटे उपाधी । अभिमानाची ॥ ३ ॥
श्रवणें निश्चया घडे । श्रवणें ममता मोडे ।
श्रवणें अंतरीं जडे । समाधान ॥ ४ ॥
श्रवणें आशंका फिटे । श्रवणें संशय तुटे ।
श्रवण होतां पालटे । पूर्वगुण आपुला ॥ ५ ॥
श्रवणें आवरे मन । श्रवणें घडे समाधान ।
श्रवणें तुटे बंधन । देहबुद्धीचें ॥ ६ ॥
श्रवणें मीपण जाये । श्रवणें धोका नये ।
श्रवणें नाना अपाये । भस्म होती ॥ ७ ॥
श्रवणें होये कार्यसिद्धी । श्रवणें लागे समाधी ।
श्रवणें घडे सर्व सिद्धी । समाधानासी ॥ ८ ॥
सत्संगावरी श्रवण । तेणें कळे निरूपण ।
श्रवणें होईजे आपण । तदाकार ॥ ९ ॥

श्रवणें प्रबोध वाढे । श्रवणें प्रज्ञा चढे ।
श्रवणें विषयांचे वोढे । तुटोन जाती ॥ १० ॥

श्रवणें विचार कळे । श्रवणें ज्ञान हें प्रबळे ।
श्रवणें वस्तु निवळे । साधकासी ॥ ११ ॥

श्रवणें सद्‌बुद्धि लागे । श्रवणें विवेक जागे ।
श्रवणें मन हें मागे । भगवंतासी ॥ १२ ॥

श्रवणें कुसंग तुटे । श्रवणें काम वोहटे[1] ।
श्रवणें धोका आटे । येकसरां[2] ॥ १३ ॥

श्रवणें मोह नासे । श्रवणें स्फूर्ति प्रकाशे ।
श्रवणें सद्वस्तु भासे । निश्चयात्मक ॥ १४ ॥

श्रवणें होये उत्तम गती । श्रवणें आतुडे शांती
श्रवणें पाविजे निवृत्ती । अचळपद ॥ १५ ॥

श्रवणा ऐसें सार नाहीं । श्रवणें घडे सर्व कांहीं ।
भवनदीचा प्रवाहीं । तरणोपाव श्रवणें ॥ १६ ॥

श्रवण भजनाचा आरंभ । श्रवण सर्वा सर्वारंभ ।
श्रवणें होये स्वयंभ[3] । सर्व कांहीं ॥ १७ ॥

प्रवृत्ती अथवा निवृत्ती । श्रवणेंविण न घडे प्राप्ती ।
हें तों सकळांस प्रचिती । प्रत्यक्ष आहे ॥ १८ ॥

ऐकिल्याविण कळेना । हें ठाउकें आहे जना ।
या कारणें मूळ प्रेत्ना । श्रवण आधीं ॥ १९ ॥

जें जन्मीं ऐकिलेंचि नाहीं । तेथें पडिजे संदेहीं ।
म्हणोनियां दुजें कांहीं । साम्यता न घडे ॥ २० ॥

---

१ कमी होतो. २ एकदम. ३ आपोआप.

बहुत साधनें पाहातां । श्रवणास न घडे साम्यता ।
श्रवणेंविण तत्वतां । कार्य न चले ॥ २१ ॥

न देखतां दिनकर । पडे अवघा अंधकार ।
श्रवणेंविण प्रकार । तैसा होये ॥ २२ ॥

कैसी नवविधा भक्ती । कैसी चतुर्विधा मुक्ती ।
कैसी आहे सहजस्थिती । हें श्रवणेंविण न कळे ॥ २३ ॥

नकळे षट्कर्माचरण । न कळे कैसें पुरश्चरण ।
न कळे कैसें उपासन । विधियुक्त ॥ २४ ॥

नाना व्रतें नाना दानें । नाना तपें नाना साधनें ।
नाना योग तीर्थाटणें । श्रवणेंविण न कळती ॥ २५ ॥

नाना विद्या पिंडज्ञान । नाना तत्त्वांचें शोधन ।
नाना कळा ब्रम्हज्ञान । श्रवणेंविण न कळे ॥ २६ ॥

अठरा भार वनस्पती । येका जळें प्रबळती ।
एका रसें उत्पत्ती । सकळ जीवांची ॥ २७ ॥

सकळ जीवां एक पृथ्वी । सकळ जीवां एक रवी ।
सकळ जीवां वर्तवी । येक वायो ॥ २८ ॥

सकळ जीवा येक पैस । जयास बोलिजे आकाश ।
सकळ जीवांचा वास । एका परब्रह्मीं ॥ २९ ॥

तैसें सकळ जीवांस मिळोन । सार येकचि साधन ।
तें हें जाण श्रवण । प्राणिमात्रांसी ॥ ३० ॥

नाना देश भाषा मतें । भूमंडळीं असंख्यातें ।
सर्वांस श्रवणापरतें । साधनचि नाहीं ॥ ३१ ॥

श्रवणें घडे उपरती । बद्धाचे मुमुक्ष होती ।
मुमुक्षाचे साधक अती । नेमेंसिं चालती ॥ ३२ ॥

साधकाचे होती सिद्ध । आंगीं बाणतां[1] प्रबोध ।
हें तों आहे प्रसिद्ध । सकळांस ठाउकें ॥ ३३ ॥

ठाईंचे खळ चांडाळ । तेचि होती पुण्यसिळ ।
ऐसा गुण तत्काळ । श्रवणाचा ॥ ३४ ॥

जो दुर्बुद्धि दुरात्मा । तोचि होय पुण्यात्मा ।
अगाध श्रवणाचा महिमा । बोलिला न वचे ॥ ३५ ॥

तीर्थां व्रतांची फळश्रुती । पुढें होणार सांगती ।
तैसें नव्हे हातीचा हातीं । सप्रचित श्रवण ॥ ३६ ॥

नाना रोग नाना व्याधी । तत्काळ तोडिजे औषधी ।
तैसी आहे श्रवणसिद्धी । अनुभवी जाणती ॥ ३७ ॥

श्रवणाचा विचार कळे । तरीच भाग्यश्री प्रगट बळे ।
मुख्य परमात्माच आकळे । स्वानुभवासी ॥ ३८ ॥

या नांव जाणावें मनन । अर्थालागीं सावधान ।
निजध्यासें समाधान । होत असे ॥ ३९ ॥

बोलिल्याचा अर्थ कळे । तरीच समाधान निवळे ।
अकस्मात अंतरीं वोळे । निःसंदेहता ॥ ४० ॥

संदेह जन्माचें मूळ । तें श्रवणें होये निर्मूळ ।
पुढें सहजचि प्रांजळ । समाधान ॥ ४१ ॥

जेथें नाहीं श्रवण मनन । तेथें केचें समाधान ।
मुक्तपणाचें बंधन । जडलें पाईं ॥ ४२ ॥

मुमुक्ष साधक अथवा सिद्ध । श्रवणेंविण तो अबद्ध ।
श्रवणमननें शुद्ध । चित्तवृत्ति होये ॥ ४३ ॥

---

१ बाणते.

जेथें नाहीं नित्यश्रवण । तें जाणावें विलक्षण ।
तेथें साधकें येक क्षण । क्रमूं नये सर्वथा ॥ ४४ ॥
जेथें नाहीं श्रवणस्वार्थ । तेथें कैंचा हो परमार्थ ।
मागें केलें तितुकें वेर्थ । श्रवणेंविण होये ॥ ४५ ॥
तस्मात् श्रवण करावें । साधन मनीं धरावें ।
नित्यनेमें तरावें । संसारसागरीं ॥ ४६ ॥
सेविलेंच सेवावें अन्न । घेतलेंचि घ्यावें जीवन ।
तैसें श्रवण मनन । केलेंचि करावें॥ ४७॥
श्रवणाचा अनादर । आळसें करी जो नर ।
त्याचा होये अपहार । स्वहितविषईं ॥ ४८ ॥
आळसाचें संरक्षण । परमार्थाची बुडवण ।
याकारणें श्रवण । केलेंचि पाहिजे ॥ ४९ ॥
आतां श्रवण कैसें करावें । कोण्या ग्रंथास पहावें ।
पुढिले समासीं आघवें । सांगिजेल ॥ ५० ॥

दा ७. ८.

५२. "निःशंक निर्लज्ज कीर्तन । करितां रंग माजे."

श्रृंघारिक नवरसिक । यामधें सांडावें येक ।
स्त्रियादिकांचें कौतुक । वर्णूं नये कीं ॥ २१ ॥
लावण्य स्त्रियांचें वर्णितां । विकार बाधे तत्वतां ।
धारिष्टापासून श्रोता । चळे तत्काळ ॥ २२ ॥
म्हणऊन तें तजावें । जें बाधक साधकां स्वभावें ।
घेतां अंतरीं ठसावें । ध्यान स्त्रियांचें ॥ २३ ॥
लावण्य स्त्रियांचें ध्यान । कामाकार जालें मन ।
कैचें आठवेल ध्यान । ईश्वराचें ॥ २४ ॥

स्त्री वर्णितां सुखावला । लावण्याचे भरीं भरला ।
तो स्वयें जाणावा चेवला । ईश्वरापासुनी ॥ २५ ॥

हरिकथेसी भावबळें । गेला रंग तो तुंबळे ।
निमिष्य येक जरी आकळे । ध्यानीं परमात्मा ॥ २६ ॥

ध्यानीं गुंतलें मन । कैचें आठवेल जन ।
निःशंक निर्लज्ज कीर्तन । करितां रंग माजे ॥ २७ ॥

रागज्ञान ताळज्ञान । स्वरज्ञानेंसीं वित्पन्न ।
अर्थान्वयाचें कीर्तन । करूं जाणे ॥ २८ ॥

उपन्न भाषा नाना कळा । कंठ माधुर्य कोकिळा ।
परी तो भक्तिमार्ग वेगळा । भक्त जाणती ॥ २९ ॥

भक्तांस देवाचें ध्यान । देवावांचून नेणें अन्न ।
कळावंतांचें जें मन । तें कळाकार जालें ॥ ३० ॥

श्रीहरिवीण जे कळा । तेचि जाणावी अवकळा ।
देवास सांडून वेगळा । प्रत्यक्ष पडिला ॥ ३१ ॥

सर्पी वेढिलें चंदनासी । निधानाआड विवसी ।
नाना कळा देवासी । आड तैशा ॥ ३२ ॥

सांडून देव सर्वज्ञ । नादामध्यें व्हावें मग्न ।
तें प्रत्यक्ष विघ्न । आडवें आलें ॥ ३३ ॥

येक मन गुंतलें स्वरीं । कोणें चिंतावा श्रीहरी ।
बळेंचि धरोनियां चोरीं । शिश्रुषा घेतली ॥ ३४ ॥

करितां देवाचें दर्शन । आडवें आलें रागज्ञान ।
तेणें धरूनियां मन । स्वरामागें नेलें ॥ ३५ ॥

१ भरतां. २ अन्य. ३ भूत, हडळ.

भेटों जातां राजद्वारीं । बळेंचि धरिला बेगारी ।
कळावंतां तैसी परी । कळेनें केली ॥ ३६ ॥
मन ठेऊन ईश्वरीं । जो कोणी हरिकथा करी ।
तोचि ये संसारीं । धन्य जाणा ॥ ३७ ॥

दा. १४. ५. २१–३७.

५३. भक्तियुक्त काव्य हेंच प्रासादिक काव्य होय.

वैभव कांता कांचन । जयास वाटे हें वमन ।
अंतरीं लागलें ध्यान । सर्वोत्तमाचें ॥ २२ ॥
जयास घडीनें घडी । लागे भगवंतीं आवडी ।
चढती वाढती गोडी । भगवद्भजनाची ॥ २३ ॥
जो भगवद्भजनेंवीण । जाऊं नेदी येक क्षण ।
सर्वकाळ अंतःकरण । भक्तिरंगें रंगलें ॥ २४ ॥
जया अंतरीं भगवंत । अचळ राहिला निवांत ।
तो स्वभावें जें बोलत । तें ब्रह्मनिरूपण ॥ २५ ॥
अंतरीं बैसला गोविंद । तेणें लागला भक्तिछंद ।
भक्तीविण अनुवाद । आणीक नाहीं ॥ २६ ॥
आवडी लागली अंतरीं । तैसीच वदे वैखरी ।
भावें करुणाकीर्तन करी । प्रेमभरें नाचतु ॥ २७ ॥
भगवंतीं लागलें मन । तेणें नाठवे देहभान ।
शंका लज्जा पळोन । दुरी ठेली ॥ २८ ॥
तो प्रेमरंगें रंगला । तो भक्तिमदें मातला ।
तेणें अहंभाव घातला । पायातळीं ॥ २९ ॥
गात नाचत निशंक । तयास कैचे दिसती लोक ।
दृष्टीं त्रैलोक्यनायेक । वसोन ठेला ॥ ३० ॥

ऐसा भगवंतीं रंगला । आणीक कांहीं नलगे त्याला ।
स्वइच्छा वर्णू लागला । ध्यान कीर्ति प्रताप ॥ ३१ ॥
नाना ध्यानें नाना मूर्ती । नाना प्रताप नाना कीर्ती ।
तयापुढें नरस्तुती । त्रृणतुल्य वाटे ॥ ३२ ॥

असो ऐसा भगवद्भक्त । जो ये संसारीं विरक्त ।
तयास मानिती मुक्त । साधुजन ॥ ३३ ॥

त्याचे भक्तीचें कौतुक । तया नांव प्रसादिक ।
सहज बोलतां विवेक । प्रगट होये ॥ ३४ ॥

दा. १४. ३. ३२–३४.

५४. कल्पना कशी मोडावी ?

कल्पना अंतरीं सबळ । नस्ते दावी ब्रह्मगोळ ।
क्षणा येकातें निर्मळ । स्वरूप कल्पी ॥ २१ ॥

क्षणा येका धोका वाहे । क्षणा येका स्थिर राहे ।
क्षणा येका पाहे । विस्मित होउनि ॥ २२ ॥

क्षणा येकातें उमजे । क्षणा येकातें निर्बुजे[1] ।
नाना विकार करिजे । ते कल्पना जाणावी ॥ २३ ॥

कल्पना जन्माचें मूळ । कल्पना भक्तीचें फळ ।
कल्पना तेचि केवळ । मोक्षदाती ॥ २४ ॥

असो ऐसी हे कल्पना । साधनें दे समाधाना ।
येरवी हें पतना । मूळच कीं ॥ २५ ॥

म्हणोन सर्वांचें मूळ । ते हे कल्पनाच केवळ ।
इचें केलिया निर्मूळ । ब्रह्मप्राप्ती ॥ २६ ॥

---

१ समजत नाहीं.

श्रवण आणि मनन । निजध्यासें समाधान ।
मिथ्या कल्पनेचें भान । उडोन जाये ॥ २७ ॥

शुद्ध ब्रह्माचा निश्चयो । करी कल्पनेचा जयो ।
निश्चितार्थे संशयो । तुटोन गेला ॥ २८ ॥

मिथ्या कल्पनेचें कोडें । कैसें राहे साचापुढें ।
जैसें सूर्याचेनि उजेडें । नासे तम ॥ २९ ॥

तैसें ज्ञानाचेनि प्रकाशें । मिथ्या कल्पना हे नासे ।
मग तुटे अपैसें[1] । द्वैतानुसंधान ॥ ३० ॥

कल्पनेनें कल्पना उडे । जैसा मृगें मृग सांपडे[2] ।
कां शरें शर आंतुडे । आकाशमार्गी ॥ ३१ ॥

शुद्ध कल्पनेचें बळ । जालियां नासे सबळ[3] ।
हेंचि वचन प्रांजळ । सावध ऐका ॥ ३२ ॥

शुद्ध कल्पनेची खूण । स्वयें कल्पिजे निर्गुण ।
सस्वरूपीं[4] विस्मरण । पडोंचि नेदी ॥ ३३ ॥

सदा स्वरूपानुसंधान । करी द्वैताचें निर्शन[5] ।
अद्वयनिश्चयाचें ज्ञान । तेचि शुद्ध कल्पना ॥ ३४ ॥

अद्वैत कल्पी ते शुद्ध । द्वैत कल्पी ते अशुद्ध ।
अशुद्ध तेचि प्रसिद्ध । सबळ जाणावी ॥ ३५ ॥

शुद्ध कल्पनेचा अर्थ । अद्वैताचा निश्चितार्थ ।
आणी सबळ वेर्थ । द्वैत कल्पी ॥ ३६ ॥

अद्वैतकल्पना प्रकाशे । तेचि क्षणीं द्वैत नासे ।
द्वैतासरिसी निरसे । प्रबळ कल्पना ॥ ३७ ॥

---

१ आपेआप २ सांपडतो ३ शबल. ४ स्वस्वरूपी. ५ निरसन, निवारण.

कल्पनेनें कल्पना सरे । ऐसी जाणावी चतुरें ।
सबळ गेलिया नंतरें । शुद्ध उरली ॥ ३८ ॥

दा. ७. ९. ३१–३८.

५५. " निर्विकल्पास कल्पावें । कल्पना मोडे स्वभावें."

असो ऐसें जें शाश्वत ब्रह्म । जेथें नाहीं मायाभ्रम ।
अनुभवी जाणे वर्म । स्वानुभवें ॥ ४७ ॥

आपुलेन अनुभवें । कल्पनेसि मोडावें ।
मग सुकाळीं पडावें । अनुभवाचे ॥ ४८ ॥

निर्विकल्पास कल्पावें । कल्पना मोडे स्वभावें ।
मग नसोनि असावें । कल्पकोटी ॥ ४९ ॥

कल्पनेचें येक बरें । मोहरितांच[1] मोहरे ।
स्वरूपीं घालितां भरे । निर्विकल्पी ॥ ५० ॥

निर्विकल्पासी कल्पितां । कल्पनेची नुरे वार्ता ।
निःसंगास भेटों जातां । निःसंग होइजे ॥ ५१ ॥

पदार्थां ऐसें ब्रह्म नव्हे । मा तें हातीं धरोनि द्यावें ।
असो हें अनुभवावें । सद्गुरुमुखें ॥ ५२ ॥

दा. ७. ३. ४७–५२.

५६. खोटें ध्यान व खरें ध्यान.

अखंड ध्यानाचें लक्षण । अखंड देवाचें स्मरण ।
याचें कळतां विवरण । सहजचि घडे ॥ २४ ॥

सहज सांडून सायास । ह्याचि कोणीयेक दोष ।
आत्मा सांडून अनात्म्यास । ध्यानीं धरिती ॥ २५ ॥

---

१ खुलवितांच.

परी तें धरितांहि धरेना । ध्यानीं येती वेक्ति[1] नाना ।
उगेंच कष्टती मना । कासाविस करूनी ॥ २६ ॥

मूर्तिध्यान करितां सायासें । तेथें येकाचें येकाचि दिसे ।
भासों नये तेंचि भासे । विलक्षण ॥ २७ ॥

ध्यान देवाचें करावें । किंवा देवाल्याचें[2] करावें ।
हेंचि बरें विवरावें । आपलें ठाईं ॥ २८ ॥

देह देऊळ आत्मा देव । कोठें धरूं पाहातां भाव ।
देव वोळखोन जीव । तेथेंचि लावावा ॥ २९ ॥

अंतरनिष्ठा ध्यान ऐसें । दंडकध्यान[3] अनारिसें[4] ।
प्रत्ययेंविण सकळ पिसें । अनुमानध्यान ॥ ३० ॥

अनुमानें अनुमान वाढे । ध्यान धरितां सर्वेचि मोडे ।
उगेंचि कष्टती बापुडे । स्थूळध्यानें ॥ ३१ ॥

देवास देहधारी कल्पिती । तेथें नाना विकल्प उठती ।
भोगणें त्यागणें विपात्ति । देहयोगें ॥ ३२ ॥

ऐसें मनीं आठवतें । विचारितां भलतेंचि होतें ।
दिसों नये तें दिसतें । नाना स्वप्नीं ॥ ३३ ॥

दिसतें तें सांगतां नये । बळें भावार्थ धरितां नये ।
साधक कासाविस होये । अंतर्यामीं ॥ ३४ ॥

सांगोपांग घडे ध्यान । त्यास साक्ष आपुलें मन ।
मनामधें विकल्पदर्शन । होऊंच नये ॥ ३५ ॥

फुटकें[5] मन येकवटिलें । तेणें तुटक ध्यान केलें ।
तेथें कोण सार्थक जालें । पाहाना कां ॥ ३६ ॥

---

१ व्यक्ति. २ देवालयाचे. ३ रूढींच. ४ निराळें. ५ फुटकें.

अखंड ध्यानें न घडे हित । तरी तो जाणावा पतित ।
हाचि अर्थ सावचित । बरा पाहावा ॥ ३७ ॥

ध्यान धरितें तें कोण । ध्यानीं आठवतें तें कोण ।
दोनीमधें अनन्यलक्षण । असिल पाहिजे ॥ ३८ ॥

अनन्य सहजाचि आहे । साधक शोधून न पाहे ।
ज्ञानी तो विवरोन राहे । समाधानें ॥ ३९ ॥

ऐसीं हे प्रत्ययाचीं कामें । प्रत्ययेंविण बाधिजे भ्रमें ।
लोकदंडकसंभ्रमें । चालती प्राणी ॥ ४० ॥

दंडकध्यानाचें लक्षण । धरून बैसलें अवलक्षण ।
प्रमाण आणी अप्रमाण । बाजारी[1] नेणती ॥ ४१ ॥

मिथ्या समाचार उठविती । वाउग्याच बोंबा घालिती ।
मनास आणितां अंतीं । आवघेंचि मिथ्या ॥ ४२ ॥

कोणीयेक ध्यानस्त बैसला । कोणी येक सिकवी त्याला ।
मुकुट काढोनि माळ घाला । म्हणजे बरें ॥ ४३ ॥

मनाचेथें काये दुष्काळ । जे आखुड कल्पिली माळ ।
सांगते ऐकते केवळ । मूर्ख जाणावे ॥ ४४ ॥

प्रत्यक्ष कष्ट करावे न लगती । दोर फुलें गुंफावीं न लगती ।
कल्पनेचि माळ थिटी[2] करिती । काये निमित्य ॥ ४५ ॥

बुद्धीविण प्राणी सकळ । ते ते अवघेचि बाष्कळ ।
तया मूर्खासीं खळखळ[3] । कोणें करावी ॥ ४६ ॥

जेणें जसा परमार्थ केला । तसाचि पृथ्वीवरि दंडक चालिला ।
साता पांचाचा बळावला । साभिमान ॥ ४७ ॥

---

१ बाजारबुणगे २ छोटी, लहान ३ गलबला.

प्रत्ययेंविण साभिमान । रोगी मारिले झांकून ।
तेथें अवघाचि अनुमान । ज्ञान कैचें ॥ ४८ ॥
सर्व साभिमान सांडावा । प्रत्ययें विवेक मांडावा ।
मायापूर्वपक्ष खंडावा । विवेकबळें ॥ ४९ ॥

दा. १४. ८. २४–४९.

५७. साधकलक्षण.

जो संतांसी शरण गेला । संतजनीं आश्वासिला ।
मग तो साधक बोलिला । ग्रंथांतरीं ॥ ३ ॥
उपदेशिलें आत्मज्ञान । तुटलें संसारबंधन ।
दृढतेकारणें करी साधन । या नांव साधक ॥ ४ ॥
धरी श्रवणाची आवडी । अद्वैतनिरूपणाची गोडी ।
मननें अर्थांतर काढी । या नांव साधक ॥ ५ ॥
होतां सारासारविचार । ऐके होऊनि तत्पर ।
संदेह छेदूनि दृढोत्तरें[1] । आत्मज्ञान पाहे ॥ ६ ॥
नानासंदेहनिवृत्ती । व्हावया धरी सत्संगती ।
आत्मशास्त्रगुरुप्रचीती । ऐक्यतेसि आणी ॥ ७ ॥
देहबुद्धि विवेकें वारी । आत्मबुद्धि सदृढ धरी ।
श्रवण मनन केलेंचि करी । या नांव साधक ॥ ८ ॥
विसंचूनि[2] दृश्यभान । दृढ धरी आत्मज्ञान ।
विचारें राखे समाधान । या नांव साधक ॥ ९ ॥
तोडूनि द्वैताची उपाधी । अद्वैत वस्तु साधनें साधी ।
लावी ऐक्यतेची समाधी । या नांव साधक ॥ १० ॥

---

१ दृढतर. २ नाहींसें करून.

आत्मज्ञान जीर्ण जर्जर। त्याचा करी जीर्णोद्धार।
विवेकें पावे पैलपार। या नांव साधक ॥ ११ ॥
उत्तमें साधूचीं लक्षणें। अंगिकारी निरूपणें।
बळेंचि स्वरूपाकार होणें। या नांव साधक ॥ १२ ॥
असत्क्रिया ते सोडिली। आणी सत्क्रिया ते वाढविली।
स्वरूपस्थिती बळावली। या नांव साधक ॥ १३ ॥
अवगुण त्यागी दिवसेंदिवस। करी उत्तम गुणाचा अभ्यास।
स्वरूपीं लावी निजध्यास। या नांव साधक ॥ १४ ॥
दृढनिश्चयोचानि बळें। दृश्य असतांच नाडळे।
सदा स्वरूपीं मिसळे। या नांव साधक ॥ १५ ॥
प्रत्यक्ष माया अलक्ष करी। अलक्ष वस्तु लक्षी अंतरीं।
आत्मस्थितीची धारणा धरी। या नांव साधक ॥ १६ ॥
जें या जनासि चोरलें। मनास न वचे अनुमानलें।
तेंचि जेणें दृढ केलें। या नांव साधक ॥ १७ ॥
जें बोलतांचि वाचा धरी। जें पाहातांचि अंध करी।
तें साधी नानापरी। या नांव साधक ॥ १८ ॥
जें साधूं जातां साधवेना। जें लक्षूं जातां लक्षवेना।
तेंचि अनुभवें आणी मना। या नांव साधक ॥ १९
जेथें मनचि मावळे। जेथें तर्कचि पांगुळे।
तेंचि अनुभवा आणी बळें। या नांव साधक ॥ २० ॥
स्वानुभवाचेनि योगें। वस्तु साधी लागवेगें।
तेचि वस्तु होये आंगें। या नांव साधक ॥ २१ ॥
अनुभवाचीं आंगें जाणे। योगियांचे खुणे वाण।
कांहींच न होन असणें। या नांव साधक ॥ २२

परती सारून उपाधी । असाध्य वस्तु साधनें साधी ।
स्वरूपीं करी दृढबुद्धि । या नांवं साधक ॥ २३ ॥

देवाभक्तांचें मूळ । शोधून पाहे सकळ ।
साध्यचि होये तत्काळ । या नांव साधक ॥ २४ ॥

विवेकबळें गुप्त जाला । आपेंआप मावळला ।
दिसतो परी देखिला । नाहींच कोणी ॥ २५ ॥

मीपण मागें सांडिलें । स्वयें आपणांस धुंडिलें ।
तुर्येसहि वोलांडिलें । या नांव साधक ॥ २६ ॥

पुढें उन्मनीचा शेवटीं । आपली आपण अखंड भेटी ।
अखंड अनुभवी ज्याची दृष्टी । या नांव साधक ॥ २७ ॥

द्वैताचा तटका[1] तोडिला । भासाचा भास मोडिला ।
देहीं असोनि विदेह झाला । या नांव साधक ॥ २८ ॥

जयास अखंड स्वरूपस्थिती । नाहीं देहाची अहंकृती ।
सकळ संदेहनिवृत्ती । या नांव साधक ॥ २९ ॥

पंचभूतांचा विस्तार । जयासि वाटे स्वप्नाकार ।
निर्गुणीं जयाचा निर्धार । या नांव साधक ॥ ३० ॥

स्वप्नीं भये जें वाटलें । तें जागृतीस नाहीं आलें ।
सकळ मिथ्या निर्धारिलें । या नांव साधक ॥ ३१ ॥

निद्रा सांडूनि चेइरा[2] जाला । तो स्वप्नभयापासून सुटला ।
माया सांडून तैसा गेला । साधक स्वरूपीं ॥ ३३ ॥

ऐसी अंतरस्थिती बाणली । बाह्य निस्पृहता अवलंबिली ।
संसारउपाधी त्यागिली । या नांव साधक ॥ ३४ ॥

---

१ संबंध. २ जागा.

कामापासून सुटला । क्रोधापासूनि पळाला ।
मदमत्सर सांडिला । एकीकडे ॥ ३५ ॥

कुळाभिमानासि सांडिलें । लोकलाजेस लाजविलें ।
परमार्थास माजविलें । विरक्तिबळें ॥ ३६ ॥

अविद्येपासून फडकला[1] । प्रपंचापासून निष्टला[2] ।
लोभाचे हातींचा गेला । अकस्मात ॥ ३७ ॥

थोरपणासि पाडिलें । वैभवासि लिथाडिलें ।
महत्वासि झिंजाडिलें[3] । विरक्तिबळें ॥ ३८ ॥

भेदाचा मडघा मोडिला । अहंकार सोडूनि पाडिला ।
पाईं धरूनि आपटिला । संदेहशत्रु ॥ ३९ ॥

विकल्पाचा केला वधु । थापें मारिला भवसिंधु ।
सकळ भूतांचा विरोधु । तोडून टाकिला ॥ ४० ॥

भवभयासि भडकाविलें । काळाचें टांगे मोडिलें ।
मस्तक हाणोनि फोडिलें । जन्ममृत्याचें ॥ ४१ ॥

अभ्यासाचा संग धरिला । सांक्षपासरिसा निघाला ।
प्रेत्न[4] सांगाती भला । साधनपंथें ॥ ५५ ॥

दा. ५. ९. ३–५५.

५८. सख्यभक्तिनिरूपण.

मागां जालें निरूपण । सातवे भक्तीचें लक्षण ।
आतां ऐका सावधान । आठवी भक्ती ॥ १ ॥

देवासी परमसख्य करावें । प्रेम प्रीतीनें बांधावें ।
आठवे भक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ २ ॥

---

१ निराळा झाला. २ निसटला. ३ फकून दिलें. ४ प्रयत्न.

देवास जयाची अत्यंत प्रीति ।[1] आपण वर्तावें तेणें रीतीं ।
येणेंकरितां भगवंतीं । सख्य घडे नेमस्त ॥ ३ ॥

भक्ति भाव आणी भजन । निरूपण आणी कथाकीर्तन ।
प्रेमळ भक्तांचें गायन । आवडे देवा ॥ ४ ॥

आपण तैसेंचि वर्तावें । आपणांसि तेंच आवडावें ।
मनासारिखें होतां स्वभावें । सख्य घडे नेमस्त ॥ ५ ॥

देवाच्या सख्यत्वाकारणें । आपलें सौख्य सांडून देणें ।
अनन्यभावें जिवें प्राणें । शरीर तेंहि वेंचावें ॥ ६ ॥

सांडून आपली संसारवेथा । करित जावी देवाची चिंता ।
निरूपण कीर्तन कथा वार्ता । देवाच्याचि सांगाव्या ॥ ७ ॥

देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांसी तुटी ।
सर्व अर्पावें सेवटीं । प्राण तोहि वेंचावा ॥ ८ ॥

आपुलें अवघेंचि जावें । परी देवासी सख्य राहावें ।
ऐसी प्रीती जीवें भावें । भगवंतीं लागावी ॥ ९ ॥

देव ह्मणिजे आपुला प्राण । प्राणासि न करावें निर्वाण ।
परम प्रीतीचें लक्षण । तें हें ऐसें असे ॥ १० ॥

ऐसें परम सख्य धरितां । देवास लागे भक्ताची चिंता ।
पांडव लाखाजोहरीं जळतां । विवरद्वारें काढिले ॥ ११ ॥

देव सख्यत्वें राहे आपणासी । तें तों वर्म आपणाचि पासीं ।
आपण वचनें बोलावीं जैसीं । तैसीं येती पडसादें[2] ॥ १२ ॥

आपण असतां अनन्यभावें । देव तत्काळचि पावे ।
आपण त्रास घेतां जीवें । देवही त्रासे ॥ १३ ॥

---

१ अमर्याद. २ प्रत्युत्तरें.

"ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ।"
जैसें जयाचें भजन । तैसाचि देवही आपण ।
म्हणौन हें अवघें जाण । आपणाचिपासीं ॥ १४ ॥

आपुल्या मनासारिखें न घडे । तेणें गुणें निष्ठा मोडे ।
तरी गोष्टी आपणाकडे । सहजचि आली ॥ १५ ॥

मेघ चातकावरी वोळेना । तरी चातक पालटेना ।
चंद्र वेळेसि उगवेना । तरी चकोर अनन्य ॥ १६ ॥

ऐसें असावें सख्यत्व । विवेकें धरावें सत्व ।
भगवंतावरील ममत्व । सांडूंचि नये ॥ १७ ॥

सखा मानावा भगवंत । माता पिता गण गोत ।
विद्या लक्ष्मी धन वित्त । सकळ परमात्मा ॥ १८ ॥

देवावेगळें कोणी नाहीं । ऐसें बोलती सर्वही ।
परंतु त्यांची निष्ठा कांहीं । तैसीच नसे ॥ १९ ॥

म्हणोनि ऐसें न करावें । सख्य तरी खरेंचि करावें ।
अंतरीं सदृढ धरावें । परमेश्वरासी ॥ २० ॥

आपुलिया मनोगताकारणें । देवावरी क्रोधास येणें ।
ऐसीं नव्हेत कीं लक्षणें । सख्यभक्तीचीं ॥ २१ ॥

देवाचें जें मनोगत । तेंचि आपुलें उचित ।
इच्छेसाठीं भगवंत । अंतरूं नये कीं ॥ २२ ॥

देवाचे इच्छेनें वर्तावें । देव करील तें मानावें ।
मग सहजचि स्वभावें । कृपाळु देव ॥ २३ ॥

पहातां देवाचे कृपेसी । मातेची कृपा कायेसी ।
माता वधी बाळकासी । विपत्तिकाळीं ॥ २४ ॥

देवें भक्त कोण वधिला । कधीं देखिला ना ऐकिला ।
शरणगतांस देव जाला । वज्रपंजरु ॥ २५ ॥

देव भक्तांचा कैवारी । देव पतितांसि तारी ।
देव होय साहाकारी । अनाथांचा ॥ २६ ॥

देव अनाथांचा कैपक्षी । नाना संकटांपासून रक्षी ।
धांविन्नला अंतरसाक्षी । गजेंद्राकारणें ॥ २७ ॥

देव कृपेचा सागरु । देव करुणेचा जळधरु ।
देवासि भक्तांचा विसरु । पडणार नाहीं ॥ २८ ॥

देव प्रीती राखों जाणे । देवासि करावें साजणें[1] ।
जिवलगें आवघीं पिसुणें । कामा न येती ॥ २९ ॥

सख्य देवाचें तुटेना । प्रीति देवाचि विटेना ।
देव कदा पालटेना । शरणागतांसी ॥ ३० ॥

म्हणोनि सख्य देवासी करावें । हितगुज तयासी सांगावें ।
आठवें भक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ ३१ ॥

जैसा देव तैसा गुरू । शास्त्रीं बोलिला हा विचारू ।
म्हणौन सख्यत्वाचा प्रकारू । सद्गुरूसी असावा ॥ ३२ ॥

दा. ४. ८.

५९. आत्मनिवेदनभक्ति.

महापूजेचा अंतीं । देवास मस्तक वाहातीं ।
तैसी आहे निकट भक्ती । आत्मनिवेदनाची ॥ ९ ॥

आपणास निवेदिती । ऐसे भक्त थोडे असती ।
तयांस परमात्मा मुक्ती । तत्काळ देतो ॥ १० ॥

---

१ सख्य.

आपणांस कैसें निवेदावें । कोठें जाऊन पडावें ।
किंवा मस्तक तोडावें । देवापुढें ॥ ११ ॥

ऐसें ऐकोन बोलणें । वक्ता वदे सर्वज्ञपणें ।
श्रोतां सावधान होणें । एकाग्रचित्तें ॥ १२ ॥

आत्मनिवेदनाचें लक्षण । आधीं पाहावें मी कोण ।
मग परमात्मा निर्गुण । तो ओळखावा ॥ १३ ॥

देवाभक्ताचें शोधन । करितां होतें आत्मनिवेदन ।
देव आहे पुरातन । भक्त पाहे ॥ १४ ॥

देवास वोळखों जातां । तेथें जाली तद्रूपता ।
देवभक्तविभक्तता । मुळींच नाहीं ॥ १५ ॥

विभक्त नाहीं म्हणोन भक्त । बंद्धन[1] नाहीं म्हणोनि मुक्त ।
अयुक्त नाहीं बोलणें युक्त । शास्त्राधारें ॥ १६ ॥

देवाभक्ताचें पाहातां मूळ । होये भेदाचें निर्मूळ ।
येक परमात्मा सकळ । दृश्यावेगळा ॥ १७ ॥

तयासि होतां मिळणी । उरी नाहीं दुजेपणीं ।
देवभक्त हे कडसणी[2] । निरसोन गेली ॥ १८ ॥

आत्मनिवेदनाचे अंतीं । जे कां घडली अभेदभक्ती ।
तये नांव सायोज्यमुक्ती । सत्य जाणावी ॥ १९ ॥

जो संतांस शरण गेला । अद्वैतनिरोपणें बोधला ।
मग जरी वेगळा केला । तरी होणार नाहीं ॥ २० ॥

नदी मिळाली सागरीं । ते निवडावी कोणेपरी ।
लोहो सोनें होतां माघारीं । काळिमा नये ॥ २१ ॥

---

१ बंधन. २ भेदबुद्धि.

तैसा भगवंतीं मिळाला । तो न वचे वेगळा केला ।
देव भक्त आपण जाला । विभक्त नव्हे ॥ २२ ॥
देव भक्त दोनी येक । ज्यासी कळला विवेक ।
साधुजनीं मोक्षदायेक । तोचि जाणावा ॥ २३ ॥
आतां असो हें बोलणें । देव पहावा भक्तपणें ।
तेणें त्याचें ऐश्वर्य बाणे । तत्काळ आंगीं ॥ २४ ॥

दा. ८. ८. ९–२४.

६०. आत्मनिवेदन म्हणजेच आत्मज्ञान.

आपणास निवेदावें । आपण विवेकें नुरावें ।
आत्मनिवेदन जाणावें । याचें नांव ॥ ३९ ॥
आधीं अध्यात्मश्रवण । मग सद्गुरुपादसेवन ।
पुढें आत्मनिवेदन । सद्गुरुप्रसादें ॥ ४० ॥
आत्मनिवेदनाउपरी । निखळ वस्तु निरंतरीं ।
आपण आत्मा अंतरीं । बोध जाला ॥ ४१ ॥
त्या ब्रह्मबोधें ब्रह्मचि जाला । संसारखेद तो उडाला ।
देहो प्रारब्धीं टाकिला । सावकास ॥ ४२ ॥
यासी म्हणिजे आत्मज्ञान । येणें पाविजे समाधान ।
परब्रह्मीं अभिन्न । भक्तचि जाला ॥ ४३ ॥
आतां होणार तें होयना कां । आणि जाणार तें जायेना कां ।
तुटली मनांतील आशंका । जन्ममृत्याची ॥ ४४ ॥
संसारीं पुंडावें[1] चुकलें । देवां भक्तां ऐक्य जालें ।
मुख्य देवास वोळखिलें । सत्संगेंकरूनि ॥ ४५ ॥

दा. ६. २. ३९–४५.

१ येरझारा फेरे

६१. मुक्तिचतुष्टयनिरूपण.

येथें ज्या देवाचें भजन करावें । तेथें ते देवलोकीं राहावें ।
सलोकता मुक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ २३ ॥

लोकीं राहावें ते सलोकता । समीप असावें ते समीपता ।
स्वरूपचि व्हावें ते स्वरूपता । तिसरी मुक्ती ॥ २४ ॥

देवस्वरूप जाला देही । श्रीवत्स कौस्तुभ लक्ष्मी नाहीं ।
स्वरूपतेचें लक्षण पाहीं । ऐसें असे ॥ २५ ॥

सुकृत आहे तों भोगिती । सुकृत सरतांच ढकलून देती ।
आपण देव ते असती । जैसे तैसे ॥ २६ ॥

म्हणोनि तिनी मुक्ति नासिवंत । सायोज्यमुक्ति ते शाश्वत ।
तेहि निरोपिजेल सावचित्त । ऐक आतां ॥ २७ ॥

ब्रह्मांड नासेल कल्पांतीं । पर्वतासहित जळेल क्षिती ।
तेव्हां अवघेच देव जाती । मां मुक्ति कैच्या तेथें ॥ २८ ॥

तेव्हां निर्गुण परमात्मा निश्चळ । निर्गुण भक्ति तेही अचळ ।
सायोज्यमुक्ति ते केवळ । जाणिजे ऐसी ॥ २९ ॥

दा. ४.१० २३–२९.

६२. जीवन्मुक्तलक्षण.

मागां जालें निरूपण । देखिलें आपणासि आपण ।
तेणें बाणली खूण । परमार्थाची ॥ ७ ॥

तेणें समाधान जालें[१] । चित्त चैतन्नीं[२] मिळालें ।
निजस्वरूपें वोळखिलें । निजवस्तुसी ॥ ८ ॥

---

१ मग. २ चैतन्यांत, आत्मस्वरूपांत.

प्रारब्धीं टाकिला देहो । बोधें फिटला संदेहो ।
आतांचि पडो अथवा राहो । मिथ्या कळीवर[1] ॥ ९ ॥

ज्ञानियांचें जें शरीर । तें मिथ्यत्वें निर्विकार ।
जेथें पडे तेंचि सार । पुण्यभूमी ॥ १० ॥

साधुदर्शनें पावन तीर्थ । पुरती त्यांचे मनोरथ ।
साधु न येतां जिणें वेर्थ । तया पुण्यक्षेत्रांचें ॥ ११ ॥

पुण्यनदीचें जें तीर । तेथें पडावें शरीर ।
हा इतर जनाचा विचार । साधु तो नित्यमुक्त ॥ १२ ॥

उत्तरायेण तें उत्तम । दक्षणायेन तें अधम ।
हा संदेहीं वसे भ्रम । साधु तो निःसंदेह ॥ १३ ॥

शुक्लपक्ष उत्तरायेण । गृहीं दीप दिवा मरण ।
अंतीं राहावें स्मरण । गतीकारणें ॥ १४ ॥

इतुकें नलगे योगियासी । तो जीतचि मुक्त पुण्यरासी ।
तिळांजुळी पापपुण्यासी । दिधली तेणें ॥ १५ ॥

देहाचा अंत बरा आला । देह सुखरूप गेला ।
त्यासी म्हणती धन्य जाला । अज्ञान जन ॥ १६ ॥

जनाचें विपरीत मत । अंतीं भेटतो भगवंत ।
ऐसें कल्पून घात । करिती आपुला स्वयें ॥ १७ ॥

जितां सार्थक नाहीं केलें । वेर्थ आयुष्य निघोन गेलें ।
मुळीं धान्येंचि नाहीं पेरिलें । तें उगवेल कैचें ॥ १८ ॥

जरी केलें ईश्वरभजन । तरीच होईजे पावन ।
जैसें वेव्हारितां धन । रासि[2] माथां लागे ॥ १९ ॥

---

१ कळेवर, शरीर. २ राशि.

दिधल्याविण पाविजेना । पेरिल्याविण उगवेना ।
ऐसें हें वाक्य जना । ठाउकेंचि आहे ॥ २० ॥

न करितां सेवेच्या व्यापारा । स्वामीस म्हणे कोठें मुशारा[1] ।
तैस अंतीं अभक्त नरां । स्वहित न घडे ॥ २१ ॥

जितां नाहीं भगवद्भक्ती । मेल्यां कैंची होईल मुक्ती ।
असो जे जे जैसें करिती । ते ते पावती तैसें ॥ २२ ॥

एवं न करितां भगवद्भजन । अंतीं नव्हीजे[2] पावन ।
जरी आलें बरें मरण । तरी भक्तीविण अधोगती ॥ २३ ॥

म्हणोन साधूनें आपलें । जीत अस्तांच सार्थक केलें ।
शरीर कारणीं लागलें । धन्य त्याचें ॥ २४ ॥

जे कां जीवन्मुक्त ज्ञानी । त्यांचें शरीर पडो रानीं ।
अथवा पडो स्मशानीं । तरी धन्य जालें ॥ २५ ॥

साधूचा देह खितपला । अथवा श्वानादिकीं भक्षिला ।
हें प्रशस्त न वाटे जनाला । मंदबुद्धीस्तव ॥ २६ ॥

अंत बरा नव्हेचि म्हणोन । कष्टी होती इतर जन ।
परी बापुडे अज्ञान । नेणती वर्म ॥ २७ ॥

जो जन्मलाच नाहीं ठाईचा । त्यास मृत्य येईल कैंचा ।
विवेकबळें जन्ममृत्याचा । घोट[3] भरिला जेणें ॥ २८ ॥

स्वरूपानुसंधानबळें । सगळी मायाच नाडळे[4] ।
तयाचा पार न कळे । ब्रह्मादिकांसी ॥ २९ ॥

तो जीतचि असतां मेला । मरणास मारून ज्याला[5] ।
जन्ममृत्य न स्मरे त्याला । विवेकबळें ॥ ३० ॥

---

१ पगार. २ न होईजे. ३ घुटका. ४ सांपडत नाही. ५ जगला.

तो जनीं दिसतो परी वेगळा । वर्ततां भासे निराळा ।
दृश्यपदार्थ त्या निर्मळा । स्पर्शलाचि नाहीं ॥ ३१ ॥

दा. ७. १०. ७–३१.

६३. " साधन सोडितां होये । मुक्तपणें बद्ध."

मी तों ब्रह्मचि जालों स्वतां । साधन कोण करील आतां ।
ऐसें मनीं कल्पूं जातां । कल्पनाचि उठे ॥ ५४ ॥

ब्रह्मीं कल्पना न साहे । तेचि तेथें उभी राहे ।
तयेसि शोधून पाहे । तोचि साधु ॥ ५५ ॥

निर्विकल्पासी कल्पावें । परी कल्पितें आपण न व्हावें ।
मीपणासी त्यागावें । येणें रितीं ॥ ५६ ॥

या ब्रह्मविद्येच्या लपणीं[1] । कांहींच नसावें असोनि ।
दक्ष आणी समाधानी । तोचि हें जाणे ॥ ५७ ॥

जयासी आपण कल्पावें । तेंचि आपण स्वभावें ।
तेथें कल्पनेच्या नांवें । सुन्य आलें ॥ ५८ ॥

पदींहून चळों नये । करावे साधन उपाये ।
तरचि सांपडे सोये । अलिप्तपणाची ॥ ५९ ॥

राजा राजपदीं असतां । उगीच चाले सर्व सत्ता ।
साध्याचि होऊन तत्वता । साधन करावें ॥ ६० ॥

साधन आलें देहाच्या माथां । आपण देह नव्हे सर्वथा ।
ऐसा करूनि अकर्ता । सहजचि जाला ॥ ६१ ॥

देह आपण ऐसें कल्पावें । तरीच साधन त्यागावें ।
देहातीत अस्तां स्वभावें । देह कैंचा ॥ ६२ ॥

---

१ लपंडाव.

ना तें साधन ना तें देह । आपला आपण निःसंदेह ।
देहींच असोन विदेह- । स्थिति ऐसी ॥ ६३ ॥
साधनेंविण ब्रह्म होतां । लागों पाहे देहममता ।
आळस प्रबळे तत्वतां । ब्रह्मज्ञानमिसें[1] ॥ ६४ ॥
परमार्थमिसें अर्थ जागे । ध्यानमिसें निद्रा लागे ।
मुक्तिमिसें दोष भोगे । अनर्गळता[2] ॥ ६५ ॥
निरूपणमिसें निंदा घडे । संवादमिसें[3] वेवाद पडे ।
उपाधीमिसें येऊन जडे । अभिमान आंगीं ॥ ६६ ॥
तैसा ब्रह्मज्ञानमिसें । आळस अंतरीं प्रवेशे ।
म्हणे साधनाचें पिसें[4] । काय करावें ॥ ६७ ॥
" किं करोमि क्क गच्छामि किं गृण्हामि त्यजामि किम् ।
आत्मना पूरितं सर्वं महाकल्पांबुना यथा " ॥ १ ॥
वचन आधारीं लाविलें । जैसें शस्त्र फिरविलें ।
स्वता हाणोन घेतलें । जयापरी ॥ ६८ ॥
तैसा उपायाचा अपाये । विपरीतपणें स्वहित जाये ।
साधन सोडितां होये । मुक्तपणें बद्ध ॥ ६९ ॥
साधन करितांचि सिद्धपण । हातींचें जाईल निघोन ।
तेणें गुणें साधन । करूंच नावडे ॥ ७० ॥
लोक म्हणती हा साधक । हेचि लज्या वाटे येक ।
साधन करिती ब्रह्मादिक । हें ठाउकें नाहीं ॥ ७१ ॥

दा. ७. ७. ६४–७१.

६४. "कुल्लाळ पावला राज्यपद्वी । आतां रासभें कासया राखावीं."
साधनें जें कांहीं साधावें । तें तों आपणाचि स्वभावें ।
आतां साधकाच्या नावें । सुन्याकार ॥ १७ ॥

---

१ मिषानें. २ यथेच्छ वर्तणूक. ३ सलोखा. ४ वेड.

कुलाळ पावला राज्यपदवी । आतां रासभें कासया राखावीं ।
कुलाळपणाची उठाठेवी । कासया पाहिजे ॥ १८ ॥

तैसा अवघा वृत्तीभाव । नाना साधनाचा उपाव ।
साध्य जालियां कैंचा ठाव । साधनासी ॥ १९ ॥

साधनें काय साधावें । नेमें काये फळ घ्यावें ।
आपण वस्तु, भरंगळावें[1] । कासयासी ॥ २० ॥

देह तरी पांचां भूतांचा । जीव तरी अंश ब्रह्मींचा ।
परमात्मा तरी अनन्याचा । ठाव पाहा ॥ २१ ॥

उगेंचि पाहातां मीपण दिसे । शोध घेतां कांहींच नसे ।
तत्वें तत्व निरसें[2] । पुढें निखळ[3] आत्मा ॥ २२ ॥

आत्मा आहे आत्मपणें । जीव आहे जीवपणें ।
माया आहे मायापणें । विस्तारली ॥ २३ ॥

ऐसें अवघेंचि आहे । आणी आपणही कोणीयेक आहे ।
हें सकळ शोधून पाहे । तोचि ज्ञानी ॥ २४ ॥

शोधूं जाणें सकळांसी । परी पाहों नेणे आपणांसी ।
ऐसा ज्ञानी येकदेसी[4] । वृत्तिरूपें ॥ २५ ॥

ते वृत्तिरूप जरि पाहिलें । तरी मग कांहीं नाहीं राहिलें ।
प्रकृतिनिरासें अवघेंचि गेलें । विकारवंत ॥ २६ ॥

उरलें तें निखळ निर्गुण । विवंचितां तेंचि आपण ।
ऐसी हे परमार्थाची खूण । अगाध आहे ॥ २७ ॥

फळ येक आपण येक । ऐसा नाहीं हा विवेक ।
फळाचें फळ कोणीयेक । स्वयेंचि होईजे ॥ २८ ॥

---

१ भटकावें. २ निघून जातें. ३ शुद्ध. ४ एकदेशी, अपूर्ण.

रंक होता राजा झाला । बरें पाहातां प्रत्ययो आला ।
रंकपणाचा गल्बला । रंकीं करावा ॥ २९ ॥
वेदशास्त्रें पुराणें । नाना साधनें निरूपणें ।
सिद्ध साधु ज्याकारणें । नाना सायास करिती ॥ ३० ॥
तें ब्रह्मरूप आपणाचि आंगें । सारासारविचारप्रसंगें ।
करणें न करणें वाउगें । कांहींच नाहीं ॥ ३१ ॥
रंक राजआज्ञेसि भ्यालें । तेंचि पुढें राजा जालें ।
मग तें भयेंचि उडालें । रंकपणासरिसें ॥ ३२ ॥
वेदं वेदाज्ञेनें चालावें । सच्छास्त्रें शास्त्र अभ्यासावें ।
तीर्थें तीर्थास जावें । कोण्या प्रकारें ॥ ३३ ॥
अमृतें सेवावें अमृत । अनंतें पाहावा अनंत ।
भगवंतें लक्षावा भगवंत । कोण्या प्रकारें ॥ ३४ ॥
संतें असंत त्यागावें । निर्गुणें निर्गुणासी भंगावें ।
स्वरूपें स्वरूपीं रंगावें । कोण्या प्रकारें ॥ ३५ ॥
अंजनें ल्यावें अंजन । धनें साधावें धन ।
निरंजनें निरंजन । कसें अनुभवावें ॥ ३६ ॥
साध्यें[1] करावें साधनासी । ध्येयें धरावें ध्यानासी[2] ।
उन्मनें आवरावें मनासी । कोण्याप्रकारें ॥ ३७ ॥

दा. ९. १०. १७–३७

६५. साक्षात्कार झाला हें कशावरून ओळखावें ?

पापाची खंडणा जाली । जन्मयातना चुकली ।
ऐसी स्वयें प्रचित आली । म्हणिजे बरें ॥ २१ ॥

१ साध्यानें. २ ध्यधांन.

परमेश्वरास वोळखिलें । आपण कोणसें कळलें ।
आत्मनिवेदन जालें । म्हणिजे बरें ॥ २२ ॥
ब्रह्मांड कोण केलें । कासयाचें उभारिलें ।
मुख्य कर्त्यास वोळखिलें । म्हणिजे बरें ॥ २३ ॥
येथें अनुमान राहिला । तरी परमार्थ केला तो वायां गेला ।
प्राणी संशई बुडाला । प्रचितीविण ॥ २४ ॥
हें परमार्थाचें वर्म । लटिकें बोलेल तो अधम ।
लटिकें मानील तो अधमोद्भम । येथार्थ जाणावा ॥ २५ ॥
येथें बोलण्याची जाली सीमा । नेणतां न कळे परमात्मा ।
असत्य नाहीं सर्वोत्तमा । तूं जाणसी ॥ २६ ॥
माझे उपासनेचा बडिवार । ज्ञान सांगावें साचार ।
मिथ्या बोलतां उत्तर । प्रभूस लागे ॥ २७ ॥
म्हणौनि सत्यचि बोलिलें । कर्त्यास पाहिजे वोळखिलें ।
मायोद्भवाचें शोधिलें । पाहिजे मूळ ॥ २८ ॥

दा. १०. ८. २१–२८.

६६. योग्यांच्या गुप्तधनाचें वर्णन.

गुप्त आहे उदंड[1] धन । काय जाणती सेवक जन ।
तयांस आहे तें ज्ञान । बाह्याकाराचें ॥ १ ॥
गुप्त ठेविले उदंड अर्थ[2] । आणी प्रगट दिसती पदार्थ ।
शाहाणे शोधिती स्वार्थ । अंतरीं असे ॥ २ ॥
तैसें दृश्य हें माईक । पाहात असती सकळ लोक ।
परी जयांस ठाउका विवेक । ते तदनंतर[3] जाणती ॥ ३ ॥

१ थोरपणा. २ शब्द. ३ तदनंतर, त्याचे रहस्य

द्रव्य ठेऊन जळ सोडिलें । लोक म्हणती सरोवर भरलें ।
तयाचें अभ्यांतर कळलें । समर्थ जनासी ॥ ४ ॥

तैसे ज्ञाते ते समर्थ । तींहीं वोळखिला परमार्थ ।
इतर ते करिती स्वार्थ । दृश्य पदार्थाचा ॥ ५ ॥

कावाडी वाहाती कावाड । श्रेष्ठ भोगिती रत्नें जाड ।
हें जयाचें तयास गोड । कर्मयोगें ॥ ६ ॥

येक काष्ठस्वार्थ करिती । येक शुभा येकवाटिती ।
तैसे नव्हेत कीं नृपती । सारभोक्ते ॥ ७ ॥

जयांस आहे विचार । ते सुकासनीं जाले स्वार ।
इतर जवळिल भार । वाहताचि मेले ॥ ८ ॥
येक दिव्यान्नें भक्षिती । येक विष्ठा सावडिती ।
आपण वर्तल्याचा घेती । साभिमान ॥ ९ ॥

सार सेविजे श्रेष्ठीं । असार घेइजे वृथापुष्टीं ।
साराअसाराची गोष्टी । सज्ञान जाणती ॥ १० ॥

गुप्त परीस चिंतामणी । प्रगट खडे कांचमणी ।
गुप्त हेमरत्नखाणी । प्रगट पाषाण मृत्तिका ॥ ११ ॥

अव्हाशंख अव्हावेल । गुप्त वनस्पति अमोल ।
येरंड धोत्रे बहुसाल । प्रगट सिंपी ॥ १२ ॥

कोठें दिसेना कल्पतरु । उदंड सेरांचा विस्तारु ।
पाहातां नाहीं मळियागरु । बोरि बाभळा उदंडी ॥ १३ ॥

कामधेनु जाणिजे इंद्रें । सृष्टींत उदंड खिल्लारें ।
महद्भाग्य भोगिजे नृपवरें । इतर कर्मानुसार ॥ १४ ॥

---

१ गोवऱ्या. २ एकत्र करितात. ३ सुख सनी. ४ वृथापुष्ट. ५ उजवीकडच्या तोंडाचा ६ शेर. ७ चंदन. ८ पुष्कळ.

नाना व्यापार करिती जन । आंवघेचि म्हणती सकांचन ।
परंतु कुबेराचें महिमान । कोणासीचि नये ॥ १५ ॥

तैसा ज्ञानी योगेश्वर । गुप्तार्थलाभाचा ईश्वर ।
इतर ते पोटाचे किंकर । नाना मतें धुंडिती ॥ १६ ॥

तस्मात् सार तें दिसेना । आणी असार तें दिसे जना ।
सारासार विवंचना । साधु जाणती ॥ १७ ॥

इतरांस हें काय सांगणें । खरें खोटें कोण जाणे ।
साधुसंतांचियें खुणे । साधुसंत जाणती ॥ १८ ॥

दिसेना जें गुप्त धन । तयासि करणें लागे अंजन ।
गुप्त परमात्मा सज्जन–। संगतीं शोधावा ॥ १९ ॥

रायाचे सन्निध होतां । सहजचि लाभे श्रीमंतता ।
तैसा हा सत्संग धरितां । सद्वस्तु लाभे ॥ २० ॥

दा. ६. ९. १–२०.

६७. अनुभवाचे उलट सुलट प्रकार.

तें आठवितां विसारिजे । कां तें विसरोनि आठविजे ।
जाणोनियां नेणिजे । परब्रह्म तें ॥ १९ ॥

त्यास न भेटतां होये भेटी । भेटों जातां पडे तुटी ।
ऐसी हे नवल गोष्टी । मुकेपणाची ॥ २० ॥

तें साधूं जातां साधवेना । नातरी सोडितां सुटेना ।
लागला संमंध तुटेना । निरंतर ॥ २१ ॥

तें असताचि सदां असे । नातरी पाहातां दुरांसे[1] ।
न पाहतां प्रकाशे । जेथें तेथें ॥ २२ ॥

---

१ दूर असे.

जेथें उपाये तोचि अपायें । आणी अपाये तोचि उपाये ।
हें अनुभवेंविण काये । उमजों जाणे ॥ २३ ॥

दा. ७. ७. १९–२३.

६८. " जैसा भाव जयापासीं । तैसा देव तयासी. "

जैसा भाव जयापासीं । तैसा देव तयासी ।
जाणे भाव अंतरसाक्षी । प्राणिमात्रांचा ॥ १३ ॥

जरी भाव असिला माईक¹ । तरी देव होये माहा ठक ।
नवल तयाचें कौतुक । जेशास तैसा ॥ १४ ॥

जैसें जयाचें भजन । तैसेंचि दे समाधान ।
भाव होतां किंचित न्यून । आपणही दुरावे ॥ १५ ॥

दर्पणीं प्रतिबिंब दिसे । जेशास तैसें भासे ।
तयाचें सूत्र असे । आपणाचपासीं ॥ १६ ॥
जसें आपण करावें । तैसेंचि तेणें व्हावें ।
जरी डोळे पसरूनि पाहावें । तरी तेंहि टवकारे ॥ १७ ॥

भृकुटीस घालोनि मिठी । पाहातां क्रोधें तेंहि उठी ।
आपण हास्य करितां पोटीं । तेंहि आनंदे ॥ १८ ॥

जैसा भाव प्रतिबिंबला । तयाचाचि देव जाला ।
जो जैसें भजे त्याला । तैसाचि वोळे ॥ १९ ॥

दा. ३. १०. १३–१९.

६९. परमार्थवर्णन.

आतां स्तऊं हा परमार्थ । जो साधकांचा निजस्वार्थ ।
नांतरी समर्थांमध्यें समर्थ । योग हा ॥ १ ॥

---

¹ खोटा.

आहे तरी परम सुगम । परी जनासी जाला दुर्गम ।
कां जयाचें चुकलें वर्म । सत्समागमाकडे ॥ २ ॥
नाना साधनांचे उधार । हा रोकडा ब्रह्मसाक्षात्कार ।
वेदशास्त्रीं जें सार । तें अनुभवास ये ॥ ३ ॥
आहे तरी चहूंकडे । परी अणुमात्र दृष्टी न पडे ।
उदास परी येकीकडे । पाहातां दिसेना ॥ ४ ॥
आकाशमार्गी गुप्त पंथ । जाणती योगिये समर्थ ।
इतरांस हा गुह्यार्थ । सहसा न कळे ॥ ५ ॥
साराचेंही निजसार । अखंड अक्षे[१] अपार ।
नेऊं न सकती तस्करें[२] । कांहीं केल्या ॥ ६ ॥
तयासि नाहीं राजभये । अथवा नाहीं अग्निभयें ।
अथवा स्वापदभयें । बोलोंच नये ॥ ७ ॥
परब्रह्म तें हालवेना । अथवा ठांव[३]ही चुकेना ।
काळांतरीं चळेना । जेथींचा तेथें ॥ ८ ॥
ऐसें तें निज ठेवणें । कदापी पालटों नेणे ।
अथवा नव्हे आदिक[४] उणें । बहुतां काळें ॥ ९ ॥
अथवा तें घसवटेना[५] । अथवा अदृश्य होयना ।
नातरी पहातां दिसेना । गुरुअंजनेंविण ॥ १० ॥
मागा योगिये समर्थ । त्यांचाहि निजस्वार्थ ।
यासी बोलिजे परमार्थ । परमगुह्य म्हणोनि ॥ ११ ॥
जेहीं शोधून पाहिला । त्यांसी अर्थ सांपडला ।
येरां असोनि अलभ्य जाला । जन्मोजन्मीं ॥ १२ ॥

१ सदोदित. २ चोर. ३ जागा ४ अधिक. ५ झिजेना.

अपूर्वता या परमार्थाची । वार्ता नाहीं जन्ममृत्याची ।
आणी पदवी सायोज्यतेची । सान्निधची लाभे ॥ १३ ॥

माया विवेकें मावळे । सारासार विचार कळे ।
परब्रह्म तेंहि निवळे । अंतर्यामीं ॥ १४ ॥

ब्रह्म भासलें उदंड । ब्रह्मीं बुडालें ब्रह्मांड ।
पंचभूतांचें थोतांड । तुच्छ वाटे ॥ १५ ॥

प्रपंच वाटे लटिका । माया वाटे लापणिका ।
शुद्ध आत्मा विवेका । अंतरीं आला ॥ १६ ॥

ब्रह्मस्थित बाणतां अंतरीं । संदेह गेला ब्रह्मांडाबाहेरी ।
दृश्याची जुनी जर्जरी । कुहिट जाली ॥ १७ ॥

ऐसा हा परमार्थ । जो करी त्याचा निजस्वार्थ ।
आतां या समर्थास समर्थ । किती म्हणोनि म्हणावें ॥ १८ ॥

या परमार्थाकरितां । ब्रह्मादिकांसि विश्रामता ।
योगी पावती तन्मयता । परब्रह्मीं ॥ १९ ॥

परमार्थ सकळांस विसांवा । सिद्ध साधु माहानुभावां ।
सेखीं सात्विक जडजीवां । सत्संगेंकरूनि ॥ २० ॥

परमार्थ जन्माचें सार्थक । परमार्थ संसारीं तारक ।
परमार्थ दाखवी परलोक । धार्मिकासी ॥ २१ ॥

परमार्थ तापसांसी थार । परमार्थ साधकांसी आधार ।
परमार्थ दाखवी पार । भवसागराचा ॥ २२ ॥

परमार्थी तो राज्यधारी । परमार्थ नाहीं तो भिकारी ।
या परमार्थाची सरी । कोणांस द्यावी ॥ २३ ॥

---

१ लपंडाव, मिथ्या. २ चिटली. ३ शेवटीं.

अनंत जन्मींचें पुण्य जोडे। तरीच परमार्थ घडे।
मुख्य परमात्मा आतुडे। अनुभवासी ॥ २४ ॥

दा. १. ९. १-२४.

७०. प्रचीतिनिरूपण.

तें हें दृश्य नासिवंत। ऐसें वेद श्रुति बोलत।
निर्गुण ब्रह्म शाश्वत। जाणती ज्ञानी ॥ १५ ॥
जें शस्त्रें तोडितां तुटेना। जें पावकें जाळितां जळेना।
कालवितां कालवेना। आपंकरुनी ॥ १६ ॥
जें वायोचेनि उडेना। जें पडेना ना झडेना।
जें घडेना ना दडेना। परब्रह्म तें ॥ १७ ॥
ज्यासी वर्णचि नसे। जें सर्वांहूनि अनारिसें।
परंतु असताचि असे। सर्वकाळ ॥ १८ ॥
दिसेना तरी काय जालें। परंतु तें सर्वत्र संचलें[1]।
सूक्ष्मचि कोंदाटलें। जेथें तेथें ॥ १९ ॥
दृष्टीस लागली सवे। जें दिसेल तेंचि पाहावें।
परंतु गुज[2] तें जाणावें। गोप्य आहे ॥ २० ॥
प्रगट तें जाणावें असार। आणी गुप्त तें जाणावें सार।
गुरुमुखें हा विचार। उमजों लागे ॥ २१ ॥
जें उमजेना तें उमजावें। जें दिसेना तें पाहावें।
जें कळेना तें जाणावें। विवेकबळें ॥ २२ ॥
गुप्त तेंचि प्रगटवावें। असाध्य तेंचि साधावें॥
कानडेंचि[3] अभ्यासावें। सावकाश ॥ २३ ॥

१ संचय. २ गोप्य, गुप्त. ३ कठीण.

वेद विरंचि आणी शेष। जेथें सिणले निशेष।
तेंचि साधावें विशेष। परब्रह्म तें ॥ २४ ॥

तरी तें कोणेपरी साधावें। तेंचि बोलिलें स्वभावें।
अध्यात्मश्रवणें पावावें। परब्रह्म तें ॥ २५ ॥

पृथ्वी नव्हे आप नव्हे। तेज नव्हे वायु नव्हे।
वर्णवेक्त ऐसें नव्हे। अव्यक्त तें ॥ २६ ॥

तयास म्हणावे देव। वरकड लोकांचा स्वभाव।
जितुके गांव तितुके देव। जनाकारणें ॥ २७ ॥

दा. ६ २. १९-२७.

७१. विमळब्रह्मनिरूपण.

ब्रह्म नभाहून निर्मळ। पाहातां तसेंचि पोकळ।
अरूप आणि विशाळ। मर्यादेवेगळें ॥ १

येकवीस स्वर्गे सप्त पाताळ। मिळोन येक ब्रह्मगोळ।
ऐसीं अनंत तें निर्मळ। व्यापून असे ॥ २ ॥

अनंत ब्रह्मांडांखालतें। अनंत ब्रह्मांडांवरूतें।
तणेंविण स्थळ रितें। अणुमात्र नाहीं ॥ ३ ॥

जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं। ऐसा वदे लोकवाणी।
तणेंविण रिता प्राणी। येकही नाहीं ॥ ४ ॥

जळचरांस जैसें जळ। बाह्याभ्यांतरीं निखळ।
तैसें ब्रह्म हें केवळ। जीवमात्रांसी ॥ ५ ॥

जळावेगळा ठाव आहे। ब्रह्माबाहिरी जातां नये।
म्हणोनि उपमा न साहे। जळाची तया ॥ ६ ॥

१ ब्रह्मदेव. २ व्यक्ति. ३ निखिल, पूर्णपणे.

आकाशाबाहेरी पळों जातां । पुढें आकाशचि तत्वतां ।
तैसा तया अनंता । अंतचि नाहीं ॥ ७ ॥

परी जें अखंड भेटलें । सर्वांगास लिगटलें ।
अति निकट परी चोरलें । सकळांसि जें ॥ ८ ॥

तयामधेंचि असिजे । परी तयास नेणिजे ।
उमजे भास तुमजे । परब्रह्म तें ॥ ९ ॥

आकाशामधें आभाळ । तेणें आकाश वाटे डहुळ[1] ।
परी तें मिथ्या निवळ । आकाशचि असे ॥ १० ॥

नेहार[2] देतां आकाशीं । चक्र दिसतीं डोळ्यांसी ।
तसें दृश्य ज्ञानियांसी । मिथ्यारूप ॥ ११ ॥

मिथ्याचि परी आभासे । निद्रिस्तांस स्वप्न जैसें ।
जागां जालियां अपैसें[3] । बुझां लागे ॥ १२ ॥

तैसें आपुलेन अनुभवें । ज्ञानें जागृतीसि यावें ।
मग माईक स्वभावें । कळों लागे ॥ १३ ॥

आतां असो हें कुवाडें । जें ब्रह्मांडापैलीकडे ।
तेंचि आतां निवाडें[6] । उमजोन[4] दाऊं ॥ १४ ॥

ब्रह्म ब्रह्मांडीं कालवलें । पदार्थांसी व्यापोन ठेलें ।
सर्वांमधें विस्तारलें । अंशमात्रें ॥ १५ ॥

ब्रह्मामधें सृष्टि भासे । सृष्टिमधें ब्रह्म असे ।
अनुभव घेतां आभासे । अंशमात्रें ॥ १६ ॥

अंशमात्रें सृष्टीभीतरीं । बाहेरी मर्यादा कोण करी ।
सगळें ब्रह्म ब्रह्मांडोदरीं । माईल केसें । १७ ॥

---

१ गढूळ. २ दृष्टि. ३ आपोआप ४ समजा. ५ कोडें ६ निश्चयानें.

अमूर्तीमधें[1] आकाश। सगळें साठवितां प्रयास।
म्हणोन तयाचा अंश। बोलिजे तो॥ १८॥

ब्रह्म तैसें कालवलें। परी तें नाहीं हालवलें।
सर्वांमधें परी संचलें। संचलेपणें॥ १९॥

पंचभूतीं असे मिश्रित। परंतु तें पंचभूतातीत।
पंकीं आकाश अलिप्त। असोनि जेसें॥ २०॥

ब्रह्मास दृष्टांत न घडे। बुझावया[2] देणें घडे।
परी दृष्टांतीं साहित्य[3] पडे। विचारितां आकाश॥ २१॥

खंब्रह्म ऐसी श्रुती। गगनसदृशं हे स्मृती।
म्हणोनि ब्रह्मास दृष्टांतीं। आकाश घडे॥ २२॥

काळिमा नस्तां पितळ। मग तें सोनेंचि केवळ।
सुन्यत्व नस्तां निवळ। आकाश ब्रह्म॥ २३॥

म्हणोनि ब्रह्म जेसें गगन। आणि माया जैसा पवन।
आडळे परी दर्शन। नव्हे त्याचें॥ २४॥

शब्दसृष्टीची रचना। होत जात क्षणक्षणा।
परंतु ते स्थिरावेना। वायुच ऐसी॥ २५॥

असो ऐसी माया माईक। शाश्वत तें ब्रह्म येक।
पाहों जातां अनेक। व्यापून आहे॥ २६॥

पृथ्वीसी भेदून आहे। परी तें ब्रह्म कठीण नव्हे।
दुजी उपमा न साहे। तया मृदत्वासी॥ २७॥

पृथ्वीहूनि मृद जळ। जळाहूनि तो अनळ।
अनळाहूनि कोमळ। वायो जाणावा॥ २८॥

---

१ गिर्दी. २ समजावयासाठीं ३ सामग्री

वायोहून तें गगन । अत्यंतचि मृद जाण ।
गगनाहून मृद पूर्ण । ब्रह्म जाणावें ॥ २९ ॥

वज्रास असें भेदिलें । परी मृदत्व नाहीं गेलें ।
उपमेरहित संचलें । कठिण ना मृद ॥ ३० ॥

पृथ्वीमधें व्यापून असे । पृथ्वी नासे तें न नासे ।
जळ शोषे तें न शोषे । जळीं असोनि ॥ ३१ ॥

तेजीं असे परी जळेना । पवनीं असे परी चळेना ।
गगनीं असे परी कळेना । परब्रह्म तें ॥ ३२ ॥

शरीर अवघें व्यापलें । परी तें नाहीं आडळलें ।
जवळिच दुरावलें । नवल कैसें ॥ ३३ ॥

सन्मुखचि चहूंकडे । तयामधें पाहाणें घडे ।
बाह्याभ्यांतरीं रोकडें । सिद्धचि आहे ॥ ३४ ॥

तयामधेंचि आपण । आपणा सबाह्य तें जाण ।
दृश्यावेगळी खूण । गगनासारिखी ॥ ३५ ॥

कांहीं नाहींसें वाटलें । तेथेंचि तें कोंदाटलें ।
जैसें न दिसे आपलें । आपणांसि धन ॥ ३६ ॥

जो जो पदार्थ दृष्टी पडे । तें त्या पदार्था ऐलिकडे ।
अनुभवें हें कुवाडें[1] । उकलावें ॥ ३७ ॥

मागें पुढें आकाश । पदार्थेंविण जो पैस ।
पृथ्वीविण भकास[2] । येकरूप ॥ ३८ ॥

जें जें रूप आणी नाम । तो तो नाथिला[3]च भ्रम ।
नामरूपातीत वर्म । अनुभवी जाणे ॥ ३९ ॥

१ कोडें. २ अवकाश. ३ खोटा.

नभीं धूम्राचे डोंगर। उचलती थोर थोर।
तैसे दावी वोडंबर[1]। माया देवी ॥ ४० ॥

ऐसी माया अशाश्वत। ब्रह्म जाणावें शाश्वत।
सर्वां ठाईं सदोदित। भरलें असे ॥ ४१ ॥

पोथी वाचूं जातां पाहे। मातृकांमधेंचि[2] आहे।
नेत्रीं रिघोनि राहे। मृदपणें ॥ ४२ ॥

श्रवणें शब्द ऐकतां। मनें विचार पाहातां।
मना सबाह्य तत्वतां। परब्रह्म तें ॥ ४३

चरणें चालतां मार्गीं। जें आडळे सर्वांगीं।
करें घेतां वस्तुलागीं। आडवें ब्रह्म ॥ ४४ ॥

असो इंद्रियेंसमुदाव। तयामधें वर्ते सर्व।
जाणों जातां मोडे हांव। इंद्रियांची ॥ ४५ ॥

तें जवळिच असे। पाहों जातां न दिसे।
न दिसोन वसे। कांहीं येक ॥ ४६ ॥

जें अनुभवेंचि जाणावें। सृष्टिचेनि अभावें।
आपुलेन स्वानुभवें। पाविजे ब्रह्म ॥ ४७ ॥

ज्ञानदृष्टीचें देखणें। चर्मदृष्टी पाहों नेणे।
अंतरवृत्तीचिये खुणे। अंतरवृत्ति साक्ष ॥ ४८ ॥

जाणे ब्रह्म जाणे माया। जाणे अनुभवाच्या ठाया।
ते येक जाणावी तुर्या। सर्वसाक्षिणी ॥ ४९ ॥

साक्षत्व वृत्तीचें कारण। उन्मनी ते निवृत्ति जाण।
जेथें विरे जाणपण। विज्ञान तें ॥ ५० ॥

---

१ अवडंबर, मिथ्या खेळ २ अक्षरं

जेथें अज्ञान सरे । ज्ञान तेंहि नुरे ।
विज्ञानवृत्ति मुरे । परब्रह्मीं ॥ ५१ ॥
ऐसें ब्रह्म शाश्वत । जेथें कल्पनेसी अंत ।
योगी जना येकांत । अनुभवें जाणावा ॥ ५२ ॥

दा. ७. ४.

७२. ब्रह्माचें सर्वगत अस्तित्व.

धरूं जातां धरितां नये । टाकूं जातां टाकितां नये ।
जेथें तेथें आहेच आहे । परब्रह्म तें ॥ १ ॥
जिकडे तिकडे जेथें तेथें । विन्मुख होतां सन्मुख होतें ।
सन्मुखपण चुकेना तें । कांहीं केल्यां ॥ २ ॥
बैसलें माणुस उठोन गेलें । तेथें आकाशचि राहिलें ।
आकाश चहुंकडे पाहिलें । तरी सन्मुखचि आहे ॥ ३ ॥
जिकडे जिकडे प्राणी पळोन जातें । तिकडे आकाशचि भोंवतें
बळें आकाशाबाहेर तें । कैसें जावें ॥ ४ ॥
जिकडे जिकडे प्राणी पाहे । तिकडे तें सन्मुखचि आहे ।
समस्तांच मस्तकीं राहे । माध्यानीं मार्तंड जैसा ॥ ५ ॥
परी तो आहे येकदेसी । दृष्टांत न घडे वस्तुसी ।
कांहीं येक चमत्कारासी । देउनी पाहिलें ॥ ६ ॥
नाना तीर्थें नाना देसीं । कष्टत जावें पाहाव्यासी[१] ।
तैसें नलगे परब्रह्मासी । बैसलें ठाईं ॥ ७ ॥
प्राणी बैसोनीच राहातां । अथवा बहुत पळोन जातां ।
परब्रह्म तें तत्वतां । समागमें ॥ ८ ॥

---

१ पहावयासी.

पक्षी अंतराळीं गेला। भोवतें आकाशचि तयाला।
तैसें ब्रह्म प्राणीयांला। व्यापून आहे ॥ ९ ॥
परब्रह्म पोकळ घनदाट। ब्रह्म सेवटाचा सेवट।
ज्यासी त्यासी ब्रह्म नीट। सर्वकाळ ॥ १० ॥
दृश्या सबाह्य अंतरीं। ब्रह्म दाटलें ब्रह्मांडोदरीं।
आरे त्या विमळाची सरी। कोणास द्यावी ॥ ११ ॥
वैकुंठकेळासस्वर्गलोकीं। इंद्रलोकीं चौदा लोकीं।
पन्नगादिक पाताळलोकीं। तेथेंहि आहे ॥ १२ ॥
कासीपासून रामेश्वर। आवघें दाटलें अपार।
परता परता पारावार। त्यास नाहीं ॥ १३ ॥
परब्रह्म तें येकलें। येकदांचि सकळांसी व्यापिलें।
सकळांस स्पर्शोन राहिलें। सकळां ठाईं ॥ १४ ॥
परब्रह्म पाउसें भिजेना। अथवा चिखलानें भरेना।
पुरामधें परी वाहेना। पुरासमागमें ॥ १५ ॥
येकसरें सन्मुख विमुख। वाम सव्य दोहिंकडे येक।
आर्धऊर्ध प्राणी सकळीक। व्यापून आहे ॥ १६ ॥
आकाशाचा डोहो भरला। कदापी नाहीं उचंबळला।
असंभाव्य पसरला। जिकडे तिकडे ॥ १७ ॥
येकजिनसी गगन उदास। जेथें नाहीं दृश्यभास।
भासेंविण निराभास। परब्रह्म जाणावें ॥ १८ ॥
संतसाधुमाहानुभावां। देवदानवमानवां।
ब्रह्म सकळांसी विसांवा। विश्रांतिठाव ॥ १९ ॥
कोणेकडे सेवटा जावें। कोणीकडे काये पाहावें।
असंभाव्य तें नेमावें। काये म्हणोनि ॥ २० ॥

स्थूळ नव्हे सूक्ष्म नव्हे । कांहीं येकासारिखें नव्हे ।
ज्ञानदृष्टीविण नव्हे । समाधान ॥ २१ ॥

पिंडब्रह्मांडनिरास । मग तें ब्रह्म निराभास ।
येथूनि तेथवरी अवकास । भकासरूप[1] ॥ २२ ॥

ब्रह्म व्यापक हें तों खरें । दृश्य आहे तों हें उत्तरें ।
व्यापेंविण कोण्या प्रकारें । व्यापक म्हणावें ॥ २३ ॥

दा. १०. १०. १—२३.

४. कर्मयोग

७३. निःस्पृहवर्तणूक.

मूर्ख येकदेसी होतो । चतुर सर्वत्र पाहातो ।
जैसा बहुधा होऊन भोगितो । नाना सुखें ॥ १ ॥

तोचि अंतरात्मा महंत । तो कां होईल संकोचित ।
प्रशस्त जाणता समस्त । विख्यात योगी ॥ २ ॥

कर्ता भोक्ता तत्वता । भूमंडळीं सर्व सत्ता ।
त्यावेगळा त्यास ज्ञाता । पाहेसा कवणु ॥ ३ ॥

ऐसें महंतें असावें । सर्व सार शोधून घ्यावें ।
पाहों जातां न संपडावें । येकायेकीं ॥ ४ ॥

कीर्तिरूपें उदंड ख्यात । जाणती लहान थोर समस्त ।
वेष पहातां शाश्वत । येकहि नाहीं ॥ ५ ॥

प्रगट कीर्ति ते ढळेना । बहुत जनास कळेना ।
पाहों जातां आढळेना । काये कैसें ॥ ६ ॥

---

१ शून्य.

वेषभूषण तें दूषण । कीर्तिभूषण तें भूषण ।
चाळणे[1]विण येक क्षण । जाऊंच नेदी ॥ ७ ॥

त्यागी वोळखीचे जन । सर्वकाळ नित्य नूतन ।
लोक शोधून पाहातीं मन । परी इच्छा दिसेना ॥ ८ ॥

पुर्ते कोणाकडे पाहेना । पुर्ते कोणासीं बोलेना ।
पुर्ते येके स्थळीं राहेना । उठोन जातो ॥ ९ ॥

जातें स्थळ तें सांगेना । सांगितलें तेथें तरी जायेना ।
आपुली स्थिती अनुमाना । येवोंच नेदी ॥ १० ॥

लोकीं केलें तें चुकावी । लोकीं भाविलें तें उलथवी ।
लोकीं तर्किलें तें दावी । निर्फळ करूनि ॥ ११ ॥

लोकांस पाह्याचा आदर । तेथें याचा अनादर ।
लोक सर्वकाळ तत्पर । तेथें याची अनिच्छ्या ॥ १२ ॥

एवं कल्पितां कल्पेना । ना तर्कितांहि तर्केना ।
कदापी भावितां भावेना । योगेश्वर ॥ १३ ॥

ऐसा अंतर सांपडेना । शरीर ठाईं पडेना ।
क्षण येक विसंभेना[2] । कथाकीर्तन ॥ १४ ॥

लोक संकल्प विकल्प करिती । ते अवघेचि निर्फळ होती ।
जनाची जना लाजवी वृत्ति । तेव्हां योगेश्वर ॥ १५ ॥

बहुतीं शोधून पाहिलें । बहुतांच्या मनास आलें ।
तरी मग जाणावें साधिलें । महत्कृत्य ॥ १६ ॥

अखंड येकांत सेवावा । अभ्यासचि करीत जावा ।
काळ सार्थकचि करावा । जनासहित ॥ १७ ॥

---

१ विचार. २ सोडीना.

उत्तम गुण तितुके घ्यावे । घेऊन जनास सिकवावे ।
उदंड समुदाये करावे । परी गुप्तरूपें ॥ १८ ॥

अखंड कामाची लगबग । उपासनेस लावावें जग ।
लोक समजोन मग । आज्ञा इच्छिती ॥ १९ ॥

आधीं कष्ट मग फळ । कष्टाचि नाहीं तें निर्फळ ।
साक्षेपेंविण केवळ । वृथापुष्ट ॥ २० ॥

लोक बहुत शोधावे । त्यांचे अधिकार जाणावे ।
जाणजाणोन धरावे । जवळी दुरी ॥ २१ ॥

अधिकारपरत्वें कार्य होतें । अधिकार नस्तां वेर्थ जातें ।
जाणोनि शोधावीं चित्तें । नाना प्रकारें ॥ २२ ॥

अधिकार पाहोन कार्य सांगणें । साक्षेप पाहोन विश्वास धरणें ।
आपला मगज राखणें । कांहीं तरी ॥ २३ ॥

हें प्रचितीचें बोलिलें । आधीं केलें मग सांगितलें ।
मानेल तरी पाहिजे घेतलें । कोणी येकें ॥ २४ ॥

महंतें महंत करावे । युक्तिबुद्धीनें भरावे ।
जाणते करून विखरावे । नाना देसीं ॥ २५ ॥

दा. ११. १०.

७४. उत्तमपुरुषनिरूपण.

नेमकपणें वर्तों लागला । तो बहुतांस कळों आला ।
सर्व आर्जवी तयाला । काये उणें ॥ १४ ॥

ऐसा उत्तम गुणी विशेष । तयास म्हणावें पुरुष ।
जयाचय़ा भजनें जगदीश । तृप्त होये ॥ १५ ॥

उदंड धिःकारून बोलती । तरी चळों नेदावी शांती ।
दुर्जनास मिळोन जातां । धन्य ते साधु ॥ १६ ॥

उत्तम गुणीं शृंघारला । ज्ञानवैराग्यें शोभला ।
तोचि येक जाणावा भला । भूमंडळीं ॥ १७ ॥

स्वयें आपण कष्टावें । बहुतांचें सोशित जावें ।
झिजोन कीर्तीस उरवावें । नाना प्रकारें ॥ १८ ॥

कीर्ती पाहों जातां सुख नाहीं । सुख पहातां कीर्ती नाहीं ।
विचारेंविण कोठेंचि नाहीं । समाधान ॥ १९ ॥

परांतरास न लावावा ढका[1] । कदापि पडों नेदावा चुका ।
क्ष्मा[2]सीळ तयाच्या तुका । हानी नाहीं ॥ २० ॥

आपलें अथवा परावें । कार्य अवघेंचि करावें ।
प्रसंगीं कामास चुकवावें । हें विहित नव्हे ॥ २१ ॥

बरें बोलतां सुख वाटतें । हें तों प्रत्यक्ष कळतें ।
आत्मवत् परावें तें । मानीत जावें ॥ २२ ॥

कठिण शब्दें वाईट वाटतें । हें तों प्रत्ययास येतें ।
तरी मग वाईट बोलावें तें । काये निमित्य ॥ २३ ॥

आपणास चिमोटा[3] घेतला । तेणें कासावीस जाला ।
आणावरून दुसऱ्याला । राखत जावें ॥ २४ ॥

जे दुसऱ्यास दुःख करी । ते अपवित्र वैखरी ।
आपणास घात करी । कोणियेके प्रसंगीं ॥ २५ ॥

पेरिलें तें उगवतें । बोलण्यासारिखें उत्तर येतें ।
तरी मग कर्कश बोलावें तें । काये निमित्य ॥ २६ ॥

---

१ धका. २ क्षमा. ३ चिमटा.

आपुल्या पुरुषार्थवैभवें। बहुतांस सुखी करावें।
परंतु कष्टी करावें। हे राक्षसी क्रिया ॥ २७ ॥

दंभ दर्प अभिमान। क्रोध आणि कठिण वचन।
हें अज्ञानाचें लक्षण। भगवद्गीतेंत बोलिलें ॥ २८ ॥

जो उत्तम गुणें शोभला। तोचि पुरुष माहा भला।
कित्तेक लोक तयाला। शोधीत फिरती ॥ २९ ॥

क्रियेवीण शब्दज्ञान। तेंचि श्वानाचें वमन।
भले तेथें अवलोकन। कदापि न करिती ॥ ३० ॥

मनापासून भक्ति करणें। उत्तम गुण अगत्य धरणें।
तया माहांपुरुषाकारणें। धुंडीत येती ॥ ३१ ॥

ऐसा जो माहानुभाव। तेणें करावा समुदाव।
भक्तियोगें देवाधिदेव। आपुला करावा ॥ ३२ ॥

आपण आवांचितें[1] मरोन जावें। मग भजन कोणें करावें।
याकारणें भजनास लावावे। बहुत लोक ॥ ३३ ॥

आमची प्रतिज्ञा ऐसी। कांहीं न मागावें शिष्यासी।
आपणामागें जगदीशासी। भजत जावें ॥ ३४ ॥

याकारणें समुदाव। जाला पाहिजे मोहोछाव।
हातोपातीं देवाधिदेव। वोळेसा करावा ॥ ३५ ॥

आतां समुदायाकारणें। पाहिजेती दोनी लक्षणें।
श्रोतीं येथें सावधपणें। मन घालावें ॥ ३६ ॥

जेणें बहुतांस घडे भक्ति। ते हे रोकडी प्रबोधशक्ति[2]।
बहुतांचें मनोगत हातीं। घेतलें पाहिजे ॥ ३७ ॥

---

१ अवचित, एकदम २ उद्बोधन.

मागां बोलिले उत्तम गुण । तयास मानिती प्रमाण।
प्रबोधशक्तीचें लक्षण । पुढें चाले ॥ ३८ ॥

बोलण्यासारिखें चालणें । स्वयें करून बोलणें ।
तयाचीं वचनें प्रमाणें । मानिती जनीं ॥ ३९ ॥

जें जें मनास मानेना । तें तें जनही मानीना ।
आपण येकला जन नाना । सृष्टिमधें ॥ ४० ॥

म्हणोन सांगाती[1] असावें । मानत मानत शिकवावे ।
हळु हळु सेवटा न्यावे । विवेकानें ॥ ४१ ॥

दा. १२. १० १४-४१.

७५. महंतलक्षणें.

जयास येत्नचि आवडे । नाना प्रसंगीं पवाडे[2] ।
धीटपणें प्रगट, दडे । ऐसा नव्हे ॥ १२ ॥

सांकडीमधें वर्तों जाणे । उपाधीमधें मिळों जाणे ।
अलिप्तपणें राखों जाणे । आपणांसी ॥ १३ ॥

आहे तरी सर्वां ठाईं । पाहों जातां कोठेंचि नाहीं ।
जैसा अंतरात्मा ठाईंचा ठाईं । गुप्त जाला ॥ १४ ॥

त्यावेगळें कांहींच नसे । पाहों जातां तो न दिसे ।
न दिसोन वर्तवीत असे । प्राणीमात्रांसी ॥ १५ ॥

तैसाच हाही नानापरी । बहुत जनांस शाहाणे करी ।
नाना विद्या त्या विवरी । स्थूळ सूक्ष्मा ॥ १६ ॥

आपणाकरितां शाहाणे होती । ते सहजाचि सोये धरिती ।
जाणतेपणाची महंती । ऐसी असे ॥ १७ ॥

---

१ सोबती. २ शिरतो.

राखों जाणे नीतिन्याये । न करी न करवी अन्याये ।
कठीण प्रसंगीं उपाये । करूं जाणे ॥ १८ ॥
ऐसा पुरुष धारणेचा[1] । तोचि आधार बहुतांचा ।
दास म्हणे रघुनाथाचा । गुण घ्यावा ॥ १९ ॥

दा. ११. ६. १२–१९.

७६. " जंव उत्तम गुण न कळे । तों या जनास काये कळे. "

बोलतो खरें चालतो खरें । त्यास मानिती लहानथोरें ।
न्याये अन्याये परस्परें । सहजाचि कळे ॥ १५ ॥
लोकांस कळेना तंवरी । विवेकें क्षमा[2] जो न करी ।
तेणेंकरितां बराबरी । होत जाते ॥ १६ ॥
जंवरी चंदन झिजेना । तंव तो सुगंध कळेना ।
चंदन आणि वृक्ष नाना । सगट होती ॥ १७ ॥
जंव उत्तम गुण न कळे । तों या जनास काये कळे ।
उत्तम गुण देखतां निवळे । जगदांतर ॥ १८ ॥
जगदांतर निवळत गेलें । जगदांतरीं सख्य जालें ।
मग जाणावें वोळले[3] । विश्वजन ॥ १९ ॥
जनीं जनार्दन वोळला । तरी काये उणें तयाला ।
राजी राखावें सकळांला । कठिण आहे ॥ २० ॥
पेरिलें तें उगवतें । उसिणें द्यावें घ्यावें लागतें ।
वर्म काढितां भंगतें । परांतर ॥ २१ ॥
लौकिकीं बरेंपण केलें । तेणें सौख्य वाढलें ।
उत्तरासारिखें आलें । प्रत्योत्तर ॥ २२ ॥

---

१ धैर्य. २ क्षमा. ३ वश झाले.

हें आवघें आपणांपासीं। येथें बोल नाहीं जनासी।
सिकवावें आपल्या मनासी। क्षणक्षणा ॥ २३ ॥

खळ दुर्जन भेटला। क्षमेचा धीर बुडाला।
तरी मौनेंचि स्थळत्याग केला। पाहिजे साधकें॥ २४ ॥

लोक नाना परीक्षा जाणती। अंतरपरीक्षा नेणती।
तेणें प्राणी करंटे होती। संदेह नाहीं ॥ २५ ॥

आपणास आहे मरण। म्हणौन राखावें बरेंपण।
कठिण आहे लक्षण। विवेकाचें ॥ २६ ॥

दा. १२. २. १९–२६.

७७. शिकवणनिरूपण.

तैसें निंद्य सोडूनि द्यावें। वंद्य तें हृदईं धरावें।
सत्कीर्तीनें भरावें। भूमंडळ ॥ २० ॥

उत्तमासि उत्तम मानें। कनिष्ठांस तें न मानें।
म्हणौन करंटे देवानें। करून ठेविले ॥ २१ ॥

सांडा अवघें करंटपण। धरावें उत्तम लक्षण।
हरिकथा पुराण श्रवण। नीति न्यायें ॥ २२ ॥

वर्तायाचा विवेक। राजी राखणें सकळ लोक।
हळु हळु पुण्यश्लोक। करीत जावे ॥ २३ ॥

मुलाचे चालीनें चालावें। मुलाच्या मनोगतें बोलावें।
तैसें जनांस शिकवावें। हळुहळु ॥ २४ ॥

मुख्य मनोगत राखणें। हेचि चातुर्याचीं लक्षणें।
चतुर तो चतुरांग[1] जाणे। इतर तीं वेडीं ॥ २५ ॥

---

१ चारिकडचें ज्ञान, चारि अंगें

वेडग्यास वेडें म्हणों नये । वर्म कदापि बोलों नये ।
तरीच घडे दिग्विजये । निस्पृहासी ॥ २६ ॥

उदंड स्थळीं उदंड प्रसंग । जाणोनि करणें येथासांग ।
प्राणिमात्रांचा अंतरंग । होऊन जावें ॥ २७ ॥

मनोगत राखों न जातां । परस्परें होये अवस्ता ।
मनोगत तोडितां वेवस्ता[1] । बरी नाहीं ॥ २८ ॥

याकारणें मनोगत । राखेल तो मोठा महंत ।
मनोगत राखतां समस्त । वोढोन येती ॥ २९ ॥

दा. १३. १०. २०–२९.

७८. विवेकनिरूपण.

उपासना करूनियां पुढें । पुरवलें पाहिजे चहूंकडे ।
भूमंडळीं जिकडे तिकडे । जाणती तया ॥ ८ ॥

जाणती परी आडळेना । काय करितो तें कळेना ।
नाना देसीचे लोक नाना । येऊन जाती ॥ ९ ॥

तितुक्यांचीं अंतरें धरावीं । विवेकें विचारें भरावीं ।
कडोविकडीचीं[2] विवरावीं । अंतःकर्णें ॥ १० ॥

किती लोक तें कळेना । किती समुदाव आकळेना ।
सकळ लोक श्रवणमनना । मधें घाली ॥ ११ ॥

फड[3] समजाविस[4] करणें । गद्यपद्य सांगणें ।
परांतरासी राखणें । सर्वकाळ ॥ १२ ॥

ऐसा ज्याचा दंडक । अखंड पाहाणें विवेक ।
सावधापुढें अविवेक । येईल कैंचा ॥ १३ ॥

---

१ व्यवस्था, स्थिति. २ धरसोडीची. ३ समुदाय. ४ समजूत.

जितुकें कांहीं आपणासि ठावें । तितुकें हळुहळु सिकवावें ।
शाहाणे करून सोडावे । बहुत जन ॥ १४ ॥

परोपरीं सिकवणें । आडणुका सांगत जाणें ।
निवळ करून सोडणें । निस्पृहांसी ॥ १५ ॥

होईल तें आपण करावें । न होतां जनाकरवीं करवावें ।
भगवद्भजन राहावें । हा धर्म नव्हे ॥ १६ ॥

आपण करावें करवावें । आपण विवरावें विवरवावें ।
आपण धरावें धरवावें । भजनमार्गासी ॥ १७ ॥

जुन्या लोकांचा कंटाळा आला। तरी नूतन प्रांत पाहिजे धरिला।
जितुकें होईल तितुक्याला । आळस करूं नये ॥ १८ ॥

देह्याचा अभ्यास बुडाला । म्हणिजे महंत बुडाला ।
लागवेगें नूतन लोकांला । शाहाणे करावें ॥ १९ ॥

उपाधींत सांपडों नये । उपाधीस कंटाळों नये ।
निसुगपण[1] कामा नये । कोणीयेकविषीं ॥ २० ॥

काम नासणार नासतें । आपण वेडें उगेंच पाहातें ।
आळसी हृदयसुन्य तें । काये करूं जाणें ॥ २१ ॥

धकाधकीचा मामला[2] । कैसा घडे अशक्ताला ।
नाना बुद्धी शक्ताला । म्हणोनि सिकवाव्या ॥ २२ ॥

व्याप होईल तों राहावें । व्याप राहातां उठोन जावें ।
आनंदरूप फिरावें । कोठें तरी ॥ २३ ॥

उपाधीपासूनि सुटला । तो निस्पृहपणें बळावला ।
जिकडे अनुकूल तिकडे चालिला । सावकास ॥ २४ ॥

---

१ कंटाळा २ उद्योग.

कीर्ति पाहातां सुख नाहीं । सुख पाहातां कीर्ति नाहीं ।
केल्याविण कांहींच नाहीं । कोठें तरी ॥ २५ ॥
येरवीं काय राहातें । होणार तितुकें होऊन जातें ।
प्राणी मात्र अशक्त तें । पुढें आहे ॥ २६ ॥
आधींच तकवा सोडिला । मधेंचि धीवसा[1] सांडिला ।
तरी संसार हा सेवटाला । कैसा पावे ॥ २७ ॥
संसार मुळींच नासका । विवेकें करावा नेटका ।
नेटका करितां फिका । होत जातो ॥ २८ ॥
ऐसा याचा जिनसाना[2] । पाहातां कळों येतें मना ।
परंतु धीर सांडावा ना । कोणीयेकें ॥ २९ ॥

दा. १९. १०. ८–२९.

७९. राजकारणनिरूपण.

ज्ञानी आणी उदास । समुदायाचा हव्यास ।
तेणें अखंड सावकास । येकांत सेवावा ॥ १ ॥
जेथें तजवीजा कळती । अखंड चाळणा निघती ।
प्राणीमात्रांची स्थिती गती । कळों येते ॥ २ ॥
जरी हा चाळणाचि करीना । तरी कांहींच उमजेना ।
हिसेबझाडाचि पाहीना । दिवाळखोर ॥ ३ ॥
येक मिरासी साधिती । येक सीध्या गवांविती[3] ।
व्यापकपणाची स्थिती । ऐसी आहे ॥ ४ ॥
जेणें जें जें मनीं धरिलें । तें तें आधींच समजलें ।
कृत्रिम अवघेंचि खुंटलें । सहजाचि येणें ॥ ५ ॥

१ धीर. २ स्वभाव ३ गमाविती.

अखंड राहतां सलगी होते। अतिपरिचयें अवज्ञा घडते।
याकारणें विश्रांतीतें। घेतां नये ॥ ६ ॥

आळसें आळस केला। तरी मग कारबाररचि[1] बुडाला।
अंतरहेत चुकत गेला। समुदायाचा ॥ ७ ॥

उदंड उपासनेचीं कामें। लावीत जावीं नित्यनेमें।
अवकाश कैंचा कृत्रिमें। करावयासी ॥ ८ ॥

या अवघ्या पहिल्याच गोष्टी। प्राणी कोणी नव्हतां कष्टी।
राजकारणें मंडळ वेष्टी। चहुंकडे ॥ १० ॥

नष्टासी नष्ट योजावे। वाचाळासी वाचाळ आणावे।
आपणावरी विकल्पाचे गोवे। पडोंच नेदी ॥ ११ ॥

कांटीनें कांटी झाडावी। झाडावी परी ते कळों नेदावी।
कळकटेपणाची[2] पदवी। असों द्यावी ॥ १२ ॥

न कळतां करी कार्य जें तें। तें काम तत्काळचि होतें।
गचगचेंत[3] पडतां तें। चमत्कारें नव्हे ॥ १३ ॥

ऐकोनी आवडी लागावी। देखोनी बळकटचि व्हावी।
सलगीनें आपली पदवी। सेवकामध्यें ॥ १४ ॥

कोणी येक काम करितां होतें। न करितां तें मागें पडतें।
याकारणें ढिलेपण तें। असोंचि नये ॥ १५ ॥

जो दुसऱ्यावरी विश्वासला। त्याचा कार्यभाग बुडाला।
जो आपणचि कष्टत गेला। तोचि भला ॥ १६ ॥

अवघ्यांस अवघें कळलें। तेव्हां तें रितें पडिलें।
याकारणें ऐसें घडलें। न पाहिजे कीं ॥ १७ ॥

---

१ व्याप. २ बावळटपणा. ३ अतिविचार.

मुख्य सूत्र हातीं घ्यावें । करणें तें लोकांकरवीं करवावें ।
कित्तेक खलक उगवावे । राजकारणामधें ॥ १८ ॥

ग्रामण्य वर्मी सांपडावें । रगडून पीठचि करावें ।
करूनि मागुतीं सांवरावें । बुडऊं नये ॥ २० ॥

खळदुर्जनासी भ्यालें । राजकारण नाहीं राखिलें ।
तेणें अवघें प्रगट जालें । बरें वाईट ॥ २१ ॥

समुदाव पाहिजे मोठा । तरी तनावा[1] असाव्या बळकटा ।
मठ करूनि ताठा । धरूं नये ॥ २२ ॥

दुर्जन प्राणी समजावे । परी ते प्रगट न करावे ।
सज्जनापरीस आळवावे । महत्त्व देउनी ॥ २३ ॥

जनामधें दुर्जन प्रगट । तरी मग अखंड खटपट ।
याकारणें ते वाट । बुझूनि टाकावी ॥ २४ ॥

गनीमाच्या देखतां फौजा । रणशूरांच्या फुर्फुरिती भुजा ।
ऐसा पाहिजे कीं राजा । कैपक्षी परमार्थी ॥ २५ ॥

तयास देखतां दुर्जन धाके । बैसवी प्रचीतीचे तडाखे ।
बंड पाषांडाचे वाखे । सहजचि होती ॥ २६ ॥

हे धूर्तपणाचीं कामें । राजकारण करावें नेमें ।
ढिलेपणाच्या संभ्रमें । जाऊं नये ॥ २७ ॥

कोठेंच पडेना दृष्टीं । ठाईं ठाईं त्याच्या गोष्टी ।
वाग्विळासें सकळ सृष्टी । वेधिली तेणें ॥ २८ ॥

हुंब्यास हुंबा लाऊन द्यावा । टोणप्यास टोणपा आणावा ।
लौंदास पुढें उभा करावा । दुसरा लौंद ॥ २९ ॥

---

१ काटे. २ ताणणाऱ्या दोऱ्या. ३ कैवारी. ४ धटिंगण.

घटसी आणावा घट । उद्धटासी पाहिजे उद्धट ।
खटनटांसी[1] खटनट । अगत्य करी ॥ ३० ॥
जैशास तैसा जेव्हां भेटे । तेव्हां मज्यालसी[2] थाटे ।
इतुकें होतें परी धनी कोठें । दृष्टीस न पडे ॥ ३१ ॥

दा. १९. ९.

८०. " कांहीं गलबला कांहीं निवळ । ऐसा कंठित जावा काळ. "

ज्यासी उपाधी आवरेना । तेणें उपाधी वाढवावी ना ।
सावचित्त करूनिया मना । समाधानें असावें ॥ १९ ॥
धांवधांवों उपाधी वेष्टी । आपण कष्टी लोकहि कष्टी ।
हे कामा नये गोष्टी । कुसमुसेची[3] ॥ २०
लोक बहुत कष्टी जाला । आपणही अत्यंत त्रासला ।
वेर्थचि केला गलबला । कासयासी ॥ २१ ॥
असो उपाधीचें काम ऐसें । कांहीं बरें कांहीं कोणांसें[4] ।
सकळ समजोन ऐसें । वर्ततां बरें ॥ २२ ॥
लोकांपासीं भावार्थ कैंचा । आपण जगवावा तयांचा ।
शेवट उपंढरें[5] कोणाचा । पडोंचि नये ॥ २३ ॥
अंतरात्म्याकडे सकळ लागे । निर्गुणीं हें कांहींच नलगे ।
नाना प्रकारीचे दगे । चंचळामधें ॥ २४ ॥
शुद्ध विश्रांतीचें स्थळ । तें येक निर्मळ निश्चळ ।
तेथें विकाराचि सकळ । निर्विकार होती ॥ २५ ॥
उद्वेग अवघे तुटोन जाती । मनास वाटे विश्रांति ।
ऐसी दुल्लभ परब्रह्मस्थिति । विवेकें सांभाळावी ॥ २६ ॥

---

१ वावदूक २ मजलस, सभा. ३ कुरकुर. ४ वांकडे. ५ दुमस्फोट.

आपणास उपाधी मुळींच नाहीं । ऋणानुबंधें मिळालीं सर्वही ।
आल्यागेल्याची क्षिती नाहीं । ऐसें जालें पाहिजे ॥ २७ ॥

जो उपाधीस कंटाळला । तो निवांत होऊन बैसला ।
आटोपेना तो गल्बला । कासयासी ॥ २८ ॥

कांहीं गल्बला कांहीं निवळ । ऐसा कंठित जावा काळ ।
जेणंकरितां विश्रांति वेळ । आपणासि फावे ॥ २९ ॥

उपाधी कांहीं रहात नाहीं । समाधानायेवढें थोर नाहीं ।
नरदेह प्राप्त होत नाहीं । क्षणक्षणा ॥ ३० ॥

दा. १९. ८. १९-३०.

८१. समर्थलक्षण.

तो सकळ जनासी व्हावा । जेथें तेथें नित्य नवा ।
मूर्खपणें अनुमान गोवा । कांहींच नाहीं ॥ ५ ॥

नाना उत्तम गुण सत्पात्र । तेचि मनुष्य जगमित्र ।
प्रगट कीर्ती स्वतंत्र । पराधेन नाहीं ॥ ६ ॥

राखे सकळांचें अंतर । उदंड करी पाठांतर ।
नेमस्तपणाचा विसर । पडणार नाहीं ॥ ७ ॥

नम्रपणें पुसों जाणे । नेमस्त अर्थ सांगों जाणे ।
बोलाऐसें वर्तो जाणे । उत्तम क्रिया ॥ ८ ॥

जो मानला बहुतांसी । कोणी बोलों न शके त्यासी ।
धगधगीत पुण्यरासी । माहांपुरुष ॥ ९ ॥

तो परोपकार करितचि गेला । पाहिजे तो ज्याला त्याला ।
मग काये उणें तयाला । भूमंडळीं ॥ १० ॥

बहुत जन वास पाहे । वेळेसी तत्काळ उभा राहे ।
उणें कोणाचें न साहे । तया पुरुषासी ॥ ११ ॥

चौदा विद्या चोसष्टी कळा । जाणे संगीत गायेनकळा ।
आत्मविद्येचा जिव्हाळा । उदंड तेथें ॥ १२ ॥

सकळांसी नम्र बोलणें । मनोगत राखोन चालणें ।
अखंड कोणायेकाचें उणें । पडोंचि नेदी ॥ १३ ॥

न्याय नीति भजन मर्यादा । काळ सार्थक करी सदा ।
दरिद्रपणाची आपदा । तेथें कैची ॥ १४ ॥

उत्तमगुणें शृंघारला । तो बहुतांमधें शोभला ।
प्रगट प्रतापें उगवला । मार्तंड जैसा ॥ १५ ॥

जाणता पुरुष असेल जेथें । कळहो कैचा उठेल तेथें ।
उत्तम गुणाविषयीं रितें । तें प्राणी करंटें ॥ १६ ॥

प्रपंचीं जाणे राजकारण । परमार्थी साकल्यविवरण ।
सर्वांमधें उत्तम गुण । त्याचा भोक्ता ॥ १७ ॥

मागें येक पुढें येक । ऐसा कदापी नाहीं दंडक ।
सर्वत्रांसी अलोलिक । तया पुरुषाची ॥ १८ ॥

अंतरासी लागेल ढका । ऐसी वर्तणूक करूं नका ।
जेथें तेथें विवेका । प्रगट करी ॥ १९ ॥

कर्मविधी उपासनाविधी । ज्ञानविधी वैराग्यविधी ।
विशाळ ज्ञातृत्वाची बुद्धी । चळेल कैसी ॥ २० ॥

पाहातां अवघे उत्तम गुण । तयास वाईट म्हणेल कोण ।
जैसा आत्मा संपूर्ण । सर्वां घटीं ॥ २१ ॥

---

१ वाट. २ रिवाज, रीत ३ आवड.

आपल्या कार्यास तत्पर । लोक असती लहान थोर ।
तैसाचि करी परोपकार । मनापासुनी ॥ २२ ॥
दुसऱ्याच्या दुःखें दुखवे । दुसऱ्याच्या सुखें सुखावे ।
अवघेचि सुखी असावे । ऐसी वासना ॥ २३ ॥
उदंड मुलें नानापरी । वडिलांचें मन अवघ्यांवरी ।
तैसी अवघ्यांची चिंता करी । माहांपुरुष ॥ २४ ॥
जयास कोणाचें सोसेना । तयाची निःकांचन वासना ।
धीकारिल्या धीकारेना । तोचि माहांपुरुष ॥ २५ ॥
मिथ्या शरीर निंदिलें । तरी यांचें काये गेलें ।
ज्ञात्यासि आणि जिंकिलें । देहबुद्धीनें ॥ २६ ॥
हें अवघें अवलक्षण । ज्ञाता देहीं विलक्षण ।
कांहीं तरी उत्तम गुण । जनीं दाखवावे ॥ २७ ॥
उत्तम गुणास मनुष्य वेधे । वाईट गुणास प्राणी खेदे ।
तीक्षण बुद्धि लोक साधे । काये जाणती ॥ २८ ॥
लोकीं अत्यंत क्षमा करिती । आलियां लोकांची प्रचिती ।
मग ते लोक पाठी राखती । नाना प्रकारीं ॥ २९ ॥
बहुतांसी वाटे मी थोर । सर्वमान्य पाहिजे विचार ।
धीर उदार गंभीर । माहांपुरुष ॥ ३० ॥
जितुके कांहीं उत्तम गुण । तें समर्थाचें लक्षण ।
अवगुण तें करंटलक्षण । सहजचि जालें ॥ ३१ ॥

दा. १९. ४. ९–३१.

८२. " भगवत्कीर्तीनें भरावें । भूमंडळ. "

कोण्हास कांहींच न मागावें । भगवद्भजन वाढवावें ।
विवेकबळें जन लावावे । भजनाकडे ॥ ११ ॥

परांतर रक्षायाचीं कामें । बहुत कठीण विवेकवर्मे ।
स्वइच्छेनें स्वधर्में । लोकरांहाटी[1] ॥ १२ ॥

आपण तुरुक गुरु केला । शिष्य चांभार मेळविला ।
नीच्च यातीनें नासला । समुदाव ॥ १३ ॥

ब्राह्मणमंडळ्या मेळवाव्या । भक्तमंडळ्या मानाव्या ।
संतमंडळ्या शोधाव्या । भूमंडळीं ॥ १४ ॥

उत्कट भव्य तेंचि घ्यावें । मळमळित अवघेंचि टाकावें ।
निस्पृहपणें विख्यात व्हावें । भूमंडळीं ॥ १५ ॥

अक्षर बरें वाचणें बरें । अर्थांतर सांगणें बरें ।
गाणें नाचणें अवघेंचि बरें । पाठांतर ॥ १६ ॥

दीक्षा बरी मीत्री[2] बरी । तीक्षण बुद्धि राजकारणीं बरी ।
आपणास राखे नानापरी । अलिप्तपणें ॥ १७ ॥

अखंड हरिकथेचा छंदु । सकळांस लागे नामवेदु[3] ।
प्रगट जयाचा प्रबोधु । सूर्य जैसा ॥ १८ ॥

दुर्जनासी राखों जाणे । सज्जनासी निवऊं जाणे ।
सकळांचें मनींचें जाणे । ज्याचे त्यापरी ॥ १९ ॥

संगतीचें मनुष्य पालटे । उत्तम गुण तत्काळ उठे ।
अखंड अभ्यासीं लगटे । समुदाव ॥ २० ॥

जेथें तेथें नित्य नवा । जनासी वाटे हा असावा ।
परंतु लालचीचा गोवा । पडोंचि नेदी ॥ २१ ॥

उत्कट भक्ति उत्कट ज्ञान । उत्कट चयातुर्य उत्कट भजन ।
उत्कट योग अनुष्ठान । ठाईं ठाईं ॥ २२ ॥

उत्कट निस्पृहता धरिली । त्याची कीर्ति दिगांतीं फांकली ।
उत्कट भक्तीनें निवाली । जनमंडळी ॥ २३ ॥

---

१ वहिवाट. २ मैत्री. ३ वेध.

कांहीं येक उत्कटेंविण । कीर्ति कदापि नव्हे जाण ।
उगेंच वणवण हिंडोन । काय होतें ॥ २४ ॥

नाहीं देह्याचा भरवसा । केव्हां सरेल वयसा[1] ।
प्रसंग पडेल कैसा । कोण जाणे ॥ २५ ॥

याकारणें सावधान असावें । जितुकें होईल तितुकें करावें ।
भगवत्कीर्तीनें भरावें । भूमंडळ ॥ २६ ॥

आपणास जें जें अनुकूळ । तें तें करावें तत्काळ ।
होईना त्यास निवळ । विवेक उमजावा ॥ २७ ॥

विवेकामधें सांपडेना । ऐसें तों कांहींच असेना ।
येकांतीं विवेक अनुमाना । आणून सोडी ॥ २८ ॥

अखंड तजवीजा चाळणा जेथें । पाहतां काये उणें तेथें ।
येकांतेंविण प्राणीयांतें । बुद्धि कैंची ॥ २९ ॥

येकांतीं विवेक करावा । आत्माराम वोळखावा ।
येथून तेथवरी गोवा । कांहींच नाहीं ॥ ३० ॥

दा. १९. ६. ११–३०.

८३. रामदासांचें आत्मचरित्र.

पृथ्वीमधें मानवी शरीरें । उदंड दाटलीं लहानथोरें ।
पालटती मनोविकारें । क्षणक्षणा ॥ १ ॥

जितुक्या मूर्ती तितुक्या प्रकृती । सारिख्या नस्ती आदिअंतीं ।
नेमाचि नाहीं पाहावें किती । काये म्हणोनि ॥ २ ॥

कित्येक म्लेंच होऊन गेलें । कित्येक फिरंगणांत[2] आटले[3] ।
देशभाषेनें रुधिले । कितीयेक ॥ ३ ॥

१ आयुष्य. २ फिरंगी लोकांचा देश ३ नाडले.

मऱ्हाष्ट्रदेश थोडा उरला । राजकारणें लोक रुधिला ।
अवकाश नाहीं जेवायाला । उदंड कामें ॥ ४ ॥

कित्येक युद्धप्रसंगीं गुंतले । तेणें गुणें उन्मत्त जाले ।
रात्रंदिवस करूं लागले । युद्धचर्चा ॥ ५ ॥

उदिम्यास[1] व्यासंग लागला । अवकाश नाहींसा झाला ।
अवघा पोटधंदाच लागला । निरंतर ॥ ६ ॥

शडदर्शनें[2] नाना मतें । पाषांडें वाढलीं बहुतें ।
पृथ्वीमधें जेथतेथें । उपदेसितीं ॥ ७ ॥

स्मार्थी आणि वैष्णवीं । उरलीं सुरलीं नेलीं आघवीं ।
ऐसी पाहातां गथागोवी । उदंड जाली ॥ ८ ॥

कित्येक कामनेचे भक्त । ठाईं ठाईं जाले आसक्त ।
युक्त अथवा अयुक्त । पाहातो कोण ॥ ९ ॥

या गलबल्यामधें गलबला[3] । कोणी कोणी वाढविला ।
त्यास देखों सकेनासा जाला । वैदिक लोक ॥ १० ॥

त्याहिमधें हरिकीर्तन । तेथें वाढले कित्येक जन ।
प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान । कोण पाहे ॥ ११ ॥

याकारणें ज्ञान दुल्लभ । पुण्यें घडे अलभ्य लाभ ।
विचारवंतां सुल्लभ । सकळ कांहीं ॥ १२ ॥

विचार कळला सांगतां नये । उदंड येती अंतराये ।
उपाय योजितां अपाये । आडवे येती ॥ १३ ॥
त्याहिमधें जो तिक्षण[4] । रिकामा जाऊं नेदी क्षण ।
धूर्त तार्किक विचक्षण । सकळां मानें ॥ १४ ॥

---

१ व्यापारी २ सहा दर्शनें. ३ गडबड. ४ तीव्रबुद्धीचा

नाना जिंनस[१] उदंड पाठ । वदों लागला घडघडाट ।
अव्हाटचि[२] केली वाट । सामर्थ्यबळें ॥ १५ ॥

प्रबोधशक्तीचीं अनंत द्वारें । जाणे सकळांचीं अंतरें ।
निरूपणें तदनंतरें । चटक लागे ॥ १६ ॥

मतें मतांतरें सगट । प्रत्यय[३] बोलोन करी सपाट ।
दंडक[४] सांडून नीट । वेधी जना ॥ १७ ॥

नेमकें भेदकें वचनें । अखंड पाहे प्रसंगमानें ।
उदास वृत्तीच्या गुमानें[५] । उठोन जातो ॥ १८ ॥

प्रत्यये बोलोन उठोन गेला । चटक लागली लोकांला ।
नाना मार्ग सांडूनि त्याला । शरण येती ॥ १९ ॥

परी तो कोठें आडळेना । कोणे स्थळीं सांपडेना ।
वेष पाहतां हीनदीना । सारिखा दिसे ॥ २० ॥

उदंड करी गुप्तरूपें । भिकाऱ्यासारिखा स्वरूपें ।
तेथें येशकीर्तिप्रतापें । सीमा सांडिली ॥ २१ ॥

ठाईं ठाईं भजन लावी । आपण तेथून चुकावी ।
मत्सर मतांचीं गोवी । लागोंच नेदी ॥ २२ ॥

खनाळामधें[६] जाऊन राहे । तेथें कोणीच न पाहे ।
सर्वत्रांची चिंता वाहे । सर्वकाळ ॥ २३ ॥

अवघड स्थळीं कठीण लोक । तेथें राहणें नेमक ।
सृष्टीमधें सकळ लोक । धुंडीत येती ॥ २४ ॥

तेथें कोणाचें चालेना । अणुमात्र अनुमानेना ।
कट्ट[७] घालून राजकारणा । लोक लावी ॥ २५ ॥

---

१ वेंचे. २ अफाट, विस्तीर्ण. ३ अनुभव. ४ रूढि. ५ जोराने. ६ दऱ्या, दुर्घटस्थळें. ७ निश्चय.

लोकीं लोक वाढविले । तेणें अमर्याद जाले ।
भूमंडळीं सत्ता चाले । गुप्तरूपें ॥ २६ ॥
ठाइं ठाइं उदंड तांबे । मनुष्यमात्र तितुके झोंबे ।
चहुंकडे उदंड लांबे । परमार्थबुद्धी ॥ २७ ॥
उपासनेचा गजर । स्थळोस्थळीं थोर थोर ।
प्रत्ययानें प्राणीमात्र । सांडविले ॥ २८ ॥
ऐसे कैवाडे उदंड जाणे । तेणें लोक होती शाहाणे ।
जेथें तेथें प्रत्यय बाणे । प्राणिमात्रांसी ॥ २९ ॥
ऐसी कीर्ति करून जावें । तरीच संसारास यावें ।
दास म्हणे हें स्वभावें । संकेतें बोलिलें ॥ ३० ॥

दा. १९. २. १–३०.

५. उपसंहार.

८४. " समर्थकृपेचीं वचनें । तो हा दासबोध. "

जालें साधनाचें फळ । संसार जाला सफळ ।
निर्गुण ब्रह्म तें निश्चळ । अंतरीं बिंबलें ॥ २६ ॥
हिसेब जाला मायेचा । जाला निवाडा तत्वांचा ।
साध्य होतां साधनाचा । ठाव नाहीं ॥ २७ ॥
स्वप्नीं जें जें देखिलें । तें तें जागृतीस उडालें ।
सहजचि अनुर्वाच्य जालें । बोलतां नये ॥ २८ ॥
ऐसें हें विवेकें जाणावें । प्रत्ययें खुणेसी बाणावें ।
जन्ममृत्याच्या नांवें । सुन्याकार ॥ २९ ॥

१ समुदाय. २ प्रकार, युक्त्या.

भक्तांचेनि साभिमानें। कृपा केली दाशरथीनें।
समर्थकृपेचीं वचनें। तो हा दासबोध ॥ ३० ॥

वीस दशक दासबोध। श्रवणद्वारें घेतां शोध।
मननकर्त्यास विशद। परमार्थ होतो ॥ ३१ ॥

वीस दशक दोनीसे समास। साधकें पाहावे सावकास।
विवरतां विशेषाविशेष। कळों लागे ॥ ३२ ॥

ग्रंथाचें करावें स्तवन। स्तवनाचें काय प्रयोजन।
येथें प्रत्ययास कारण। प्रत्ययो पाहावा ॥ ३३ ॥

देहे तंव पांचा भूतांचा। कर्ता आत्मा तर्थीचा।
आणी कवित्वप्रकार मनुशाचा। काशावरूनी ॥ ३४ ॥

सकळ करणें जगदीशाचें। आणी कवित्वचि काय मानुशाचें।
ऐशा अप्रमाण बोलण्याचें। कार्य घ्यावें ॥ ३५ ॥

सकळ देह्याचा झाडा केला। तत्वसमुदाव उडाला।
तेथें कोण्या पदार्थाला। आपुलें म्हणावें ॥ ३६ ॥

ऐसीं हे विचाराचीं कामें। उगेच भ्रमों नये भ्रमें।
जगदेश्वरें अनुक्रमें। सकळ केलें ॥ ३७ ॥

दा. २०. १०. २६–३७.

---

१ दोनशे.

रामदासवचनामृत

भाग दुसरा

संकीर्ण अंश

रामदासवचनामृत

(संकीर्ण ग्रंथ)

६ जुना दासबोध.

८९. देह पडे कां देव जोडे !

निग्रहनेमाचें बळ । असतां प्राप्ति तात्काळ ।
दुराशा करी तळमळ । निग्रहभ्रष्टो ॥ १३ ॥

जेथें निग्रहेंसीं धारिष्ट्य वसे । तेथें देव सन्निधचि असे ।
सोडी संशयाचें पिसें । एतद्विषयीं ॥ १४ ॥

तरी निग्रह धारिष्ट जडे । हें वैराग्यंवीण न घडे ।
दृढ वैराग्य होतां उडे । पांग देहाचा ॥ १५ ॥

देह पडे कां देव जोडे । ऐशी हांव आंगीं जडे ।
तेणें गुणें वैराग्य घडे । महाप्रबळ ॥ १७ ॥

देहपांग[1] निःशेष भंगे । तव्हां प्राप्तीसी वेळ नलगे ।
देव भक्तापाठीं लागे । "नाभी नाभी" म्हणोनि ॥ १८ ॥

बाळक आपणा रक्षूं नेणे । म्हणोनि मातेसि लागे रक्षणें ।
तेंचि बाळक शहाणें । होतां माता विसंबे ॥ १९ ॥

तैसा भक्त भगवंतीं प्रेमा । लावूनि उल्लंघी देहसीमा ।
तयाचा सांभाळ आत्मयारामा । करणें घडे नेमस्त ॥ २० ॥

---

१ इच्छा. २ भिऊं नको ३ दुर्लक्ष करणें.

सर्वस्वाची आस तुटे । तरीच सगुणमूर्ति प्रगटे ।
दुःख संसारींचें फिटे । एकसरा ॥ २१ ॥

जु. दा. ७. १३–२१.

८६. प्रपंचपरमार्थ.

गृहासी आग लागली । देखोनि कां बोंब केली ।
लोकांची मांदी मेळविली । आगी विझवाया कारणें ॥
तैसीं परमार्थीं बोंब मारावी । कांहीं काढाकाढी करावी ।
हळू हळू सोडवावी । मिठी प्रपंचाची ॥
प्रपंचधुडका[1] पेटला । मध्यें परमार्थ जळोनि गेला ।
ऐसें देखोनि तुम्हांला । कैसें बरें वाटत ॥
मुक्ताफळ आणि दिव्यांबर । नाना वस्तूंचें भांडार ।
भस्म करूनि वैश्वानर । विझोनि जाई जेंवीं ॥
तैसा प्रपंच हा परमार्थासी । जाळोनि भागूं नदी आपणांसी ।
आयुष्य गेलियां प्राणियासी । विमुख होय ॥
जरी हा प्रपंच शाश्वत जाणतां । तरी आम्हीं यासीच धरितों ।
हा अशाश्वत म्हणोनि रडतां । तुम्हां भोंवतीं ॥
तुम्हीं कैसे रे परमार्थी । परघात आणि अपस्वार्थी ।
डोळे झांकूनि दाहीं अर्थीं । नागवलेत कीं रे ॥

जु. दा. ११. ५४–६०.

८७. अनुभव सांगूं नये.

आतांही जयास वाटे भेटावें । रामें मज सांभाळीत जावें ।
ऐसें दृढ घेतलें जीवें । तरी ऐका मी सांगेन ॥ ३७ ॥

---

१ अग्नि, भडका

श्रीराम जयराम जयजयराम । ऐसा काहीं एक करूनियां नेम ।
जप कीजे तेणें आत्माराम । जोडेल नियमें ॥ ३८ ॥

परी कोणासी कळों नेदावा । जप अंतरींच करावा ।
जैसा कृपणासी धनठेवा । सांपडला एकांतीं ॥ ३९ ॥

राम जपे त्याचें चित्त पाहतां । जप करितां शीण येतां ।
विकल्प[1] अंतरीं प्रवेशतो । तरी ढळेना मेरू जैसा ॥ ४० ॥

कां प्रपंचीं होती थोर आघात । तेणें चित्त होय दुश्चित ।
देहासी आपदा होती अत्यंत । तरी रामासि विसरूं नये ॥४१॥

जप नेमिला तो चुकों नेदावा । त्यावेगळा सर्वदा स्मरावा ।
मळत्यागींही न विसंबावा । कर्मठपणें करूनि ॥ ४२ ॥

ऐसें अखंड नाम स्मरावें । परी दुसरियासी कळों नेदावें ।
निदिध्यास लागलियां राघवें । पाविजे तात्काळ ॥ ४३ ॥

वैरें निदिध्यास रावणें केला । त्याचा संकल्प त्यासी फळला ।
मा जेणें दास्यत्वें उपासिला । तो राम कैसा नव्हे ॥ ४४ ॥

कांहीं साक्षात्कार झाला । तो सांगों नये दुसरियाला ।
जरी ओळकेपणें[2] सांगितला । तरी पुन्हां होणार नाहीं ॥ ४५ ॥

पुन्हां साक्षात्कार कैंचा । जाला तरी वरपंगाचा[3] ।
हा मी आपुले जीवाचा । अनुभव सांगतों ॥ ४६ ॥

जु. दा. १९. ३७–४६.

८८. रामास मागणें.

रामासि इतुकें मागावें । जें आपण रामचि व्हावें ।
कां रामासि दास करावें । आपणा ऐसें ॥

---

१ संशय. २ आशाळभूतपणा, मूर्खपणा. ३ वरवरचा दिखाऊ.

तूं ऐसा कां मीच असोन । त्याहून नलगे आम्हांसि आन ।
तुझ्या ठायीं दासपण । आणीन तरी मी होय ॥

तुवां स्वामी होऊनि बैसावें । आणि आम्हांसभोंवतें भोंवावें ।
रागेजोनी बाहतां[1] न यावें । हें काय बरें ॥

तूं राज्य सांडुनियां जालियां उदास । तरी आम्हींही तुझेचि दास ।
तां काय बोलिजेल बापास । तैसें आम्हींही तुज करूं ॥

तुवां पाषाण तारिले । तरी आम्हींही जडजीव उद्धरिले ।
तुवां देव मुक्त केले । बंधनापासूनी ॥

तरी आम्हींही भाविकांसी । सोडवूनियां मोक्षपदासी ।
पावविलें तयांसी । मागुता जन्म नाहीं ॥

तुवां जरामरण केलें दुरी । तें मुळींच नाहीं आमुचे घरीं ।
तूं राजा अकरा सहस्त्रवरी । तरी आम्हांसी संख्या नाहीं ॥

तुवां पुरी नेली वैकुंठा । आम्हीं वैकुंठींच्या बारा वाटा ।
करूनि मांडिला चाहटा[2] । तया वैकुंठाचा ॥

ऐसे बोलती रामदास । निधडे सर्वस्वें उदास ।
वैभव वाटे जयांस । कसपट जैसें ॥

ऐसें बोलणें ऐकिलें । रामें मंदहास्य केलें ।
धांवोनियां हृदयीं धरिलें । आपुलिया निजदासा ॥

ऐसा भक्ताचा वेळाइत[3] । दासाभोंवता भोंवत ।
एक क्षणीं न विसंबत । भावार्थ देखोनि भुलला ॥

राम दासांमध्यें उभा । तेणें दासांसी आली शोभा ।
रामस्वरूपाची प्रभा । कोंदाटली सबाह्य ॥

---

१ हाक मारणे. २ चवाटा. ३ वेळेनुसार काम करणारा, आज्ञाधारक शिपाई.

रामें आपणांसारिखें केलें । दास दासपणेंसी मुकले ।
रामासि मिळोनि एकचि जाले । एकपणाही वेगळे ॥

स्वामीसेवकपणें आनंदले । हर्षेकरुनि उचंबळले ।
परस्परें मिळोनि ठेले । लोभ[1] आला म्हणोनि ॥

ऐसें देवाभक्तांचें सांजणें । जीव घेणें जीव देणें ।
पुन्हां मागुतें येणें जाणें । न घडे कदा ॥

नवविधा भक्ति याचिकारणें । जें आपण स्वयें रामचि होणें ।
स्वयेंचि रामपणें ठाकणें । स्वानुभवें करूनी ॥

ज्ञ. दा. १६. १–१६.

७ मनाचे श्लोक.

---

८९. मनास प्रार्थना.

मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें ।
तरी श्रीहरि पाविजे तो स्वभावें ॥
जनीं निंद्य तें सर्व सोडूनि द्यावें ।
जनीं वंद्य तें सर्वभावें करावें ॥ २ ॥

प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।
पुढें वैखरी राम आधीं वदावा ॥
सदाचार हा थोर सांडूं नये तो ।
जनीं तोचि तो मानवीं धन्य होतो ॥ ३ ॥

देहे त्यागितां कीर्ति मागें उरावी ।
मना सज्जना हेचि क्रीया धरावी ॥

---

१ प्रीति, सख्य.

मना चंदनाचे परी त्वां झिजावें ।
परी अंतरीं सज्जना नीववावें ॥ ८ ॥

मना पाहतां सत्य हे मृत्यभूमी ।
जितांबोलती सर्वही जीव मी मी ॥
चिरंजीव हे सर्वही मानिताती ।
अकस्मात सांडूनियां सर्व जाती ॥ १५॥

भवाच्या भयें काय भीतोस लंडी ।
धरीं रे मना धीर धाकासि सांडी ॥
रघूनायकासारिखा स्वामि शीरीं ।
नुपेक्षी कदा कोपल्यां दंडधारी ॥ २७ ॥

समर्थाचिया सेवका वक्र पाहे ।
असा सर्व भूमंडळीं कोण आहे ॥
जयाची लिळा वर्णिती लोक तीन्ही ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥ ३० ॥

असे हो जया अंतरीं भाव जैसा ।
वसे हो तया अंतरीं देव तैसा ॥
अनन्यास रक्षीतसे चापपाणी ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥ ३५ ॥

सदा सर्वदा देव सन्नीध आहे ।
कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे ॥
सुखानंद आनंद कैवल्यदानी ।
नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥ ३६ ॥

---

१ त्वां. २ जिवंत असतांना. ३ देणारा, दान करणारा.

सदा चक्रवाकासि मार्तंड[1] जैसा ।
उडी घालितो संकटीं स्वामि तैसा ॥
हरीभक्तिचा घाव गाजे निशाणीं[2] ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥ ३७ ॥

जयाचेनि संगें समाधान भंगे ।
अहंता अकस्मात् येऊनि लागे ॥
तये संगतीची जनीं कोण गोडी ।
जये संगतीनें मती राम सोडी ॥ ४५ ॥

सदा देवकार्जीं झिजे देह ज्याचा ।
सदा रामनामें वदे नित्य वाचा ॥
स्वधर्मेचि चाले सदा उत्तमाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ४८ ॥

मना राम कल्पतरू कामधेनु ।
निधी सार चिंतामणी काय वानूं ॥
जयाचेनि योगें घडे सर्व सत्ता ।
तया साम्यता कायसी कोण आतां ॥ ६० ॥

उभा कल्पवृक्षातळीं दुःख वाहे ।
तया अंतरीं सर्वदा तेंचि आहे ॥
जनीं सज्जनीं वाद हा वाढवावा ।
पुढें मागुता शोक जीवीं धरावा ॥ ६१ ॥

घनशाम हा राम लावण्यरूपी ।
महां धीर गंभीर पूर्णप्रतापी ॥
करी संकटीं सेवकांचा कुढावा[3] ।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥ ६७ ॥

---

१ सूर्य. २ नौबद, नगारा. ३ संरक्षण

जनीं भोजनीं नाम वाचे वदावें ।
अती आदरें गद्य घोषें म्हणावें ॥
हरीचिंतनें अन्न जेवीत जावें ।
तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावें ॥ ८९ ॥

गजेंद्र महा संकटीं वास पाहे ।
तया कारणें श्रीहरी धांवताहे ॥
उडी घातली जाहला जीवदानी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥ ११८ ॥

नसे पीत ना श्वेत ना शाम कांहीं ।
नसे वेक्त आवेक्त ना नीळ नाहीं ॥
म्हणे दास विश्वासतां मुक्ति लाहे ।
मना संत आनंत शोधूनि पाहें ॥ १५० ॥

दिसेना जनीं तेंचि शोधूनि पाहें ।
बरें पाहतां गूज तेथेंचि आहे ॥
करीं घेउं जातां कदा आढळेना ।
जनीं सर्व कोंदाटलें तें कळेना ॥ १५५ ॥

विधी निर्मितां लीहितो सर्व भाळीं ।
परी लीहिता कोण त्याचे कपाळीं ॥
हरु जाळितो लोक संव्हारकाळीं ।
परी शेवटीं शंकरा कोण जाळी ॥ १७५ ॥

तिन्ही लोक जेथूनि निर्माण जाले ।
तया देवरायासि कोण्ही न बोले ॥
जगीं थोरला देव तो चोरलासे ।
गुरूवीण तो सर्वथाही न दीसे ॥ १७९ ॥

नभासारिखें रूप या राघवाचें ।
मनीं चिंतितां मूळ तूटे भवाचें ॥
तया पाहतां देहबुधी उरेना ।
सदा सर्वदा आर्त पोटीं पुरेना ॥ १९७ ॥

स. श्लो०

८. पंचसमासी.

१०. स्वरूपानुसंधान.

हें नवविध भजन । सायुज्यमुक्ति साधन ।
तेणें करितां शुद्ध ज्ञान । प्राण्यास होय ॥ १८ ॥
शुद्ध ज्ञानाचे बळें । अंतरीं वैराग्य प्रबळे ।
तेणें लिंगदेह मोकळें । होय वासनेसीं ॥ १९ ॥
लागे स्वरूपानुसंधान । नाठवे देहाभिमान ।
विश्रांतीतें देखे मन । तद्रूप होय ॥ २० ॥
आदिपुरुष एकला । नाहीं द्वैताचा गलबला ।
संगत्यागें अवलंबिला । शुद्ध एकांत ॥२१ ॥
तेथें मन पांगुळलें[1] । आपणांस विसरलें ।
आपणास भुलोन गेलें । स्वरूपबोधें ॥२२ ॥
मी कोण हें न कळे । अवघा आत्मा प्रबळे ।
तेणें बळें मन मावळे । कर्पूरन्यायें[2] ॥२३ ॥
तेथें शब्द कुंठित झाला । अनुभव अनुभवीं निमाला ।
आतां असो हा गलबला । कोणी करावा ॥ २४ ॥

१ पांगुळें होणें. २ कर्पूरअग्निन्याय.

वाटे एकांतासी जावें। पुनः हें अनुभवावें।
उगें निवांत असावें। कल्पकोटी॥ २५॥

नको वक्तृत्व उपाधि। पांगुळली स्वरूपीं बुद्धि।
लागली सहज समाधि। हेतुरहित॥ २६॥

गुरु शिष्य एक झाले। अनुभवबोधीं बुडाले।
त्यांचे शुद्धीस जे गेले। तया तीच गती॥२७॥

तुटला संसारबंधु। आटोनि गेला भवसिंधु।
बुडाला बोधीं प्रबोधु। विवेकबळें॥ २८॥

ज्ञानाग्नि प्रगट झाला। मायाकर्पूर जळाला।
विवेकें अविवेक ग्रासिला। तये ठायीं॥ २९॥

झालें साधनाचें फळ। चुकलें जन्माचें मूळ।
निष्कलंक आणि निर्मळ। तोचि आत्मा॥ ३०॥

पं. स. ४. १८–३०.

९१. सर्वत्र रामदर्शन.

एवं ज्ञाता समाधानी। प्रारब्धयोगें वर्ते जनीं।
परि अनुसंधान मनीं। वेगळेंचि॥ ५

वृत्ति गुंतली स्वानुभवें। जनीं तेंचि भासे आघवें।
सबाह्य व्यापिलें देवें। ब्रह्मांड अवघें॥ ६॥

वृत्ति मुळाकडे पाहे। त्यास राम दिसताहे।
स्तब्ध होवोनियां राहे। रामचि दिसे॥ ७॥

मन मुरडे आटे। तंव मार्गीं राम भेटे।
मागें पुढें प्रगटे। रामचि अवघा॥ ८॥

दाही दिशा अवलोकितां । रामचि भासे तत्वतां ।
वदन चुकवूं जातां । सन्मुख राम ॥ ९ ॥

राम झालिया सन्मुख । कल्पांतीं नोहे विन्मुख ।
नेत्र झाकितां अधिक । रामचि दिसे ॥ १० ॥

मग विसरोनि पाहिलें । तंव तें रामचि झालें ।
जीव सर्वस्वें वेधले । संपूर्ण रामें ॥ ११ ॥

मग आपणा पाहे । तंव रामचि झाला आहे ।
उभय साक्षी जो राहे । तोचि राम ॥ १२ ॥

रामेंविण सर्वथा कांहीं । अणुमात्र रितें नाहीं ।
दृश्य द्रष्टा दर्शन तेंही । रामचि भासे ॥ १३ ॥

प्रपंच सारिला मानसें । दृढ लागलें रामपिसें ।
देह वर्ते भ्रमिष्ट जैसें । पिशाचवत् ॥ १४ ॥

रामरूपीं वेधलें मन । तेणें राहे कुलाभिमान ।
पूर्वदशेचें लक्षण । पालटोनि गेलें ॥ १५ ॥

ऐसी खूण सकळांस । सांगोनि गेला रामदास ।
सत्संगें जगदीश । नेमस्त भेटे ॥ ३३ ॥

पं. म. ५. ९–३३.

९. मानपंचक.

९२. रामराज्य.

राज्य या रघुनाथाचें । कळीकाळासी नातुडे ।
बहुवृष्टी अनावृष्टी । हें कदा न घडे जनीं ॥ ७ ॥

उद्वेग पाहतां नाहीं । चिंतामात्र नसे जनीं ।
व्याधी नाहीं रोग नाहीं । लोक आरोग्य नांदती ॥ ८ ॥

युध्य नाहिंच आयोध्या[1] । राग ना मछरु नसे ।
बंद निर्बंद ही नाहीं । दंड दोष कदा नसे ॥ ९ ॥

कुरूपी पाहतां नाहीं । जरा मृत्य असेचिना ।
आदरु सकळैं लोकां । सख्यप्रीती परस्परें ॥ १० ॥

बोलणें सत्य न्यायाचें । अन्याय सहसा नसे ।
अनेक वर्तती काया । येक जीव परस्परें ॥ ११ ॥

दरिद्री धुंडितां नाहीं । मूर्ख हा तो असेचिना ।
परोपकार तो मोठा । सर्वत्र लोकसंग्रहो ॥ १२ ॥

अद्भुत पीकती भूमी । वृक्ष देती सदा फळें ।
अखंड दुभती धेनु । आरोग्यें वाहती जळें ॥ १३ ॥

जळजें स्वापदें पक्षी । नाना जीव भुमंडळीं ।
आनंदरूप बोभाती[2] । नाना स्वर परस्परें ॥ १४ ॥

नद्या सरोवरें बावी[3] । डोलती नूतनें वनें ।
फळती फुलती झाडें । सुगंध वनवाटिका ॥ १५ ॥

उदंड वसती ग्रामें । नगरें पुरेंचि पट्टणें ।
तीर्थें क्षत्रें नाना स्छानें । शिवाल्यें गोपुरें त्ररीं ॥ १६ ॥

मठ मठ्या पर्णशाळा । रुसी[4]आश्रम साजिरे ।
वेदशास्त्रधर्मचर्चा । स्नान संध्या तपोनिधि ॥ १७ ॥

चढता वाढता प्रेमा । सुखानंद उचंबळे ।
संतोष समस्तैं लोकां । रामराज्य भुमंडळीं ॥ १८ ॥

---

१ जेथें युद्ध नाहीं ती जागा. २ हांक मारणें. ३ विहिरी. ४ ऋषी.

हरिदास नाचती रंगीं । गायनें कीर्तनें बरीं ।
रागरंग तानमानें । टाळबंधें विराजती ॥ १९ ॥
प्रबंद[1] कविता छंदें । धाटी मुद्रा परोपरीं ।
आन्वय जाड दृष्टांतें । गद्यें पद्योंचि औघडें ॥ २० ॥
नानायुक्ती नाना बुधी । नाना विद्या नाना कळा ।
नाना संगीत सामर्थ्यें । नाना वाद्यें परोपरीं ॥ २१ ॥
संमार्जनें रंगमाळा । पुष्पमाळा बहुविधा ।
केशरें धुंशरें गंधें । सुगंध करताळिका ॥ २२ ॥
सर्वही तोषले तोषें । नाम घोषेंचि गर्जती ।
पुरेना दिन ना रात्री । यात्रा पर्वे हरीकथा ॥ २३ ॥
दीपिका चंद्रजोती त्या । आर्त्या नीरांजनें जनें ।
रामराजा दयासिंधु । वोळला सेवकांवरी ॥ २४ ॥
रामदासीं ब्रह्मज्ञान । सारासार विचारणा ।
धर्मस्थापनेसाठीं । कर्मकांड उपासना ॥ २५ ॥

मा. पं. १. ७–२५

९३. सर्व देव मिळून एकच.

कास या रघुनाथाची । धरितां सुख पावलों ।
इतर कष्टती प्राणी । थोर संसारसांकडीं ॥
सांकडीं तोडिलीं माझीं । राघवें करुणाळयें ।
पूर्वीच तुटली माया । दुःख शोक विसंचला ॥
सेवकु मानवीयांचे । कष्टती बहुतांपरीं ॥
सेविला देव देवांचा । तेणें मी धन्य जाहालों ॥

१ गद्यपद्य. २ बुक्का.

नीच हे मानवी प्राणी। नीचाश्रय कामा नये।
महत्कीर्ति श्रीरामाची। फावला महदाश्रयो॥

विबुधां आश्रय ज्याच्या। पावले बंदमोचनें[1]।
सेवकु मारुती ऐसा। त्याचा मी म्हणती जनीं।

निवाला सीव ज्या नामें। ज्या नामें वाल्मीक रुसी।
जें नाम सकळां तारी। तें नाम मज अंतरीं॥

देव हा सर्व अंतरात्मा। वात हा त्याजपासुनी।
वातसुत हनुमंतु। रामसेवक हा जनीं॥

सीव तो राघवा ध्यातो। राम ध्यातो सदासीवा।
सख्यत्वें चालती दोघे। प्रसीध ठाउके जनीं॥

शक्ती ते शक्ती सीवाची। सीवशक्ती समागमें।
औंश जे चंद्रमौळीचे। ते सर्व प्रभुचे सखे॥

येकची अंश विष्णूचे। देवमात्र भुमंडळीं।
येकांशें चालती सर्वै। यालागीं सर्व एकची॥

ऐकती येकमेकांचें। येकमेकांसी पाहाती।
जन्मले जीव ते सर्वै। एक देवची वर्तवी॥

रामउपासना ऐसी। ब्रह्मांडव्यापिनी पाहा।
राम कर्ता राम भोक्ता। रामरूप वसुंधरा॥

विषयो जाहला देवो। नाना सुखें विळासवी।
नाना दुःखें देव कर्ता। त्रासकें शरीरें धरीं॥

भुजंगें डंखितां देव। देव जाला धन्वंतरी।
वारिता मारिता देव। बोलती ते येणें रिती॥

---

१ कारागृहातून सुटका.

शत्रु मित्र देव जाला। सुखदुःखें परोपरीं।
येकासी हांसवी देवो। येकासी रडवीतसे॥
येकासी भाग्य दे देवो। येकासी कष्टें करी।
सर्व कर्तव्यता तेथें। येथें शब्दाचि खुंटला॥
शब्दज्ञान सरों आलें। ज्ञान सर्वत्र संचलें।
जाणती जाणते ज्ञानी। मौन्यगर्भ विचारणा॥

मानपंचक ४. १–२९.

१०. निर्गुणध्यान.

९४. परममार्गाचें वर्णन.

चक्षूचें देखणें सरे। ज्ञानदृष्टि पाहोनि विरे।
देखणेंपणेंविण उरे। सर्वांगदेखणा॥ ५२॥

अखंड चक्षु अर्धोन्मीलित। सकळ देखण्याचा प्रांत।
जेथें अगोचरासहित। मुद्रा आटती॥ ५३॥

श्रवण मनन निजध्यास। साक्षात्कारें जडे विश्वास।
परमानंद सावकाश। होइजे स्वयें॥ ५४॥

मुमुक्षु साधक सिद्ध झाले। तेही येणेंचि मार्गें गेले।
निखळ[1] सुखें सुखावले। महानुभाव॥ ५५॥

योगी वीतरागी उदास। चतुर्थाश्रम जो संन्यास।
दिगंबर नाना तापस। येणेंचि मार्गें॥ ५६॥

जोगी जंगम आणि सोपी। फकीर कलंदर नानारूपी।
येणेंचि मार्गें स्वरूपीं। पावती सकळ॥ ५७॥

---

१ श्रेष्ठ.

ऋषी मुनी आणि सुरवर। आदि करूनियां हरिहर।
यणेंचि मार्गें पैलपार। पावती सकळ॥ ६८॥

मागां जाहाले आतां होती। होऊनि नाहीं पुनरावृत्ति।
ऐसी अभंग ऐक्यस्थिति। वर्तल्यासहित॥ ७०॥

सकळ भक्त मिळाले। हरिहरब्रह्मादि आले।
ऐक्यरूपें राम जाले। रामेंसहित॥ ७०॥

जितुकें दृश्य साकार। आहे अनमेय[1] अपार।
तोंचि उसळलें धूसर। रक्त श्वेत सुगंध॥ ७२॥

पंचभूतीं कर्पूरगोळ। ज्ञानरूपें झाला प्रबळ।
ओवाळूनियां सकळ। निवांत झाले॥ ७३॥

गेला कर्पूर जळोनि। राहिला अनुहतध्वनि।
ऐक्यरूपें समाधानी। सकळ राहिले॥ ७४॥

नि. ध्या. ९४–७४.

.११ जनस्वभावगोसावी.

९९. भोंदू गुरूंचें वर्णन.

अनीती अविवेकी अन्यायी। अभक्त अधर्म लंडाई।
वेदशास्त्र करील काई। तया मूर्खासी॥ १॥

कर्माच्या ठाईं अनादर। नाहीं सगुण साक्षात्कार।
ज्ञान पहातां अंधार। निश्चय नाहीं॥ २॥

उगाच गोष्टी ऐकिल्या। मना आल्या त्या धरिल्या।

[1] अमेय.

रत्नें सोडून एकवटिल्या । शुभा[१] जैशा ॥ ३ ॥

फाल्गुन मासींचा खेळ । जैसा अवघा बाष्कळ ।
तेथें पाहोनि निर्मळ । काय घ्यावें ॥ ४ ॥

प्रत्ययज्ञानेंविण । करी अनुमानाचा शिण ।
शत्रु आपणासि आपण । होऊन राहे ॥ ५ ॥

त्यासी कोणे उमजवावें । मानेल तिकडे न्यावें ।
आंधळें गुरूं स्वभावें । धांवें चहूंकडे ॥ ६ ॥

जिकडे तिकडे ज्ञान झालें । उदंड गोसावी उतले[२] ।
तयांचे संगतीं झाले । बाष्कळ[३] प्राणी ॥ ७ ॥

भ्रष्ट ओंगळ अनाचारी । कुकर्मी अनुपकारी ।
विचार नाहीं अविचारी । जेथें तेथें ॥ ८ ॥

गर्भांधा कैंची परीक्षा । दीक्षाहीनासी दीक्षा ।
प्रमाण मानी प्रत्यक्षा । विवेकहीन ॥ ९ ॥

कशापासून काय झालें । ब्रह्मांड कोणी निर्मिलें ।
कांहीं न कळतां भुंकलें । गाढव जैसें ॥ १०

जें वेदशास्त्रीं मिळेना । अध्यात्म कांहीं कळेना ।
माजला बोका आकळेना । रेडा जैसा ॥ ११ ॥

कोण दीक्षा आहे कैसी । अविवेक स्थिति ऐसी ।
न पाहतां वसवसी[४] । श्वान जैसें ॥ १२ ॥

ऐसे प्रकारींचे जन । चित्तीं अवघा अनुमान ।
प्रतीतीविण ज्ञान । उगेंच बोले ॥ १३ ॥

---

१ गोवऱ्या. २ मातले. ३ मूर्ख, वटवट करणारा. ४ गुरगुरणे.

लक्षण नेणे अवलक्षण । भाग्य नेणे करंटपण ।
ज्ञान नेणे अज्ञान । परम अन्यायी ॥ १४ ॥
एक उपदेश घेती । देवतार्चन टाकून देती ।
धर्मनीति बुडविती । महापाषांडी ॥ १५ ॥
म्हणती आमुचा गुरु । तयाचा अगाध विचारु ।
तेथें अवघा एकंकारु । भेद नाहीं ॥१६ ॥
एक म्हणती गुरु आमुचा । करी अंगिकार विष्ठेचा ॥
तयासारिखा दुजा कैंचा । भूमंडळीं ॥१७ ॥
एक म्हणती एकचि तो । अखंड ओक वर्पितो ।
बरें वाईट पाही तो । गोसावी कैंचा ॥ १८ ॥
अंगीकार करी सौख्याचा । तो गोसावी काशाचा ।
पहा गोसावी आमुचा । गुहाडींत लोळे ॥ १९ ॥
ओक नरक आणि मूत । निःशंक घटघटां घेत ।
लोकांमध्यें मोठा महंत । तया म्हणावें ॥ २० ॥
ओंगळपणाची स्थिती । स्वयें ओंगळ करिती ।
शुचिष्मंत महापंडितीं । मानिजेना ॥ २१ ॥
बरें जैसें जैसें मानलें । तैसें तैसें घेतलें ।
येथें आमुचें काय गेलें । होईना कां ॥ २२ ॥
एक म्हणती अगळा । भूताळा आणि देवताळा ।
जनांमध्यें आग्या वेताळा । चेतऊं जाणें ॥ २३ ॥
म्हणती आमुचा गुरु । जाणे चेटकाचा विचारु ।
भूतें घालून संहारु । समर्थ असे ॥२४ ॥

५ ओरपणें, खादाड रीतीनें खाणे.

म्हणती आमुच्या घरीं। मोठी विद्या पंचाक्षरी।
चेडं चेटकीं नानापरी। लोकांमध्यें ॥ २५ ॥

अखंड राहे ६स्मशानीं। सटवी मेसको मावशाणी।
नाना कुजंत्रें येथुनी। शिकोनि जावीं ॥ २६ ॥

एक म्हणती गोसावी। गारुड्यास वेड लावी।
त्याचे सर्पचि पळवी। चहूंकडे ॥ २७ ॥

कुसळी विद्या दृष्टिबंधन। तत्काळ सभामोहन।
उच्चाटण आणि खिळण। मोहनी विद्या ॥ २८ ॥

आमुचे गोसावी महायोगी। औषधें देती जगालागीं।
नपुंसक वनिता भोगी। चमत्कारें ॥ २९ ॥

आमुचा गोसावी साक्षेपें। अखंड करिती सोनें रुपें।
अंजन साधन त्यापें। काय उणें ॥ ३० ॥

मोठा बडिवार गुरूचा। विंचू उतरी ठाईंचा।
तैसाचि उतार सर्पाचा। ठाईंचा होय ॥ ३१ ॥

जंबुक मुसकें खिळावीं। चोरटीं करावी वोणवीं।
अखंड भूतें राबवावीं। नाना जिनसीं ॥ ३२ ॥

आमुचा गुरु गुप्त होतो। दुजे दिवशीं उमटतो।
अचेतन चालवितो। मोठा ज्ञानी ॥ ३३ ॥

व्याघ्रावरी निःशंक। हातीं सर्पाचा चाबुक।
वांचले होते सहस्र एक। सामर्थ्यबळें ॥ ३४ ॥

दांत पाडोनी निघाले। पांढरे केश काळे झाले।
किती आले आणि गेले। गोसाव्यादेखतां ॥ ३५ ॥

---

६ कपटविद्या. ७ उशीर.

धारबंद नजरबंद । नाना घुटके काम बंद ।
पोर मोहरे नाना बंद । नाना प्रकारें ॥ ३६ ॥

अग्नीमध्यें परी जळेना । लोकांमध्यें परी कळेना ।
देखतां देखतां अस्माना[1] । वेधून जाय ॥ ३७ ॥

जाणें दुसऱ्याचें जीवींचें । वांझपण फेडिलें वांझेचें ।
मन विघडी दंपत्याचें । एकही करी ॥ ३८ ॥

त्याचें मोठें नवल कीं गा । मृत्तिकेच्या करी लवंगा ।
ब्राह्मण समंध अंगा । आणून दावी ॥ ३९ ॥

मातीची साखर केवळ । ढेंकळाचा करी गूळ ।
धोत्र्यांच्या बोंडांचीं केवळ । वाळकें करी ॥ ४० ॥

श्वास कोंडी दिशा कोंडी । पाडी तिडकेनें मुरकुंडी ।
धडा माणसाची मान वांकडी । करून मोडी ॥ ४१ ॥

ऐशापरीच्या करामती । भोंपळें पोटांत चढविती ।
मनुष्याचे पशु करिती । निमिषमात्रें ॥ ४२ ॥

गुरु भविष्य सांगती । रेड्याकरवीं वेद म्हणविती ।
गधड्याकरवीं पुराणें सांगविती । सामर्थ्यबळें ॥ ४३ ॥

कुतऱ्याकरवीं रागोद्धार । । कोंबड्याकरवीं तत्त्वविचार ।
खेचर आणि भूचर । सकळ बाधी ॥ ४४ ॥

घुटका घटकेनें करावा । फुटका कवडा वेचों न द्यावा ।
उदंड बचनाग साधावा । येकायेकीं ॥ ४५ ॥

वाळलीं काष्ठें हिरवाळलीं[2] । आंधळीं डोळसें झालीं ।
पांगुळें धांवों लागलीं । चहूंकडे ॥ ४६ ॥

---

१ आकाश. २ हिरवी झालीं, पल्लवित झालीं.

गर्भिणीस कन्या कीं पुत्र । हें ठाउकें आहे यंत्र ।
गोसाव्यांनीं विद्यामात्र । अभ्यासिली ॥ ४७ ॥

भांडविद्या अभ्यासिली । तस्करविद्या कळों आली ।
विचारें पाहिली । वसुंधरा ॥ ४८ ॥

आमुचे गुरु अधिक गुणें । डोईचें करी रांधणें ।
लोकांचे नवस पुरवणें । नानाप्रकारें ॥ ४९ ॥

मेले प्राणी उठविले । साकरेचें मीठ केलें ।
गटगटां अग्नीस गिळिलें । काय सांगों ॥ ५० ॥

गोसावी समाधीस बैसला । दुसरे वेळे उघडून पाहिला ।
पूर्वेचा पश्चिमेस गेला । अकस्मात् ॥ ५१ ॥

लिंगाचे तुकडे तोडिती । कोटिलिंगें एकचि करिती ।
मोजवून दाळी[1] चारिती । पाषाणनंदी ॥ ५२ ॥

आसन घातलें जळावरी । पाहतां तो पैलतिरीं ।
आमुचा गुरु समुद्रावरी । चालत जातो ॥ ५३ ॥

पुरुषाची करी वनिता । वनितेचा पुरुष मागुता ।
अन्न खाऊन तत्वतां । दिशा[2] नाहीं ॥ ५४ ॥

नानाजिन्नसी अन्न खाणें । परी उदक नाहीं घेणें ।
शापून भस्माचि करणें । ऐसा गुरु ॥ ५५ ॥

अन्न उदंडचि खाणें । किंवा उपवास करणें ।
गोमुख तोंडें जेवणें । यथासांग ॥ ५६ ॥

गुरु वाघासी भेटला । वाघें चरचरा चाटिला ।
वस्त्रें बांधोनी आणिला । घरास वाघ ॥ ५७ ॥

---

१ डाळ २ शौच

गोसावी वाघ होतो । दुसऱ्या वाघासी मारितो ।
भुंकभुंकोनि मरतो । उतार नाहीं ॥ ५८ ॥

साधी बाळंतिणीची खापरी[1] । वोहरें[2] साधी नानापरी ।
तूप घे घागरीच्या घागरी । गुरु आमुचा ॥ ५९ ॥

मेल्या माशा उठविती । तुळसी देवावरी पाडिती ।
ऐशा नाना करामती । भूमंडळीं ॥ ६० ॥

अमुच्या गुरूची मोठी महंती । नाना अभक्ष भक्षिती ।
लोकांदेखतां फुलें करिती । मद्यमांसाचीं ॥ ६१ ॥

एक गोसावी पृथ्वीवरी । त्याची कोणी न पवे सरी ।
जेथें बैसे तेथें वोहरीं । सावकाश करी ॥ ६२ ॥

एक गोसावी महा भला । पोरीं वाळवंटीं पुरिला ।
येक तो पडोनिच राहिला । कित्येक दिवस ॥ ६३ ॥

येक गोसावी भाग्य देती । एक गोसावी पुत्र देती ।
गोसाव्यानें नवस चालती । नानाप्रकारें ॥ ६४ ॥

जें जें मनामध्यें चिंतावें । तें तें गोसाव्यांनीं जाणावें ।
चुकलें ठेवणें काढून द्यावें । नाना प्रकारें ॥ ६५ ॥

सुडक्यामध्यें[3] लाह्या भाजिती । थोड्या द्रव्याचें उदंड करिती ।
पराचीं खबुत्रें नाचविती । नाना प्रकारें ॥ ६६ ॥

हारपलें सांपडून द्यावें । चोरटें तात्काळ धरावें ।
थोडें अन्न पुरवावें । बहुत जनांसी ॥ ६७ ॥

ऐसें वर्ततें लोकीं । येणें सार्थक नव्हे कीं ।
अध्यात्मविद्या विवेकी । जाणतसे ॥ ६८ ॥

---

१ कवची, परटी. २ जादूटोणा. ३ जुने फडके.

पिंडज्ञान तत्त्वज्ञान । आत्मज्ञान ब्रह्मज्ञान ।
पिंडब्रह्मांड सकळ शोधून । राहिलें जें ॥ ६९ ॥

पदार्थज्ञानाचा बडिवार । त्याहूनि थोर ईश्वर ।
ऐसे प्राणी लहान थोर । सकळ जाणती ॥ ७० ॥

ज. गो. १–७०.

१२ राममंत्राचे श्लोक.

९६. हरे राम हा मंत्र सोपा जपा रे.

नको शास्त्रअभ्यास वित्पत्ति मोठी ।
जडे गर्व ताठा अभीमान पोटीं ।
कसा कोणता नेणवे आजपा रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥

खुळे[1] हस्तपादादि हे भग्न होती ।
दिठी मंद होऊनियां कर्ण जाती ।
तनू कंप सर्वांगि होती कळा रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥

कफें कंठ हा रुद्ध होईल जेव्हां ।
अकस्मात् तो प्राण जाईल तेव्हां ।
तुला कोण तेथें सखे सोयरे रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥

१ लुले.

दुराशा नको रे परस्त्रीधनाची।
नको तूं करूं नीच सेवा जनाची।
पराधीन कैसा मला दीससी रे।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे॥

नको योग अष्टांग तो रोध प्राणा।
नको कृच्छ्रचांद्रायणीं हट्ट जाणा।
अपभ्रंश हा मार्ग कीं वोखटा रे।
हरे राम हा मंत्र सोपा रे॥

तपस्वी मनस्वी भले पार गेले।
दुजी सृष्टिकर्ते असे थोर मेले।
चिरंजीव कल्पायु गेले किती रे।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे॥

नको सांग छंदें करूं ढोंग कांहीं।
नको शिष्यशाखा मठीं सुख नाहीं।
महंतीमुळें नाश होतो तपा रे।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे॥

कलीं साधनें याविणें सर्व निंदीं।
हरे राम हा मंत्र जो त्यासि वंदीं।
हरे राम हे मालिका साधकां रे।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे॥

रा. श्लो. (८).

१३ करुणाष्टकें.

९७. रघुनायेका मागणें हेंचि आतां.

उदासीन हे वृत्ति जीवीं धरावी । अती आदरें सर्व सेवा करावी ।
सदा प्रीति लागो तुझे गूण गातां । रघुनायेका मागणें हेंचि आतां ॥१॥
तुझें रूपडें लोचनीं म्या पहावें । तुझे गूण गातां मनासी रहावें ।
उठो आवडी भक्तिपंथेंचि जातां । रघुनायेका मागणें हेंचि आतां ॥ २ ॥
मनीं वासना भक्ति तुझी करावी । कृपाळूपणें राघवें पूरवावी ।
वसावें मज अंतरीं नाम घेतां । रघुनायेका मागणें हेंचि आतां ॥ ३ ॥
सदा सर्वदा योग तूझा घडावा । तुझे कारणीं देह माझा पडावा ।
नुपेक्षीं मज गुणवंता अनंता । रघुनायेका मागणें हेंचि आतां ॥ ४ ॥
नको द्रव्यदारा नको येरझारा । नको मानसीं ज्ञानगर्वें फुगारा ।
सगुणीं मज लाविं रे भक्तिपंथा । रघुनायेका मागणें हेंचि आतां ॥ ५ ॥
भवें व्यापलों प्रीति छाया करावी । कृपासागरें सर्व चिंता हरावी ।
मज संकटीं सोडवावें समर्था । रघुनायेका मागणें हेंचि आतां ॥६॥
मनीं कामना कल्पना ते नसावी । कुबुद्धी कुडी वासना नीरसावी ।
नको संशयो तोडिं संसारवेथा । रघुनायेका मागणें हेंचि आतां ॥७॥
समर्थापुढें काय मागों कळेना । दुराशा मनीं बैसली हे ढळेना ।
पुढें संशयो नीरसीं सर्व चिंता । रघुनायेका मागणें हेंचि आतां ॥८॥
ब्रिदाकारणें दीन हातीं धरावें । म्हणे दास भक्तांसि रे उधरावें ।
सुटो ब्रीद आम्हासि सांडूनि जातां । रघुनायेका मागणें हेंचि आतां ॥९॥

९८. उदासीन हा काळ कोठें न कंठे.

समाधान साधुजनाचेनि योगें । परी मागुतें दुःख होतें वियोगें ।
घडीनें घडी सीण अत्यंत वाटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ १ ॥

घरें सुंदरें सौख्य नानापरीचें। परी कोण जाणेल तें अंतरींचें।
मनीं आठवितांचि तो कंठ दाटे। उदासीन हा काळ कोठें न कंठे॥ २॥
बळें लावितां चित्त कोठें जडेना। समाधान तें कांहिं केल्या घडेना।
नव्हे धीर नेनीं[1] सदा नीर लोटे। उदासीन हा काळ कोठें न कंठे॥ ३॥
आवस्था मनीं लागली काय सांगों। गुणीं गुंतला हेत कोण्हासि मागों।
बहुसाल भेटावया प्राण फूटे। उदासीन हा काळ कोठें न कंठे॥ ४॥
कृपाळूपणें भेट रे रामराया। वियोगें तुझ्या सर्व व्याकूळ काया।
जनामाजि लोकीक हा हीं न सूटे। उदासीन हा काळ कोठें न कंठे॥५॥
आहा रे विधी तां असें काय केलें। पराधेनता पाप माझें उदेलें।
बहुतांमधें तूकतां[2] तूक तूटे। उदासीन हा काळ कोठें न कंठे॥ ६॥
समर्था मनीं सांडि माझी नसावी। सदा सर्वदा भक्तचिंता असावी।
घडेना तुझा योग हा प्राप्त खोटें। उदासीन हा काळ कोठें न कंठे॥ ७॥
अखंडित हें सांग सेवा घडावी। न होतां तुझी भेटि काया पडावी।
दिसेंदीस आयुष्य हें व्यर्थ आटे। उदासीन हा काळ कोठें न कंठे॥ ८॥
भजा काय सर्वां परी हीण देवा। करूं काय रे सर्व माझाचि ठेवा।
म्हणों काय मी कर्म रेखा न लोटे। उदासीन हा काळ कोठें न कंठे॥९॥
म्हणे दास मी वा[3]स पाहें दयाळा। रघुनायेका भक्तपाळा भुपाळा।
पहावें तुला हें जिवीं आर्त[4] मोठें। उदासीन हा काळ कोठें न कंठे॥१०॥

९९. नसे भक्ति ना ज्ञान.

नसे भक्ति ना ज्ञान ना ध्यान कांहीं। नसे प्रेम हें रामविश्राम नाहीं।
असा दीन अज्ञान मी दास तुझा। समर्था जनीं घेतला भार माझा॥१॥
रघुनायेका जन्मजन्मांतरींचा। अहंभाव छेदूनि टाकीं दिनाचा।
जनीं बोलती दास या राघवाचा। परी अंतरीं लेश नाहीं तयांचा॥ २॥

---

१ नयन, डोळा. २ वजन करणं. ३ वाट. ४ इच्छा.

दिनाचें उणें दीसतां लाज कोण्हा। जनीं दास दीसे तुझा दैन्यवाणा।
सिरीं स्वामि तूं रामपूर्णप्रतापी। तुझा दास पाहें सदा सीघ्रकोपी ॥ ३ ॥
रघुनायेका दीन हातीं धरावें। अहंभाव छेदूनियां उधरावें।
अगुणी तयालागीं गुणी करावें। समर्थे भवसागरीं उतरावें ॥ ४ ॥
किती भार घालूं रघुनायेकाला। मजकारणें सीण होईल त्याला।
दिनानाथ हा संकटीं धांव घालीं। तयाचेन हे सर्व काया निवाली ॥५॥
मज कोंवसा[१] राम कैवल्यदाता। तयाचेन हे फीटली सर्व चिंता।
समर्था तया काय उत्तीर्ण व्हावें। सदा सर्वदा नाम वाचे म्हणावें ॥ ६ ॥

१००. सर्वोत्तमा कैं मज भेट देसी.

दुःखानळें मी संतप्त देहीं। तुजवीण रामा विश्रांति नाहीं।
आधार तुझा मज मी विदेसीं। सर्वोत्तमा कैं मज भेटि देसी ॥ १ ॥
प्रालब्ध खोटें आभिमान आला। स्वामी समर्था वियोग जाला।
तेणें बहु क्षीति वाटे मनासी। सर्वोत्तमा कैं मज भेटि देसी ॥ २ ॥
तुझिया वियोगें बहु वेधना रे। विवेक नाहीं आम्हां दिनां रे।
पडिला समंधु या दुर्जनेसीं। सर्वोत्तमा कैं मज भेटि देसी ॥ ३ ॥
संसारचिंता मज वाटते रे। रामा प्रपंचीं मन जातसे रे।
संसर्ग आहे इतरां जनासीं। सर्वोत्तमा कैं मज भेटि देसी ॥४॥

१०१. रघुविरभजनाचीं.

रघुविरभजनाची मानसीं प्रीति लागो।
रघुविरस्मरणाची अंतरीं वृत्ति जागो।
रघुविरचरणाची वासना वास मागो।
रघुविरगुण गातां वाणि हे नित्य सांगों ॥ १ ॥

---

१ रक्षण करणारा, आश्रय.

चतुरपण जनीं हें पाहतां आढळेना ।
निकट रघुविराचें रूप कैसें कळेना ।
चपळ मन वळेना गर्वताठा गळेना ।
तुजविण जगदीशा कर्मरेखा टळेना ॥ २ ॥

तरुणपण देह्याचें लोपतां वेळ नाहीं ।
तन मन धन अंतीं वोसरे सर्व कांहीं ।
सकळ जन बुडाले वेर्थ मायाप्रवाहीं ।
झडकरि सुमना रे हीत शोधूनि पाहीं ॥ ३ ॥

पळपळ चळताहे बाळ तारुण्य देहीं ।
तळमळ विषयांची नेणवे हीत कांहीं ।
लळलळ गरळा तो काळ लाळीत[1] आहे ।
जळजळ सितळा हे भक्ति सेऊनि राहे ॥ ४ ॥

दिनकरकुळवल्ली लोटली आंगभारें ।
रघुविरअवतारें दाटली थोरथोरें ।
सुखरूप सुखवासि राहिले योगरासी ।
सफळ सितळ छाया फावली रामदासीं ॥ ५ ॥

१०२. जनीं जाणिजे योग हा सुकृताचा.

मनासारिखी सुंदरा ते अन्यया । मनासारिखे पुत्र ज्यामात कन्या ।
सदा सर्वदा बोलती रम्य वाचा । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥१॥

भलीं मायबापें भले मित्र बंधु । भले सोयरे राखती स्नेहवादु ।
मुलें लेंकुरें येक मेळा सुनांचा । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥२॥

भले धाकुटे थोरले सर्व कांहीं । भले गोत्रजु भिन्न भावार्थ नाहीं ।
अखंडीत हा काळ जातो सुखाचा।जनीं जाणिजे योग हा सुकृताचा॥३॥

---

१ लाळ टाकणें.

धनें धान्य पात्रें अळंकार चीरें[1] । विसोंरें[2] घरें सुंदरें रम्य सारे ॥
देहे चालतो सर्व आरोग्य ज्याचा । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥ ४ ॥

मनासारिखे ग्राम ग्रामाधिकारी । मनासारिखे लोक शोकापहारी ।
मनासारिखा संग साधुजनाचा । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥ ५ ॥

मनासारिखें चिंतितां देव पावे । मनासारिखे भक्त भावें मिळावे ।
सदा बोलती बोल सारांश वाचा । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥ ६ ॥

म्हणे दास सायास केल्यां घडेना । विकल्पें जनीं एक ठाईं पडेना ।
घडे योग होतां विवेकी जनाचा । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥ ७ ॥

१०३. अनुदिनिं अनुतापें.

अनुदिनिं अनुतापें तापलों रामराया ।
परम दिनदयाळा नीरसीं मोहमाया ॥
अचपळ मन माझें नावरे आवरीतां ।
तुजविण शिण होतो धांव रे धांव आतां ॥ १ ॥

भजनरहित रामा सर्वही जन्म गेला ।
स्वजनजनधनाचा व्यर्थ म्यां स्वार्थ केला ॥
रघुपति मति माझी आपुलीशी करावी ।
सकळ त्यजुनि भावें कांस तूझी धरावी ॥ २ ॥

विषयजनित सूखें सूख होणार नाहीं ।
तुजविण रघुनाथा ओखटें[3] सर्व कांहीं ॥

१ वस्त्रें. २ विश्रांतिस्थानें. ३ व्यर्थ.

रघुकुळटिळका रे हीत माझें करावें।
दुरित दुरि रहावें म्यां स्वरूपीं भरावें ॥ ३ ॥
तन मन धन माझें राघवा रूप तूझें।
तुजविण मज वाटे सर्व संसार ओझें ॥
प्रचलित न करावी सर्वथा बुद्धि माझी।
अचल भजनलीला लागली आस तूझी ॥ ४ ॥

चपळपण मनाचें मोडितां मोडवेना।
सकळ स्वजनमाया तोडितां तोडवेना ॥
घडिंघडि विघडे हा निश्चयो अंतरींचा।
म्हणवुनि करुणा हे बोलतों दीन वाचा ॥ ५ ॥

जळत हृदय माझें जन्म कोट्यानुकोटी।
मजवरि करुणेचा राघवा पूर लोटी ॥
तळमळ निववीं रे राम कारुण्यसिंधू।
षड्रिपुकुळ माझें तोडिं याचा समंधू ॥ ६ ॥

तुजविण करुणा हे कोण जाणेल माझी।
शिणत शिणत पोटीं पाहिली वाट तूझी ॥
झडकरि झड घालीं धांव पंचानना रे।
तुजविण मज नेते जंबुकी वासना रे ॥ ७ ॥

सबळ जनक माझा राम लावण्यपेटी।
म्हणवुनि मज पोटीं लागली आस मोठी ॥
दिवस गणित बोटीं प्राण ठेवोनि कंठीं।
अवचट मज भेटी होत घालीन मीठी ॥ ८ ॥

जननिजनकमाया लेंकरूं काय जाणें।
पय न लगत मखीं हाणितां वत्स नेणे ॥

जलधरकणआशा लागली चातकासी ।
हिमकर अवलोकी पक्षिया भूमिवासी ॥ ९ ॥
तुजविण मज तैसें जाहलें रामराया ।
विलग विषम काळीं सांडिती सर्व माया ॥
सकळजनसखा तूं स्वामि आणीक नाहीं ।
विषय वमन जैसें त्यागिलें सर्व कांहीं ॥ १० ॥
स्वजनजनधनाचा कोण संतोष आहे ।
रघुपतिविण आतां चित्त कोठें न राहे ॥
जिवलग जिव घेती प्रेत सांडोनि देती ।
विषय सकळ नेती मागुता जन्म देती ॥ ११ ॥
सकळजन भवाचे आखिले वैभवाचे ।
जिवलग मज कैंचे चालतें हेंच साचें ॥
विलग विषमकाळीं सांडिती सर्व माळी ।
रघुवर सुखदाता सोडवी अंतकाळीं ॥ १२ ॥
सुख सुख म्हणतां तें दुःख ठाकोनि आलें ।
भजन सकळ गेलें चित्त दुश्चित्त झालें ॥
भ्रमुनि मन कळेना हीत तें आकळेना ।
परम कठिण देहीं देहबुद्धी गळेना ॥ १३ ॥
उपरति मज रामीं जाहली पूर्णकामीं ।
सकळभ्रमविरामीं[1] रामविश्रामधामीं ॥
घडि घडि मन आतां रामरूपीं भरावें ।
रघुकुळटिळका रे आपुलेसें करावें ॥ १४ ॥
जळचर जळवासी नेणती त्या जळासी ।
निशिदिनिं तुजपाशीं चूकलों गूणराशी ॥

१ जेथें सकळभ्रम विराम पावतात असा.

भुमिधरनिगमांसी वर्णवेना तयासी ।
सकळभुवनवासी भेटि दे रामदासीं ॥ १५ ॥

१०४. तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलों.

असंख्यात ते भक्त होऊनि गेले ।
तिहीं साधनांचे बहू कष्ट केले ॥
नव्हे कार्यकर्ता भुमीभार झालों ।
तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलों ॥ १ ॥
बहू दास ते तापसी तीर्थवासी ।
गिरीकंदरीं भेटि नाहीं जनासी ॥
स्थिती ऐकतां थोर विस्मीत झालों ।
तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलों ॥ २ ॥
सदा प्रेमळांसी तयां भेटलासी ।
तुझ्या दर्शनें स्पर्शनें पुण्यराशी ॥
अहंता मनीं शब्दज्ञानें बुडालों ।
तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलों ॥ ३ ॥
तुझ्या प्रीतिचे दास जन्मासि आले ।
असंख्यात ते कीर्ति बोलोनि गेले ॥
बहू धारणा थोर चकीत[१] झालों ।
तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलों ॥ ४ ॥
बहूसाल देवालयें हाटकाचीं[२] ।
रसाळा कळा लाघवें नाटकाचीं ॥
पुजा देखतां जाड जीवीं गळालों ।
तुझा दास मी व्यर्थ जन्मासि आलों ॥ ५ ॥

---

१ आश्चर्यचकित. २ सोन्याचीं.

कितेकीं देह त्यागिले तूजलागीं।
पुढें जाहले संगतीचे विभागी॥
देहदुःख होतांचि वेगें पळालों।
तुझा दास मी व्यर्थ जन्मासि आलों॥ ६॥

सदासर्वदा राम सोडोनि कामी।
समर्था तुझे दास आह्मीं निकामी॥
बहू स्वार्थबुद्धीन रे कष्टवीलों।
तुझा दास मी व्यर्थ जन्मासि आलों॥ ७

किती योगमूर्ती किती पुण्यमूर्ती।
किती धर्मसंस्थापना अन्नशांति॥
परस्तावलों कावलों तप्त झालों।
तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलों॥ ८॥

१०६. रघूनायका, काय कैसें करावें

उदासीन हा काळ जातो गमेना।
सदा सर्वदा थोर चिंता शमेना॥
उठे मानसीं सर्व सोडोनि जावें।
रघूनायका काय कैसें करावें॥ १॥

जनीं बोलतां बोलतां वीट वाटे।
नसे अंतरीं सूख कोठें न कंठे॥
घडीनें घडी चित्त कीती धरावें।
रघूनायका काय कैसें करावें॥ २॥

बहू पाहतां अंतरीं कोंड होतो।
शरीरास तो हेत सांडोनि जातो॥

उपाधीस देखोनि वाटे सरावें ।
रघूनायका काय कैसें करावें ॥ ३ ॥

अवस्था मनीं होय नानापरींची ।
किती काय सांगू गती अंतरींची ॥
विवेकेंचि या मानसा आवरावें ।
रघूनायका काय कैसें करावें ॥ ४ ॥

म्हणे दास ऊदास झालों दयाळा ।
जनीं व्यर्थ संसार हा वांयचाळा[1] ॥
तुझा मी तुला पूसतों प्रेमभावें ।
रघूनायका काय कैसें करावें ॥ ५ ॥

१०६. रामाचा धांवा.

धांव रे रामराया किती अंत पाहासी ॥ ध्रु० ॥

प्राणांत मांडिलासे नये करुणा कैशी ।
पाहीन धणिभरी चरण झाडीन केशीं ।
नयन शिणले बा आतां केधवां येशी ॥ १ ॥

मीपण अहंकारें अंगीं भरला ताठा ।
विषयकर्दमांत लाज नाहीं लोळतां ।
चिळस उपजेना ऐसें जालें बा आतां ॥ २ ॥

मारुतिस्कंधभागीं शीघ्र बैसोनि यावें ।
राघवें वैद्यराजें कृपाऔषध द्यावें ।
दयेचे पद्महस्त माझे शिरीं ठेवावे ॥ ३ ॥

या भवीं रामदास थोर पावतो व्यथा ।

---

१ वायफळ खेळ.

कौतुक पाहतोसी काय जानकीकांता ।
दयाळा दीनबंधो भक्तवत्सला ताता ॥ ४ ॥

१०७. बुद्धि दे रघुनायका.

युक्ति नाहीं बुद्धि नाहीं विद्या नाहीं विवंचितां ॥
नेणता भक्त मी तूझा बुद्धि दे रघुनायका ॥ १ ॥
मन हें आवरेना कीं वासना वावडे सदा ।
कल्पना धांवते सैरा बुद्धि दे रघुनायका ॥ २ ॥
अन्न नाहीं वस्त्र नाहीं सौख्य नाहीं जनांमधें ।
आश्रयो पाहतां नाहीं बुद्धि दे रघुनायका ॥ ३ ॥
बोलतां चालतां येना कार्यभाग कळेचिना ।
बहु मी पीडिलों लोकीं बुद्धि दे रघुनायका ॥ ४ ॥
तुझा मी टोणपा झालों कष्टलों बहुतांपरी ।
सौख्य तों पाहतां नाहीं बुद्धि दे रघुनायका ॥ ५ ॥
नेटकें लिहितां येना वाचितां चुकतों सदा ।
अर्थ तो सांगतां येना बुद्धि दे रघुनायका ॥ ६ ॥
प्रसंग वेळ तर्केना सुचेना दीर्घसूचना ।
मैत्रिकी राखितां येना बुद्धि दे रघुनायका ॥ ७ ॥
कळेना स्फूर्ति होईना आपदा लागली बहु ।
प्रत्यहीं पोट सोडीना बुद्धि दे रघुनायका ॥ ८ ॥
संसार नेटका नाहीं उद्वेग् वाटतो जिवीं ।
परमार्थू कळेना कीं बुद्धि दे रघुनायका ॥ ९ ॥
देईना पुर्विना कोणी उगेंचि जन हांसती ।
विसरू पडतो पोटीं बुद्धि दे रघुनायका ॥ १० ॥

पिशुनें वाटतो सर्वे कोणीही मजला नसे ।
समर्था ! तूं दयासिंधू बुद्धि दे रघुनायका ॥ ११ ॥
उदास वाटतें जीवीं आतां जावें कुणीकडे ।
तूं भक्तवत्सला रामा बुद्धि दे रघुनायका ॥ १२ ॥
कायावाचामनोभावें तुझा मी म्हणवीतसें ।
हे लाज तूजला माझी बुद्धि दे रघुनायका ॥ १३ ॥
सोडवील्या देवकोटी भूभार फेडिला बळें ।
भक्तांसि आश्रयो मोठा बुद्धि दे रघुनायका ॥ १४ ॥
उदंड भक्त तुम्हांला आम्हांला कोण पूसतें ।
ब्रीद हें राखणें आधीं बुद्धि दे रघुनायका ॥ १५ ॥
उदंड ऐकिली कीर्ति पतीतपावना प्रभो ।
मी एक रंक दुर्बुद्धि बुद्धि दे रघुनायका ॥ १६ ॥
आशा हे लागली मोठी दयाळू बा दया करी ।
आणीक नलगे कांहीं बुद्धि दे रघुनायका ॥ १७ ॥
रामदास म्हणे माझा संसार तुज लागला ।
संशय वाटतो पोटीं बुद्धि दे रघुनायका ॥ १८ ॥

१०८. रामदासांस कफव्यथा झाली असतां त्यांनीं केलेलें मारुतीचें करुणाष्टक.

फणिवर उठवीला वेग अद्भूत केला ।
त्रिभुवनजनलोकीं कीर्तिचा घोष केला ॥
रघुपतिउपकारें दाटले थोर भारें ।
परम धिर उदारें रक्षिलें सौख्यकारें ॥ १ ॥
सबळ दळ मिळालें युद्ध ऊदंड झालें ।
कपिकटक निमालें पाहतां येश गेलें ॥

परदळ शरघातें कोटिच्या कोटि प्रेतें ।
अभिनव रणपातें दुःख बीभीषणातें ॥ २ ॥

कपिरिसघनदाटीं जाहली थोर दाटी ।
म्हणवुनी जगजेठी धांवणें चार कोटी ॥
मृत विर उठवीले मोकळे सिद्ध झाले ।
सकळ जन निवाले धन्य सामर्थ्य चाले ॥ ३ ॥

बहु प्रिय रघुनाथा मुख्य तूं प्राणदाता ।
उठवि मज अनाथा दूर सारूनि वेथा ॥
झडकरि भिमराया तूं करीं दृढ काया ।
रघुविरभजना या लागवेगेंचि जाया ॥ ४ ॥

तुजविण मजलागीं पाहतां कोण आहे ।
म्हणवुनि मन माझें तूझि रे वास पाहे ॥
मज तुज निरवीलें पाहिजे आठवीलें ।
सकळिक निजदासांलागि सांभाळवीलें ॥ ५ ॥

उचित हित करावें उद्धरावें धरावें ।
अनुचित न करावें त्वां जनीं येश घ्यावें ॥
अघटित घडवावें सेवका सोडवावें ।
हरिभजन घडावें दुःख तें वीघडावें ॥ ६ ॥

प्रभुवर विरराया जाहली वज्रकाया ।
परदळ निवटाया दैत्यकुळें कुडाया[1] ॥
गिरिवर तुडवाया रम्य वेशें नटाया ।
तुजचि अलगडाया ठेविलें मुख्य ठाया ॥ ७ ॥

---

१ ठार मारण्यास.

बहुत सबळ सांठा मागतों अल्पवाटा ।
न करित हित कांटा थोर होईल ताठा ॥
कृपणपण नसावें भव्य लोकीं दिसावें ।
अनुदिन करुणेचें चिन्ह पोटीं वसावें ॥ ८ ॥
जलधर करुणेचा अंतरामाजी राहो ।
तरि तुज करुणा हे कां न ये सांग पाहों ॥
कठिण हृदय झालें काय कारुण्य केलें ।
न पवसि मज कां रे म्यां तुझें काय केलें ॥ ९ ॥
वडिलपण करावें सेवका सांवरावें ।
अनहित न करावें तूर्त हातीं धरावें ॥
निपटाचि हटवादें प्रार्थिला शब्दभेदें ।
कपि घन करुणेचा बोलला राम तेथें ॥ १० ॥
बहुताचि करुणा ही लोटली देवराया ।
सहजचि कफ गेलें जाहली दृढ काया ॥
परम सुख विलासे सर्वदा दासनूसे ।
पवनज तनुतोषें वंदिला सावकाशें ॥ ११ ॥

१४. ऐतिहासिक.

१०९. समर्थांचें स्वहस्तलिखित पत्र.

श्रीरामसमर्थ.

उत्तमगुणाळंकृत रघुनाथभक्तिपरायेण परोपकार राज्यमान्य राजेश्री रघुनाथभट गोसावी यांसी स्नेहपूर्वक सूचना. तुमचा निरोप घेउनु हेलवाकीहून स्वार जालों तें सुखरूप चाफलास पावलों. संकल्पाची समारादनाही झाली पुढें शरीराचा उपचार ही हळुहळु होतो. तुमचें मन मजवरि बहुत आहे तें तुमचे

आवडीच्या गुणें कल्याण होईल ऐसें नेमस्त[1] चिन्ह दिसतें. आपण ते कर्कष सीतलाईमधें बहुताचि श्रम पावलों, तो माझा सकळ श्रम घेउनु निरोप दिधला तो देव जाणे येविसीं चीत चमत्कारलें तें पत्रीं किती म्हणौनु लेहावें ? माझें अरिष्ट तुह्मीं घेऊन मज उष्ण देशासी पाठविलें हा उपकार श्रीरघुनाथजीस जाला. मज रघुनाथजीवेगलें कोण्ही जिवलग नाहीं; आपण जाल' समाचार रघुनाथजीस विदित केला या उपरी माझे ठाईं तुम्हीं आहा. रघुनाथकृपेचा प्रत्यये तुम्हास आलियावरी प्रचितीसीं कलों येईल. बहुत काये लेहावें ? वेदमूर्ती दिवाकरभट गोसांवी तेथें आलियावरी तुम्हीं माझा समाचार घेयासी ये प्रांतास आले पाहिजे. स्नेह बहुत असों दीजे हा पत्रार्थ. हें इतकें म्यां आवडीच्या कलवळ्यानें लिहिलें आहे मनें मन साक्ष असेल. परंतु तुम्हांस उपचारसा वाटोन रंजीस[2] होल तरी न होणें. जैसा दिवाकरभट तैसे तुम्हीं हा इत्यर्थ आहे बरें कललें पाहिजे. तुमचा आमचा येकांत प्रसंग जालियावरी मग ऐसें लिहितां न ये, म्हणौनि संधीमधें प्रसंग फावला पुढें फावेना म्हणौनि लांबेकरून[3] लिहिलें. वरकड इतर भाव मनामध्यें असेल तरी रघुनाथ साक्ष असे. तुम्हीं रंजीस न होणें आणि जे आहे ते लिहिलें यांमधें मिथ्या स्तुती नाहीं. तुम्ही सर्वज्ञ आहा. तुमचें जें कांहीं आहे तें सकल माझेंचि आहे. म्या मज माझ्या मनास येईल तैसें लिहिलें येथें तुमचें काये गेलें ? कांहीं चिंता न कीजे. तुम्हीं आमचेचि आहा, तुम्ही आम्ही सकल देवाचे आहों. शरीरभेदावरी न जाणे अंतरस्थिति पाहिल्याउपरी कलों येईल.

—सांप्रदायिक कागदपत्रें.

१ निश्चयपूर्वक. २ असंतोष. ३ विस्तारपूर्वक.

११०. रामदासांचें महंतास पत्र.

विवेक जालियां देवाचा योग । मग होणार नाहीं वियोग ।
देव सर्वांचें अंतरंग । अखंडित भेटी ॥

या समाधानें असावें । निरूपणीं विवरावें ।
मानसपूजनें आठवावें । सकळ कांहीं ॥
ऋणानबंधें भेटी होईल । परस्परें समाचार कळेल ।
सहज वर्तमान निवळेल । ते प्रसंगीं ॥

कांहीं समुदाव[1] करणें । ये विषीं आलस्य न करणें ।
आलस्य करितां उदंड उणें । दिसेल परमार्थी ॥
पोहोणारें बुडते तारावे । सामर्थ्यें बुडों नेदावे ।
मूर्ख ते शाहाणे करावे । विवेकी पुरुषें ॥
आपणाहुन जो धींग[2] । त्यासी करूं नये प्रसंग ।
आपणाधीन जो प्रसंग । तोचि करावा ॥
सोईऱ्याधाईऱ्याचीं मुलें । तीक्षण बुधीचीं सखोलें ।
तयासी बोलणें मृद बोलें । करित जावें ॥

त्याचा संसार समाचार । पुसत जावा विस्तार ।
उदंड सांगतां तत्पर । होऊनि ऐकावें ॥

दुःख ऐकतां दुःख जातें । त्याचें दुःख हळु होतें ।
मग तें सर्वेंचि धरितें । मित्रभावें ॥
निकट मित्रि बरी होतां । मग त्यासी न्यावें येकांता ।
म्हणावें रे भगवंता । कांहीं तऱ्हीं भजावें ॥
पूर्वीं देव पूजिला नव्हता । म्हणोनि आली दरिद्रता ।
या कारणें अनंता । कांहीं तऱ्ही भजावें ॥

---

१ शिष्यसमुदाय. २ वरचढ.

मान्य होतां जप सांगावा । मग तो इकडे पाठवावा ।
मग तयाचा सकळ गोवा । उगऊं आम्हीं ॥

—विविधविषय १. १४१–१४२.

१११. सुंदरमठ.

परंतु येकवचनी देव एक । जेणें सोडिले देव अनेक ।
सेवाहीन मी सेवक । त्याचा म्हणवी ॥
समर्थें अंगिकार केला । नाना संकटीं रक्षिला ।
त्याचिया अन्नें पिंड वाढविला । जन्मवरी ॥
मारुतीसारिखे सेवक । तेथें मी मानवी रंक ।
नवल सामर्थ्याचें कौतुक । काय सांगों ॥
समर्थ आणि दीननाथ । वैभवें समर्थाहून समर्थ ।
जेणें माझे मनोरथ । पूर्ण केले ॥
जें जें मनें अभिळासिलें । तें तें समर्थें पुरविलें ।
मज दीनास वाढविलें । मर्यादेवेगळें ॥
समर्थानें समर्थ करावें । तरीच समर्थ म्हणवावें ।
त्रैलोक्यास पडिलें ठावें । सामर्थ्य ज्याचें ॥
देवमात्र जाजावला । म्हणोनि कैपक्षी पावला ।
भुवनकंटक निर्दाळिला । दशमुख शत्रु ॥
जिहीं त्रैलोक्य जिंकिलें । त्यास मर्कटाहातीं मारविलें ।
भुवनत्रय आनंदविलें । दाशरथीनें ॥
बिभीषणास दिधली लंका । सुरवरांची फिटली शंका ।
समर्थें रामदास रंका । नवाजिलें ॥

---

१ संशय, संकट, विकल्प. २ त्रासला. ३ रक्षणकर्ता. ४ प्रसिद्ध केलें.

सुंदर मूर्ति सुंदर गुण । सुंदर कीर्ति सुंदर लक्षण ।
सुंदरमठीं देव आपण । वास केला ॥

सुंदर पाहोन वास केला । दास संनिध ठेविला ।
अवघा प्रांतचि पावन केला । कृपाळुपणें ॥

बावी पोखरणी झरे । टांकीं विशाळ सुंदरें ।
ठाईं ठाईं विशाळ मनोहरें । स्थळें निर्मिलीं ॥

कडे कपाटें दरे दर्कुटें । पाहों जातां भयचि वाटे ।
ऐसे स्थळीं वैभव दाटे । देणें रघुनाथाचें ॥

अंतर्निष्ठ अखंडध्यानी । संनिध रामवरदायनी[1] ।
विश्वमाता त्रैलोक्यजननी । मूळमाया ॥

—विविधविषय २. १३७–१३८.

११२. प्रतापगडच्या भवानीचें स्तोत्र.

प्रपंचीं आमचे कुळीं । तुळजा कुळदेवता ।
नेणतां ऐकिलें होतें । जाणतां स्मरलें मनीं ॥

श्रेष्ठांची कामना होती । पुर्विली मनकामना ।
नौस[2] जो नौसिला होता । तो त्यापासुनि चुकला ॥

पुत्रची घेतला त्यांचा । जोगी करुनि सोडिला ।
ख्याति[3] दाविली मोठी । न्याय नीति चुकेचिना ॥

वैराग्य घेतलें पोटीं । सर्व संसार सांडिला ।
तुझिया दर्शना आलों । कृपादृष्टी नवाजिलों[4] ॥

तुझा नवाजिला आहे । महंत म्हणती जनीं ।
तुझेंची सर्वही देणें । सर्वही तुजपासुनी ॥

---

१ प्रतापगडची भवानी. २ नवस. ३ ख्याती ४ प्रसिद्ध झालों.

संसारीं मोकळें केलें । आनंदीं ठाव दिधला ।
तोडिली सर्वही चिंता । तूं माया सत्य जाहालें ॥
पुर्विल काय मी सांगों । ईच्छा पूर्ण परोपरीं ।
मागील आठवेनासें । केलें आश्चीर्य वाटलें ॥
सदानंदीं उदो[1] जाला । सुख संतोष फावला ।
पराधेनता गेली । सत्ता उदंड चालिली ॥
उदंड ऐकिलें होतें । रामासी वरु दीधला ।
मी दास रघुनाथाचा । मजही वरदायेनी ॥
श्रेष्ठांचा नौस जो होता । तो मी फेडीनसें म्हणें ।
पुष्प देउनि उतराई । ऐसें हें कल्पिलें मनीं ॥
तुळजापुर ठाकेना । चालिली पश्चिमेकडे ।
पारघाटीं जगन्माता । सद्य[2] येउनी राहिली ॥
ऐसें हें ऐकिलें होतें । हेत तेथेंचि पावला ।
पुष्पाची कल्पना होती । तेथें पुष्पचि दिधलें ॥
ऐसी तूं दयाळु माता । हेमपुष्पाचि घेतलें ।
संतुष्ट भक्तिभावानें । त्रैलोक्यजननी पाहा ॥
थोड्यानें श्लाघ्यता केली । थोर संतोष पावलों ।
उत्तीर्ण काये म्यां व्हावें । तुझे कृपेसी रोकडें ॥
तुझेंची तुजला दिल्हें । म्यां हें कोठुनि आणिलें ।
संकटें वारिलीं नाना । रक्षिलें बहुतांपरीं ॥
जीवींचें जाणते माता । तूं माता मज रोकडी ।
लोकांच्या चुकती माता । आचुक जननी मला ॥

---

१ उदय. २ हल्ली.

येकची मागणें आतां । द्यावें तें मजकारणें ।
तुझा तूं वाढवी राजा । सीघ्र आम्हांची देवतां ।
दुष्ट संव्हारिले मागें । ऐसें उदंड ऐकतों ।
परंतु रोकडें कांहीं । मूळ सामर्थ्य दाखवी ॥
देवाचीं राहिलीं सत्त्वें । तूं सत्त्व पाहासी किती ।
भक्तांसी वाढवीं वेगीं । ईच्छा पूर्ण परोपरीं ॥
रामदास म्हणे माझें । सर्व आतुर बोलणें ।
क्षमावें तुळजे माते । इच्छा पूर्णची ते करो ॥

—रामदासांची कविता २९३. १–२०.

११३. शिवाजीचें वर्णन.

निश्चयाचा महामेरु । बहुत जनांसि आधारु ।
अखंडस्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी ॥ १ ॥
परोपकाराचिया राशी । उदंड घडती जयासी ।
तयाचे गुणमहत्त्वासी । तुळणा कैंची ॥ २ ॥
नरपति हयपति गजपति । गडपति भूपति जळपति ।
पुरंदर आणि छत्रपति । शक्ति पृष्ठभागीं ॥ ३ ॥
यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।
पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ॥ ४ ॥
आचारशीळ विचारशीळ । दानशीळ धर्मशीळ ।
सर्वज्ञपणें सुशीळ । सकळां ठाईं ॥ ५ ॥
धीर उदार गंभीर । शूर क्रियेसी तत्पर ।
सावधपणें नृपवर । तुच्छ केले ॥ ६ ॥

तीर्थक्षेत्रें मोडिलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट जालीं ।
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥ ७ ॥

देवधर्मगोब्राह्मण । यांचें करावया संरक्षण ।
हृदयस्थ जाला नारायण । प्रेरणा केली ॥ ८ ॥

उदंड पंडित पुराणिक । कवीश्वर याज्ञिक वैदिक ।
धूर्त तार्किक सभानायक । तुमचे ठायीं ॥ ९ ॥

या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाहीं ।
महाराष्ट्र धर्म राहिला कांहीं । तुम्हांकारितां ॥ १० ॥

आणिकही धर्मकृत्यें चालती । आश्रित होऊनी कित्येक राहती ।
धन्य धन्य तुमची कीर्ति । विश्वीं विस्तारली ॥ ११ ॥

कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकांस धाक सुटले ।
कित्येकांस आश्रय जाले । शिव कल्याणराजा ॥ १२ ॥

तुमचे देशीं वास्तव्य केलें । परंतु वर्तमान नाहीं घेतलें ।
ऋणानुबंधें विस्मरण जालें । काय नेणूं ॥ १३ ॥

सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ती । सांगणें काय तुम्हांप्रती ।
धर्मस्थापनेची कीर्ती । सांभाळली पाहिजे ॥ १४ ॥

उदंड राजकारण तटलें । तेणें चित्त विभागलें ।
प्रसंग नसतां लिहिलें । क्षमा केली पाहिजे ॥ १५ ॥

११४. क्षात्रधर्म.

अल्पस्वल्प संसारधर्म । मागां बोलिलों राजधर्म ।
आतां ऐका क्षात्रधर्म । परम दुर्लभ जो ॥ १ ॥

जयास जिवाचें वाटे भय । त्यानें क्षात्रधर्म करूं नये ।
कांहीं तरी करूनि उपाये । पोट भरावें ॥ २ ॥

विन्मुख मरणीं नर्क होती । वांचून येतां मोठी फजिती ।
इहलोक परलोक जाती । पहाना कां ॥ ३ ॥

मारितां मारितां मरावें । तेणें गतीस पावावें ।
फिरोन येतां भोगावें । महद्भाग्य ॥ ४ ॥

नजर करारी राखणें । कार्य पाहुनि खतल करणें ।
तेणें रणशूराचीं अंतःकरणें । चाकित होती ॥ ५ ॥

जैसा भांडि[1]याचा गलोला[2] । निर्भय भारामधें[3] पडिला ।
तैसा क्षत्री रिचवला । परसैन्यांमध्यें ॥ ६ ॥

निःशंकपणें भार फुटती । परवीरांचे तवके तुटती ।
जैसा बाळिया घालुनि घेती । भैरी उठतां ॥ ७ ॥

ऐसे अवघेच उठतां । परदळाची कोण चिंता ।
हरणें लोळवी चित्ता । देखत जैसा ॥ ८ ॥

मर्दे तकवा सोडूं नये । म्हणजे प्राप्त होतो जय ।
कार्य प्रसंग समय । ओळखावा ॥ ९ ॥

कार्य समजेना अंतरें । तें काय झुंजेल विचारें ।
युद्ध करावें खबरदारें । लोक राजी राखतां ॥ १० ॥

दोन्ही दळें एकवटें । मिसळताती लखलखाटें ।
युद्ध करावें खणखणाटें । सीमा सांडुनी ॥ ११ ॥

देव मात्र उच्छेदिला । जित्यापरीस मृत्यु भला ।
आपुला स्वधर्म बुडविला । ऐसें समजावें ॥ १२ ॥

मराठा तितका मेळवावा । आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा ।
ये विषयीं न करितां तकवा । पूर्वज हांसती ॥ १३ ॥

---

१ तोफ. २ गोळा. ३ सैन्य.

मरणहाक तो चुकेना । देह वांचवितां वाचेना ।
विवेकी होऊन समजाना । काय करावें ॥ १४ ॥

भले कुळवंत म्हणावें । तेंही वेगीं हजीर व्हावें ।
हजीर न होतां कष्टावें । लागेल पुढें ॥ १५ ॥

एक जाती दोन जाती पावला । तो कैसा म्हणावा भला ।
तुम्हां सकळांस कोप आला । तरी क्षमा केली पाहिजे ॥ १६ ॥

देवद्रोही तितुके कुत्ते । मारूनि घालावे परते ।
देवदास पावती फत्ते । यदर्थीं संशय नाहीं ॥ १७ ॥

देव मस्तकीं धरावा । अवघा हलकल्लोळ करावा ।
मुलुखबडवा कां बुडवावा । धर्मसंस्थापनेसाठीं ॥ १८ ॥

विवेक विचार सावधपणें । दीर्घ प्रयत्न केलाचि करणें ।
तुळजावराचेनि गुणें । रामें रावण मारिला ॥ १९ ॥

अहो हे तुळजा भवानी । प्रसिद्ध रामवरदायिनी ।
रामदास ध्यातो मनीं । यन्निमित्त ॥ २० ॥

११६. शिवाजीची सनद.

श्री.

श्रीरघुपती. श्रीमारुती.

आश्विन शु॥ १० शके १६००.

श्रीसद्गुरुवर्य श्रीसकळतीर्थरूप श्रीकैवल्यधाम,

श्रीमहाराज स्वामीचे सेवेसीं.

चरणरज शिवाजी राजे यांनीं चरणावरी मस्तक ठेऊन विज्ञापना जे मजवर कृपा करुनु सनाथ केले. आज्ञा केली कीं तुमचा मुख्य धर्म राज्यसाधन करून धर्मस्थापना, देव-ब्राह्मणाची सेवा, प्रजेची पीडा दूर करुनु, पाळण, रक्षण करावें; हें व्रत संपादून

त्यांत परमार्थ करावा. तुम्हीं जें मनीं धराल तें श्री सिद्धीस पाववील त्याजवरून जो जो उद्योग केला व दुष्ट तुरुक (पा भे दुराढे)लोकांचा नाश करावा, विपुल द्रव्यें करुनु राज्यपरंपरा अक्षई चालेल ऐशीं स्थळें दुर्घट करावीं ऐसें जें जें मनीं धरिलें तें तें स्वामींनीं आशीर्वादप्रतापें मनोरथ पूर्ण केले

याउपरि राज्य सर्व संपादिलें तें चरणीं अर्पण करुनु सर्वकाळ सेवा घडावी ऐसा विचार मनीं आणिला तेव्हां आज्ञा जाहली कीं, " तुम्हांस पूर्वी धर्म सांगितले तेच करावेस तीच सेवा होय " ऐसें आज्ञापिलें.

यावरून निकटवास घडुनु वारंवार दर्शन घडावें; श्रीची स्थापना कोठें तरी होउनु सांप्रदाय शिष्य व भक्ती दिगंत विस्तीर्ण घडावी ऐसी प्रार्थना केली तेही आसमंतात् गिरिगव्हरीं वास करुनु चाफळीं श्रीची स्थापना करुनु सांप्रदाय शिष्य दिगंत विस्तीर्णता घडली.

त्यास चाफळीं श्रीची पूजा मोहोत्छाव ब्राह्मणभोजन, अतिथि, इमारत सर्व यथासांग घडावें. जेथें जेथें श्रीची मूर्तिस्थापना जाहाली तेथें उत्छाव पूजा घडावी यास राज्य संपादिलें यांतील ग्रामभूमी कोठें काय नेमावें ते आज्ञा व्हावी. तेव्हां आज्ञा जाहली कीं " विशेष उपाधीचें कारण काय ? तथापि तुमचे मनीं श्रीची सेवा घडावी हा निश्चय जाहला त्यास यथाअवकाश जेथें जें नेमावेसें वाटेल तें नेमावें, व पुढें जसा सांप्रदायाचा व राज्याचा व वंशाचा विस्तार होईल तैसें करीत जावें. " याप्रकारें आज्ञा जाहली.

यावरुनु देशांतरीं सांप्रदाय व श्रीच्या स्थापना जाहल्या त्यास ग्रामभूमीचीं पत्रें करून पाठविलीं. श्रीसंनिध चाफळीं एकशें एकवीस गांव सर्वमान्य व एकशें एकवीस गांवीं अकरा बिघे प्रमाणें भूमी व अकरा स्थळीं श्रीची स्थापना झाली. तेथें नैवेद्यपूजेस भूमि अकरा बिघे प्रमाणें नेमिले आहेती ऐसा संकल्प केला आहे. तो सिद्धीस नेहण्याविषयीं विनंति केली तेव्हां संकल्प केला तो परंपरेनें सेवटास न्याहावा ऐसी आज्ञा जाहली त्याजवरून सांप्रत गाऊ व भूमी नेमिले तपशील—

१ मौजे चाफळ, मौजे नाणेगांव......वगैरे गांवें ३२.

२ मौजे दहीफळ बुद्रुक, परगणे हवेली, श्रीभ्रष्टाचे समाधीकडे देह २

३ गांव गंना जमीन बिघे चारशें एकोणीस.

धान्य गल्ला हरजिनसी खंडी १२१ एकशें एकवीस. येकूण दरोबस्त सर्वमान्य गांऊ तेहेतीस व जमीन बिघे गाऊगना चारशें येकोणीस व कुरण एक श्रीचे पूजा उछाहाबद्दल संकल्पांतील सांप्रत नेमिले व उछाहाचे दिवसास व इमारतीस नक्की ऐवज व धान्य समयाचे समयास प्रविष्ट करीत येणें करोन अक्षई उछाहादि चालविण्याविषयीं आज्ञा असावी

राज्याभिषेक ५ कालयुक्ताक्षि नाम संवत्सरे अश्विन शुद्ध १० दशमी बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

११६. आनदवनभुवन.

जन्मदुःखें जरादुःखें। नित्य दुःखें पुनः पुन्हा।
संसार त्यागणें जाणें। आनंदवनभुवना॥

कष्टलों कष्टलों देवा। पुरे संसार जाहला।
देहत्यागासि येणें हो। आनंदवनभुवना॥

स्वधर्मा आड जें विघ्नें। तें तें सर्वत्र उठिलीं।
लाटिलीं कुटिलीं देवें। दापिलीं कापिलीं बहु ॥
खोळले[1] लोक देवाचे। मुख्य देवचि उठिला।
कळेना कायरे होतें। आनंदवनभुवनीं ॥
देवदेव बहु देव। नाना देव परोपरी।
दाटणी जाहली मोठी। आनंदवनभुवनीं ॥
कल्पांत मांडला मोठा। म्लेंच्छ दैत्य बुडावया।
कैपक्ष घेतला देवीं। आनंदवनभुवनीं ॥
बुडाले सर्वही पापी। हिंदुस्तान बळावलें।
अभक्तांचा क्षयो झाला। आनंदवनभुवनीं ॥
पूर्वी जे मारिले होते। तेचि आतां बळावले।
कोपला देव देवांचा। आनंदवनभुवनीं ॥
येथून वाढिला धर्मु। रमाधर्म समागमें।
संतोष मांडला मोठा। आनंदवनभुवनीं ॥
बुडाला औरंग्या पापी। म्लेंच्छ संहार जाहला।
मोडिलीं मांडिलीं क्षेत्रें। आनंदवनभुवनीं ॥
उदंड जाहले पाणी। स्नानसंध्या करावया।
जपतप अनुष्ठानें। आनंदवनभुवनीं ॥
लिहिला प्रत्ययो आला। मोठा आनंद जाहला।
चढता वाढता प्रेमा। आनंदवनभुवनीं ॥
बंड पाखंड उडालें। शुद्ध अध्यात्म वाढलें।
चढता वाढता प्रेमा। आनंदवनभुवनीं ॥

---

१ खवळले.

रामवरदायिनी माता । गर्द घेऊनि उठली ।
मर्दिले पूर्वींचे पापी । आनंदवनभुवनीं ॥

प्रत्यक्ष चालली राया । मूळमाया समागमें ।
नष्ट चांडाळ ते खाया । आनंदवनभुवनीं ॥

भक्तांसि रक्षिले मागें । आतांही रक्षिते पहा ।
भक्तांसि दिधलें सर्वै । आनंदवनभुवनीं ॥

देवभक्त येक जाले । मिळाले जीव सर्वही ।
संतोष पावले तेथें । आनंदवनभुवनीं ॥

मनासी प्रचीत आली । शब्दीं विश्वास वाटला ।
कामना पुरती सर्वै । आनंदवनभुवनीं ॥

—रामदासांची कविता ४२१. १–९३.

१५ सांप्रदायिक.

११७. रामदासांचे गुरु कोण ?

आदिनारायण सद्गुरु आमुचा । शिष्य झाला त्याचा महाविष्णु ॥१॥
तयाचा जो शिष्य तो जाणावा हंस । तेणें ब्रह्मयास उपदेशिलें ॥२॥
ब्रह्मदेवें केला उपदेश वसिष्ठा । तेथें धरा निष्ठा शुद्धभावो ॥ ३ ॥
वसिष्ठ उपदेशी श्रीरामरायासी । रामें रामदासीं उपदेशिलें ॥ ४ ॥
उपदेश देवोनि दिधला मारुती । स्वयें रघुपती निरवीता ॥ १ ॥
निरवितां तेणें झालों रामदास । संसारीं उदास म्हणोनियां ॥ २ ॥
म्हणोनि आमुचे कुळीं कुळदैवत । राम हनुमंत आत्मरूपी ॥ ३ ॥
आत्मरूपी झाला रामीरामदास । केला उपदेश दीनोद्धारा ॥ ४ ॥

११८. रामदासांचें स्वचरित्रकथन.

नमो अधिष्ठाता विष्णु मुख्य साधु ।
तेथूनियां बोधु विधीलागीं ॥ १ ॥

विधीपासुनियां ज्ञान विधिसुता ।
तेंचि ज्ञान प्राप्त वसिष्ठासी ॥ २ ॥

वसिष्ठें उपदेश केला रामचंद्रा ।
तोचि महारुद्रा हनुमंता ॥ ३ ॥

हनुमंत कलीमाजि चिरंजीव ।
झाले देव सर्व बौद्धरूप ॥ ४ ॥

बौद्ध नारायण होऊनी बैसला ।
उपाव बोलिला व्यासमुनि ॥ ५ ॥

व्यासमुनि बोले भविष्यपुराण ।
जग उद्धरणें कलीमाजी ॥ ६ ॥

कलीमाजी गोदातीरीं पुण्य क्षेत्र ।
तेथें वातपुत्र अवतरे ॥ ७ ॥

अवतरे अभिधानी रामदास ।
कृष्णातीरीं वास जगदुद्धारा ॥ ८ ॥

जगदुद्धारासाठीं श्रीरामा सांकडें ।
केलें वाडेंकोडें भक्तिपंथें ॥ ९ ॥

भक्तिपंथें मोठा केला श्रीरामानें ।
जंबू अभिधानें ग्राम तेथें ॥ १० ॥

तेथें ब्रह्मनिष्ठ अधिष्ठाता पूर्ण ।
सूर्य नामा जाण द्विजवर्य ॥ ११ ॥

द्विजवर्य सूर्य जैसा तपोधन ।
अद्भुत विंदान झालें तेथें ॥ १२ ॥

झाली रामनवमी मध्य अष्टमीसी ।
अर्धरात्रीं त्यासी दूत आले ॥ १३ ॥

दूत आले पुढं घालोनि चालिले ।
महाद्वारा आले भीम जेथें ॥ १४ ॥

भीमदेवालयीं नेऊनी तयासी ।
तेथें उभयतांसी देखियेलें ॥ १५ ॥

देखियेलें राजपुत्र सूर्यवंशी ।
झांपड नेत्रांसी पडे तेव्हां ॥ १६ ॥

पडे तेव्हां जैसा दंडवत भूमी ।
मग अंतर्यामीं बोलाविलें ॥ १७ ॥

बोलवूनि माथां ठेवी सव्य पाणी ।
मंत्र सांगे कर्णी रामनाम ॥ १८ ॥

नाम सांगुनियां ताम्रमूर्ति रम्य ।
पट्टाभिश्रीराम दिधला तया ॥ १९ ॥

तया दिला वर तुज पुत्र होतील ।
ध्वज उभारतील रामदास्यें ॥ २० ॥

रामदास्य झालें धन्य वंशोद्धार ।
बोलोनि सत्वर गेत्र झाले ॥ २१ ॥

झाला रामनवमी महोत्सव थोर ।
मध्यान्हीं सत्वर जन्म झाला ॥ २२ ॥

---

१ लीला, करणी. २ मारुति.

जन्म झाला झाला देव वंशा आले ।
उपासना चाले राघवाची ॥ २३ ॥

राघवाची भक्ति सुखाची विश्रांति ।
पितयाची शांति झाली पुढें ॥ २४ ॥

पुढें ज्येष्ठबंधु न सांगेचि कांहीं ।
सुखें देवालयीं निद्रा केली ॥ २५ ॥

निद्रा केली तेथें श्रीरामें उठवूनी ।
तोचि मंत्र कानीं सांगितला ॥ २६ ॥

सांगितला बोध रामीरामदासा ।
गुरूच्याहि वंशा निरोपिलें ॥ २७ ॥

११९. हनुमंत आमुची कुळवल्ली.

हनुमंत आमची कुळवल्ली । राममंडपीं वेला गेली ।
श्रीरामभक्तीनें फळली । रामदास बोले ॥ १॥

आमुचे कुळीं हनुमंत । हनुमंत आमुचें दैवत ।
तयावीण आमुचा परमार्थ । सिद्धीतें न पवे कीं ॥ २ ॥

साह्य आह्मांसी हनुमंत । आराध्य दैवत श्रीरघुनाथ ।
गुरु श्रीराम समर्थ । उणें काय दासासीं ॥ ३ ॥

दाता एक रघुनंदन । वरकड लंडी देईल कोण ।
हे सोडोन आम्हीं जन । कोणाप्रति मागावें ॥ ४ ॥

ह्मणोनि आम्हीं रामदास । रामचरणीं आमुचा विश्वास ।
कोसळोनि पडो रे आकाश । आणिकाची वास[1] न पाहूं ॥५॥

स्वरूपसांप्रदाय अयोध्यामठ । जानकी देवी रघुनाथ दैवत ।
मारुती उपासक नेमस्त । वाढविला परमार्थ रामदासीं ॥ ६ ॥

---

१ वाट.

१२०. "भीमरूपी" स्तोत्र.

भीमरूपी महारुद्रा । वज्रहनुमान मारुती ।
वनारी अंजनीसूता । रामदूता प्रभंजना ॥ १ ॥

महाबळी प्राणदाता । सकळां उठवी बळें ।
सौख्यकारी शोककहारी । धूर्त वैष्णव गायका ॥ २ ॥

दीननाथा हरीरूपा । सुंदरा जगदांतरा ।
पातालदेवताहंता । भव्य सिंदुरलेपना ॥ ३ ॥

लोकनाथा जगन्नाथा । प्राणनाथा पुरातना ।
पुण्यवंता पुण्यशीला । पावना परितोषका ॥ ४ ॥

ध्वजांगें उचली बाहो । आवेशें लोटला पुढें ।
कालाग्नी कालरुद्राग्नी । देखतां कांपती भयें ॥ ५ ॥

ब्रह्मांड माईल नेणों । आवळे दंतपंगती ।
नेत्राग्नी चालिल्या ज्वाळा । भ्रकुटी ताठिल्या बळें ॥ ६ ॥

पुच्छ तें मुर्डिलें माथां । किरीटी कुंडलें बरी ।
सुवर्ण कटि कांसोटी । घंटा किंकिणी नागरा ॥ ७ ॥

ठकारे पर्वता ऐसा । नेटका सडपातळू ।
चपळांग पाहतां मोठें । महाविद्युल्लतेपरी ॥ ८ ॥

कोटिच्या कोटि उड्डाणें । झेंपावे उत्तरेकडे ।
मंद्राद्रीसारिखा द्रोणू । क्रोधें उत्पाटिला बळें ॥ ९ ॥

आणिला मागुती नेला । आला गेला[१] मनोगती ।
मनासी टाकिलें मागें । गतीसी तुळणा नसे ॥ १० ॥

---

१ सुंदर.

अणूपासूनि ब्रह्मांडा । एवढा होत जातसे ।
ब्रह्मांडाभोंवतें वेढे । वज्रपुच्छें करूं सके ॥ ११ ॥

तयासी तूळणा कोठें । मेरु मंदार धाकुटे ।
तयासी तूळणा कैंची । ब्रह्मांडीं पाहतां नसे ॥ १२ ॥

आरक्त देखिलें डोळां । गिळिलें सूर्यमंडळा ।
वाढतां वाढतां वाढे । भेदिलें शून्यमंडळा[1] ॥ १३ ॥

भूतप्रेतसमंधादि । रोगव्याधि समस्तही ।
नासती तुटती चिंता । आनंदे भीमदर्शनें ॥ १४ ॥

हे धरा पंधरा श्लोकी । लाभली शोभली भली ।
दृढ देहो निसंदेहो । संख्या चंद्रकळा[2] गुणें ॥ १५ ॥

रामदासीं अग्रगण्यू । कपिकूळासि मंडणू ।
रामरूप अंतरात्मा । दर्शनें दोष नासती ॥ १६ ॥

१२१. छत्रसिंहासनीं.

छत्रसिंहासनीं अयोध्येचा राजा । नांदतसे माझा मायबाप ॥ १ ॥
माझा मायबाप त्रिलोकीं समर्थ । सर्व मनोरथ पूर्ण करी ॥ २ ॥
पूर्ण प्रतापाचा कैवारी देवांचा । नाथ अनाथांचा स्वामी माझा ॥३॥
स्वामी माझा राम योगियां विश्राम । सांपडलें वर्म थोर भाग्यें ॥४॥
थोर भाग्य ज्याचें राम त्याचे कुळीं । संकटीं सांभाळी भावबळें॥५॥
भावबळें जिहीं धरिला अंतरीं । तया क्षणभरी विसंभेना ॥ ६ ॥
विसंभेना कदा आपुलया दासासी । रामीरामदासीं कुळस्वामी ॥७॥

१२२. रामाचें दर्शन कव्हां होईल ?

आज्ञेप्रमाणें परमार्थ । केला जाण म्यां यथार्थ ॥ १ ॥
आतां देहाचा कंटाळा । आला असे जी दयाळा ॥ २ ॥

---

१ आकाश २ सोळा.

आतां एकचि मागणें । कृपा करूनियां देणें ॥ ३ ॥
ज्याची दर्शनाची आशा । त्याची पुरवावी इच्छा ॥ ४ ॥
ऐक सखया वचन । त्यासी देईन दर्शन ॥ ५ ॥
तेरा अक्षरी मंत्राचा । जप करील जो साचा ॥ ६ ॥
गणना होतां तेरा कोटी । त्यासी भेटेन जगजेठी ॥ ७ ॥
भय न धरावें मनीं । बहू बोलिलों म्हणुनी ॥ ८ ॥
नलगे आसनीं बसावें । नलगे अन्नही त्यागावें ॥ ९ ॥
येतां जातां धंदा करितां । जपसंख्या मात्र होतां ॥ १० ॥
तेरा कोटी गणना तेची । पापें निरसतीं जन्मांतरींचीं ॥ ११ ॥
त्यासी देईन दर्शनें । तात्काळचि मुक्त होणें ॥ १२ ॥
ऐसा वर होतां जाण । दास झाला सुखसंपन्न ॥ १३ ॥

१६. अभंग, पदें, वगैरे.

१२३. " राघवाची कास न सोडी सत्य. "

जठरीं लागो क्षुधा होत नाना आपदा ।
भक्तिप्रेम कदा न संडी सत्य ॥ १ ॥
शब्द न फुटे तरी चिंतीन अंतरीं ।
भक्तिप्रेम परी न संडी सत्य ॥ २ ॥
नानापरी आघात चिरकाल होत ।
भक्तिप्रेमामृत न संडी सत्य ॥ ३ ॥
दाहूं वडवानळ अथवा दंशू काळ ।
भक्तिप्रेमबळ न संडी सत्य ॥ ४ ॥
आतांच हा देह राहो अथवा जावो ।
भक्तिप्रेमभावो न संडी सत्य ॥ ५ ॥

म्हणे रामीरामदास वरीं पडो आकाश ।
राघवाची कास न सोडी सत्य ॥ ६ ॥

१२४. आतां तरी जाय जाय.

आतां तरि जाय जाय जाय । धरि सद्गुरुचे पाय ॥ ध्रु० ॥
संकल्प विकल्प सोडुनि राहे । दृढ धरुनी पाय पाय पाय ॥ १ ॥
नामस्मरण ज्या मुखिं नाहीं । त्यानें वांचुनि काय काय काय ॥२॥
मानवतनु ही न ये मागुती । बरें विचारुनि पाहें पाहें पाहें ॥ ३ ॥
आत्मानात्मविचार न करितां । व्यर्थ प्रसवली माय माय माय ॥४॥
सहस्र अन्याय जरी त्वां केले । क्षमा करिल गुरु माय माय माय॥५॥
रामदास म्हणे नामस्मरणें । भिक्षा मागुनि खाय खाय खाय ॥६॥

१२५. देव जवळ असून भेट नाहीं.

देव जवळीं अंतरीं । भेटी नाहीं जन्मवरी ॥ १ ॥
मूर्ति त्रैलोक्यीं संचली । दृष्टि विश्वाची चुकली ॥ २ ॥
भाग्यें आले संतजन । झालें देवाचें दर्शन ॥ ३ ॥
रामदासीं योग झाला । देहीं देव प्रगटला ॥ ४ ॥

१२६. एकही क्षण वायां न दवडितां देवाचें चिंतन.

शिंक जांभई खोकला । तितुका काळ व्यर्थ गेला ॥ १ ॥
आतां ऐसें न करावें । नाम जीवीं तें धरावें ॥ २ ॥
श्वास उश्वास निघतो । तितुका काळ व्यर्थ जातो ॥ ३ ॥
पात्या पातें न लगत । तितुकें वय व्यर्थ जात ॥ ४ ॥
लागे अवचित उचकी । तितुकें वय काळ लेखी ॥ ५ ॥
म्हणे रामीरामदास । होतो आयुष्याचा नाश ॥ ६ ॥

१२७. देवाचा वियोग नाहीं तो योग.

योगियांचा देव मज सांपडला । थोर लाभ जाला येकायेकीं ॥ १ ॥
येकायेकीं येक त्रैलोक्यनायेक । देखिला सन्मुख चहूंकडे ॥ २ ॥
चहूंकडे देव नित्य निरंतर । व्यापूनी अंतर समागमें ॥ ३ ॥
समागम मज रामाचा जोडला । वियोग हा केला देशधडी ॥ ४ ॥
देशधडी केला विवेकें वियोग । रामदासीं योग सर्व काळ ॥ ५ ॥

१२८. देव एकाएकीं प्रसन्न होतो.

आलभ्याचा लाभ आकस्मात जाला । देव हा वोळला येकायेकीं ॥१॥
येकायेकीं सुख जाहालें येकट । वेर्थ खटपट साधनाची ॥ २ ॥
साधनाची चिंता तुटली पाहातां । वस्तुरूप होतां वेळ नाहीं ॥ ३ ॥
वेळ नाहीं मज देवदरुशणा । सन्मुखाचि जाणा चहूंकडे ॥ ४ ॥
चहूंकडे मज देवाचें स्वरूप । तेथें माझें रूप हारपलें ॥ ५ ॥
हारपलें चित्त देवासी चिंतीतां । दास म्हणे आतां कोठें आहे ॥ ६ ॥

१२९. देवाचें सर्वत्र दर्शन.

संताचेनि संगें देव पाठीं लागे । सांडूं जातां मागें सांडवेना ॥ १ ॥
सांडवेना देव सदा समागमीं । बाह्यअंतर्यामीं सारिखाची ॥ २ ॥
सारिखाची कडां कपाटीं सीखरीं । गृहीं वनांतरीं सारिखाची ॥३॥
सारिखाची तीर्थीं सारिखाची क्षत्रीं[१] । दिवा आणि रात्रीं सारिखाची ॥४॥
सारिखाची अंत नाहीं तो अनंत । रामदासीं कींत[२] मावळला ॥ ५ ॥

१३०. राघवाच्या भेटीनें अमृतत्व.

बहु काळ गेले देवासी धुंडीतां । देव पाहों जातां जवळीच ॥ १ ॥
जवळीच असे पाहातां न दिसे । संन्नीधनी वसे रात्रदिस ॥ २ ॥
रात्रदिस देव बाह्यअभ्यांतरीं । जीवा क्षणभरी विसंभेना ॥ ३ ॥
विसंभेना परी जीव हे नेणती । जाती अधोगती म्हणोनियां ॥ ४ ॥

---

१ क्षेत्र. २ किंतु, शंका.

म्हणोनीयां सदा सावध असावें। विमुख नसावें राघवेंसीं ॥ ५ ॥
राम पूर्वपुण्यें जालीया सन्मुख। मग तो विमुख होऊं नेणें ॥ ६ ॥
होऊं नेणे राम सर्वांगें सुंदर। नित्य निरंतर मागें पुढें ॥ ७ ॥
मागें पुढें सन्मुखची चहुंकडे। भेटी हे निवाडें राघवाची ॥ ८ ॥
राघवाची भेटी जाल्यां नाहीं तुटी। मग कल्पकोटी चिरंजीव ॥ ९ ॥
चिरंजीव होये राघवीं मिळतां। तेथें पाहों जातां मृत्य नाहीं ॥१०॥
नाहीं जन्म मृत्य नाहीं येणें जाणें। स्वरूपीं राहाणें सर्वकाळ ॥११॥
सर्वकाळ मन तदाकार होय। जरी राहे सोये श्रवणाची ॥ १२ ॥
श्रवणाची सोये संतांचेनि संगें। विचारें विभागे अहंभाव ॥ १३ ॥
अहंभावें राम भेटला न जाये। जवळींच होये दुरी केसा ॥ १४ ॥
दुरी केसा होये अहंभावें करी। जवळीच चोरी आपणासी ॥ १५ ॥
आपणासी चोरी सबाह्यअंतरीं। आणि सृष्टीभरी नांदतसे ॥ १६ ॥
नांदतसे अंत नाहीं तो अनंत। जाणतील संत अनुभवी ॥ १७ ॥
अनुभवी जाणे येथींचीये खुणें। येरां वीटवाणें वाटईल[1] ॥ १८ ॥
वाटईल सुख संत सज्जनासी। रामीरामदासीं भेटी जाली ॥ १९ ॥

१३१. विठ्ठल व राम.

एथें उभा कां श्रीराम। मनमोहन मेघश्याम ॥ १ ॥
काय केले धनुष्यबाण। कर कटावरी ठेवून ॥ २ ॥
काय केली सीताबाई। येथें राहीरखुमाई ॥ ३ ॥
काय केलें वानरदळ। एथें मेळविले गोपाळ ॥ ४ ॥
काय केली अयोध्यापुरी। एथें वसविली पंढरी ॥ ५ ॥
काय केली शरयूगंगा। एथें आणिली चंद्रभागा ॥ ६ ॥
रामदासीं जैसा भाव। तैसा झाला पंढरिराव ॥ ७ ॥

---

१ वाटेल

१७ स्फुट प्रकरणं.

—:०:—

१३२. शक्ति व युक्ति.

प्रतापगिरिचे ठाईं । आदिशक्ती विराजते ।
कामना पुरती तेथं । प्रचीती रोकड्या जनीं ॥

शक्तीनें पावती सुखें । शक्ती नसतां विटंबणा ।
शक्तीनें नेटका प्राणी । वैभवें भोगितां दिसे ॥

कोण पुसे अशक्ताला । रोगीसें बरोंडी दिसे ।
कळा नाहीं कांती नाहीं । युक्ती बुद्धी दुरावली ॥

साजिरी शक्ती तों काया । काया मायाची वाढवी ।
शक्ती तों सर्वही सुखें । शक्ती आनंद भोगवी ॥

शक्तीनें मिळती राज्यें । युक्तीनें येत्न होतसे ।
शक्ती युक्ती जये ठाईं । तेथें श्रीमंत धांवती ॥

युक्तीनें चालती सेना । युक्तीनें युक्ती वाढवी ।
संकटीं आपणां रक्षी । रक्षी सेना परोपरी ॥

फित्व्यानें बुडती राज्यें । खबर्दारी असेचिना
युक्ती ना शक्ती ना वेगीं । लोक राजी असेचिना ॥

असो हें बोलणें जालें । युक्तीविण कामा नये ।
युक्तीला पाहिजे शक्ती । तस्मात् शक्ती प्रमाण हे ॥

मुक्त केल्या देवकोंडी । सर्वहि शक्तीच्या बळें ।
समर्थ भवानी माता । समर्था वरु दीधला ॥

---

१ दुकाळलेला. २ फितुरी. ३ त्वारित, वेगान.

रामवरदायिनी माता । दासें धुंडुन काढिली ।
वोळखी पडितां ठाईं । भिन्न भेद असेचिना ॥

उदो उदो तुझा उदो । जाहला सचराचरीं ।
गोंधळु घातला देवीं । ब्रह्माविष्णुमहेश्वरीं ॥

मातेसी काय चोरावें । सर्वही ठाउकें तिला ।
उत्तीर्ण व्हावया नाहीं । तेची ते सचराचरीं ॥

बोलणें चालणें तीचें । देखणें चाखणें सदा ।
आखंड खेळते आंगीं । प्राणिमात्रांचिये पाहा ॥

—रामदासांची कविता ४३६.२२–५७.

१३३. देव व देउळें.

देहेदेवाळयामधें । पाहाणें देव तो बरा ।
देव सांडुनी देवाल्यें । वर्णिती सर्वही कवी ॥

दिसेना लोचनाला रे । घाला रे मन त्यामधें ।
येकला सर्व देवाळीं । गुप्त नाना परी वसे ॥

आनंत कोटि देवाल्यें । त्यामध्यें येकला प्रभु ।
दीपानें दिसेना नाहीं । त्यानें त्यासचि पाहाणें ॥

उजेडे दिसेना नाहीं । आंधारें गुप्त होय ना ।
कदा हातासी लागेना । सर्वथा पूजीतां नये ॥

पूजीतां सर्व देवाल्यें । तेणें तो तृप्त होतसे ।
प्रतक्ष वर्ततें आतां । पाहा रे विवेकी तुम्हीं ॥

देवाल्यें वर्णिती ज्ञाते । ते ज्ञाते नव्हती कदा ।
देव वर्णील तो ज्ञाता । ज्ञानें मोक्षची पावतो ॥

मोडलीं जीर्ण देवाल्यें । तेंचीं लोकांसी मानती ।
भांडती देवळासाठीं । देव चुकोनि राहिला ॥
शरीरमात्र देवाल्यें । जीर्ण सांडुनी जातसे ।
नूतनें रम्य देवाल्यें । त्यामध्यें देव नाटकु ॥
ठकु रे ठकु रे मोठा । ठकीतो जनमानवी ।
मानवी दानवी काया । काया माया पाहा बरी ॥
थोर देवाल्य मुळींचें । ईश्वरु जगदेश्वरु ।
देवदेव्या बहुरूपा । अर्धनारीनटेश्वरु ॥
त्यापुढें तीन देवाल्यें । ब्रह्मा विष्णु महेश्वरु ।
तया अभ्यांतरीं देवो । तो देव सत्य जाणिजे ॥
तोचि जो तो हा जाणा । नानां देवाळयांमधें ।
औतरे[1] देवळामधें । त्यासी औतार बोलिजे ॥
आतां म्यां काये सांगावें । सांगावें त्या परमेश्वरा ।
अखंड अंतरीं ध्यावें । जावें रे निश्चळाकडे ॥

—रामदासांची कविता ४३९. १–२२.

१३४ गुरुशिष्यसंवादात्मक दासबोधाचा सोलीव अर्थ.

धैर्याचें आसन बळकट । आणि इंद्रियें वोढुनी सघट ।
धरे ऊर्ध्वपंथें वाट नीट । अढळपदीं लक्ष लावी ॥ १५ ॥
तैं मार्गाची करूं नव्हाळी । प्रथम घंटा नादाची नवाळी ।
दुसरी किंकिणीची मोवाळी । तिसरी अनुहत कोल्हाळ ॥१७॥
आतां अग्रीं लक्ष लावी । काय दिसेल तें न्याहाळीं ।
चंद्रज्योती प्रकाशली । विभु नांधिला बळकट ॥ १८ ॥

१ अवतार घेतो.

तें सुख अंतरीं घेऊनी। पुढें चाल करी संगमीं।
तेथें विजु ऐशा कामिनी। चमकताती सुवर्णरंग॥ १९॥
तेंहि जाणोनि मागें सारी। पुढें सूर्यबिंब अवधारीं।
ज्वाळा निघती परोपरी। दंडळूं नको कल्पांतीं॥ २०॥
अनंतभानु तेज अद्भुत। खदिरांगार ज्वाळा उसळत।
धारिष्ट तेथें न निभत। दुर्घट विभु तेथींचा॥ २२॥
तेथें हुशारीचें काम। अग्रीं लक्ष घालूनि नेम।
तीर लावून सुगम। मागें सारी सूर्यातें॥ २३॥
पुढें दिसेल जें नवल। तें पाहीं हंसमेळ।
चंद्रकिरण शीतळ। पाहसी तूं मम वत्सा॥ २४॥
तेव्हां मागील दाह शमेल। शीतलाई सर्वांग होईल।
चंद्राची प्रभा सुढाळ। फडफडीत चांदणें॥ २५॥
तोचि डोळियाचा डोळा पाहीं। देहातीत वर्म विदेही।
चिन्मय सुखाची नवाई। भोगी आपुलें कीं गा॥ २६॥
अनुभवाची शीग भरली। आम्रापरी उसळली।
भूमंडळीं प्रभा पडली। कर्पूरवर्ण नभ झालें॥ २७॥
तया मध्यभागीं सघन। अढळ पद देदीप्यमान।
उर्वरित ब्रह्म जाण। ध्रुव बैसला अढळतें॥ २८॥
तें तुझें स्वरूप नेटवोटें। जेथें समस्त जाणणें आटे।
ऐके जालासि धिटे। बळकटपणें बलाढ्य॥ २९॥
ऐसें सुख योगियां लाधलें। तेव्हां देहाचें मरण गेलें।
सांगणें ऐकणें हरालें। एकत्वपणें एकचि॥ ३०॥

— सोंलीव अर्थ १९—३०.

१३५. श्रीसमर्थकृत पांगूळ

भरत गा खंडामाजी । शरयूतीर ब्रा गांव ।
धर्माचें नगर तेथें । राज्य करी रामराव ।
पांगुळां पाय देतो । देव जानकीचा नाथ ।
जाईन मी तया ठायां । देवा उत्तम तो ठाव ॥ १ ॥

राघवाचा धर्म जागो । (सर्व) अधर्म भागो ।
अज्ञान निरसोनियां । विज्ञानीं लक्ष लागो ॥ ध्रु० ॥

मीपणाचे मोडले पाय । ह्मणउनि पांगूळ जालों ।
तूंपणाची कीर्ति देई । ऐकोनियां शरण आलों ।
मीतूंपण निरसीं माझें । भजनभिंतीवरि बैसलों ।
प्रेमफडकें पसरोनियां । कृपादान मागों आलों ॥ २ ॥

जनीं येक तूंचि दाता । म्हणुनि आलों मागावया ।
मागणें निरसे जेणें । ऐसें दे गा रामराया ।
नवविधा दुभतें देई । भावहलगा बैसावया ॥
ज्ञानकाठीं देई करीं । वैराग्यबोल पांघराया ॥ ३ ॥

दासीहातीं देवविसी । तें मी नेघें सर्वथा ।
द्वैतदान नेघें जाण । दोन वेळे आणीतां ।
अपूर्णता देऊं नको । पूर्ण करी निःकामता ।
आपणा ऐसें दान देई । तूं तरी इच्छेचा दाता ॥ ४ ॥

तुझे कृपेचा कांबळा देई । मज पांगुळाकारणें ।
माया मोहो हींव वातें । तें हें निवारें जेणें ।
निःकाम भाकर देई । कामक्षुधा हरे जेणें ।
बोधाचें ताक पाजीं । शब्द खुंटे घालेपणें ॥ ५ ॥

रामदास पांगुळासी । रामें दीधलीयां दान ।
घेणेंचि निरसलें । कैंची मागण्याची खूण ।
देणें घेणें निरसोनीयां । पूर्ण केलें परीपूर्ण ।
दाता ना याचक तेथें । सहजीं सहज संपूर्ण ॥ ६ ॥

—विविधविषय २. ८९.

समाप्त.

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें

1 **Academy of Philosophy and Religion**
Poona Branch, Poona (D. G.)

२ अध्यात्मविद्यापीठ, पोस्ट निंबाळ, जिल्हा विजापूर.

३ लक्ष्मण नारायण गोडबोले, बुकसेलर, पुणें २

४ मॅनेजर, नवीन किताबखाना, पुणें २

५ मे. परचुरे पुराणिक मंडळी, बुकसेलर, माधवबाग मुंबई, ४

६ मॅनेजर, बॉंबे बुक डेपो, गिरगांव-मुंबई ४